॥ श्रीः ॥

अनुभवामृत

॥ श्री धन्वन्तरये नमः ॥

लेखक

वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर

प्रधान चिकित्सक– शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालय व रुग्णालय
प्राचार्य– शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय, सोलापूर
संपादक– जीवक मासिक, सोलापूर
सभासद– महाराष्ट्र फॅकल्टी ऑफ आयुर्वेद, मुंबई
सभासद– आयुर्वेद फॅकल्टी ऑफ पुणे विद्यापीठ
माजी प्राध्यापक– पोस्ट ग्रॅज्युएट क्लासेस (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे)
सल्लागार चिकित्सक– कामगार-विमा-योजना, सोलापूर.

प्रकाशक–
वैद्य नृ. ना. बागेवाडीकर
आयुर्वेद चिकित्सक
१४० गोल्डफिंच पेठ, सोलापूर १.

प्रथम आवृत्ति–
विजया दशमी
शके १८९३
सन १९७१

किंमत १५ रुपये

मुद्रक–
कुमुदचंद्र फुलचंद शाह
मे. सन्मति मुद्रणालय,
१६६, शुक्रवार, सोलापूर २.

*** सखाराम नेमचंद जैन औषधालयाचे संस्थापक ***

स्व. श्रीमान् शेठ सखाराम नेमचंद दोशी

◆ यांना अर्पण ◆

॥ श्री धन्वन्तरये नमः ॥

लेखकाचें निवेदन

माझ्याकडून एखादा ग्रंथ लिहिला जाईल याची कल्पनाहि कधीं मनांत आली नव्हती. ग्रंथलेखन हें कार्य सोपें नाहीं, याची जाणीव असल्यामुळेंच ग्रंथलेखनाचा विचार मनांतून काढून टाकला होता. पण योगायोग निराळा असल्यामुळें हा 'अनुभवामृत' ग्रंथ लिहिला गेला. या लेखनामागील घटना येथें नमूद करणें आवश्यक आहे.

गेल्या वर्षी मुंबईस कांहीं कामानिमित्त गेलो होतों. तेथें माझा मुक्काम कै. वा. वैद्य ना. ह. ऊर्फ नाना जोशी यांचेकडे नेहमीप्रमाणें होता. रात्रीं आमच्या गप्पा सुरू झाल्या. त्यांत सखाराम नेमचंद जैन औषधालय सुरू होऊन ५० वर्षें पूर्ण झाली आहेत म्हणून संस्थेचा सुवर्ण महोत्सव करण्याचे योजिले आहे, तरी आपण आम्हास उत्सव उत्तमरीतीनें साजरा करण्यास मदत करावी अशी त्यांना विनंती केली. ती त्यांनीं मान्य करून संस्थेचा सुवर्ण महोत्सव दिनांक ६–७ मार्च १९७१ रोजीं मोठ्या थाटानें साजरा करण्यास सहाय्य केलें.

वैद्य नाना जोशी यांनीं या सुवर्ण महोत्सवाच्यानिमित्तानें तुम्ही आम्हास काय देणार असा प्रश्न केला. मी म्हटलें 'अहो नाना, मी तुम्हास काय देणार ! तुम्हास देण्यासारखे मजजवळ काय आहे !' तेव्हां त्यांनीं चटकन् उत्तर दिलें कीं 'तुमच्याजवळ ५० वर्षांच्या आयुर्वेदीय चिकित्सेचा अनुभव आहे. तो आम्हास पाहिजे.' मी म्हटले 'अहो नाना, ही गोष्ट सोपी नाहीं ! ग्रंथ लेखनाचें तंत्र मला माहीत नाहीं. व तसेंच मला लिहितांहि येत नाहीं.' माझा हात कांपतो. यामुळें ग्रंथलेखन शक्य नाहीं. त्यांनीं लगेच माझ्यापुढें लेखक उभा केला व त्यांना सांगितलें कीं रोज सकाळीं शास्त्रीबुवांच्या समोर बसून ते सांगतील तें लिहून घ्या. त्या गृहस्थांनीं हें मान्य केलें म्हणूनच हा ग्रंथ वैद्य वर्गापुढें ठेवणें शक्य झाले.

अशारीतीनें ग्रंथाचें खरें प्रवर्तक कै. वा. वैद्य ना. ह. ऊर्फ नाना जोशी व न कंटाळता लेखन करणारे गृहस्थ हेच आहेत. मी केवळ निमित्त मात्र आहे.

कै. वा. वैद्य नानांनीं अनुभवात्मक चिकित्सा लिहिण्यास सांगितले खरे! पण कशी लिहावी हा प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला. केवळ नुसते चुटके द्यावें कीं चिकित्सा शास्त्रीय स्वरूपांत मांडावी कीं केवळ रोगाचा नामनिर्देश करून

चिकित्सा द्यावी ? असें अनेक तरंग मनांत उठू लागले. शेवटीं पूर्वरूपावस्थेपासून शेवटपर्यंत ज्या ज्या अवस्था निर्माण होतात व त्या अवस्थेंत जी जी लक्षणें दिसतात त्यास अनुसरून चिकित्सा लिहिली जावी, म्हणजे वाचकांना किंवा वैद्यांना या अनुभवाचा उपयोग सुलभपणें करता येईल असा विचार निश्चित करून एकंदर ग्रंथाचा पसारा मांडला आहे.

तीव्र विकारांतील अनुभव

ज्वरासारख्या तीव्र विकारांत जेव्हां सान्निपातिक अवस्था येते, त्यावेळीं अनेक उपद्रवहि होतात. त्रिदोष हे प्रकुपित होऊन क्षणाक्षणाला लक्षणें बदलत असतात. अशावेळीं चिकित्सक गडबडतो. पण अशा वेळींहि धैर्यानें निरनिराळ्या लक्षणांचा व दोष प्रकोपांचा विचार करून आयुर्वेदीय रसायन कल्पांचा उपयोग केला असतां रोगी बरा होतो असा शेंकडो रोग्यावर अनुभव आला व म्हणूनच या ग्रंथामध्यें ज्वर प्रकरणांत अनुभवात्मक चिकित्सा लिहिता आली.

टायफाईड, न्युमोनिया, मिनिंजायटिस इ. आधुनिक नांवानें प्रचलित असलेल्या रोगांचा विचार ज्वर प्रकरणांतच येतो. उदाहरणादाखल म्हणून टायफाईड ज्वराचे देतां येईल. अँटीबायोटिक्स युगापूर्वी टायफाईड, न्युमोनिया इ. विकारावर हमखास अशी चिकित्सा अॅलोपॅथीजवळ नव्हती. अशावेळीं या विकाराचें रोगी वैद्याकडे येत असत, व अनेक उपद्रव निर्माण झाल्यानंतरहि आयुर्वेदीय चिकित्सेनें तें बरें होत असत. टायफाईड ज्वरांत बेशुद्धी, कास, श्वास, रक्तपित्त (रक्तस्राव), मूत्रविकार इ. उपद्रव झालेल्या रोग्यांना आयुर्वेदांतील रसायन कल्पानें प्राणदान दिलें आहे. तसेंच हातपाय गार पडणें, नाडी क्षीण होणें वा जाणें या कठीण अवस्थेंतहि महालक्ष्मीविलासरस, हेमगर्भ, त्रैलोक्य-चिंतामणी इ. मात्रा उपयोगी पडलेल्या आहेत. या मात्रामुळें १० ते १५ मिनिटाच्या आंत नाडीचा वेग सुधारून रोगी जगले आहेत. हल्लीं जसें अशा अवस्थेंत लोक इंजेक्शन्स व ऑक्सिजन मागतात त्याचप्रमाणें पूर्वी लोक मात्रा द्या, चाटवा अशी मागणी करीत असत. पण आज असा वैद्यवर्गहि मात्रा बाळगणारा व मात्रावर विश्वास ठेवणारा नसल्यामुळें जनतेचा ओढा सर्व अॅलोपॅथिक चिकित्सेकडे गेला आहे. जेथें इंजेक्शनमुळें व ऑक्सिजनमुळें रोग्याची नाडी सुधारत नाहीं, अशावेळीं अशा मात्रांच्या चाटणानेंहि अनेक रोगी जगले आहेत. हा माझा अनुभव खाजगी २२ वर्षांतील (१९२१ ते १९४२ अखेर) व संस्थेंत आल्यानंतरहि घेतलेला आहे तो मी वैद्यवर्ग व जनतेपुढें ठेवीत आहे. चिकित्सेंत दिली गेलेली औषधें स्वतः तयार केलेली होती.

नवीन रोग व आयुर्वेदीय चिकित्सा

आयुर्वेदीय निदान ग्रंथांत आधुनिक कालांत रूढ झालेल्या सर्व रोगांचें वर्णन आहे कीं नाहीं याचाहि मागोवा घेणें भाग पडलें. म्हणून कांहीं रोगांचें स्पष्टीकरण करीत आहे. उदाः– पेप्टिक अल्सर या विकाराचें वर्णन अन्नद्रवाख्य-शूल, परिणामशूल या नांवानें दाखवितां येतें. तसेंच मूत्रपिंडाच्या विकृतीमुळें उत्पन्न होणारे विकार यांचाहि अंतर्भाव मूत्रकृच्छ्र या विकारांत होतो. अशारीतीनें जेथें जेथें आधुनिक विकारांचा अंतर्भाव आयुर्वेदामध्यें केला आहे त्यांचा स्वतंत्रपणें विचार केला नाहीं.

ज्या रोगांचें वर्णन आयुर्वेदांत अत्यंत त्रोटक आहे अशा विकारांचा विस्तार प्रत्यक्ष आढळून येणाऱ्या लक्षणानुरूप व अवस्थानुरूप केला आहे. उदाः– प्रमेह विकार. या विकारांत दोषांना अनुसरून प्रकार पाडले आहेत. पण शरीरांत उत्पन्न होणाऱ्या लक्षणांचा विचार त्या त्या प्रकारांत दिला नाहीं. केवल मूत्रलक्षणावरून दोष प्रकार पाडले आहेत. येथें त्या त्या प्रकारांत सार्वदेहिक अशी जी लक्षणें होतात त्यांचा ग्रंथांत विस्तार केला आहे.

याशिवाय हृद्रोग या विकाराचें प्रत्यक्ष हृदयांत होणाऱ्या हृद् विकृती व इतर सर्व लक्षणें यासह वर्णन केलें आहे. व त्याची आयुर्वेदीय चिकित्सा अवस्थानुरूप दिली आहे. यामुळें आधुनिक विद्वानांनाहि या ग्रंथाचा उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे.

फुफ्फुसावरण शोथ व त्यांत होणारी जलसंचिति तसेंच रसाभिनोदनावृद्धि व क्षीणता यांचाहि विचार स्वतंत्रपणें केलेला आहे व त्यावरील अनुभविक चिकित्साहि दिली आहे. यामुळें केवळ जुन्या परंपरेनें शिकलेल्यांनाहि यामध्यें नवीन कांहीं मिळेल असा भरंवसा आहे. आणि नवीन शिक्षित असलेल्या वैद्यांना आयुर्वेदांत या रोगावर चिकित्सा नाहीं असें जें वाटतें तेंहि कसें बरोबर नाहीं याचाहि अनुभव या ग्रंथांतील चिकित्सेचा वापर केल्यास कळून येईल.

हा ग्रंथ शक्य तो अद्यावत् करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीपण त्यांत आणखी भर घालणें आवश्यक आहे असें आम्हासहि वाटतें.

सखाराम नेमचंद जैन औषधालयाचे ट्रस्टी व ऋण

शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालयांत २८ वर्षे सतत काम केलें. या औषधालयाचा उपयोग मला फार झाला आहे. संस्थेच्या विश्वस्तांनीं अनेक मूल्यवान आयुर्वेदीय औषधें तयार करण्याचें साधन निर्माण करून दिलें. व त्या औषधांचा उपयोग रुग्णांवर करण्यास परवानगी दिली, म्हणून हें ' अनुभवामृत ' जनतेपुढें ठेवता आलें. तसेंच अनेक सुशिक्षित वा अशिक्षित, धनिक व गरीब, सुखसाध्य व असाध्य अशा रोग्यांनीं माझ्यावर विश्वास ठेवून उपचार करून घेतलें, हें एक माझें महत् भाग्यच आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय आयुर्वेदीय औषधांचें अनुभव सांगणें वा लिहिणें अशक्य होतें. शिवाय एकंदर ग्रंथाच्या मुद्रणासाठीं येणारा खर्च संस्थेच्या विश्वस्तांनीं केल्यामुळेंच हा ग्रंथ प्रकाशित होत आहे, म्हणून मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

ग्रंथलेखनाच्याबाबतींत श्रीमान् शेठ गोविंदजी रावजी यांनीं प्रोत्साहन दिलें, म्हणून आम्ही लेखनास प्रवृत्त झालो. त्यांच्या प्रोत्साहनानेंच संस्थेची वाढ झाली. संस्थेच्या या वाढीबरोबरच माझ्या ज्ञानांतहि वाढ होऊं शकली. हें त्यांचें ऋण माझ्या हातून फिटणें शक्य नाहीं. त्यांना मी धन्यवाद देतो.

मे. सन्मति मुद्रणालयाचे मालक श्रीमान् कुमुदचंद्र फुलचंद शाह यांनीं विशेष काळजीपूर्वक ग्रंथ मुद्रणाचें कार्य योग्यरीतीनें करून दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

लेखनीक व ग्रंथरचनेचे सहाय्यक

कै. नाना जोशी यांनीं वैद्य श्या. धों. कुलकर्णी यांना लेखनाचें काम सांगितलें होते. व ते त्यांनीं सकाळीं व रात्रीं माझ्याजवळ बसून पूर्ण केलें. त्यांच्या या चिकाटीमुळेंच हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला. याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडें आहेत. त्यांच्या मदतीशिवाय ग्रंथ लिहिणें शक्य नव्हते. म्हणून त्यांना धन्यवाद देतो. त्यांनीं केवळ लेखनीकाचेंच काम केलें नाहीं, तर अनेक ग्रंथांचें वाचन करून त्यांतील आधारहि काढून दिलें आहेत. या ग्रंथरचनेच्या कामांत चि. कु. तेजस्विनी बागेवाडीकर, कु. प्रमोदिनी बागेवाडीकर (शुद्ध आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थिनी) व चि. यशवंत बागेवाडीकर यांनींहि चरक, सुश्रुत, वाग्भट इ. ग्रंथांतील आधार काढून दिलें आहेत. इतकेंच नव्हें तर प्रत्येक रोगाच्या विवेचनांत निरनिराळ्या शंका-कुशंका घेऊन व प्रत्यक्ष रोगी

बरा झाल्याचा वृत्तांत ऐकून स्वतःचें समाधान करून घेऊन चिकित्सा लिहिली आहे. म्हणून त्या सर्वांचें अभिनंदन करतो.

ह्या ग्रंथाची प्रूफें तपासण्याचें चिकट असें काम वैद्य श्या. धों. कुलकर्णी यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक केलें याबद्दल पुनः एकदां त्यांचे आभार मानतो.

दुर्दैवी घटना

ज्यांच्या प्रेरणेनें हा ग्रंथ लिहिण्यास उद्युक्त झालो. ते ग्रंथ प्रकाशनापूर्वीच दिवंगत व्हावेत याबद्दल मनाला अत्यंत दुःख होत आहे. कै. वा. वैद्य नाना जोशी यांनीं या पुस्तकाची प्रकरणें चाळून मृत्युपूर्वीच अभिप्राय लिहून दिला आहे. तो या ग्रंथासोबत प्रसिद्धहि होत आहे. कै. वा. नाना जोशी यांच्या समक्ष ग्रंथ प्रकाशित झाला असतां तर आम्हास फार आनंद झाला असता. ग्रंथ प्रकाशित करणें हें कालानुसार योग्यच आहे. व हा ग्रंथ प्रकाशित केल्यानेंच त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास निश्चित शांती मिळेल. त्यांनीं दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल त्यांना आम्ही शतशः प्रणाम करीत आहोंत.

वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर
आयुर्वेद चिकित्सक

अभिप्राय

सुप्रसिद्ध वैद्य बागेवाडीकरशास्त्री यांनीं शेठ सखाराम नेमचंद आयुर्वेद रुग्णालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ' अनुभविक चिकित्सा ' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

या पुस्तकाचीं कांहीं प्रकरणें वाचून पाहिलीं. वैद्य बागेवाडीकरशास्त्री यांच्याशीं चर्चा केली. त्यावरून या ग्रंथाबाबत मला सुचलेलें विचार सांगण्याचें धाष्ट्र्य करीत आहे.

आयुर्वेदाच्या सद्यःस्थितीचें अवलोकन केलें तर हजारो औषधें सांगितलेलें हें शास्त्र प्रत्यक्षांत आणण्यास कठीण आहे, असें सहजच म्हटलें जातें. हें म्हणणें आजच्या परिस्थितींतच म्हटलें जात आहे असें नसून पूर्वकालींहि अष्टांगहृदय-कारांनीं

' तेभ्योऽतिविप्रकीर्णेभ्यः क्रियते सारतरोच्चयः प्रायः । '

' असंख्य प्रचलित असणाऱ्या वाङ्मयांतून हा सर्व श्रेष्ठ ग्रंथ लिहीत आहे ' असें विधान केलेलें आहे. आयुर्वेद चिकित्सा यशस्वीपणें करावयाची तर रोगी, वैद्य, औषध व शुश्रुषा हीं चार अंगें चांगलीं असावयास पाहिजेत. वैद्य हा केवळ शास्त्र-अध्ययन केलेला व अनुभवाच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष ज्ञान कमी असलेला चालणार नाहीं. तो शास्त्र, व्यवहार, चिकित्साविषयक रोजचा अनुभव, देश-काल यांचा अभ्यासक, निरनिराळे प्रयोग करण्यांत उत्साह असणारा, जें आपण प्रयोग करीत असतों तें शास्त्र कसोटीवर तपासून पाहणारा (सिद्धान्तो नाम स यः परीक्षकैः बहुविधं परीक्ष्य हेतुभिश्च साधयित्वा स्थाप्यते निर्णयः) — चरक वि. ८ चरकाचार्यांनींच या सिद्धांताबाबत सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणें प्रयत्न करणारा असावा. हे गुण वै. नृ. ना. बागेवाडीकरशास्त्री यांच्यापाशीं पहावयास मिळतात. त्यांनीं गेल्या ५० वर्षांत केलेल्या शास्त्रचर्चेवरून त्यांच्या विद्वत्तेची प्रचीति समाजाला आलेली आहे. त्यांनीं ' क्षीण दोषहि रोग करतात ' हा सिद्धांत अखिल भारतीय स्तरावर मांडून आपल्या ज्ञानाचा परिचय सर्वांना करून दिला आहे. त्यांनीं सखाराम नेमचंद रुग्णालयांत व दवाखान्यांत अनेक कष्टसाध्य रुग्णांना आपल्या अनुभवी चिकित्सेनें जीवदान दिलें आहे. ' कर्क ' रोगासारख्या दुस्तर रोग्यांना दुःखमुक्त केल्याची अनेक उदाहरणें लोकांना माहित आहेत. औषधें, त्यांचे पाठ, प्रक्रिया इ. बाबतींतहि शास्त्रीबुवांनीं बरेच प्रयोग करून आपलें एक

तंत्र निर्माण केलें आहे. गंधकदृतीचा महाराष्ट्रभर प्रसार होण्यांत शास्त्रीबुवांनीं केलेल्या प्रयोगांनाच प्रथम स्थान द्यावें लागेल. ग्रामीण विभागांतील लोक घरगुती म्हणून वापरीत असणाऱ्या वनस्पतीपासून तों आधुनिक कालांत सांपडलेल्या प्लॅटिनमसारख्या मौल्यवान धातूपर्यंतच्या सर्व द्रव्यांचा औषधी उपयोग शास्त्रीबुवांनीं आपल्या या चिकित्सा व्यवसायांत केला आहे.

या ' अनुभवी चिकित्सा ' पुस्तकाची जरुरी फार आहे. कारण आजचा सर्व सामान्य चिकित्सक शास्त्रीबुवांइतके समृद्धतेनें प्रयोग करणें कठीण आहे. कारण शास्त्रीबुवांना पन्नास–साठ रुग्णशय्यांवर काम करण्याची संधि बरीच वर्षें मिळाली आहे. अशी संधि प्रत्येकाला मिळणें कठीण आहे. म्हणून शास्त्रीबुवांच्या या अनुभवी चिकित्सेचा लाभ चिकित्सा व्यवसायांतील आबाल–वृद्धांना होणार आहे व चिकित्सा–साफल्य प्राप्त होण्यास मदत होणार आहे.

आयुर्वेद शास्त्रज्ञांना व्याधि व त्याचें स्वरूप हें सर्व वेळीं जितकें स्पष्ट कळावयास पाहिजे तितकें सर्व वेळीं कळेलच असें नाहीं असें वाटतें, म्हणून ते स्पष्टपणें समजून घ्यावयास औषध, अन्न आणि विहार यांचें प्रयोग करूनच समजून घ्यावें असें उपशय– अनुपशय शब्दांत सांगितलें आहे.

(" असत्यां च संप्राप्तौ पूर्वरूपादि प्रतीतस्यापि व्याधेः चिकित्सो-पयोगिनोऽशांश विकल्पनाबलकालादेरप्रतीतेश्चिकित्साविशेषो न स्यात् ।

– माधव नि. अ. ४ मधुटीका)

हाच उपशयानुपशयाचा फारसा खटाटोप आपणांस वैद्य बागेवाडीकरशास्त्री यांच्या अनुभवी चिकित्सेचा अभ्यास केला तर करावा लागणार नाहीं. त्यांनीं रोगाची अवस्थानुरूप लक्षणें व त्यांवरील त्यांनीं अनुभवलेली चिकित्सा, औषधी द्रव्यांचें प्रमाण, अनुपान द्रव्य औषधें द्यावयाचा काल इ. सह स्पष्ट शब्दांत दिली आहेत. तसेंच या पुस्तकांत रोगाची पुढील अवस्था टळावी-निर्माण होऊं नये म्हणून औषधि द्रव्यें कशीं द्यावयाची, कोणतें पथ्य पाळावयाचें व किती कालपर्यंत हें औषध याच अवस्थेंत देत रहावयाचें हें स्पष्ट शब्दांत दिलें आहे.

चिकित्सकाला चिकित्सा करतांना, नेमकी रोगावस्था कोणती व त्यावर नेमकें औषध कोणतें या माहितीची फार आवश्यकता असतें. ती गरज या पुस्तकानें शास्त्रीबुवांनीं दूर केली आहे. तसेंच रोग्याच्या आत्ययिक अवस्थेंत नेमकें काय करावयाचें हें कळावयास फार दिवसांचा अत्यावस्थ रोगी–चिकित्सेचा अनुभव असावा लागतो. ती अडचण शास्त्रीबुवांनीं आपल्या अनुभवी चिकित्सेंत स्पष्ट शब्दांत सांगून दूर केली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तरः—

मंद देहोष्मा
(या अवस्थेंत आमावस्था कमी असते.)
देहोष्म्याचा क्षय
(सब्– नॉर्मल टेंपरेचर)

या अवस्थेंत मध्य देहोष्म्यांत चालू असलेली चिकित्सा ज्वरमुक्तीपर्यंत द्यावी.

सान्निपातिक ज्वरांत सतत असलेला ज्वरोष्मा दोन प्रकारांनीं कमी होतो. १) हळूं हळूं देहोष्मा कमी होऊन ज्वर उतरतो. २) एकदम स्वेद येऊन (वा स्वेद न येतांहि) ज्वर उतरतो. यांपैकीं दुसरी अवस्था रोग्याच्या जीवितास धोका देणारी असल्यामुळें तिकडे चिकित्सकानें बारकाईनें लक्ष पुरवावें. कांहीं रोग्यांत अतिस्वेद येतो, नाडी क्षीण होऊन रोगी दगावतो. या अवस्थेंत पुढील चिकित्सा– महालक्ष्मीविलासरस पाव ते अर्धा गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवणें.

किंवा हेमगर्भमात्रा १० ते २० वेढे उगाळून ५।५ मिनिटांनीं वरील अनुपाना-बरोबर चाटविणें.

किंवा त्रैलोक्यचिंतामणी वरील अनुपानाबरोबर चाटविणें. अतिस्वेद कमी होण्याकरितां अंगास सुंठीचें वा वेखंडाचें किंवा कोष्ठकोळिंजनाचें चूर्ण चोळावें.

टीप– या ज्वराच्या अवस्थेंत आधुनिक वैद्यक तज्ञ ब्लड प्रेशर पाहतात. तें नॉर्मलपेक्षां खालीं आलेलें असतें. अशा वेळींहि वरील मात्रांचें कार्य दिसून येतें. ब्लडप्रेशर या मात्रांच्या चाटणामुळें नॉर्मल येतें असा अनुभव आहे.

नाडी (जीवसाक्षिणी)

संतत ज्वरांत कांहीं कांहीं रोग्यांत नाडीचें ठोके मधून मधून बंद पडतात; बोटांस एखादा ठोका लागत नाहीं किंवा दोन ठोके सरळ पडतात तिसरा हळूं लागतो. नाडीचें ठोके व ज्वराचें मान यांचे कांहीं नियम आहेत ते–

सामान्यत: ज्वर १०० अंश असेल त्यावेळीं नाडी १०० असते; पुढें एक अंश ज्वरोष्म्याबरोबर

ही अवस्था फारशी धोकादायक नसते. तरीपण तिकडे वैद्यांचें लक्ष असावें. जेव्हां रोग आमावस्थेंतून पच्यमान अवस्थेंत जात असतो तेव्हां नाडीच्या गतींत बदल होत असतो. म्हणून यावेळीं आमपाचक चिकित्सा करावी.

त्रिभुवनकीर्ति ½ ते १ गुंज, आल्याचा रस व मध यांबरोबर चाटविणें. दिवसांतून दोन वेळां केवळ आल्याचा रस व मध द्यावा.

नाडीचें १० ठोके वाढलेले असतात. उदा. १०१ अंश ज्वर तर नाडी ११०. याप्रमाणें १०।१० ठोके अधिक असतात, पण आमावस्थेंत मात्र हें ज्वर-नाडीमान व्यस्त असतें. ज्वराच्या मानानें नाडीचें ठोके कमी पडतात. उदा. ज्वरोष्मा १०२ अंश असेल तर त्यावेळीं नाडी १०० (किंवा यापेक्षांहि कमी) असते.

चिकित्सेचे, शोधन व शमन असे दोन प्रकार आहेत. शोधन चिकित्सेचा परिणाम रोग्यावर लवकर दिसतो. कारण त्या चिकित्सेनें शरीराबाहेर जाणारे दोष प्रत्यक्ष दिसतात. शमन औषधांनीं कमी होणारे दोष अनुमानानेंच कमी झाल्याचें जाणावयाचें असतें. म्हणून शमन चिकित्सा जास्त कठीण व अधिक अनुभवानें करतां येणारी आहे. वैद्य बागेवाडीकरशास्त्री यांच्या ५० वर्षांच्या चिकित्सेच्या अनुभवानें ही शमन चिकित्सा त्यांनीं आपल्या ग्रंथांत फारच सुलभ करून दिली आहे. रोग्याच्या शरीरांतील दोषांची चिन्हें, व्याधींची चिन्हें यांचें अतिशय सोप्या भाषेंत वर्गीकरण करण्यांत आलेलें आहे. रोगाचा शरीर, मन, इंद्रियें इ. कांवर किती काळ परिणाम राहतो हेंहि या ग्रंथांत सविस्तर वर्णिलेलें आहे. आयुर्वेदाच्या आर्ष ग्रंथांत अनेक औषधांचें योग लिहिलें आहेत. एकेका रोगावर अनेक औषधांचें योग सांगितल्यामुळें नव्या चिकित्सकाला चिकित्सा करतांना संभ्रम निर्माण होण्याचा संभव असतो, अशा वेळीं शास्त्रीबुवांचें हें पुस्तक दीपस्तंभासारखें आहे.

या पुस्तकांत दिलेले विकार, त्यांचीं नांवें हीं सर्वांना परिचित असणारी अशीं आहेत. त्याशिवाय आयुर्वेदांत वर्णन न केलेलें पण व्यवहारांत असणारे विकार त्यांनाहि या पुस्तकांत योग्य तें आयुर्वेदीय पर्यायी शब्द देऊन शास्त्रीबुवांनीं ही चिकित्सकांची अडचण दूर केली आहे.

या पुस्तकामध्यें सोप्या शब्दांत हृद्रोगासारख्या कठीण अशा रोगाचें वर्णन सविस्तर दिलें आहे. त्याची संप्राप्ति पूर्णपणें चिन्हांशीं सयुक्तिकपणें लावून दाखविण्यांत आली आहे. हृद्रोग हा हृदयाच्या बिघाडामुळें जसा होतो तसाच अनेक रोगांमध्यें उपद्रवात्मक म्हणून उत्पन्न होतो, त्याचा स्वतंत्रपणें विचार करावा लागतो हे सुस्पष्टरीत्या त्या प्रकरणांत समजावून दिलें आहे. त्याशिवाय

आवृतवायुमध्यें सांगितलेली चिन्हें हृद्रोग विकारांत कशा तऱ्हेनें बसतात हे दाखविण्याचा प्रयत्न हृदयरोहिणी-अवरोध या प्रकरणांत केला आहे.

नाडी विज्ञानावर सविस्तर वर्णन यामध्यें दिलें आहे. आयुर्वेद चिकित्सकां-बद्दल समाजामध्यें नाडीवरून रोग समजणारा चिकित्सक असें अनुमान करण्यांत आलेलें आहे. परंतु आजचे आयुर्वेदीय – चिकित्सक नाडीवरून आम्हाला फारसें ज्ञान होतें असें समजत नाहींत. त्या सर्वांना या पुस्तकांतील नाडी-विज्ञान प्रकरण वाचल्यानें पुष्कळ ज्ञान होण्यासारखें आहे. रोगाची साध्यासाध्यता समजून घ्यायला नाडी– विज्ञान किती महत्वाचें आहे हे या प्रकरणांत खुलासेवार उदाहरणासह दिलेलें आहे.

आजच्या चिकित्सा-व्यवसायांत डिप्थेरिया, टिटॅनस, हार्टडिसीझ, हेमरेज, हायफीव्हर, डी-हैड्रेशन, कोमास्टेज, शॉक इ. कठीण व आत्ययिक विकारांवर 'इमर्जन्सी ट्रीटमेंट' शास्त्रीबुवांनीं या ग्रंथांत सांगितली आहे; व या तऱ्हेच्या चिकित्सेचा स्वानुभव आपल्या अपत्यावरहि त्यांनीं घेतल्याचे सर्वांना विदितच आहे.

ग्रंथामध्यें वापरलेलीं औषधें, त्यांचें पाठ, प्रक्रिया इ. बाबत शास्त्रीबुवांनीं सखोल अनुभवी ज्ञान या ग्रंथांत दिलेलें आहे. त्यामुळें औषधांचें सुचविलेलें प्रमाण प्रथम दर्शनीं मुंबईसारख्या अनूप प्रांतांतील चिकित्सा व्यवसाय करणाऱ्या चिकित्सकांना फारच कमी आहे असें वाटेल. परंतु औषधाचा पाठ, प्रक्रिया नीट पाहिल्या तर त्यांत प्रत्येकाला स्वानुभवानें फेरफार करतां येईल.

या पुस्तकांत दिलेली परिभाषा सरळ आणि सोपी असली तरी कठीण असेल तेथें टिप्पणी देऊन लेखकानें कुणालाहि सुलभतेनें हा ग्रंथ समजेल अशी योजना केली आहे.

हें पुस्तक लिहून वै. बागेवाडीकरशास्त्रींनीं आयुर्वेद शास्त्रावर फार मोठे उपकार केले आहेत. आज चिकित्सा क्षेत्रांत भिन्न भिन्न चिकित्सा-पद्धतींचा स्पर्धेचा काळ निर्माण झालेला आहे. अशावेळीं शास्त्र-सिद्धांताची जपणूक करून स्वानुभवाची, व्यवहारांत आणण्यास सोपी अशी चिकित्सा सांगून आयुर्वेदीय चिकित्सक या स्पर्धेच्या युगांत कमी ठरणार नाहींत अशी व्यवस्था या पुस्तकामुळें निर्माण केली आहे.

वास्तविक ग्रंथाचा उद्देश अनुभविक चिकित्सा सांगण्याचा असला तरीसुद्धां सविस्तर रोगविज्ञान सांगून शास्त्रीबुवांनीं आयुर्वेद जगतावर मोठें न फिटण्या-सारखें उपकार केलें आहेत.

वैद्य ना. ह. जोशी
आयुर्वेद विशारद

लेखकाची भूमिका

आयुष्यांतील ५० वर्षांचा काल रोग्याशीं व रोगाशीं झगडत गेला. या झगडयांतून जें कांहीं निर्माण झालें तें जगापुढें ठेवीत आहे.

या ग्रंथांत जें कांहीं लिहिलें आहे तें सर्व प्रत्यक्ष केलें, पाहिलें व आपणापुढें ठेविलें आहे. याचा उपयोग आर्तांना तसेंच अपक्व वैद्यांना व्हावा या बुद्धीनें हा ग्रंथ लिहिला आहे.

रामदासस्वामींनीं जी समाजास आज्ञा केली आहे ती जें जें आपणासीं ठावें तें तें दुसऱ्याशीं शिकवावें. येथें दुसऱ्याशीं शिकवावें न म्हणतां दुसऱ्यांशीं सांगावें हें म्हणणें अधिक योग्य होईल. या वचनानुसार हें लिखाण केलें आहे. यांत शास्त्रीय भूमिकेंतून औषधी चिकित्सेची चर्चा किंवा कारण मीमांसा कोठेंहि लिहिलेली नाहीं.

ग्रंथ लिहिण्याचें पूर्वीं काय व कसें लिहावें याची मर्यादा ठरविली होती. यामुळें कार्य-कारण-मीमांसेचा विचार कोठेंहि केला नाहीं. केवळ रोग्यांत येणारा अनुभव लिहिला जावा हा उद्देश डोळ्यापुढें ठेवून या ग्रंथाचा विस्तार केला आहे. हा विस्तार करीत असतांना जास्तीत जास्त सुलभता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच शक्यतों औषधी योजना करतांना आयुर्वेदाचा शास्त्रीय दृष्टि-कोन सतत समोर ठेवून चिकित्सा केली व त्यांतून जें अनुभव आलें तें मांडलें आहेत. या अनुभवाचा उपयोग कोणाहि सामान्य वैद्यांना करून घेता येईल, असा विश्वास वाटतो. यांतहि कांहीं त्रुटि आहेत. त्या त्रुटिसंबंधी वाचकांनीं सूचना केल्यास त्या पुढील आवृत्तींत भरून काढल्या जातील.

या ग्रंथांतील बहुतांशीं चिकित्सा रसशास्त्रावर अधिष्ठित आहे. किंवा औषधी कल्पावर ही चिकित्सा लिहिली गेली आहे. या शास्त्राचें महत्त्व येथें निवेदन करणें जरुरीचें वाटतें. म्हणून याचा थोडा विस्तार करीत आहे.

रसशास्त्राचें महत्त्व

अल्पमात्रोरपयोगित्वादरुचेरप्रसङ्गतः।
क्षिप्रमारोग्यदायित्वादोषिधिभ्योऽधिको रसः ॥

अल्प मात्रा, अरुचीचा अप्रसंग, लवकर आरोग्य प्राप्त होणें यामुळें केवळ वनस्पतिज चिकित्सेपेक्षां ही रस चिकित्सा श्रेष्ठ आहे. या सूत्रांतील विवेचन

किती सार्थ आहे हें पाहण्याच्या बुद्धीनेंच आयुष्याचा सर्व काल व्यतीत केला. या ५० वर्षांच्या कालानंतर या सूत्राची सत्यता अनुभवास आल्यामुळें ती वैद्य वर्गापुढें ठेविली आहे. ही रसचिकित्सा म्हणजे केवल शमन चिकित्सा आहे असा अनेक वैद्यांचा समज झालेला दिसतो. म्हणून तो कसा अयोग्य आहे हें प्रथम पाहाणें आवश्यक आहे.

आर्ष ग्रंथांत शोधन चिकित्सेला प्राधान्य दिलेलें आहे. शोधन चिकित्सेनें दोष हें शरीराचें बाहेर जातात. त्यामुळें दोषांचा प्रकोप तात्कालिक कमी होतो व शमन चिकित्सेनें दोष हें साम्यावस्थेंत येतात. दोन्हीहि चिकित्सा पद्धतीनें कार्य एकच घडतें तें म्हणजे दोषांची साम्यावस्था. शमन चिकित्सेनें सम झालेलें दोष कारणांवाचून विषम होऊं शकणार नाहींत. तसेंच बाहेर गेलेलें दोषहि कारणांवाचून विषम होणार नाहींत. म्हणून चिकित्सेमध्यें निदान परिवर्जनाला फार मोठें महत्त्व आहे. शोधन चिकित्सेनंतरहि दोष शरीरांत शिल्लक राहूं शकतात असे आर्ष ग्रंथकारांचें म्हणणें आहे व त्यासाठीं शमन चिकित्सा करावी असें त्यांनींच सांगितलें आहे. या एकंदर विचारावरून असा निष्कर्ष काढतां येतो कीं शोधन चिकित्सेपेक्षां शमन चिकित्सा ही जास्त श्रेष्ठ आहे. आर्ष ग्रंथांत जी शमन चिकित्सा सांगितली आहे ती केवळ ओषधींची आहे. या ओषधी चिकित्सेचा अवलंब फार पुरातन कालापासून केलेला आहे. या ओषधी चिकित्सेमध्यें अत्यंत श्रेष्ठ व पवित्र अशी कल्पना सांठविली आहे. या ओषधींच्या ज्या कल्पना सांगितल्या आहेत त्यापैकीं स्वरस कल्पना हीच अत्यंत श्रेष्ठ कल्पना आहे. सजीव शरीराशीं ही स्वरस कल्पना अत्यंत जवळची आहे. स्वरस हा सजीव, चैतन्ययुक्त आहे म्हणून या स्वरसाचें कार्य षड्धात्वात्मक शरीरावर तात्कालिक घडून येतें. या पुढील कल्पना ज्या निर्माण केल्या आहेत, त्या केवळ जडात्मक विचाराच्या आहेत. त्या कल्पनांमधून चैतन्य हें नष्ट झालेलें असतें. स्वरस कल्पनेनंतर कल्क कल्पना घेतली आहे. या कल्क कल्पनेंतहि वनस्पतिज जीवाचा संबंध असतो, म्हणून स्वरसानंतर ही दुय्यम प्रतीची कल्पना आहे. इतर ज्या ओषधी कल्पना आहेत त्या सर्व पंचमहाभूतात्मक वर्गीकरणामधून निर्माण झाल्या आहेत, म्हणून त्या गौण सांगितल्या आहेत. हा शास्त्रीय दृष्टिकोन डोळ्यापुढें ठेवून प्राचीन चिकित्सकांनीं स्वरसाचाच उपयोग महत्त्वाचा मानला आहे. पण ही चिकित्सा सर्व काल करतां येत नसल्यामुळें त्याचें पर्याय निर्माण केलें आहेत व या पर्यायांतूनच हिम, फांट, क्वाथ, चूर्ण, तैल, घृत आसवारिष्टें या कल्पना उत्पन्न झाल्या आहेत. या ओषधी कल्पांचा उपयोग करीत असतांना सहज व सुलभ स्वरस कल्पनेची जोड अनुपानांच्याद्वारें दिली आहे, ज्या कल्पांना अनुपानाची जोड दिली जात नाहीं, असें कल्प वापरण्यांत आहेत. उदा.– तैल, घृत आसवा-

रिष्टें इ. या कल्पांचें कार्य केवल पांचभौतिक द्रव्यकल्पनेच्या दृष्टिकोनांतूनच करावें लागतें. ही उणीव रसकल्पांत भरून काढलेली आहे. त्याचा विचार थोडक्यांत करीत आहे.

रसकल्पांतील पारदाचें महत्त्व

रसायनशास्त्रांत पारदास महत्वाचें स्थान दिलें आहे. ज्याप्रमाणें वनस्पतीमध्यें रसांना महत्त्व दिलें आहे, त्याचप्रमाणें रसशास्त्रांत पारदरूपी रसास महत्त्व प्राप्त झालें आहे. पारा हा निरिन्द्रिय द्रव्य असून तो शरीरांतील चेतना धातूवर प्रामुख्यानें कार्य करणारा आहे. म्हणून अनेक असाध्य रोगांत याचें कार्य दृष्टोत्पत्तीस येतें. जेव्हां चेतना धातूच क्षीण होतो तेव्हां चेतनेची अनुवृत्ति शरीरांत नीट होत नाहीं. यामुळें माणूस हा मृत्युपंथास लागतो. अशावेळीं पारद कल्पामुळें माणसास जीवदान दिलें जातें. म्हणून यास रस ही संज्ञा दिली आहे. आत्म्यासहि रस या नांवानें संबोधिलें जातें. या दोन रसांचा संयोग शरीरांत आनंद निर्माण करूं शकतो. दुसऱ्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास पारा हा शिवाचें वीर्य आहे असें म्हटलें आहे. म्हणून हा सजीव शरीरांत वीर्याप्रमाणें कार्य करतो. अशारीतीनें या शिववीर्याचा उपयोग रसशास्त्रांत केला आहे. म्हणून या सर्व रसायन कल्पांचें महत्त्व ओषधीकल्पापेक्षां श्रेष्ठ दर्जाचें होतें.

पारदसंयोगाचें महत्त्व

रसायनकल्पामध्यें अनेक वनस्पति, खनिजद्रव्यें व प्राणिजद्रव्यें यांचा पारदाशीं संयोग केला आहे. तो कां ? तें पाहूं. वनस्पति व प्राणी यांच्या गुणधर्माचा नाश होऊं नये म्हणून पारदसंयोग केला आहे. हा प्रत्यक्ष येणारा अनुभव आहे. या संयोगामुळेंच पारदकल्पाचें श्रेष्ठत्व आजतागायत टिकून आहे. पारा हा या कल्पांचा समवायी कारण आहे. जें द्रव्य द्रुत गतीनें रूपांतरित होऊन परिणाम पावतें तें त्या कार्याचें समवायी कारण असतें.

रसायन कल्पांत जी निरिन्द्रिय व निर्जीव पण सेन्द्रिय द्रव्यें असतात, त्यांचे ठिकाणींहि पारदाच्या संयोगानें शक्ति निर्माण होते. म्हणून रसायन कल्पांचें कार्य अधिक प्रभावी दिसून येतें. व हीं सर्व द्रव्यें कल्पांची समवायी कारणें होतात. अशा या समवायी कारण द्रव्यांच्या संयोगानें कल्पांत अचिन्त्य अशी शक्ति निर्माण होते. (द्रव्यसंयोगशक्तिरचिन्त्यत्वात् सुश्रुत चि. अ. ११ सूत्र १३ टीका) या अचिन्त्य शक्तिमुळेंच कल्पांचें कार्य अनेक विकारांत घडून येतें. याशिवायहि पारदाच्या बाबतींत निराळा दृष्टिकोन रसरत्नसमुच्चयाच्या टीकेंत दिला आहे.

पारदाचें सर्व संग्राहकत्व

पारा हा अनेक खनिज, प्राणिज व वनस्पति द्रव्याबरोबर कां मिश्र केला जातो व त्याचें महत्व काय आहे याचें वर्णन रसरत्नसमुच्चय टीकाकारानें स्पष्टपणें मांडलें आहे. पाऱ्याशीं संयोग केलेल्या द्रव्यांचें गुणधर्म पारदांत विलीन होतात. व तोच शरीरांत सर्व गुणधर्मांनीयुक्त कार्य करतो. जसें परमात्म्याच्या ठिकाणीं सर्व सृष्टि लय पावते किंवा योगी हरमूर्तीच्या ठिकाणीं लीन झाला असतां त्यास अमृतत्व प्राप्त होतें. याचप्रमाणें सुवर्णादि द्रव्यें पारदामध्यें लीन झाली असतांना त्यास सुधारूपत्व येतें. अमृतत्वं जीवन्मुक्तत्वम्‌। भजन्ते हरमूर्तौ लीना योगिनः। तद्वत्‌ हेमादयोऽपि जीर्णाभ्रके पारदे लीनाः सन्तोऽमृतत्वं नित्यत्वं सुधारूपत्वं च भजन्ते। रसरत्नसमुच्चय टीका अ. १ सु. ४७ पान ८

हा एक विचार रसायनकल्पांचें गुणधर्म पहात असतांना करणें आवश्यक आहे.

सेन्द्रिय द्रव्यें हीं कांहीं काल आपलें गुणधर्म राखून ठेवूं शकतात. व नंतर ती हीनवीर्य होतात, यामुळें त्यांचा उपयोग चिरकाल करतां येत नाहीं. हीं द्रव्यें पारदामध्यें लीन केली असतां ती हीनवीर्य होत नाहींत त्यांना अमृतत्व येतें.

औषधी-कल्पांतील तत्त्वें

१ लें तत्त्व-

ज्या द्रव्यांच्या कार्याचें एकमेकांशीं साम्य आहे अशा निरनिराळ्या द्रव्यांचें संयोग करून एखाद्या विशिष्ट गुणधर्माची वाढ करतां येते. यामध्यें द्रव्यसामान्य, गुणसामान्य व कर्मसामान्य यांचा अन्तर्भाव होतो. (सिनेर्जेस्टिक)

चरक कालापासून आजतागायत आयुर्वेदीय चिकित्सेंत एकेरी द्रव्यें वापरण्याची फारशीं प्रथा नाहीं. त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें पुढील सूत्र ठेवलें आहे. बहुकल्पं बहुगुणं संपन्नं योग्यमौषधम्‌। बहुकल्प म्हणजे स्वरस, क्वाथ, कल्क, फांट इ. आहेत. यांत स्वरस हा एकेरी वापरण्याची पद्धत आहे. बाकीचें कल्प एकापेक्षां अधिक द्रव्यें मिश्र केलेलें आढळतात. यामध्यें १ द्रव्यसामान्य, गुणसामान्य व कर्मसामान्य हा विचार डोळ्यापुढें ठेवून कल्प बनविलें गेलें आहेत. या समान भावात्मक द्रव्यांच्या मिश्रणामुळें या कल्पांत शक्त्युत्कर्ष केला जातो. मध्वादेरपि द्रवस्य किंचिद्द्रव्यं समानगुणस्य शक्त्युत्कर्षं कुर्वदेव दृष्टम्‌। (वाग्भट सूत्रस्थान अ. ५ सूत्र ५२ टीका) उदा:- षडंगोदक. षडंगोदकांतील काळा वाळा, वाळा, पांढरें चंदन, सुंठ, नागरमोथा व पित्तपापडा या सहा द्रव्यांचें प्रत्येकाचें गुणधर्म पाहिले असतां ती सर्व तृषाशामक, पित्तघ्न व ज्वरघ्न आहेत. हें उदाहरण कर्मसामान्याचें आहे. रसकल्पांतील उदरारिकल्प हा कर्मसामान्याचें उदाहरण आहे. त्यामधील जेपाळ, बाहवा मगज, पिंपळी, मोरचूद, त्रिधारी निवडुंग चीक ही सर्व विरेचन कर्म करणारी आहेत. वातज्वरामध्यें लघुपंचमूळाचा काढा, पित्तज्वरामध्यें धमासा, काडेचिराईत यांचा व कफज्वरामध्यें वत्सकादि गणांचा काढा वाग्भटानें ज्वर चिकित्सेमध्यें सांगितला आहे. (वा. चि. अ. १ सूत्र ५१, ५२, ५३) हे गुणसामान्याचें उदाहरण आहे. त्याचप्रमाणें चरकाचार्यांनीं ज्वर चिकित्सेमध्यें जे चंदनादितैल अभ्यंगाकरितां सांगितलें आहे तेहि गुणसामान्याचेंच उदाहरण होय. रसशास्त्रकारानींहि हेंच तत्त्व अवलंबिलें आहे हे खालील कल्पावरून आढळून येईल. उदा:- चंद्रकलारस, महावातविध्वंसरस, त्रिभुवनकीर्ति इ. चरकाचार्यांनीं पांडुरोग चिकित्सेमध्यें सांगितलेलें नवायसचूर्ण व योगराजलोह (ताप्यादिलोह) हें द्रव्यसामान्याचें उदाहरण आहे. नवायस चूर्णांतील त्रिकटु, चित्रक, नागरमोथा, वावडिंग ही गंधगुणबहुल द्रव्यें व खनिज मंडूरभस्म ही सर्व पार्थिव द्रव्यें होत. यांचा संयोग द्रव्यसामान्य म्हणून केला आहे. योगराजलोहांतील नागरमोथा, देवदार, दालचिनी, त्रिकटु, चित्रक, वावडिंग, पिंपळमूळ ही गंधगुणबहुल द्रव्यें व रौप्यभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, लोहभस्म व शिलाजतु खनिज पार्थिव द्रव्यें होत. हाहि संयोग द्रव्यसामान्य म्हणूनच केलेला आहे.

यामधील सामान्य भावात्मक, सामान्य गुणधर्मात्मक द्रव्यें मिश्र केल्यामुळें कल्पाच्या अल्प मात्रेनें प्रभूतकर्म निर्माण केलें जातें. व तो कल्प अल्प मात्रेंत असला तरीहि तो अग्निदीपन करून व महास्रोतसांतील सर्व सूक्ष्म स्रोतसांत लवकर पसरतो. यामुळें तत्तत्‌ दोषाशयांत हा कल्प जाऊन प्रकुपित दोषांचें शमन करतो.

२ रें तत्त्व-

एखाद्या द्रव्याचें ठिकाणीं असलेला दुष्परिणाम कमी होण्यासाठीं दुष्परिणाम नाशक द्रव्याशीं त्या द्रव्याचा संयोग करणें. उदा- जेपाल या द्रव्याचें त्रिकटुशीं मिश्रण. जेपाळामुळें पोटांत मुरडा होतो, तो त्रिकटुमुळें कमी केला जातो. किंवा विषें आणि उपविषें यांचा विषघ्न औषधाबरोबर संयोग करणें. उदा:- बचनाग युक्त कल्पांत टंकण मिश्र करणें (अँटीगोनिस्ट).

एखाद्या कल्पामध्यें त्या कल्पाचें कार्य अधिक प्रभावी व्हावें म्हणून पहिल्या विधानानुसार समान द्रव्य, समान गुण व समान कार्य करणारीं द्रव्यें मिश्र केलीं जातात. त्यामुळें त्या कल्पाचें प्रभूत कार्य किंवा तीव्र कार्य निर्माण होतें. यामुळें शरीरावर जें दुष्परिणाम होतात तें होऊं नयेत म्हणून विश्लेषात्मक (तद्विरुद्ध)

कार्य करणाऱ्या द्रव्यांचा संयोग केलेला दिसून येतो. वर इच्छाभेदी रसाचें उदाहरण दिलें आहे. त्याशिवायहि आणखी कांहीं उदाहरणें देता येतात. ज्या ज्या कल्पांत विषें किंवा उपविषें मिश्र केलेली आहेत, त्या कल्पांत विषघ्न अशा द्रव्यांचा संयोग केलेला आहे. त्याचप्रमाणें समान भावात्मक द्रव्यांचें मिश्रण करून प्रभूत कार्य निर्माण करणारे कल्पहि सांपडतात. अशा कल्पांत तद्विरुद्ध कार्य करणाऱ्या द्रव्यांचा संयोग केलेला आहे. तेथें विश्लेषात्मक कार्य करून कल्पांच्या कार्यांत समतोलपणा निर्माण केला आहे. उदा:– अजीर्णारिरस. यामध्यें हिरड्याचें चूर्ण ८ तोळे आहे. व सर्वांत अधिक सुंठ व भांग १६ तोळे आहे. ही दोन परस्पर विरुद्ध कर्मात्मक द्रव्यें मिश्र करून भांगेचें स्तंभनात्मक कार्य कमी केलें आहे, विश्लेष केला आहे.

३ रें तत्त्व–

एखाद्या वनस्पतीचें किंवा खनिज द्रव्याचें शरीरावर होणारे परिणाम विवक्षित दिशेनें वाढविणें. उदा:– मध व एरंडेल तेल मिश्र करून देणें. मधामुळें एरंडेल तेलाचा रेचकधर्म वाढविला जातो.

उदाहरणादाखल कांहीं रसकल्पांची उदाहरणें देता येतील. वैश्वानररस. या रसामध्यें जलशोषण करणारी कारण द्रव्यें नाहींत. तथापि जलोदरामध्यें हा रस दिला असतां शोधनात्मक कार्य न होतां उदरस्थ जलाचें शोषण केलें जातें. हें कार्य द्रव्य संयोगज आहे. ताम्रांतील तिक्त, कषाय रसाचें जलशोषणाचें कार्य इतर द्रव्यांचे संयोगानें वाढविले जाते.

गुल्मकालानलरस यामध्यें जवखाराचें प्रमाण अधिक आहे. व त्याचें गुल्मघ्न कार्य इतर द्रव्यांच्या संयोगानें वाढविण्यांत आलें आहे.

याचप्रमाणें त्रिदोषघ्न कल्पहि बनविलें आहेत.

४ थें तत्त्व–

परस्पर विरुद्ध गुणात्मक द्रव्यांच्या संयोगानें अपेक्षित गुणधर्म उत्पन्न करून त्यांचा उपयोग करणें. उदा– लक्ष्मीनारायणरस, प्रवाळपंचामृत यामधील मौक्तिक, प्रवाळ भस्में ही शीत वीर्यात्मक व पित्तशामक आहेत तर शंख, कपर्दिक भस्म उष्णवीर्यात्मक व पित्तवर्धक आहेत. या कल्पास दिलेली रूईच्या चिकाची भावना तीक्ष्ण व उष्ण गुणात्मक आहे. अशी परस्पर विरुद्ध गुणात्मक द्रव्यें एकत्र केल्यानें याचें कार्य केवल पित्तघ्न असे होत नसून पित्त क्षीण झाले असतांनाहि किंवा पित्ताचा प्रकोप झाला असतांनाहि पित्त साम्यावस्थेंत आणण्याचें कार्य या कल्पामुळें घडून येतें.

शंखवटीमध्यें शंख हें तापवून चिंचाक्षार व लवण मिश्रित अशा लिंबू-रसामध्यें निर्वापण करावयास सांगितलें आहेत. त्यामुळें शंखाच्या रूपामध्यें व गुणधर्मामध्यें बदल होतो. यामधील इतर द्रव्यें पित्तप्रकोप करणारी असतां-नासुद्धां हा कल्प पित्तप्रकोपक न होता विषम पित्तास समस्थितींत आणण्याचें कार्य करतो. पित्त क्षीण झाले असतांनाहि या कल्पामुळें पित्त समस्थितींत येतें.

५ वें तत्त्व–

द्रव्यांचें शोषण शरीरांत सुलभ व्हावें म्हणून त्यांचा संयोग विशिष्ट द्रव्यांशीं विशिष्ट प्रमाणानें करावा लागतो. उदा:– सुवर्णपर्पटीमधील शुद्ध सुवर्णाचे शरीरांत शोषण होण्यासाठीं पाऱ्याशीं संयोग.

इतर पर्पटीकल्पांतील असलेली खनिज द्रव्यें शरीरांत लवकर शोषली जावी म्हणून कज्जलीसारख्या व्यवायी, विकाशी द्रव्याबरोबर त्यांचा संयोग केलेला आहे. या कल्पांत कज्जलीचें प्रमाण ६० ते ६५ टक्केपर्यंत आहे. केवल भस्मांचा उपयोग करण्यापेक्षां कज्जलीशीं संयोग करून भस्में वापरणें अधिक फलदायी आहे.

याचप्रमाणें आणखी अनेक कल्पामध्यें वनस्पति व प्राणिज द्रव्यांबरोबर पाऱ्याचा संयोग केला आहे.

६ वें तत्त्व

वनस्पति व प्राणिज द्रव्यें स्थिर रहावी व वीर्यवान रहावीत म्हणून त्यांचा विशिष्ट द्रव्यांशीं संयोग करणें. उदा:– पारा व वनस्पतिज किंवा प्राणिज द्रव्यांचा संयोग. उदा:– सुवर्णमालिनीवसंत.

७ वें तत्त्व–

वनस्पति व प्राणिज द्रव्यांचें प्रमाण कमी वापरून रोग हरण किंवा दोष-साम्य व्हावें म्हणून त्या द्रव्याशीं योगवाही द्रव्यांचा संयोग करणें. उदा– खल्वी रसायन व कुपिस्थ रसायन कल्प. योगवाहीची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. यद् द्रव्यं द्रव्यांतरेण तुल्यगुणेनापि युक्तं सत्तद् गुणाननुवर्तते स्वं च कार्यं तद-विरुद्धं किंचित्करोति तद्योगवाहि द्रव्यम् भृत्यवत् । अ. हृ. सू. अ. ५ सूत्र ५२ टीका.

जें द्रव्य विपरीत गुणयुक्त अन्य द्रव्यांशीं मिश्र केलें असतां सेवकाप्रमाणें त्या द्रव्याच्या गुणधर्माप्रमाणें कार्य करतें आणि त्याच द्रव्याच्या गुणधर्मांना अविरोधी असें आपलें स्वतःचें असेंहि कार्य करतें त्यास योगवाहि द्रव्य म्हणावें.

या व्याख्येप्रमाणें अनेक कल्प बनविलेलें आहेत. त्या सर्वांचा विचार येथें करणें अशक्य आहे. म्हणून कांहीं कल्पांचा विचार येथें करीत आहे. उदा.– आरोग्यवर्धिनी. या कल्पामध्यें कुटकीचें प्रमाण सर्व द्रव्यांच्या बरोबरीनें घेतलें आहे. या कल्पांत पारा, ताम्र, शिलाजतु व गुग्गुळ ही योगवाही द्रव्यें मिश्र केली आहेत. यामुळें या कल्पाचें कार्य विशेषतः कुटकीवर अवलंबून असल्यामुळें तिचें गुणधर्म योगवाही द्रव्यामुळें वृद्धिगत केले आहेत. एकेरी कुटकी देण्याचें प्रमाण पाहतां ५ ते १० गुंजा सांगितलें आहे. इतकें प्रमाण दिल्याशिवाय कुटकीचें कार्य शरीरावर दिसून येत नाहीं. आरोग्यवर्धिनीरसाचें प्रमाण साधारणतः २ ते ४ गुंजा आहे. या प्रमाणांत कुटकीचें मान १ ते २ गुंजा येतें. या अल्प प्रमाणानें कुटकीचें कार्य प्रभावीपणानें शरीरावर घडून येतें. याचें कारण कुटकीचा योगवाही द्रव्यांशीं संयोग हे होय. मकरध्वजामध्यें पारा ८ भाग, गंधक १६ भाग, सुवर्ण १ भाग या प्रमाणांत आहेत. यामध्यें प्रमुख द्रव्य सुवर्ण हें आहे. या सुवर्णाचें गुणधर्म वाढविण्यासाठीं पाऱ्याशीं संयोग केला आहे. सुवर्ण हें रसायन वृष्य व हृद्य आहे. सुवर्णाचें हें कार्य योगवाही द्रव्यांच्या संयोगामुळें वृद्धिगत केलेलें असल्यामुळें या कल्पाचें कार्य वृष्य, रसायन, वाजीकर असें प्रभावीपणें दिसून येतें. या कल्पांत सुवर्णाचें अस्तित्त्व नाहीं अशी चुकीची कल्पना वैद्य समाजांत रूढ झाली आहे. या कल्पामध्यें घातलेलें सुवर्ण संपूर्ण शिल्लक राहात नाहीं. शें. ४०–४१ टक्के कमी होतें. म्हणून मकरध्वजामध्यें एवढें सुवर्ण जातें असें आमचें मत आहे. व या सुवर्णाचें कार्य शरीरावर दिसून येतें.

८ वें तत्त्व–

कल्पांतील प्रधान व अप्रधान द्रव्यांचा विचार करणें. उदा:– मदनादि वामक द्रव्यें सुरादि द्रव्यांच्याबरोबर मिसळून, एकत्र करून देणारें योग सांगितलें आहेत. या योगास मदनादियोग असें नामाभिधान दिलें आहे. त्यामध्यें फलादि प्रधान द्रव्यें आहेत व सुरादि द्रव्यें ही अप्रधान आहेत. या अशा योगामध्यें अप्रधान द्रव्यें ही प्रधान द्रव्याप्रमाणेंच कार्य करतात. म्हणून कल्पांच्या गुणधर्मांचा विचार करीत असतांना प्रधान व अप्रधान द्रव्यांचा विचार करावा लागतो. चरक कल्पस्थान अ. १२ सू. ४४ पान १२

चरकानें कल्पस्थानामध्यें या तत्त्वासंबंधी विवेचन केलेलें आहे. तें वाचकांनीं मूळ ग्रंथांतून पहावें. असें कल्प आजहि व्यवहारांत आहेत. उदा:– चंद्रप्रभा, गुग्गुळ-

कल्प, कांचनारगुग्गुळ, कल्प, पुनर्नवासव, सुवर्णमालिनीवसंत, सितोपलादि चूर्ण. कल्पामध्यें जें प्रधान द्रव्य असतें त्याचें नांव त्या कल्पास दिलेलें आहे. प्रधान द्रव्याच्या प्रमाणावरून कल्पाचें नांव दिलें गेलेलें नाहीं.

९ वें तत्त्व–

कल्पांत इष्टवर्णादि उत्पन्न करणें. कोणताहि कल्प पाहिला असतांना नेत्रेंद्रियाच्याद्वारें सुखसंवेदना निर्माण झाल्या पाहिजेत. याचप्रमाणें रससंवेदना, स्पर्शसंवेदना, गंधसंवेदना सुखकर असाव्या लागतात.

कोणताहि कल्प तयार करीत असतांना तो योग्य वर्णात्मक, योग्य रसात्मक व योग्य स्पर्शात्मक तयार व्हावा म्हणून चरकानें तो विचार केलेला आहे. एखादा कल्प नेत्रेंद्रियांनीं पाहिला असतांना त्याचा वर्ण नेत्रेंद्रियास आल्हाद देणारा असावा लागतो. याचप्रमाणें त्याचा रसहि आनंद देणारा असावा लागतो. हा विचार अत्यंत मूलगामी असा आहे. पंचज्ञानेंद्रियामुळें एखाद्या वस्तूचें ज्ञान होत असतांना सुखसंवेदना निर्माण होणें आवश्यक असते. व त्या सुखसंवेदना आरोग्यास हितकर आहेत.

१० वें तत्त्व–

कल्पद्रव्यें व भावनाद्रव्यें यांचा संबंध– कल्पांत असणाऱ्या द्रव्यांचें वीर्य लक्षांत घेऊन तत्समान वीर्यात्मक द्रव्याच्या स्वरसाच्या किंवा क्वाथाच्या भावना देणें. यामुळें कल्पांत असलेल्या द्रव्यांचें कार्य वाढविलें जातें. अल्प मात्रेनेंहि बहुकर्म निर्माण होतें. चरक कल्पस्थान अ. १२ सूत्र ४७, ४८ पान १

एखादा कल्प तयार करीत असतांना त्या कल्पांत असणाऱ्या द्रव्यांचें वीर्य लक्षांत घेऊन त्या वीर्यात्मक द्रव्यांच्या रसाच्या भावना देऊन कल्पाचें कार्य वाढविलें जातें. उदा:– त्रिभुवनकीर्तिरस. यामध्यें बहुतेक सर्व द्रव्यें उष्ण वीर्यात्मक आहेत. या द्रव्यांना तुळस, आलें व धोत्रा या द्रव्यांच्या रसाच्या भावना दिल्या आहेत. असें अनेक कल्प उदाहरणादाखल देतां येतील.

रुग्णाच्या चिकित्सेमध्यें अनेक औषधियोग प्राचीन ग्रंथकारांनीं सांगितले आहेत. त्या योगांच्या मार्गे कोणती तत्त्वें किंवा कोणती कार्यकारण मीमांसा असावी याचें विवेचन वरील दहा विधानांत माझ्या अल्प मतीनें मी मांडलें आहे. त्यांत अनेक त्रुटीहि असूं शकतील. त्या सुज्ञ वाचकांनीं भरून काढाव्यात.

आम्ही जी रोगानुसार व रोगावस्थानुसार तसेंच दोषानुसार व दोषावस्थानुसार अशी स्वानुभावात्मक चिकित्सा लिहिली आहे. त्या चिकित्सेंत अनेक औष-

धांचें किंवा कल्पांचें मिश्रण केलें आहे. या मिश्रणामध्येंहि वरील तत्त्वांचा ठिंकठिकाणीं अनुबंध दिसून येईल. तो वाचकांनीं विचारांत घ्यावा.

याशिवायहि या मिश्रणांत व्याधिप्रत्यनीक व दोषप्रत्यनीक असें कल्प किंवा एकेरी द्रव्यें एकत्र करून रुग्णास तात्कालिक किंवा कालावधीनें रोगांचा शम झालेला दिसून यावा म्हणून अनेक द्रव्यांचें एकत्रीकरण केलें आहे.

ग्रंथांत दिलेल्या चिकित्सा योजनेमध्यें अनेक रसकल्पांचा उपयोग केलेला दिसून येईल. या रसकल्पांबरोबर विशिष्ट अशा एकेरी द्रव्यांचा उपयोग अल्प मात्रेंत केला आहे. या अल्प मात्रेनें कार्य कसें घडतें ? ही शंका वाचकांस येणें साहजिक आहे. उदा.— रसाभिनोदनवृद्धीमध्यें सर्पगंधा वापरलेली आहे. सर्पगंधेचें आजचे प्रमाण ५ ते १५ ग्रेन आहे. (२ ते ८ गुंजा) या प्रमाणाशिवाय तिचा परिणाम दिसून येणार नाहीं. अशी सामान्य वैद्यांची कल्पना होणें शक्य आहे. आमच्या योजनेंत सर्पगंधा ही अर्धा ते एक गुंज मिश्र केलेली आहे. या अल्पमात्रेनें रसाभिनोदनवृद्धी कमी होणार नाहीं असे वाटणे साहजिक आहे. पण या पाठीमागें कांहीं तत्त्व आहे व तें तत्त्व वरील विधानास अनुसरून आहे. सर्पगंधेशीं योगवाही कल्पांचा संयोग या योजनेंत केला आहे. सूतशेखररस व सर्पगंधा यांचा संयोग हा सर्पगंधेचें गुणधर्म वाढविणारा आहे. सूतशेखर रस हा योगवाही कल्प आहे. अनेक रसकल्प योगवाही म्हणून सांगितलें आहेत.

रसशास्त्रामध्यें अशी कांहीं सूत्रें आंढळतात.

पित्तनाशक भैषज्यं योगवाहि रसं सुधीः । (रसचंडांशु)

पित्तनाशक औषधांबरोबर योगवाही रसाची योजना करावी. या दृष्टिकोनांतून अनेक औषधी योजना केलेल्या आहेत. याशिवायहि द्रव्यसामान्य, गुणसामान्य व कर्मसामान्य या विधानांचाहि विचार करून अनेक योजना केल्या आहेत. त्या वाचकांनीं पाहिल्या तर त्यांना या चिकित्सा कशा फलदायी होतात तें कळून येईल. इतकेच नव्हें तर द्रव्यांच्या अल्प मात्रेनेंहि दोषसाम्य व व्याधिनाश करतां येतो हें दिसून येईल.

औषधियोजनेमध्यें अनुपानाचें महत्त्व वर्णन केलें आहे. म्हणून येथें त्याचाहि विचार करणें आवश्यक आहे.

अनुपानाचें महत्त्व

औषधियोगांबरोबर किंवा एखाद्या भस्माबरोबर कांहीं वनस्पतींच्या स्वरसाची किंवा काढ्याची योजना करण्याची पद्धत फार पूर्वीपासून प्रचारांत आहे ती कां ? याचा विचार थोडक्यांत करूं.

औषधीद्रव्याबरोबर दिल्या जाणाऱ्या स्वरसाचा किंवा काढ्याचा समावेश अनुपान या शब्दांत होत नाहीं. अनुपान म्हणजे पश्चात् पान. येथें औषधिद्रव्यांबरोबर स्वरस किंवा क्वाथ दिले जातात. म्हणून यांस सहपान म्हणणें जास्त योग्य होईल. या सहपानाची योजना कां केली व याचें कार्य काय हेहि समजून घेणें आवश्यक आहे.

तत् तत् रोगहरानुपानसहितं ताम्रं द्विवल्लोन्मितम् । र. र. स.

ताम्रभस्म हें तत् तत् रोगहर अशा अनुपानाबरोबर द्यावयास सांगितलें आहे. येथें व्याधिनाशनाचें कार्य अनुपानामुळें घडतें, ताम्रामुळें नव्हें. तर मग ताम्राचें कार्य काय ? येथें ताम्र हे योगवाही म्हणून कार्य करतें. याचप्रमाणें इतर धातूंची भस्मेंहि योगवाही म्हणून कार्य करतात. याचप्रमाणें अनेक रसायनकल्पहि तत् तत् व्याधिनाशक अशा अनुपानाबरोबर दिलें असतां त्या व्याधीचा नाश करतात. ज्या रसकल्पामध्यें खनिज द्रव्यांचें प्रमाण असतें ती सर्व योगवाही आहेत. व योगवाही द्रव्यांचें स्वतंत्रपणें असें रसायन कार्यहि घडून येत असतें.

मांसवृद्धिजन्य विकारांत स्थानिक मांसधातूची वृद्धि झालेली असते. अशावेळीं स्थानिक मांसधातूचें क्षरण करणाऱ्या भस्माचें कार्य जसें होतें तसेंच शरीरस्थ इतर मांसधातूची क्षीणताहि भरून येत असते. यामुळें शरीरस्थ दोषधातुमलांचें साम्य उत्पन्न करतां येतें. अशारीतीनें हे धातुसाम्य प्रस्थापित होण्यासाठीं व्याधिनाशक सहपानाबरोबर भस्में व रसायनें यांची योजना केली आहे.

अल्प मात्रेचें महत्त्व

धातूपधातूंची भस्में किंवा रसायनकल्प यांचें प्रमाण किती असावें याबावतींत मतभेद आहेत. कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें या धातूपधातूंच्या औषधांचें प्रमाण अल्प असावें असें आहे. याचें कारण असें कीं ही खनिज द्रव्यें मोठ्या प्रमाणांत दिली गेल्यास त्याचें शरीरावर दुष्परिणाम दिसून येतात, असे प्रयोगानेंहि सिद्ध झाले आहे. म्हणून ही अल्प मात्रेंत वापरावीत. अल्प मात्रेनें दिलेल्या या धातूपधातूंच्या कल्पांचा उपयोग व्याधिक्षमत्व निर्माण करण्याकडे होतो. कांहीं पाश्चात्य विद्वान या धातूपधातूंच्या अल्प मात्रेसंबंधी पुढीलप्रमाणें मतें व्यक्त करतात. या धातूपधातूंच्या अल्प मात्रेमुळें शरीरांत 'अँटिबॉडिज' निर्माण होतात. अशारीतीनें अल्प मात्रा ही सद्यःफलदायी व दोषसाम्य प्रस्थापित करणारी असल्यामुळें चिकित्सेमध्यें तिचे फार मोठे महत्त्व आहे.

सुखसंज्ञकम् आरोग्यम्

आयुर्वेदानें आरोग्याची जी व्याख्या केली आहे ती फार मोठी महत्त्वाची आहे. शरीरामध्यें सुखसंवेदना निर्माण करणें हे एक चिकित्सेचे फार मोठें तंत्र आहे. चिकित्सा करीत असतांना औषधि द्रव्यांचा जो उपयोग केला जातो त्यापासून सुखसंवेदना निर्माण होणें आवश्यक असते. तसेच चिकित्सेसाठीं जे प्रयोग केले जातात, त्यापासूनहि सुखसंवेदना निर्माण होणें आवश्यक आहे. या प्रयोगामध्यें पंचकर्म हो चिकित्सा अंतरभूत आहे. पंचकर्म चिकित्सेमध्यें वमन विरेचनादि जे प्रयोग सांगितले आहेत, त्या प्रयोगावस्थेंतहि सुखसंवेदनाच निर्माण व्हाव्या लागतात. म्हणून पंचकर्मांचा विचार हीनमिथ्यातियोगानें केला आहे. पंचकर्माचा सम्यग् योग झाला असतांना सुखसंवेदना निर्माण होते. इतकेच नव्हें तर प्रयोगामध्यें वापरल्या जाणाऱ्या द्रव्यांपासून म्हणजेच प्रयोगाच्या आरंभापासून सुखसंवेदना निर्माण होण्यासाठीं वामक किंवा विरेचक द्रव्यांबरोबर सुखसंवेदना निर्माण करणारी द्रव्यें मिश्र करावी लागतात व या शोधनाबरोबर दोष हे सुखानें स्रोतसांमधून बाहेर जावें लागतात. अशावेळीं दुःख संवेदना उत्पन्न होऊं नये याची काळजी चिकित्सकानें घ्यावी लागते. याचप्रमाणें शमन चिकित्सेमध्येंहि द्रव्यांचा किंवा अद्रव्यभूत चिकित्सेचा प्रयोग करीत असतांना सुखसंवेदना निर्माण करून दोषांचें शमन करणें आवश्यक आहे.

रसायन चिकित्सेमध्यें अल्प मात्रा जी सांगितली आहे ती याच हेतूनें होय. या अल्प मात्रेमुळें व्याधिहरण किंवा दोषप्रशमन कसें घडतें हेहि पाहणें आवश्यक आहे. आधुनिक चिकित्सेमध्यें औषधांच्या प्रमाणाचा विचार निराळया दृष्टिकोनांतून केलेला आहे. त्याचाहि थोडक्यांत विचार करूं.

तुलनात्मक दृष्टिकोन

सध्याचें युग अँटिबॉयोटिक्सचे आहे. ही औषधें इतक्या मोठ्या प्रमाणावर द्यावी लागतात कीं त्यांचा रक्तांत विशिष्ट प्रमाणांत संचय व्हावा लागतो. तेव्हांच त्या औषधांचें कार्य शरीरांत दिसून येतें. हा जो आधुनिक दृष्टिकोन आहे तो आयुर्वेदानें आपल्या चिकित्सेंत घेतलेला नाहीं. म्हणून आयुर्वेदीय औषधींचें कार्य अल्प मात्रेनें कसें घडतें तें पाहूं.

आयुर्वेदीय औषधी कल्पामध्यें जीं जीं द्रव्यें घातलेली आहेत, त्या द्रव्यांच्या ठिकाणीं असलेल्या गुणांचा उत्कर्ष करून तीं मिश्र केली आहेत. आधुनिक वैद्यक द्रव्यांच्या प्रमाणावर भर अधिक देते तर आयुर्वेद हा गुणावर अधिक भर देतो. हा दोहोंमधला फार मोठा फरक आहे.

दुसरें उदाहरण घ्यावयाचें झाल्यास लोहाचें घेता येईल. रक्तवृद्धिसाठीं लोहकल्पांचा उपयोग दोन्हीहि शास्त्रांत केलेला आहे. आधुनिक वैद्यकांत जें लोहकल्प आहेत त्यांचें प्रमाण फार मोठें द्यावें लागतें. व आयुर्वेदांत लोहभस्म किंवा तत्सम लोहयुक्त औषधें ही अल्प प्रमाणानें दिली जातात. लोहाचें प्रमाण अधिक दिल्यास तो लोह शरीरांतून बराचसा बाहेर टाकला जातो. त्याचें कारण त्या लोहाचें पचन-शोषण योग्यरीतीनें होत नाहीं व इतक्या मोठ्या प्रमाणांत दिलेलें लोह शरीर घेऊं शकत नाहीं व मोठ्या प्रमाणाची शरीरास आवश्यकताहि नसते.

अशारीतीनें खनिज द्रव्यें वा खनिज द्रव्यांचें कल्प हें अल्प मात्रेनें दिलें असतां त्यांचें कार्य शरीरांत दिसून येतें, मोठ्या मात्रेची आवश्यकता नाहीं. या अल्प मात्रेचें शरीरांत घडणारें कार्य डॉ. कर्नल आर्. एन्. चोप्रा यांनीं इंडिजिनस ड्रग्ज ऑफ इंडिया या पुस्तकांत नमूद केलें आहे.

Most of the preparation of mercury in use in the British Pharmacopoeia are rapidly absorbed, so that larger quantities of mercury ion than are good for the system, are probably taken up. It is quite possible that in 'Makaradhwaja' we have an insoluble preparation which by action of the gastro Intestinal juices, is rendered absorbable to such an extent that minute quantities of mercury ions, sufficent for stimulation of the tissues and no more, are taken into the system and are acting on the tissues. (P.453)

आधुनिक वैद्यकांत व आयुर्वेदांत पारदाचें कल्प वापरलें जातात. आधुनिक वैद्यकांतील कल्प शरीरांत लवकर व अधिक प्रमाणांत शोषले जातात व त्यांचें कार्य शरीरांतील सूक्ष्म घटकावर होत असतें. पारद हा अधिक प्रमाणांत गेल्यामुळें त्याचें संपूर्णतः पचन होत नाहीं, व जो पारद शरीरांत शोषला जातो, त्याचें कार्य व्याधिनाशनाचें जसें दिसतें तसेच शरीरस्थ सजीव परमाणूंचा नाश होण्याकडेहि त्याचें कार्य दिसतें. यामुळें पारदाचें दुष्परिणाम शरीरांवर घडून येतात.

आयुर्वेदानें जें पारदकल्प उपयोगांत आणले आहेत तें सर्व कोणत्याहि द्रावणांत न विरघळणारे असे आहेत. यांचें द्रावण होत नसल्यामुळें ब्रिटिश फार्माकोपियानें हें कल्प वापरलेलें नाहींत, पण डॉ. आर्. एन्. चोप्रा व तत्पूर्वींच्या कांहीं संशोधकांनीं या कल्पांचें प्राण्यावर प्रयोग केलें आहेत. व त्यांना असें आढळून आलें कीं हें सर्व कल्प शरीरस्थ पाचक रसामुळें पचून शरीरांत शोषलें जातात व त्यांचें कार्यहि शरीरावर घडून येतें. या कल्पांमधील पारदाचें प्रमाण अत्यल्प असतें व तें शरीरांतील सूक्ष्म घटकांना उत्तेजित करण्यास पुरेसें

आहे. या अल्प प्रमाणानें शरीरावर कोणताहि दुष्परिणाम घडून येत नाहीं. म्हणून या पारद कल्पांचें किंवा धातूपधातूंच्या कल्पांचें कार्य सुखद असें होतें.

अशा रीतीनें या कल्पांच्या अल्प प्रमाणानें शरीरस्थ दोष, धातु व मल यांची साम्यावस्था निर्माण होते, म्हणून हें सर्व कल्प अल्प प्रमाणानेंच वापरावेंत. मोठ्या मात्रेची आवश्यकता नाहीं. हे वरील डॉ. चोप्रा यांच्या उताऱ्यावरून कळून येईल.

पूर्वींचा वैद्यवर्ग हें सर्व रसायनकल्प अनुपान द्रव्याबरोबर सहाणेवर उगाळून वरचेवर चाटवीत असत. व त्याचा अनुभवहि चांगला येत असे. ही प्रथा पुनः सुरू व्हावी म्हणून वरील विवेचन केलें आहे.

औषधी योजनेंतील महत्त्व

या ग्रंथांत केवल एखादा कल्प किंवा केवल एकेरी वनस्पति अशी वापरली गेली नाहीं. अनेक औषधीकल्प व इतर वनस्पति द्रव्यें एकत्र करून औषधी योजना केलेली आहे. या औषधी योजनेचा हेतु लक्षांत यावा म्हणून त्याचें स्पष्टीकरण करीत आहे.

औषधी योजनेमध्यें व्याधिप्रत्यनीक आणि दोषप्रत्यनीक अशी औषधें वापरण्याची प्रथा पूर्वापार चालू आहे. केवल दोषप्रत्यनीक किंवा व्याधिप्रत्यनीक चिकित्सा तात्काल फलद्रूप होत नसल्यामुळेंच वाग्भट ग्रंथकारांनीं हेतुप्रत्यनीक, व्याधिप्रत्यनीक व दोषप्रत्यनीक अशी चिकित्सा लिहिलेली दिसून येते. उदा:– ज्वर चिकित्सेमध्यें प्रथम ज्वर उत्पन्न करणाऱ्या व स्रोतोरोध निर्माण करणाऱ्या आमाच्या पचनाकडे लक्ष दिलें आहे. त्यानंतर दोषांच्या वृद्धीमुळें उत्पन्न होणाऱ्या लक्षणांचा विचार केला आहे, व व्याधीमध्यें उत्पन्न होणाऱ्या बलवान अशा लक्षणांचा विचार प्रामुख्यानें केला आहे. तसेंच बलवान अशा उपद्रवाचाहि विचार चिकित्सेमध्यें प्रथम करावा लागतो हेहि स्पष्टपणानें मांडले आहे. उदा:– ज्वर. ज्वरामध्यें आम + दोष आणि उपद्रवात्मक व्याधि यापैकीं जो बलवान असेल त्याची चिकित्सा प्रथम करावी लागते, म्हणून ज्वरांत प्रथम लंघन व आमपाचक षडंगोदक किंवा सुवर्णसूतशेखर ही द्यावी लागतात. ज्वर चिकित्सेमध्यें जी औषधी योजना केलेली आहे त्यामध्यें आमपाचक म्हणून सुवर्णसूतशेखर, ज्वरघ्न म्हणून लक्ष्मीनारायणरस यांचें एकत्र मिश्रण केलें आहे. या ज्वरांत रक्तपित्तासारखा प्रबल उपद्रव उत्पन्न झाला असल्यास चंद्रकला, प्रवाळ, मौक्तिक इ. द्रव्यें त्यांत मिश्र केली आहेत. या तात्त्विक भूमिकेनें एकंदर रोगामध्यें औषधी योजना केलेली आहे. हें ग्रंथाचें सूक्ष्म अवलोकन केल्यास दिसून येईल.

कांहीं रोगामध्यें विशिष्ट रसायनकल्प घेऊन, व्याधीनाशक अशा वनस्पतीशीं त्या रसायन कल्पाचा संयोग करून, त्या वनस्पतीचें कार्य वृद्धिंगत केलेलें आहे. येथें दोन प्रकारचा दृष्टिकोन आढळून येईल. १) समान भावात्मक द्रव्यें एकत्र केलेलीं आहेत. २) योगवाही अशा द्रव्यांचा संयोग करून विशिष्ट कार्य वाढावें असा दृष्टिकोन ठेवून मिश्रणें केलेलीं आहेत.

वर जी १० विधानें मांडलेली आहेत त्या सर्व विधानांचा उपयोग करून घेतला आहे.

परादि दशगुणांचें चिकित्सेंतील स्थान

चरकानें परादि दहा गुणांचे चिकित्सेंत असणारें स्थान दाखविलें आहे. या दहा गुणांचा विचार चिकित्सेमध्यें कसा केला जातो तें पाहूं. या दहा गुणांचा उपयोग जे लोक करीत नाहींत त्यांची चिकित्सा फलद्रूप होत नाहीं असें चरकाचें म्हणणें आहे. हल्लीचें चिकित्सक या दहा गुणांच्या दृष्टिकोनांतून चिकित्सा करतात कां ? आमच्या माहितीप्रमाणें कोणीहि चिकित्सक या दहा गुणांचा उपयोग चिकित्सेंत करीत नाहीं. मग त्यांची चिकित्सा फलद्रूप कशी होते ? या दहा गुणांचा विचार त्यांचेकडून न कळत कां होईना केला जातो. म्हणून तो चिकित्सेंत यशस्वी होतो. उदा:– त्यांच्या परंपरेंतील किंवा संग्रहांतील एखाद्या रोगावर असलेलें पर द्रव्य तो निवडतो. व तें द्रव्य हमखास गुण देणारे आहे असें समजतो. यासच प्रधान द्रव्य असें म्हटलें आहे. या पर द्रव्यामध्यें संयोग, विभाग, पृथक्त्व किंवा युक्ति या गुणांचा अंतर्भाव असल्यामुळें त्याची चिकित्सा फलदायी होते. कांहीं रोग्यांत ही चिकित्सा फलदायी होत नसल्याचाहि अनुभव येतो. ती कां ? याचा विचार करण्याचें सामर्थ्य अशा वैद्यांचें जवळ नसतें. या चिकित्सेचा उपयोग कां झाला नाहीं? याची शास्त्रीय मीमांसा करण्याचें कार्य शास्त्राध्ययनांवाचून होत नाहीं. म्हणून शास्त्राध्ययनाची आवश्यकता आहे.

परादि दशगुण

पर, अपर, युक्ति, संख्या, संयोग, विभाग, पृथक्त्व, परिणाम, संस्कार, अभ्यास हे परादि दहा गुण चिकित्सोपयोगी आहेत. टीकाकारानें या दहा गुणांचा विचार विशेष स्पष्ट केलेला नाहीं.

पर–

१) याठिकाणीं पर शब्दाचा अर्थ श्रेष्ठ असा घेणें योग्य होईल. चिकित्सेमध्यें देश, काल व औषध हें सर्व श्रेष्ठ कसें आहेत तें पहावें लागतें.

देश–

१) भूमिदेश, २) देहदेश, ३) औषधीदेश. यांचा विचार करावा लागतो. भूमिदेशामध्यें जांगल, अनूप व साधारण यापैकीं रोग्यांस कोणता देश रोगमुक्ती करितां अनुकूल आहे हें पाहणें आवश्यक आहे. प्रतिकूल देश असेल तर त्या रोग्यांस अनुकूल देशामध्यें जाऊन राहण्याचा सल्ला द्यावा लागतो. उदा:– जांगल देशांत राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीस, वातविकार झाला असतांना त्यांस अनूप देशांत जाण्यास सांगावें. तो देश चिकित्सेच्यादृष्टीनें श्रेष्ठ प्रतीचा ठरेल.

देहदेश–

देहदेशामध्यें दोन प्रकार पाडावे लागतील. १) देहदेश २) मनोदेश.

देहांत मर्मस्थानें सोडून झालेला व्याधि हा चिकित्सेस सुखसाध्य असतो. म्हणून तो देहदेश पर समजावा. त्याचप्रमाणें देहांत दोषांकडून अनेक स्थानांत व्याधिसंकर झाला तर तो अपर– कष्टसाध्य, असाध्य समजावा.

मनोदेश–

सात्त्विक, राजस आणि तामस असें तीन प्रकारचें लोक समाजांत आढळतात. यापैकीं सात्त्विक मनोवृत्तीचा रोगी हा पर–साध्य समजावा. व राजस हा त्यापेक्षां कनिष्ठ–कष्टसाध्य व तामस हा अपर–असाध्य होय.

औषधीदेश–

चिकित्सेमध्यें विशिष्ट देशामध्यें उत्पन्न होणाऱ्या वनस्पतींची निवड करावी लागते. सर्व देशामध्यें एका वनस्पतीची योग्य अगर सारखी वाढ होत नसते, म्हणजेच त्यांच्यामध्यें रसादि गुणांची सारख्याप्रमाणांत निर्मिति होत नाहीं, (देश–काल–आकार–निमित्त कारणें) म्हणून वापरल्या जाणाऱ्या वनस्पति कोणत्या देशांतील श्रेष्ठ आहेत, याचा विचार केला पाहिजे, व त्याच देशांतील वनस्पति आणून औषधी योग करावेत.

आयुर्वेदानें या शिवाय कांहीं निंद्य स्थानें सांगितली आहेत. उदा.– स्मशान. या निंद्य स्थानांतील वनस्पति अपर म्हणून गणल्या गेल्या आहेत. विशिष्ट देशामध्यें वनस्पतींच्या ठिकाणीं योग्य असे रस, वीर्य, विपाक व प्रभाव हें गुणधर्म उत्पन्न होतात, म्हणून तत्स्थानिन तें द्रव्य श्रेष्ठ समजलें जातें.

कालकृत परत्व–

१) विशिष्ट कालामध्यें वनस्पति या परिपूर्ण होतात. अशा परिपूर्ण वाढलेल्या वनस्पति चिकित्सेमध्यें श्रेष्ठ (पर) समजाव्या, व बाकीच्या इतर कालांतील अपर समजाव्या.

२) कालकृत परापरत्वाचा संबंध चिकित्सेमध्यें रोग व रोगी यांच्याशींहि आलेला आहे. व्याधीच्या साध्यासाध्यत्वाच्या दृष्टीनेंहि रोग आणि रोगी यांचा कालानुसार विचार करावा लागतो. उदा.– १) ग्रहणी. बाल्यावस्थेंत झालेला ग्रहणी विकार साध्य, तरुणावस्थेंत झालेला कष्टसाध्य व वृद्धावस्थेंत झालेला असाध्य आहे. २) प्राकृत–वैकृत ज्वर. शरद ऋतूंतील पित्तज्वर किंवा वसंत ऋतूंतील कफज्वर हे प्राकृतज्वर सुखसाध्य आहेत. म्हणजे चिकित्सेच्या दृष्टीनें पर आहेत.

देश कालांचा विचार वर केलेला आहे. आता पाक, वीर्य, रसादींचा विचार क्रमप्राप्त आहे. चिकित्सेमध्यें ज्या ज्या द्रव्यांचा उपयोग करावयाचा आहे तीं तीं द्रव्यें आपणास सहज उपलब्ध होणारी किंवा आपल्या जवळ असलेलीं यामध्यें पर आणि अपर कोणती द्रव्यें आहेत याचा विचार करून त्यांतील पर द्रव्यें निवडणें योग्य होईल. या द्रव्यामध्यें रसोत्कटताहि असावी लागते. रसहीन द्रव्यें अपर असल्यामुळें ती त्याज्य आहेत, किंवा वीर्यहीन द्रव्येंहि त्याज्य आहेत. रसयुक्त, वीर्यवान् द्रव्यें ही श्रेष्ठ आहेत. याचप्रमाणें पाकाचाहि विचार करावा लागतो. जीं औषधीं द्रव्यें शरीरांत सुलभ पचून शोषली जातात ती पर होत. आणि जीं द्रव्यें लवकर शोषली जात नाहींत, पचली जात नाहींत, ती अपर जाणावी. या दृष्टिकोनांतून पाहतां रसायनकल्पें ही पर आहेत. म्हणून या ग्रंथांत रसकल्पांचा उपयोग अधिक केलेला दिसून येईल.

युक्ति

योजना या तु युज्यते सा युक्तिः जी योजना जेथें अचूक फलदायी होते ती युक्ति होय. चिकित्सेमध्यें जी योजना अचूकपणें दोषसाम्य प्रस्थापित करतें ती युक्ति म्हणावी. जसें– एखादा शिकारी नेम धरून एका गोळीतच सावज मारतो. हेंच कौशल्य चिकित्सेमध्यें असावें लागतें. म्हणून परादि सर्व गुणामध्यें युक्ति हा गुण अत्यंत श्रेष्ठ आहे.

संख्या

चिकित्सेमध्यें अनेक द्रव्यांचें मिश्रण करून चिकित्सा केली असतां ती अधिक फलदायी होते, म्हणूनच प्राचीन ग्रंथांत क्वाथ, चूर्ण, गुटिका, अवलेह इ. मध्यें अनेक द्रव्यें एकत्र केलेलीं आहेत, म्हणून संख्या या गुणाला चिकित्से-मध्यें फार महत्त्व आहे.

संयोग

दोन वा अधिक द्रव्यांचा संयोग करून चिकित्सेंत अंतिम यश निर्माण करण्याचा हा एक प्रयत्न आहे. कोणत्या द्रव्याचा कोणत्या द्रव्यांशीं संयोग केला असतांना शक्त्युत्कर्ष होतो याचें ज्ञान वैद्यांस असणें आवश्यक आहे. दोन समान गुणात्मक द्रव्यांचा संयोग केला असतांना शक्त्युत्कर्ष होतो असे प्राचीन ग्रंथ-कारांचेंहि म्हणणें आहे. याचप्रमाणें योगवाहि द्रव्यांचा संयोग करूनहि एखाद्या द्रव्याचें गुणधर्म वाढविता येतात. ही संयोगात्मक योजना चिकित्सेंत अत्यंत महत्त्वाची आहे.

विभाग

संयोगाच्या विरुद्ध हा गुण आहे. दोन द्रव्यांचा संयोग करून कल्पांचें गुण-धर्म वाढविलें जातात. तें गुणधर्म अति तीव्र स्वरूपांत होऊं नयेत म्हणून झालेला संयोग विशिष्ट मर्यादेपर्यंत आणण्यासाठीं तद्विरुद्ध द्रव्यांचा संयोग करावा लागतो, म्हणून कल्पस्थानांत कुर्याद् संयोग–विश्लेष–काल–संस्कार–युक्तिभिः या ठिकाणीं विश्लेष शब्दांनीं विभाग असा अर्थ घेतां येतो.

एखाद्या द्रव्यांचे शरीरावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठीं तद्विरुद्ध द्रव्यांचा संयोग अनेक कल्पांत केलेला आहे. हाहि एक विभागच होय.

दोषदूष्यसंमूर्च्छनेंमुळें व्याधी निर्माण होतो. येथें दोष व दूष्यें यांचा जो संयोग झालेला असतो, तो नष्ट होण्यासाठीं त्यांचा विभाग करणारी द्रव्यें चिकित्सेमध्यें उपयोगांत आणली जातात.

अशारीतीनें संयोग आणि विभाग या दोन गुणांचा उपयोग चिकित्सेच्या–दृष्टीनें फार उपयोगाचा आहे.

संयोग आणि विभाग हें दोन गुण द्रव्यांच्याच ठिकाणीं असतात.

पृथक्त्व

चिकित्सेमध्यें अनेक द्रव्यांची जी मिश्रणें केली जातात त्यांत कांहीं द्रव्यें स्वतंत्रपणें राहून आपलें कार्य करतात. उदा:– अश्वकंचुकी, इच्छाभेदी, नाराचरस इ. कल्पामध्यें जेपाळबी मिश्र केलेली असतें. याचा इतर द्रव्यांशीं संयोग न होता तें निराळें राहतें, व त्याचेंच कार्य शरीरांत दिसून येतें. अशारीतीनें चिकित्सेमध्यें औषधी द्रव्यांची योजना करावी लागते.

परिमाण

औषधी द्रव्यांचें रोगाच्या व रोग्याच्या बलानुसार योग्य प्रमाण ठरवावें लागतें. रोगाच्या साध्यासाध्यात्वाच्या दृष्टीनें शरीराचें अंगुलीमान पाहणें आवश्यक असतें.

संस्कार

कल्प तयार करीत असतांना निरनिराळे खल, भावना इ. संस्कार केलें जातात, व तें योग्यरीतीनें करावें लागतात. त्याशिवाय त्यांचें कार्य नीट वा अपेक्षित होत नाहीं, किंवा औषधी योजना करीत असतांना मात्रांचा उपयोग केला जातो, त्या मात्रा अनुपानाबरोबर सहाणेवर उगाळून द्याव्या लागतात. हा एक संस्कारच होय. या संस्काराशिवाय त्या मात्रांचें कार्य लवकर दिसून येत नाहीं.

अभ्यास

अभ्यास म्हणजे सतत ती क्रिया कांहीं दिवस किंवा कांहीं काल करीत राहणें. कोणतेहि औषधी द्रव्य घेतलें असतां त्या औषधाचा परिणाम होण्यासाठीं सतत त्याचा कांहीं काल उपयोग करावा लागतो. त्याशिवाय रोगी बरा होत नाहीं.

वरील १० गुणांचा उपयोग चिकित्सेमध्यें योग्यरीतीनें केला तरच चिकित्सेंत यशप्राप्ति होते. हें वरील विवेचनावरून सहज लक्षांत येईल.

चिकित्सा यैरविदितैर्न यथावत् प्रवर्तते ।।

चरक सूत्रस्थान अ. २६ – ३५

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
ज्वरनिदान व चिकित्सा	१
अतिसार – प्रवाहिका	२०
ग्रहणी	२५
अग्निमांद्य	२८
अजीर्ण	३२
विसूचिका	३४
पाण्डु – कामला	३५
रक्तपित्त	४१
राजयक्ष्मा	४६
पार्श्वशूल – प्लूरसी	४८
कास	५१
हिक्का – उचकी	५४
श्वास	५६
स्वरभेद	५९
छर्दि	६०
मूर्च्छा – भ्रम – संन्यास	६३
वात व्याधि	६७
आमवात	७८
वातरक्त	८१

विषय	पृष्ठ
शूल	८३
उदावर्त	१००
हृद्रोग	११०
नाडीविज्ञान	१४८
रसाभिनोदन वृद्धि व क्षीणता	१५८
मूत्रकृच्छ्र – मूत्राघात– अश्मरी	१७०
प्रमेह – बहुमूत्रता	१७९
उदर	१९६
शोथ	२१२
अर्बुद – गण्डमाला – अपची	२१६
अम्लपित्त	२२६
शीतपित्त – उदर्द – कोठ	२२९
विसर्प	२३०
कुष्ठ	२३४
फिरंगोपदंश	२३६

।। श्री धन्वन्तरी प्रसन्न ।।

ज्वरनिदान व चिकित्सा

वैद्यानें रोगाचें निदान केलें आहे, असे गृहीत धरून पुढील अनुभविक चिकित्सा लिहीत आहे.

ज्वराची पूर्वरूपावस्था :—

विशेष लक्षणें–आमावस्थाजन्य अंगमर्द, अरति, श्रम, रोमहर्ष उष्णता किंवा थंडी यांची इच्छा उत्पन्न होणें, अरुचि.

चिकित्सा– लंघन (निराहार) त्रिभुवनकीर्ति ·।।· ते १ गुंज. आर्द्रकस्वरस एक ते दोन चमचे (लहान) यांत मध किंवा खडीसाखर मिसळून देणें. दिवसांतून ३ वेळां. किंवा खालील मिश्रण देणें– त्रिभुवनकीर्ति १।।· गुंज + मृगश्रृंग भस्म ३ गुंजा + सितोपलादि चूर्ण ९ गुंज = ३ पुडया वरील अनुपानांतून दिवसांतून ३ वेळां देणें.

या अवस्थेंत केवळ लंघन दिलें असतानांहि ज्वराची पुढील अवस्था टळते किंवा तीव्र स्वरूपाची लक्षणें असतां पुढील अवस्था सौम्य होते.

विशेष लक्षणें–निरामावस्था व्यायामजन्य लक्षणें– अंगमर्द, लघुता, श्रम, अरति, वैवर्ण्य, शिरःशूल.

सुवर्णगूनशेखर ·।· ते ·।।· गुंज अनुपान– दूधसाखर दिवसांतून २ वेळां.

वातज्वर पूर्वरूपावस्था लक्षणें जांभया अधिक येणें.

त्रिभुवनकीर्ति ·।।· ते १ गुंज. अनुपान– आर्द्रकस्वरस + खडीसाखर दिवसांतून ३ वेळां.

पित्तज्वर पूर्वरूपावस्थेंतील लक्षणें

हस्तपाद–अंग–नेत्र–दाह.	सुवर्णसूतशेखर -।- ते -।।- गुंज + प्रवाळ भस्म -।।- ते २ गुंज. + सितोपलादिचूर्ण ९ गुंज = ३ पुडया. अनुपान– दूधसाखर किंवा मोरावळा किंवा आर्द्रक स्वरस + साखर. दिवसांतून ३ वेळां देणें.

कफज्वराच्या पूर्वरूपावस्थेंतील लक्षणें

अनन्नाभिलाषा, अरुचि.	लंघन, त्रिभुवनकीर्ति -।।- ते १ गुंज अनुपान- आल्याचा रस व मध. दिवसांतून ३ वेळां.
आमावस्था आहार	लंघन (निराहार) १ ते २ दिवस बलाप्रमाणें देणें. चहा, कॉफी, दूध थोडे घालून द्यावी.
श्रमजन्य पूर्वरूपावस्था आहार	दूध साखर, तूप भात, आमसुलाचें सार व भात.
पूर्वरूपावस्थेंतील निरामावस्था आहार	दूधसाखर, तांदूळ भाजून केलेला मऊ भात व दूध, साबुदाण्याची खीर, सार भात.
वातज पूर्वरूपावस्थेंत आहार	आमपाचक व वातनाशक, शुंठीसिद्ध दूध, चहा, कॉफी देणें.
पित्तज पूर्वरूपावस्थेंत आहार	आमपाचक व पित्तनाशक. तिक्त, कषाय रसात्मक द्रव्यें उदा. चहा, कॉफी हीं पेयें. यांत सुगंधी लवंग, दालचिनी, वेलदोडे घालून तयार करून द्यावीत.
कफज पूर्वरूपावस्थेंत आहार	आमपाचक व कफघ्न, तीक्ष्ण, उष्ण, सुंठ पिंपळी हीं द्रव्यें घालून चहा, कॉफी हीं पेयें द्यावी.

त्रिदोषजनित पूर्वरूपावस्थेंत सर्व दोषांची लक्षणें दिसतात.	लंघन, पाचक, त्रिदोषघ्न. १) मृत्युंजय -।।- ते १ गुंज, सुवर्णसूतशेखर -।- ते -।।- गुंज १ पुडी दिवसांतून ३ वेळां देणें. २) राजचंडेश्वर -।।- ते १ गुंज एका वेळीं दिवसांतून ३ वेळां देणें.
आमपाचक, त्रिदोषघ्न. **आहार**	लंघन, ऊन पाणी, किंवा उकळून थंड केलेलें पाणी, चहा, कॉफी, यांत सुंठ, मिरे, पिंपळी, दालचिनी टाकून चहा किंवा कॉफी करून द्यावी.

वातज्वराची विशेष लक्षणें

ज्वराचा विषम-वेग, निद्रानाश, शिर:शूल, गात्रशूल, गाढविट्कता, हृद्शूल, पार्श्वशूल.	दशमूलघन १ ते २ गुंजा, त्रिभुवनकीर्ति -।।- ते १ गुंज, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा. यांची १ पुडी. दिवसांतून ३ पुडया देणें. अनुपान- तुळशीचा रस १ ते २ चमचे घेऊन त्यांत पुडी मिसळून आंत साखर टाकून चाटविणें.
निद्रानाश व शिर:शूल अधिक असेल तर	देवदार पाण्यांत उगाळून कपाळावर लेप करणें. किंवा जायफळ पाण्यांत उगाळून त्यांत कापराच्या २–३ वडया मिश्र करून कपाळावर लेप घालणें.
गाढविट्कता	तिळाच्या तेलाची पिचकारी देणें. बस्ति देणें.

पित्तज्वर लक्षणें

तीक्ष्ण ज्वरवेग, कण्ठ, मुख, नासा, यांचा पाक, (दाह, लाली) स्वेद, दाह, तृष्णा, रक्तनिष्ठीवन.	लक्ष्मीनारायणरस -।- ते -।।- गुंज, सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज, प्रवाळ भस्म १ ते २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी, दिवसांतून ३ ते ४ वेळां देणें. अनुपान– मोरावळा किंवा तापवून थंड केलेलें पाणी.

अतिसार, वमि, वक्त्रकटुता.	सुवर्णसूतशेखर -॥- ते १ गुंज, सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी दिवसांतून ३ पुड्या देणें. अनुपान-दाडिमावलेह.
प्रलाप, मूर्च्छा, मद, भ्रम, निद्राल्पत्व	सुवर्णसूतशेखर १ गुंज, सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, याची १ पुडी, दिवसांतून ३ ते ४ वेळां देणें. अनुपान– दाडिमावलेह किंवा मोरावळा.
मूर्च्छा किंवा प्रलाप अधिक असणें.	सुवर्णसूतशेखर -।- ते -॥- गुंज आल्याच्या रसांत उगाळून त्यांत मोरावळा मिसळून ५–५ मिनिटांनीं चाटविणें. रोगी चाटत नसल्यास किंवा दातखीळ बसली असल्यास वरील चाटण हिरड्यास चोळणें.
निद्राल्पत्व.	सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, अश्वगंधाघन २ गुंजा यांची १ पुडी अशा ३ पुड्या २-२ तासांनीं दूधसाखरेबरोबर देणें. विशेषतः रात्रीं देणें.
अतिस्वेद	सुवर्णसूतशेखर -॥- ते १ गुंज, सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, प्रवाळभस्म २ गुंजा यांची १ पुडी. ही पुडी १-१ तासानीं मोरावळ्याच्या पाकांतून किंवा दूध साखरेबरोबर द्यावी. घाम बंद झाल्यावर देऊं नये.
स्वेदातिप्रवर्तनामुळें नाडी क्षीण, व जलद झाल्यास.	लक्ष्मीविलासगुटी -।- ते -॥- गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध घालून वरचेवर चाटविणें.
कंठ, ओष्ठ, मुख, नासा यांचा पाक. येथें लाली, शोथ, दाह असणें.	गंधकद्रुती दिवसांतून २ वेळां लावणें.

अतितृष्णा.	षडंगोदक किंवा खर्परसिद्धजल (खापर चांगले लाल होईपर्यंत तापवून पाण्यांत सात वेळां बुडविणें). हें पाणी वरचेवर पिण्यास द्यावें.
रक्तनिष्ठीवन,	लाक्षाचूर्ण २ गुंजा, चंद्रकला १ गुंज, प्रवाळभस्म १ गुंज याची १ पुडी दिवसांतून ३ वेळां देणें. अनुपान– शीतजल किंवा कुष्मांड स्वरस.

कफज्वर लक्षणें

प्रतिश्याय, कास, श्वास, गौरव, रोमहर्ष, स्तैमित्य, (जाड्य) अंगसाद.	त्रिभुवनकीर्ति -॥- ते १ गुंज, शृंगभस्म २ गुंजा, सितोपलादिचूर्ण किंवा लवंगादि चूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– आर्द्रकस्वरस व मध किंवा तुळशीच्या पानाचा रस व मध. दिवसांतून ३ वेळां देणें.
मधुरास्यता, लवणास्यता, तृप्ति, प्रसेक, लालास्राव, अरुचि, अविपाकिता, स्रोतोरोध, छर्दि.	संजीवनीगुटी १ ते २ गुंजा. दिवसांतून ३ वेळां. अनुपान– आर्द्रकस्वरस व मध.

टीप – दोषज ज्वरांत ज्यावेळीं वरील लक्षणें प्रामुख्यानें दिसतील त्यावेळीं ही विशिष्ट चिकित्सा केली जावी.

वातपित्तज्वर

तृष्णा, मूर्च्छा, भ्रम, दाह, स्वप्ननाश, शिरःशूल, पर्वभेद, रोमहर्ष, वमथु, जृंभा, तम, कंठ–आस्य–शोष, प्रलाप, मोह.	सुवर्णसूतशेखर -॥- ते १ गुंज, लक्ष्मीनारायण -।- ते -॥- गुंज, प्रवाळभस्म २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा यांची पुडी १ अनुपान– आल्याचा रस व साखर. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
ज्वर वेग अधिक असतांना.	चंद्रकला १ ते २ गुंजा, मौक्तिक भस्म -।- ते -॥- गुंज, प्रवाळभस्म २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा यांची १ पुडी अनुपान– मोरावळा किंवा दाडिमावलेह. ज्वराचा वेग कमी होईपर्यंत ३–३ तासांनीं १–१ पुडी द्यावी.

तीव्र प्रलाप.	महावातविध्वंसनरस -।- ते -।।- गुंज आल्याच्या रसांत उगाळून साखर घालून ५–५ मिनिटांनीं १–१ बोट चाटविणें.
वातकफज्वरः– पर्वभेद, निद्रा, गौरव, शिरोग्रह, प्रतिश्याय, ज्वराचा मध्य-वेग.	त्रिभुवनकीर्ति -।।- ते १ गुंज अनुपान– तुळशीचा रस व मध. दिवसांतून ३ वेळां.
स्वेदाप्रवर्तन (घाम येणें)	सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज मधांत किंवा मोरावळ्याच्या पाकाबरोबर खलून वरचेवर चाटविणें. यावेळीं त्रिभुवनकीर्ति देणें बंद करावें.
शिरोरुक्, श्वास	श्वासासाठीं समीरपन्नग आल्याच्या रसांत ½ गुंज उगाळून मध मिश्र करून वरचेवर चाटविणें.
मलमूत्रावरोध	तिळेल तेलाचा मात्रा बस्ति देणें.
शिरोरुक्	जायफळ पाण्यांत उगाळून त्यांत कापूर मिसळून कपाळावर लेप करणें.
शुष्क कास अधिक	कर्पूरादिवटी १–१ गोळी खडीसाखरेबरोबर तोंडांत धरणें. दिवसांतून ४ ते ६ गोळ्या. बकुळीच्या फुलांचा ५ तोळे फांट साखर घालून थोडा थोडा दिवसभर देत राहणें किंवा बकुलपाक १ ते २ चमचे पाणी मिसळून दिवसांतून ३–४ वेळां देणें.
आर्द्र कास	अभ्रकभस्म -।।- ते १ गुंज, लवंगादिचूर्ण ६ गुंजा १ पुडी अनुपान– मध दिवसांतून ३ वेळां.

कफपित्तज्वर लक्षणें लिप्ततिक्तास्यता, अरुचि, तृष्णा, तन्द्रा, मोह, कास, मुहुःदाह मुहुःशीत, शीतता, स्तंभ, स्वेद ही लक्षणें अनियमित.	सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज, लक्ष्मीनारायणरस -।- ते -।।- गुंज, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– आर्द्रकस्वरस आणि साखर. दिवसांतून ३ वेळां देणें.
अंतर्दाह अधिकः–	प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, गुळवेलीचें सत्त्व २ गुंजा यांची पुडी १ अनुपान– दूध, साखर. किंवा दाडिमावलेह. दाह कमी होईपर्यंत १–१ तासानीं १ पुडी द्यावी.
सान्निपातिक ज्वर लक्षणें अस्थिसंधिशिरोरुजा, कर्णनाद, कर्णशूल, प्रलाप, निद्रानाश, हृद्व्यथा, मलमूत्रस्वेद यांची प्रवृत्ति थोडी पुष्कळ वेळानें होणें, मान सारखी हालणें, मूकत्व, उदर जाड्य, जिव्हा कृष्ण–खरखरीत, गीत-नर्तन हास्यादि चेष्टा, पिण्डिकोद्वेष्टन, पार्श्वशूल, मूर्धारुक्, (टाळूचे जागीं वेदना) पर्वभेद, पापण्या पडणें, डोळे ताठ राहणें, अंग गळणें.	लंघन या कालांत षडंगोदक द्यावें आमाचें पचन होण्यासाठीं. लक्ष्मीनारायणरस -।- ते -।।- गुंज, सुवर्णसूतशेखररस -।।- ते १ गुंज, दशमूलघन २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा पुडी १ अनुपान-आल्याचा रस व मध ३, ३ तासानीं देणें. ज्वरोष्मा १०३ ते १०५ असेल तर या पुड्या २–२ तासांनीं देणें. अनुपान– तुळशीच्या पानाचा रस व मध.
डोळे लाल होणें, मोह, भ्रम, कफाबरोबर रक्त पडणें, काळीतांबडी चकंदळें उठणें, स्रोतसांचा पाक.	चंद्रकलारस -।।- ते १ गुंज, प्रवाळभस्म २ गुंजा, मौक्तिकभस्म -।।- गुंज, पुडी १ अनुपान–मोरावळा किंवा दाडिमावलेह किंवा साखरेचा पाक, दिवसांतून ३ वेळां.
अतिनिद्रा, अश्रुयुक्त डोळे, तंद्रा, कास, श्वास, अरुचि, कंठकूजन, स्वरसाद.	समीरपन्नग ½ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून वरचेवर चाटविणें. या चाटणानें ज्वरोष्मा वाढतो

असें दिसल्यास तें देऊं नये. लक्ष्मीविलास-गुटीचे -।।- गुंजेचे चाटण तयार करून तें द्यावें.

विकृतिविषमसमवायात्मक लक्षणें

घटकेंत थंडी वाजणें, घटकेंत गरम वाटणें, दिवसा अति निद्रा रात्रीं झोप न लागणें, सतत झोप येणें किंवा अजिबात झोप न येणें, अतिस्वेद किंवा अस्वेद.

राजचंडेश्वर -।।- ते १ गुंज. अनुपान– तुळशीचा रस व मध. दिवसांतून ३ ते ४ वेळां देणें.

टीप – या सान्निपातिक अवस्थेंत दोषांच्या लक्षणांत क्षणाक्षणाला बदल होत असतो. त्या बदलानुसार लक्षणांचें वर्गीकरण वर केलें आहे. त्यास अनुसरून स्वतंत्र चिकित्सा दिली आहे. दोषांच्या लक्षणाकडे वैद्यानें सूक्ष्मपणें पाहून चिकित्सा करावी.

देहोष्मा मृदु, मध्य, तीव्र असा असतो.
मृदु ९९ ते १०१ डिग्री, मध्य १०१ ते १०३ डिग्री, तीव्र १०३ ते १०५ डिग्री. तीव्र देहोष्मा १०३ ते १०५ पर्यंत असल्यास

लक्ष्मीनारायणरस -।- ते -।।- गुंज, सुवर्णसूतशेखर -।।- गुंज, मृगशृंगभस्म २ गुंजा, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा याची १ पुडी. अनुपान– तुळशीचा रस व मध २–२ तासानीं १ पुडी देणें.
दिवसा ४ व रात्रीं ४ पुड्या देणें. या पुड्यामुळें घाम अधिक आल्यास त्या देऊं नये. घाम कमी होण्यासाठीं सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज, प्रवाळभस्म २ गुंजा लक्ष्मीविलासगुटी -।।- गुंज १ पुडी करावी ती मधाबरोबर द्यावी.
या पुड्या २ ते ३ वेळां देणें.

देहोष्मा मध्य असतांना

लक्ष्मीनारायणरस -।- गुंज, सूतशेखर -।।- गुंज, सितोपलादिचूर्ण ४ गुंजा, १ पुडी. अनुपान– दाडिमावलेह, किंवा मध, आल्याचा रस व मध. दिवसांतून तीन वेळां.

मंद देहोष्मा.
(या अवस्थेंत आमावस्था कमी असते.)
देहोष्म्याचा क्षय.
(सब् नॉर्मल टेंपरेचर)

या अवस्थेंत मध्य देहोष्म्यांत चालू असलेली चिकित्सा ज्वरमुक्तिपर्यंत द्यावी.

सान्निपातिक ज्वरांत सतत असलेला देहोष्मा दोन प्रकारानें कमी होतो. १ हळूं हळूं देहोष्मा कमी होऊन ज्वर उतरतो, २ एकदम देहोष्मा स्वेद येऊन किंवा स्वेद न येतां ज्वर उतरतो. यापैकीं दुसरी अवस्था रोग्याच्या जीवितास धोका देणारी असल्यामुळें तिकडे चिकित्सकानें बारकाईनें लक्ष पुरवावें. कांहीं रोग्यांत अतिस्वेद येतो, नाडी क्षीण होते, रोगी दगावतो.

या अवस्थेंत पुढील चिकित्सा

महालक्ष्मीविलासरस -।- ते -।।- गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून ५–५ मिनिटानीं १–१ बोट चाटविणें. किंवा हेमगर्भ मात्रा १० ते २० वेळें उगाळून ५–५ मिनिटानीं वरील अनुपानाबरोबर चाटविणें. किंवा त्रैलोक्यचिंतामणी वरील अनुपानाबरोबर चाटविणें.

अतिस्वेद कमी होण्याकरितां

अंगास सुंठीचें किंवा वेखंडाचें किंवा कोष्ठकोळिंजनाचें चूर्ण चोळावें.

टीप – या ज्वराच्या अवस्थेंत आधुनिक वैद्यकतज्ञ ब्लडप्रेशर पाहतात, तें नॉर्मलपेक्षां खाली आलेले असतें. अशावेळींहि वरील मात्रांचें कार्य दिसून येतें. ब्लडप्रेशर या मात्रांच्या चाटणामुळें नॉर्मल येते असा अनुभव आहे.

नाडी (जीवसाक्षिणी)
संतत ज्वरांत कांहीं कांहीं रोग्यांत नाडीचे ठोके मधून मधून बंद पडतात. बोटास एखादा ठोका लागत नाहीं. किंवा दोन ठोके सरळ पडतात. तिसरा हळूं लागतो.

ही अवस्था फारशी धोकादायक नसते. तरी पण तिकडे वैद्याचें लक्ष असावें. रोग जेव्हां आमावस्थेंतून पच्यामानावस्थेंत जात असतो तेव्हां नाडीच्या गतींत बदल होत असतो. म्हणून यावेळीं आमपाचक चिकित्सा करावी.
त्रिभुवनकीर्तिरस -।।- ते १ गुंज,

नाडीचे ठोके व ज्वराचें मान यांचे कांहीं नियम आहेत ते:– सामान्यत: ज्वर १००/० अंश असेल त्यावेळीं नाडी १०० असते, व पुढें एक अंश ज्वरोष्म्याच्या बरोबर १० नाडीचे ठोके वाढलेलें असतात. उदा. १०१/० अंश ज्वर तर नाडी ११० याप्रमाणें दहा दहा ठोके अधिक असतात. पण आमावस्थेंत मात्र हे ज्वरनाडीमान व्यस्त असतें. ज्वराच्या मानानें नाडीचे ठोके कमी पडतात. उदा. ज्वरोष्मा १०२ असेल तर त्यावेळीं नाडी १०० असते. किंवा यापेक्षांहि कमी असते.	आल्याचा रस व मध याबरोबर चाटविणें. दिवसांतून २ वेळां. केवळ आल्याचा रस व मध द्यावा.
ज्वरोष्मा मध्य व नाडीचे ठोके मधून मधून बंद पडणें. ही एक आमावस्थाच आहे. ५।१० ठोके सरळ पडतात व मधून एक ठोका बंद पडतो व पुन: ठोके सरळ पडतात.	महावातविध्वंसनरस -।- ते -।।- गुंज आल्याचा रस व मध यांत उगाळून ५–५ मिनिटानीं १–१ बोट चाटविणें. (आम पाचक म्हणून दिला आहे)
ज्वरोष्मा तीव्र, नाडी जलद व क्षीण. हातापायास गारवा, हृदय विकल.	सुवर्णसूतशेखररस -।- ते -।।- गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून ५ ते १० मिनिटानीं १–१ बोट चाटविणें. २) लक्ष्मीविलासगुटी -।।- ते १ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून ५–५ मिनिटानीं चाटवावे.
नाडी क्षीण, देहोष्मा तीव्र, प्रलाप, हातपाय गार पडणें, आक्षेपक.	महावातविध्वंसनरस -।- ते -।।- गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून ५–५ मिनिटानीं चाटवावे.

याच अवस्थेंत पित्तोल्बण असतांना	सुवर्णसूतशेखररस -।- ते -।।- गुंज आल्याच्या रसांत उगाळून साखर मिश्र करून वरचेवर चाटविणें.
नाडी क्षीण, देहोष्मा तीव्र, श्वास	अभ्रकभस्म -।।- ते १ गुंज, (शतपुटी वा सहस्रपुटी) सुवर्णसूतशेखररस १ गुंज १ पुडी आर्द्रकस्वरस व मध यांत चांगले मिसळून वरचेवर चाटविणें. किंवा पुटपाक वासास्वरस २ चमचे व मध यांत वरील मिश्रणाची पुडी खलून ५–५ मिनिटानीं १–१ बोट चाटविणें. मकरध्वज १/८ ते १/४ गुंज, आल्याच्या रसांत उगाळून मध मिसळून ५–५ मिनिटानीं १–१ बोट चाटविणें.
नाडी क्षीण, देहोष्मा तीव्र, श्वास अधोगामी रक्तपित्त, महास्रोतसांत आंत्राचा पाक.	रक्तस्तंभन करणें. चंद्रकला १ ते २ गुंजा प्रवाळभस्म २ गुंजा, मौक्तिक -।।- गुंज, आमलकीरस २ गुंजा, असली नागकेशर २ गुंजा १ पुडी वासास्वरस (पुटपाक) २ चमचे थोडी साखर व पुडी मिसळून देणें. २–२ तासानीं देणें. रक्तबंद होईपर्यंत देणें. रक्तस्तंभनानंतर २–३ दिवस मलप्रवृत्ति होऊं देऊं नये.
रक्तस्रावामुळें देहोष्मा आपोआप खाली येतो त्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे.	सुवर्णसूतशेखररस -।।- ते १ गुंज, वासास्वरसांत उगाळून साखर मिश्र करून ५–५ मिनिटानीं चाटविणें.
सान्निपातिक अवस्थेंत आंत्रांत पाक होतो, त्यामुळें तेथें व्रण होऊन त्यांतून रक्तस्राव होतो, किंवा आंत्रांत छिद्र पडतें, यावेळीं आध्मान, ज्वरोष्मा कमी होतो, ही अवस्था असाध्य आहे.	शक्यतो लवकर शल्य चिकित्सा करावी.

टीप :– तीव्र ज्वरांत नाडी क्षीण झाली असतां समीरपन्नग, महालक्ष्मीविलास, हेमगर्भ, मल्लसिंदूर इ. मात्रा दिल्या तर ज्वरोष्मा १०८ पर्यंत जातो असा अनुभव आहे म्हणून या मात्रांचा उपयोग जपून करावा.

कास आणि श्वास — यांची चिकित्सा वर दिली आहे.

पित्तज छर्दि — सुवर्णसूतशेखररस -।- ते -।।- गुंज मोरावळ्याचे पाकांत उगाळून १–१ बोट वरचेवर चाटविणें.
बर्फाचे खडे चोखण्यास देणें, नारिकेलोदक, शीत जल थोडें थोडें पिण्यास द्यावें.

कफज छर्दि — मयूरपिच्छाभस्म १ ते २ गुंजा मधांत कालवून १–१ बोट वरचेवर चाटविणें.

वातज छर्दि — वांतिहृद्रस १ ते २ गुंजा आल्याचा रस व साखर मिश्र करून १–१ बोट ५–५ मिनिटांनीं चाटविणें.

अतिसार

टीप – सान्निपातिक अवस्थेंत अतिसार आमज असतो म्हणून त्याचे एकदम स्तंभन करूं नये. निराम असल्यास स्तंभन चिकित्सा करता येते, तरी पण अतिसाराचें एकदम स्तंभन केल्यास ज्वराचा वेग वाढण्याचा संभव आहे. म्हणून पाचक, दीपक औषधें देऊन अतिसार कमी करावा. जर रोगी अशक्त असेल तर मग स्तंभन करणें भाग पडते.

स्तंभन — दाडिमादिवटी २ ते ४ गुंजा. अनुपान–पाणी. यांत अफू आहे. अतिसार बंद झाल्याबरोबर ही वटी देऊं नये. किंवा अफूचें दुष्परिणाम दिसूं लागले तर ती देऊं नये.

दीपन, पाचन — लोहपर्पटी किंवा पंचामृतपर्पटी १ ते २ गुंजा मधांतून देणें. सकाळीं व संध्याकाळीं. कुडाधन २ ते ४ गुंजा सकाळीं व रात्रीं पाण्याबरोबर देणें.

बिट्ग्रह — तिळाच्या तेलाचा मात्रा बस्ती द्यावा. यानें मलप्रवृत्ति न झाल्यास,
अग्नितुंडीरस १ ते २ गुंजा. अनुपान–कोमट पाणी मनुका, ज्येष्ठमध, बाहव्याचा मगज यांचा काढा दिवसांतून २ वेळां द्यावा.
मल वर असल्यास किंवा मलाचा खडा झाला असल्यास रबरी नलिका गुदद्वारांत वरपर्यंत घालावी. म्हणजे मल सरकून खालीं येतो.
विरेचन देऊं नये.

हिक्का — दीपन, पाचन चिकित्सा करणें. वाताचें अनुलोमन करणारी औषधें द्यावी.
चंद्रप्रभागुटी १ गुंज, शंखवटी १ गुंज, कनकसुंदररस १ गुंज १ पुडी अनुपान–लिंबू व साखर दिवसांतून ३ ते ४ वेळां किंवा आल्याचा रस व साखर यांतून चाटविणें.
२) सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज, तुळशीचा रस व मध यांतून १–१ बोट वरचेवर चाटविणें.
३) नारळाच्या शेंडीची धुरी द्यावी.
४) गोपीचंदन २ ते ४ गुंजा, सुवर्णगैरिक २ ते ४ गुंजा, सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज १ पुडी मधांतून देणें. दिवसांतून ३ वेळां

मूत्राघात, मूत्र बस्तींत भरलेलें असतें, पण लघ्वी होत नाहीं; पोट तडणी लागते. — ओटीपोटावर पळसाच्या फुलांचा शेक द्यावा. व ही गरम फुलें ओटी पोटावर बांधावी.
२) उंदराच्या लेंड्या व एरंडाच्या बियाचा मगज एकत्र वाटून त्याचा ओटीपोटावर लेप करणें.
३) चंद्रप्रभागुटी १ ते २ गुंजा, गोक्षुरादि-

गुग्गुळ २ ते ४ गुंजा, पुनर्नवाघन २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी, दिवसांतून ३ वेळां गोक्षुर फांट दिवसांतून चाळीस तोळे देणें.

४) मूत्रशलाकेनें मूत्र निर्हरण करणें. पुनः पुनः करूं नये.

मूत्रक्षय :–

मूत्र प्रवृत्ति थोडी होणें, मूत्र झाल्यावरही न झाल्याप्रमाणें वाटणें, बस्ती रिकामा असणें.

नारिकेलोदक देणें. किंवा शहाळयाचें पाणी द्यावें.

२) गोक्षुरफांट दिवसांतून ४० तोळे पर्यंत द्यावा.

३) तृणपंचमूळाचा काढा किंवा फांट द्यावा.

कृमी :–

(पुरीषज, गोल जंत) कांहीं रोग्यांत ज्वरमुक्ती नंतर प्रलाप, मूर्च्छा हीं लक्षणें राहतात, यांस कारण कृमी हे होत.

भल्लातकतैल १ ते २ थेंब कॅप्सूलमध्यें घालून देणें. साखरेवर किंवा दुधांत टाकून दिलें असतां कृमी पडत नाहींत. यानें कृमी पडून रोगी शुद्धीवर येतो.

अन्तर्वेगीज्वर :–

सान्निपातिक ज्वरांत ज्वर हा अन्तस्थ होतो. या अवस्थेंत देहोष्मा बगलेंत स्वाभाविक असतो. (९७/० किंवा ९८|० डिग्री) आणि गुदद्वारांत ज्वरोष्मा १०५|० डिग्री किंवा याहूनहि अधिक असतो. कोष्ठस्थ उष्णता वाढलेली असते. हा अनुभव आधुनिक वैद्यकांत ज्वर प्रकरणीं नमूद केला नाहीं.

लक्षणें :– अति तृष्णा, प्रलाप, श्वास, भ्रम, संधि-अस्थि या

चंद्रकलारस १ ते २ गुंजा, मौक्तिकभस्म -।- ते -॥- गुंज, प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, गुळवेलीचें सत्त्व २ गुंजा १ पुडी अनुपान– नारिकेलोदक दिवसांतून ४ वेळां.

प्रलाप आणि भ्रमाकरितां :–

सुवर्णसूतशेखर मोरावळयांत उगाळून ५–५ मिनिटानीं १–१ बोट चाटविणें. स्नेह शीत बस्ती द्यावा.

ठिकाणीं शूल, घाम न येणें, मलावरोध, दोषांच्या मलांचा अवरोध.

अति तृष्णा, दाह –

वाळा, चंदन, धमासा, पित्तपापडा यांचा फांट द्यावा.

विषमज्वर

सन्तत

वर सांगितलेल्या सान्निपातिक ज्वराहून भिन्न असलेला पण सतत राहणारा हा ज्वर चार, आठ किंवा याहूनहि अधिक काल असणारा, यांत देहोष्मा उतरत नाहीं. असे रोगी पूर्वी पहावयास मिळत होते. दोषानुरूप लक्षणें यांत आढळून येतात.

लंघन, पाचन, व दीपन चिकित्सा करणें. लक्ष्मीनारायणरस -।- ते -॥- गुंज, तुळशीचा रस व मध यांतून दिवसांतून ३ ते ४ वेळा देणें. ज्वरवेग तीव्र नसल्यास नारायणज्वरांकुश -॥- ते १ गुंज अनुपान– मध किंवा मोरावळा. ३ ते ४ वेळां.

आहार– चहा, कॉफी, दूध, मोसंबी रस,

सतत

हा ज्वर चोवीस तासांतून दोन वेळां थंडी वाजून येतो आणि उतरतो.

लंघन दिलें असतां थंडी वाजून ताप येण्याचे कमी होते, किंवा थंडी वाजून ताप येत नाहीं.

नारायणज्वरांकुश -॥- ते १ गुंज, अनुपान– मोरावळा किंवा मध दिवसांतून चार वेळां.

अन्येद्युष्क, तृतीयक, चतुर्थक विषमज्वर

सप्तपर्णाघन २ ते ४ गुंजा, दारुहरिद्राघन २ ते ४ गुंजा, सिंकोनाघन २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी दिवसांतून ४ पुड्या देणें.

नारायणज्वरांकुश -॥- ते १ गुंज, अनुपान– मोरावळा किंवा मध. दिवसांतून २ वेळां वरील औषधाबरोबर देणें.

आहार	दूध, फळांचा रस, प्रथम १ दिवस पूर्ण लंघन.

सूचना :– विषमज्वर येण्यापूर्वी जर रोग्यांस अतिसार किंवा प्रवाहिका झाली असेल तर किंवा विषमज्वराचे वेळीं प्रवाहिका असेल तर वरील औषधांत दारुहरिद्रा घन घालूं नये.

प्लीहावृद्धि, मन्दज्वर, अग्निमांद्य, पांडुता.	कुमारी आसव २ चमचे (चहाचे) रोहितकारिष्ट २ चमचे ,, लोहासव २ चमचे ,, पाणी १२ चमचे ,, सकाळीं व संध्याकाळीं दोन वेळां देणें.
वरील लक्षणाबरोबर जीर्णज्वर.	वरील औषधांत अमृतारिष्ट २ चमचे मिश्र करावे. किंवा सप्तपर्णाघन २ ते ४ गुंजा पाण्याबरोबर किंवा वरील आसवारिष्टाबरोबर द्यावे.
पांडु (उपद्रव)	मधुमंडूर २ ते ४ गुंजा, १ पुडी दिवसांतून ३ वेळां. २) कासीसभस्म १ ते २ गुंजा १ पुडी दिवसांतून ३ वेळां. अनुपान– ताक किंवा दूध.
पांडु, प्लीहावृद्धि, शोथ.	पुनर्नवादिक्वाथ ५ तोळे उरवून सकाळीं देणें. सोबत आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा १ पुडी दिवसांतून ३ वेळां अनुपान– दूध
शोथ कमी झाल्यावर.	पुनर्नवादिक्वाथ बंद करावा, आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा, मंडूरभस्म १ ते ४ गुंजा १ पुडी दिवसांतून ३ वेळां अनुपान– दूध. आहार– ताजें ताक, दूध, मोसंबीरस, डाळिंबरस.

उष्माघातज ज्वर **काल** – वसंतऋतु किंवा ग्रीष्मऋतु. देश भेदानें कालभेद आढळतो. कालाचा अतियोग. किंवा अर्थाचा अतियोग (त्वक्, कर्ण, नेत्र यावर बाह्य उष्णतेचा अति योग, म्हणजे उन्हाळ्यांत उन्हांत अति हिंडणें, किंवा नेहमीपेक्षा अति उन्हाळा याचा परिणाम पित्तप्रकोप.) यामुळें पित्तज्वर उत्पन्न होणें. हा वैकृत ज्वर होय.	रोग्यास थंड जागीं ठेवावे, किंवा शीतगृहांत उष्णतेचा आघात होऊं देऊं नये. २) कपाळावर गार पाण्याच्या पट्या ठेवणें. ३) गार पाण्यानें अंग पुसून घेणें. ४) थंड पाणी किंवा नारिकेलोदक देणें.
अति तृष्णा.	५) वाळा, चंदन, पाण्यांत टाकून ते गार करून द्यावें. ६) लाजामंड थंड करून साखर घालून देणें.
मूर्च्छा, आक्षेप.	७) चंद्रकला १ ते २ गुंजा, प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, अमृतासत्त्व २ ते ४ गुंजा, मौक्तिकभस्म -।।- ते १ गुंज. १ पुडी अनुपान– शीत जल किंवा नारिकेलोदक. सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज मोरावळा किंवा दाडिमावलेह यांत उगाळून वरचेवर १–१ बोट चाटविणें.
नाडी क्षीण, मंद, जलद.	लक्ष्मीविलासगुटी -।।- ते १ गुंज साखरेच्या पाकांत किंवा मोरावळ्यांत उगाळून वरचेवर चाटविणें.
अन्तर्दाह.	प्रवाळभस्म २ ते ४ गुंजा धण्याच्या हिमाबरोबर द्यावें.

आहार

ज्वराची आमावस्था **पच्यमानावस्था लक्षणें**	लंघन– २–३ दिवस. या कालांत केवळ गरम पाणी द्यावें. किंवा चहा, कॉफी थोडें दूध घालून द्यावें. अति लंघनाची लक्षणें दिसेंपर्यंत लंघन देऊं नये. बलाचें रक्षण करावें. २–३ दिवसानंतर दूध चांगलें तापवून वरील साय काढून साखर टाकून द्यावें. चहा, कॉफी द्यावी. पाणी सकाळीं उकळून गाळून गार करून ठेवावें. तें दिवसभर द्यावें. संध्याकाळीं दुसरे पाणी घेऊन उकळून गार करून गाळून तें रात्रीं द्यावें.
आनाह, तृष्णा, अतिसार.	अतिसार असतांना दूध देऊं नये. मोसंबी देऊं नये, दाडिमस्वरस द्यावा. सफरचंद किसून तें वाफवून त्याचा पिळून रस काढून तो देणें. लोणी काढलेलें ताजें ताक द्यावें. तीव्र अतिसार असेल तर थोडें दूध घेऊन तापवून त्यांत कागदी लिंबाचा रस पिळावा म्हणजे तें दूध फुटते, त्यांतील पाणी गाळून घेऊन तें वरचेवर थोडें थोडें द्यावें. हें ताजे करून देत जावें.
अतिसार सोडून इतर लक्षणें	साय काढलेलें दूध, चहा, कॉफी, मोसंबीचा रस,
निरामावस्था	
ज्वर उतरल्यावर दहा दिवसपर्यंत.	फळांचा रस, दूध, ताजें ताक, चहा, कॉफी.
दहा दिवसानंतर.	साळीच्या लाह्या (कुसे काढलेल्या) तूप, मीठ, हळद, जिरें घालून परतलेल्या १ ते २ तोळे देणें. फक्त १ वेळ. किंवा या लाह्या दुधांत कालवून साखर मिश्र

	करून १ वेळ देणें. याशिवाय दूध, ताक, फळें देणें.
तीन दिवसानंतर	थोडा मऊ भात १ वेळां सुरू करावा. जसा अग्नि प्रदीप्त होईल तसा आहार वाढवावा.

अतिसार

पूर्वरूप

	चिकित्सा
विटसंग, आध्मान, अविपाक, वाताची अप्रवृत्ति, हृदय, नाभि, पायु, उदर, कुक्षिभागीं शूल, गात्रावसाद.	कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– आर्द्रक स्वरस, साखर किंवा लिंबाचा रस, साखर. दिवसांतून ४ वेळां.
विटसंग, आध्मान, अविपाक, वाताची अप्रवृत्ति.	लशुनादिवटी २ ते ३ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी किंवा लिंबाचा रस साखर. दिवसांतून ४ वेळां.
आहार	उष्ण पेय, चहा, कॉफी सुंठ टाकून तयार केलेली द्यावी. २) गरम पाण्यांतील लिंबाचें सरबत मीठ व साखर घालून ३) ताजें ताक आलें लावून.

वातातिसार लक्षणें

सशूल, थोडी थोडी, वरचेवर, फेसयुक्त, अपरिपक्व, पिच्छिल, (बुळबुळीत) सशब्द, उष्ण, ग्रंथीयुक्त मलप्रवृत्ति.	कनकसुंदर १ ते २ गुंजा, लशुनादिवटी २ ते ३ गुंजा १ पुडी. अनुपान– लिंबूरस साखर. दिवसांतून ३ वेळां.
मलप्रवृत्ति अधिक वेळां	वरील पुड्या २–२ तासानें देत रहाणें. २) कुडाघन १ ते २ गुंजा, बालबिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा, कनकसुंदर ३ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
आहार	लंघन. उकळून थंड केलेलें पाणी, गोड ताजें ताक, दाडिम स्वरस, सफरचंदाचा स्वरस.

पित्तातिसार आमावस्था लक्षणें

पिवळसर, निळसर, रक्तयुक्त, हिरवट, काळसर, दुर्गंधयुक्त, सशूल, सदाह, द्रव मलप्रवृत्ति, गुदपाक, तृष्णा, दाह, घाम येणें, मूर्च्छा.	सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज मोचरस २ ते ४ गुंजा बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा धायटीचूर्ण २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.

निरामावस्था लक्षणें

पिवळसर, निळसर, काळसर, रक्तयुक्त सदाह, द्रव मलप्रवृत्ति, वेग अधिक असणें.	कनकसुंदर १ ते २ गुंजा कुडाघन २ ते ४ गुंजा बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा लोहपर्पटी १ गुंज १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३–४ वेळां.

सूचना :– आमावस्थेंत व निरामावस्थेंत शूल असल्यास कनकसुंदर १ ते २ गुंजा द्यावा.

गुदपाक असतांना.	आंत गंधकद्रुति पिचु ठेवणें व बाहेरून लावणें.
तृष्णा, दाह	मौक्तिकभस्म -।- ते -।।- गुंज, प्रवाळभस्म १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– दाडिमावलेह. दिवसांतून ४ वेळां किंवा दाह कमी होईतोपर्यंत २–२ तासानीं १–१ पुडी देणें.
मूर्च्छा	सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज साखरेच्या पाकांत उगाळून १–१ बोट ५–५ मिनिटांनीं चाटवणें.
आहार	लंघन. दाडिमरस, सफरचंदरस, ताजें गोड ताक, लिंबाचें सरबत, तापवून थंड केलेलें पाणी.

कफातिसार आमावस्था लक्षणें

पांढरट, बुळबुळीत, स्निग्ध, कफयुक्त, सान्द्र, दुर्गंधियुक्त, मलप्रवृत्ति; शूलयुक्त, वारंवार, प्रवाहणयुक्त, मलप्रवृत्ति; झाली तरी न झाल्यासारखे वाटणें, अन्नद्वेष. ओटीपोटांत जड वाटणें, निद्रा, आळस.

कनकसुंदर १ ते २ गुंजा, लशुनादिवटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबूरस साखर. दिवसांतून ४ वेळां. २) अग्निकुमार १ ते २ गुंजा, कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.

अति प्रवृत्ति असेल तर

वरील औषधाबरोबर कुटजघन २ ते ४ गुंजा, बिल्व चूर्ण २ ते ४ गुंजा देणें.

आहार

लंघन. सुंठ घालून गोड ताजें ताक, डाळिंब स्वरस, सफरचंद स्वरस. उकळून थंड केलेलें पाणी.

सान्निपातिक लक्षणें

मांस धुतल्याप्रमाणें (तांबूस) मेद व मज्जायुक्त, मलप्रवृत्ति; यामध्यें धातुपाकावस्था असते. वर लिहिलेली दोषात्मक लक्षणेंहि असतात.

पंचामृतपर्पटी -।।- ते १ गुंज
कुडाघन २ ते ४ गुंजा
बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा
मोचरस १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान- पाणी. दिवसांतून ४ वेळां.

लोहपर्पटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– तूप व मध. दिवसांतून ३ वेळां.

आहार

गोड, ताजें ताक, दाडिमस्वरस, सफरचंद स्वरस, उकळून थंड केलेलें पाणी.

आमातिसार लक्षणें

सशूल व नानावर्णात्मक, द्रव मलप्रवृत्ति.

दीपक, पाचक. कनकसुंदर १ ते २ गुंजा, लशुनादिवटी २ ते ३ गुंजा १ पुडी अनुपान–लिंबाचा रस, साखर. दिवसांतून ३ वेळां

आहार

लंघन. उन पाणी, लिंबाचें सरबत, दाडिमस्वरस.

रक्तातिसार

पित्तज अतिसारावरील चिकित्सा करावी.

तीव्र अतिसार लक्षणें

अजीर्णामुळें झालेलें एकदम तीव्र असे जुलाब होतात. वर्ण श्वेत, पीत, तृष्णा.

लशुनादि १ ते २ गुंजा १ पुडी लिंबाचा रस साखर यांमधून दर २–२ तासानीं द्यावी.

रोगी खूप थकतो तेव्हां

स्तंभन चिकित्सा करावी. लघुगंगाधर चूर्ण १ ते २ मासे १ पुडी ताकाबरोबर. दिवसांतून ४ वेळां देणें. शंखोदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून २ वेळां. दाडिमादिवटी २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून २ वेळां.

सूचना :– रोगी खूप थकला असल्यास स्तंभन चिकित्सा करावी.

पक्वातिसार लक्षणें

आमातिसाराची लक्षणें बंद होऊन नुसती द्रव मलप्रवृत्ति चालू असतांना.

दीपन व स्तंभन चिकित्सा करावी.
कुटजघन २ ते ४ गुंजा
रसपर्पटी १ ते २ गुंजा
बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां देणें.

अपधातूच्या बहिर्निस्सरणामुळें होणारी लक्षणें:– तृष्णा, अंग गार होणें, हातपाय गार होणें, नाडी क्षीण होणें.

लक्ष्मीविलासगुटी -।।- ते १ गुंज आल्याचा रस व मधांत उगाळून १–१ बोट ५–५ मिनिटांनीं चाटवणें.
सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज वरीलप्रमाणें चाटवणें.

छर्दि व अतिसार तीव्र असतांना वरील अवस्था येते.	मल्लसिंदूर १/८ ते १/४ गुंज मधांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें. यामुळें नाडी लवकर सुधारते व दिलेलें पाणी पचते व रोगी अधिक पाणी मागतो. यामुळें अप्धातूची पूर्तता होते.

प्रवाहिका

वातज	
सशूल.	रसपर्पटी १ ते २ गुंजा कुडाघन २ ते ४ गुंजा बाल बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३, ४ वेळां.
आहार	नागरमोथासिद्ध दूध. ताजें गोड ताक.
पित्तज	
सदाह अंतर्गत दाह	वरील औषधाबरोबर प्रवाळ भस्म १ ते २ गुंजा अमृतासत्त्व २ गुंजा देणें.
आहार	गोड, ताजें, ताक, दाडिम स्वरस.
कफज	
कफयुक्त मलप्रवृत्ति	वातज प्रवाहिकेवरील चिकित्सा करावी.
तीव्र प्रवाहिका लक्षणें	
५–५ मिनिटांनीं प्रवाहण येऊन चिकट व सरक्त मल पडणें. किंवा केवळ आंव व रक्त पडणें.	१) लोहपर्पटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान मध व तूप. दिवसांतून ३ वेळां. २) कुडाघन २ ते ४ गुंजा बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा इसबगोल २ ते ६ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां देणें. नं. १ची पुडी व नं. २ ची पुडी दर २।२ तासांनीं आलटून पालटून देणें.
आहार	नागरमोथासिद्ध दूध, चहा, कॉफी, दाडिमरस.
गुदभ्रंश राहिल्यास.	बिब्बा तूपांत उगाळून लावणें.

ग्रहणी

पूर्वरूप	**चिकित्सा**
तृष्णा, अन्नाचा विदाह, गौरव अंग जड होणें, आळस, अन्न उशीरा पचणें, प्रसेक, वक्त्रवैरस्य, अरुचि, छर्दि, आंत्रकूजन, आनाह, बलक्षय, क्लम, भ्रम, कर्णनाद.	
तृष्णा व अन्नाचा विदाह असतांना.	मौक्तिकयुक्त-प्रवाळ-पंचामृत १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
गौरव, आळस, अन्न उशीरा पचणें इ.	शंखवटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबाचा रस व साखर. दिवसांतून ३ वेळां.
बलक्षय, क्लम इ. असतांना.	सुवर्णपर्पटी ॥ गुंज १ पुडी एकदां सकाळीं अनुपान– तूप व मध. इतर वेळां वरील जरुर ती औषधी योजना दुपारीं व संध्याकाळीं करावी.
वातज लक्षणें विदाह, त्वचा रूक्ष होते, अन्न उशीरा पचते, छर्दि, अतिसार, सर्व रसांची इच्छा उत्पन्न होते, द्रव, ग्रंथिल, थोडे थोडे आम व फेसयुक्त, वरचेवर मलप्रवृत्ति होते. मलप्रवृत्ति होतांना वेदना व आवाज होतो.	पंचामृतपर्पटी १ गुंज १ पुडी अनुपान– तूप व मध. सकाळीं व संध्याकाळीं १।१ पुडी द्यावी. दशमूलारिष्ट ४ चहाचे चमचे + पाणी मिसळून दुपारीं आहारानंतर द्यावें.

पित्तज लक्षणें

निळसर, पिवळसर, द्रव मलप्रवृत्ति, करपट–आंबट ढेकर, छाती व घशांत जळजळ, अरुचि तृष्णा.	लोहपर्पटी १ ते २ गुंजा. प्रवाळ भस्म २ गुंजा. सुवर्णमाक्षिक भस्म २ गुंजा. १ पुडी अनुपान– तूप साखर. दिवसांतून ३ वेळां.
मलप्रवृत्ति अधिक असल्यास.	वरील मिश्रणांत कुडाघन २ ते ४ गुंजा घालावे. व पाण्यामधून पुड्या द्याव्यात.

कफज लक्षणें

अन्नाचें पचन सावकाश होतें. मळमळ, छर्दि, अरुचि, तोंड गोड पडते, करपट व मधुर ढेकर, उदर जाड्य, कृश नसून सुद्धां दुर्बल, आलस्य, सांद्र, आम व कफयुक्त मलप्रवृत्ति.	पंचामृतपर्पटी १ ते २ गुंजा कुडाघन २ ते ४ गुंजा बाल बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान–कोमट पाणी. (उकळून थंड केलेलें पाणी) दिवसांतून ३-४ वेळां द्यावें.

सान्निपातिक लक्षणें

द्रव, शीत, घन, स्निग्ध, आमयुक्त, बुळबुळीत, मलप्रवृत्ति. मलप्रवृत्ति होतांना कमरेमध्यें दुखते व होतांना आवाज होतो. वरीलप्रमाणें मलप्रवृत्ति ४, ८ दिवस होते व नंतर आपोआप बंद होऊन मलावरोध होतो. मलप्रवृत्ति दिवसा अधिक होते. रात्रीं कमी होते. पोटांत गुडगुडते.	सुवर्णपर्पटी १ गुंज. १ पुडी सकाळीं व संध्याकाळीं तूप मधांतून द्यावी.
आमयुक्त असल्यास, जास्त वेळां मलप्रवृत्ति असल्यास.	कुडाघन २ ते ४ गुंजा बिल्वचूर्ण २ ते ४ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां द्यावी. सुवर्णपर्पटी चालू ठेवावी.

सूचना :– पर्पटी कल्प चालू असतांना सुवर्णपर्पटी किंवा पंचामृतपर्पटी वर्धमान दिली असतांना अधिक उपयोग होतो.

मात्रा -।।- गुंजेपासून सुरू करावी व रोज -।।- गुंज याप्रमाणें २० दिवसपर्यंत वाढवीत जावी व तशीच -।।- गुंज कमी करीत जावी. कांहीं वैद्य १ गुंजेपासून सुरू करतात व वर्धमानप्रमाणानें २० दिवसपर्यंत देतात व नंतर त्याचप्रमाणें कमी करतात. या प्रयोगांत सुवर्णपर्पटी चालू असतांना केवल दुग्धाहार व पंचामृत–पर्पटी चालू असतांना केवल तक्राहार चालू ठेवावा लागतो. या प्रयोगामध्यें रोगी केवल दूध ३ ते ४ शेरापर्यंत पितो व इतके दूध पचतें व त्याचे वजन वाढतें. त्यास दूध पचून घट्ट अशी स्वाभाविक मलप्रवृत्ति होते. तक्राहारामध्यें प्रथम लोणी काढलेलें ताक द्यावें. व जसजसा अग्नि वाढेल तसतसे सायीसकट ताक घुसळून द्यावें. या रोग्याचा अग्नि प्रज्वलीत होतो. बल वाढतें व घट्ट, स्वाभाविक अशी मलप्रवृत्ति होऊं लागते.

आहार	कोणत्याहि ग्रहणी विकारामध्यें तक्राहार श्रेष्ठ आहे. म्हणून आमावस्था असतांना लोणी काढलेलें ताक द्यावें. अग्नि जसा प्रज्वलीत होईल तसे सायीसकट दही घुसळून ताजें ताक देत जावें.
ताजें ताक करण्याची पद्धत	पावशेर दूध निरनिराळ्या भांड्यांत घेऊन निरनिराळ्या वेळीं विरजणें. व ज्यावेळीं ताक द्यावयाचें असेल त्यावेळीं १।१ भांडे घेऊन तें घुसळून ताक द्यावें. विशेषतः दूध तापविण्यासाटीं मडकी वापरणें चांगले. या मडक्याच्या आंतील बाजूस चित्रकमूळाचें चूर्ण ४ गुंजा पाण्यांत कालवून लावावे व नंतर दूध तापवावें. व वरील प्रमाणें विरजण लावून ताक करून द्यावें.

अग्निमांद्य

कफवृद्धिजन्य लक्षणें

तृप्ति, तन्द्रा, गुरुगात्रता, मुखस्राव, मुखमाधुर्य, अंग जड होणें, आळस, कफाची उलटी होणें, श्वेत व बहुमूत्रता, घशांत चिकटपणा येणें, भूक न लागणें, पोट जड वाटणें, मलसंचय होणें.

चिकित्सा

अग्निदीपक, रूक्ष व तिक्त रसात्मक द्रव्यें द्यावीत.

आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ पुड्या द्याव्यात.

कुमारीआसव ४ चमचे दुप्पट पाणी घालून आहार घेण्यापूर्वी दोन्हीं वेळेला द्यावें.

सकाळीं उठल्याबरोबर कोरफडीचा मधला मगज १ ते २ चमचे व नवसागर १ गुंज त्यांत टाकून देणें.

अग्नितुंडी १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– कोमट पाणी. दिवसांतून ३ वेळां.

पित्तवृद्धिजन्य लक्षणें

विदाह, अन्तर्दाह, घशाशीं आंबट येणें, स्वेद विशेषतः बगलेंत पिवळा व वासयुक्त घाम येणें, सकाळीं उठल्याबरोबर तोंड कडू, मुखदुर्गंधी, मुखपाक, कंठपाक, भूक न लागणें, पित्त उलटून पडणें.

तिक्त, मधुर, दीपक द्रव्यें द्यावीत.

शंखवटी २ ते ४ गुंजा. १ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३ वेळां.

अमृतारिष्ट ४ चमचे दुप्पट पाणी घालून आहार घेण्यापूर्वी दोन्ही वेळेला द्यावें.

प्रवाळपंचामृत २ ते ४ गुंजा. १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

वातवृद्धिजन्य लक्षणें

अरसज्ञता, मुखशोष, विड्भेद, उदावर्त, कषायास्यता, अस्वप्न, अनवस्थित चित्त, गुदार्ति, आनाह, पार्श्वशूल, पोटांत गोळा उठणें, कोरडे ढेंकर येणें, भूक न लागणें, विट्संग, विड्भेद.

अम्ल, लवणयुक्त स्नेह.

१) हिंगाष्टकचूर्ण २ मासे थोड्या भातावर घालून तूप मिसळून तो भात प्रथम खाऊन नंतर जेवणें.

२) भास्करलवणचूर्ण २-३ मासे १ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ४ वेळां

३) सामुद्रादि चूर्ण २ मासे १ पुडी वरीलप्रमाणें घेणें.

४) शंखवटी २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबुरस साखर. दिवसांतून ३-४ वेळां.

५) लशुनादिवटी २ गुंजा १ पुडी वरीलप्रमाणें घेणें.

६) महाळुंग रस ५ तोळे, लिंबूचा रस ७ तोळे, आर्द्रक रस २ तोळे, शेंदेलोण व पादेलोण १।१ तोळा, साखर ३ तोळे हें मिश्रण करून ठेवणें व ते १ चमचा जेवणापूर्वी घेणें.

कफक्षीणजन्य लक्षणें

बोधक व क्लेदक कफाची क्षीणता. त्यामुळें खाल्लेल्या अन्नामध्यें क्लिन्नत्व येत नाहीं, अन्नाची रुचि कळत नाहीं. आमाशयांत क्लिन्नत्व नसल्यानें तेथें अन्न पडून रहातें व विदग्धावस्था येते. जडत्व, छर्दि, अन्नाच्या विदग्धावस्थेमुळें पित्तप्रकोप होऊन छर्दि होईल व आमाशयस्थ रंजक पित्त हे जर याबरोबर क्षीण असेल तर योग्य रक्तोत्पत्ति होणार नाहीं. छातींत जळजळ,

१) घृतपान रोज ५ ते १०तोळे सकाळीं कफकालीं म्हणजे १० वाजेपर्यंत द्यावें. असे ३ दिवस द्यावें. व स्नेहाचें योग्य पचन झाल्यानंतर शीत, मधुर, स्निग्ध असा आहार द्यावा. म्हणजे पेया द्यावी.

पित्तक्षयजन्य लक्षणें

अग्निमांद्य, देहोष्मा कमी होणें, कांती कमी होणें, मलप्रवृत्ति पांढरी होणें, मूत्रांतील पीतता कमी होणें, ग्रहणींत अन्नाचें सारकिट्ट विभजन होणार नाहीं.

शुद्ध नवसागर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

नवसारादिचूर्ण १ ते २ गुंजा अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

रलपर्पटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– मध व तूप. दिवसांतून ३ वेळां.

अन्नाचें पचन न झाल्यानें तेथें पडून राहील, त्यामुळें विदाह होईल. किंवा समान वायु तसेंच अन्न पुढें ढकलील व तो मल आमयुक्त व पित्तरहित असा असेल. याचा परिणाम सार्वदेहिक पित्तस्थानावर होऊन तेथील पित्त कमी होऊन तेथेंहि पित्त क्षयजन्य विकार होतील.

वातक्षयजन्य लक्षणें

समान वायूच्या क्षीणतेमुळें अग्निमांद्य निर्माण होतें. विवेचन व मलमुंचन क्रिया नीट न झाल्यानें अन्न ग्रहणींत पडून राहतें. व अग्नि प्रज्वलित करण्याचे जे समानाचें कार्य तें होत नाहीं. सार्वदेहिक चेष्टा, क्रिया कमी होतात. उत्साह नसतो. विषाद–नैराश्य असतें.	कटु विपाकी व कटु, तिक्त रसात्मक द्रव्यें द्यावीत. कुटकी चूर्ण द्यावें. ही कटु रसात्मक व कटु विपाकी असल्यामुळें वातकर आहे म्हणून कुटकी प्रधान असा आरोग्यवर्धिनी कल्प वापरावा. आरोग्यवर्धिनी २ ते ३ गुंजा १ पुडी अनुपान-पाणी. दिवसांतून ३ वेळां. द्राक्षासव ४ चहाचे चमचे दुप्पट पाणी दोन्हीं वेळचें आहारापूर्वी द्यावें. हे वाताची कर्मे वाढवणारे म्हणजे उत्साहवर्धक. धातूव्यूह करणारे व अग्निदीपन करणारे आहे.

सूचना :- येथें रस, गुण, वीर्य विपाक यांचा कोणताहि विचार न करतां द्रव्य प्रभावात्मक कर्माचा विचार करून हा कल्प वापरला आहे.

आहार

कफवृद्धिज	गुरु, स्निग्ध गुणात्मक आहार वर्ज. तिक्त, उष्ण, रूक्ष गुणात्मक आहार द्यावा. ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी, कारली-मेथीची भाजी, लसूण, कोथिंबीरीची चटणी. निस्नेह ताक (लोणी काढलेलें).

पित्तवृद्धिज	उष्ण, तीक्ष्ण, अम्ल रसात्मक, अम्लविपाकी लवण रसात्मक आहार वर्ज. ज्वारीची भाकरी, दूध, तूप, स्नेहयुक्त ताक, दुध्याभोपळा, पाथरी, भेंडी मेथीची भाजी, लिंबाचें लोणचें, कवठाचें सार व चटणी.
वातवृद्धिज	तिक्त, कषाय, कटु रसात्मक आहार वर्ज करावा. अम्ल, लवण, मधुर रसात्मक आहार द्यावा. सुंठ वा आले घातलेली ताकाची कढी, बाजरी व ज्वारीची भाकरी, भात, अळू चाकवत, चुका, वांगी, या भाज्या. लिंबू, आले, कोथिंबीर, कैरीची चटणी.
कफक्षयज	पेया, ज्वारीची भाकरी, लोणी, तूप, दही, मीठ, दूधभोपळा, भेंडी, तोंडली, यांची भाजी, पालेभाज्या देऊं नये. स्नेहयुक्त ताक.
पित्तक्षयज	बाजरीची भाकरी, तूप, मिरची, मिरे, कारले, (पित्तसाम्यावस्थेंत आणणारे) भोपळ्याचे वा इतर द्रव्यांची मिरे, मोहरी घालून रायती; मसालेदार वांग्याची भाजी.
वातक्षयज	मुद्गयूष, द्विदल धान्याची कढणें, ज्वारीची भाकरी, नंतर मुगाचें वरण, निस्नेह खिचडी.

अजीर्ण

लक्षणें	चिकित्सा
आमाजीर्ण (कफज) लक्षणें गालावर व डोळ्यांभोंवती शोथ, प्रसेक, उत्क्लेश, गौरव, जेवण झाल्याबरोबर जसें ढेंकर येतात त्याप्रमाणें ढेंकर येणें, शूल.	लंघन द्यावें. आमपाचन. १) शंखवटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी, लिंबूचा रस + आर्द्रक रस + साखर. दिवसांतून ३ वेळां. २) लशुनादिवटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबाचा रस साखर; किंवा गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां. ३) संजीवनीगुटी २ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळा.
विदग्धाजीर्ण (पित्तज) लक्षणें घसा, छाती, आमाशय या ठिकाणीं दाह, अम्लोद्गार, तृष्णा, घाम येतो, भ्रम, पोटांत दाह व ओढल्याप्रमाणें वेदना.	१) प्रवाळपंचामृत १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– मोरावळा, किंवा दूध. दिवसांतून ३ वेळां. २) शंखभस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
विष्टब्धाजीर्ण (वातज) लक्षणें टोचल्याप्रमाणें–भेदन केल्याप्रमाणें शूल, मल, वात यांचा अवरोध, आध्मान, आंतडीची कांहींहि हालचाल होत नाहीं. अंगमर्द	१) शिवाक्षारपाचन चूर्ण ४ ते ८ गुंजा, कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३–४ वेळां. २) शंखवटी १ ते २ गुंजा चंद्रप्रभा १ ते २ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी किंवा अर्ध्या लिंबाचा रस + साखर. दिवसांतून ३ वेळां.

लक्षणें	चिकित्सा
रसशेषाजीर्ण लक्षणें अश्रद्धा (अन्नावर इच्छा नसणें) हृदयाच्या ठिकाणीं पीडा. अंगजाड्य–अंग जड वाटणें. वरील लक्षणावरून रस हा अपाचित आहे असे समजावे. रसशेषाजीर्ण वरचेवर झाले तर हृद्रोग उत्पन्न होतो. वरचेवर हृद्रोगाचे वेग येतात व रोगी मरतात. तेथें हृदय जाडच हृद्गौरव, हृद्शूल हे यांतील लक्षण असतें.	मकरध्वज ½ गुंज १ पुडी. १–२ चमचे मध यांत उगाळून चाटवणें. दिवसांतून एकदां द्यावें. लक्ष्मीविलासगुटी -॥- ते १ गुंज सितोपलादि चूर्ण ६ गुंजा १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां. लंघन, झोंप घेणें.

आहार

आमाजीर्ण	लंघन १।२ दिवस द्यावें. आमाचें पचन झाल्यावर आलें लावलेलें ताक, २।३ दिवस द्यावें. व नंतर हळू हळू आहार द्यावा.
विदग्धाजीर्ण	लंघन १।२ दिवस द्यावें. स्वादु, शीत असा आहार द्यावा. दूध व ज्वारीची भाकरी, तोंडली, भेंडी, दूधभोपळा, मेथीची भाजी.
विष्टब्धाजीर्ण	लंघन १।२ दिवस द्यावें. अम्ल, मधुर रसात्मक आहार द्यावा. सार, ताक, ज्वारीची भाकरी, वरील भाज्या.
रसशेषाजीर्ण	लंघन १।२ दिवस द्यावें. भात, भाकरी, उष्ण, तीक्ष्ण अशा द्रव्यांनीं (मोहरी लावलेली) सिद्ध रायती, लिंबाचें लोणचें, सुंठीसिद्ध दुग्ध.

विसूचिका

लक्षणें

अतिसार, वांती, तृष्णा, शूल, पिंडिकोद्वेष्टन, दाह, वैवर्ण्य, चेहरा-डोळे काळवंडतात. हृत्पीडा, लवकर थकवा येतो. डोळे खोल जातात. जास्त मलप्रवृत्ति झाल्यावर नाडी क्षीण, जलद, श्वास, हातपाय गार पडतात, हृदय विकल होतें.	१) लशुनादिवटी १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबाचा रस, साखर १।१ तासानें पुडी द्यावी. सुवर्णसूतशेखर -॥- ते १ गुंज आल्याचा रस व साखर यामध्यें उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें. २) जुन्या चिंचेचा बलक १ भाग, बिब्ब्याचे तुकडे -॥- भाग, लसूण -।-भाग एकत्र घोटून त्याच्या २।२ गुंजेच्या गोळ्या करणें. या गोळ्या १ ते २ कांद्याच्या रसामधून -॥-, -॥- तासानें द्याव्यात. जुलाब व उलट्या बंद होईतों-पर्यंत या गोळ्या द्याव्यात.
नाडी क्षीण, श्वास, हातपाय गार पडणें.	१) हेमगर्भ १/२ गुंज मधांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें. २) मल्लसिंदूर १/२ गुंज वरीलप्रमाणें चाटवणें.
अतितृष्णा, अन्तर्दाह.	नारिकेलोदक थोडें थोडें वरचेवर देणें.
आहार	लिंबाचें सरबत, तापवून थंड केलेलें पाणी याशिवाय कांहींहि देऊं नये. जुलाब व उलट्या थांबल्यावर प्रथम लाजामंड द्यावा व नंतर पेयादि क्रम अनुसरावा.

पाण्डु–कामला

पूर्वरूप

त्वचा रूक्ष होणें व फुटणें, मल व मूत्र पिवळें, घाम न येणें, अंगसाद, डोळ्याचें भोंवती सूज, अग्निमांद्य, अपचन, हृत्स्पंदन, कपाळावर घाम येणें, डोळे पांढरे दिसणें, (नेत्र शुक्लता)नखें किंचित पांढरी दिसूं लागतात व नखाचेंमध्यें खळगा पडतो. छातींत धडधड होतें.	दीपक, पित्तशामक, ओजोवर्धक, जीवनीय गणांतील औषधें, आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध, तूपसाखर. दिवसांतून ३ वेळां

वातज लक्षणें

त्वचा - मूत्र - नेत्र - रूक्ष, काळसर, लालसर दिसतात. शोथ, पार्श्वशूल, शिरःशूल, भ्रम, आनाह, मल-शुष्कता, मळाच्या गांठी होणें, तोंड बेचव होणें.	ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा १ पुडी. अनुपान– तूपसाखर. दिवसांतून ३ वेळां.
पार्श्वशूल, शिरःशूल, भ्रम, हृत्स्पंदन अधिक.	अभ्रकभस्म ॥ ते १ गुंज मंडूर भस्म २ ते ४ गुंजा सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा शिलाजीत १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३ वेळां
आनाह, मलशुष्कता, आस्यवैरस्य।	त्रिफळाचूर्ण २ ते ३ मासे १ पुडी. अनुपान– तूप व मध. रात्रीं १ पुडी देणें, किंवा जेवणापूर्वी २ ते ३ चमचे गरम तुपांत २ ते ३ गुंजा सैंधव मिश्र करून तें प्यावें व नंतर लगेच आहार घ्यावा.

पित्तज लक्षणें

मल-मूत्र-नेत्र पीतता, दाह, तृष्णा, ज्वर, दुर्गंधीयुक्त व द्रव मलप्रवृत्ति; शीतकामित्व, उष्ण व अम्ल पदार्थांनीं उपशय न येणें, कटु-कास्यता, अतिस्वेद, अम्ल उद्गार, विदाह, अन्तर्दाह, मूर्च्छा,

१) सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म १ ते २ गुंज
मौक्तिकभस्म ।। ते १ गुंजा
कासीसभस्म २ गुंजा
आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध, किंवा मोरावळा, दाडिमावलेह. दिवसांतून ३ वेळां.

ज्वर, तृष्णा, दाह; द्रव, मलप्रवृत्ति, अम्लोद्गार.

१) सुवर्णसूतशेखर ।। ते १ गुंज
लक्ष्मीनारायण ।। गुंज
प्रवाळभस्म १ गुंज
अमृतासत्त्व २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दाडिमावलेह. दिवसांतून ३ पुडया. वरील पुडयाबरोबर या आलटून पालटून द्याव्यात व ज्वर, दाह कमी झाल्यावर या बंद कराव्यात.
२) रौप्यभस्म १ गुंज, सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– तूप मध दिवसांतून २ वेळां.

कफज लक्षणें

त्वचा, मूत्र, नेत्र, चेहरा पांढरट होणें, प्रसेक, तंद्रा, आळस, जाडय, लवणास्यता, छर्दि, रोमहर्ष, स्वरक्षय, कास, शोथ.

१) ताम्रभस्म । ते ।। गुंज
पुनर्नवामंडूर ४ गुंजा
अभ्रकभस्म १ गुंज
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां.
लोहासव २-४ चहाचे चमचे-दुप्पट पाणी मिसळून दोन्ही वेळचें जेवणानंतर.
२) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
कासीसभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

सान्निपातिक लक्षणें

अरोचक, हृल्लास, छर्दि, ज्वर, तृष्णा, क्लम.

१ सुवर्णमालिनीवसंत । गुंज. १ पुडी अनुपान– दूध. सकाळीं १ पुडी देणें.
दुपारीं व संध्याकाळीं खालील मिश्रणाची १।१ पुडी देणें.
मकरध्वज १/४ गुंज
प्रवाळभस्म १ गुंज
कासीसभस्म १ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध.
२) हीरकभस्म १/१० गुंज. १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं देणें.
दुपारीं व संध्याकाळीं
आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
कासीसभस्म १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दाडिमावलेह किंवा दुधांतून देणें.

मृज्जन्य पांडु लक्षणें

डोळे, गाल, नाभि, जननेंद्रिय यावर शोथ, कृमि.

आरोग्यवर्धिनी १ गुंज
नवायसलोह ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध, दूध. दिवसांतून ३ वेळां.

आहार

वातज

सस्नेह ताक, कांहीं दिवस देऊन नंतर साळीच्या लाह्या ताकांत भिजवून किंवा तूप, मीठ लावून देणें. दूध द्यावें. नंतर हळू हळू उष्ण, स्निध, मधुर असा आहार अग्नि प्रदिप्त झाल्यावर द्यावा.

पित्तज

द्रव आहार. दूध, दाडिमस्वरस, सफरचंद स्वरस, तीव्र लक्षणें कमी होईतोंपर्यंत हा आहार द्यावा. नंतर स्निग्ध पेयादि क्रम अवलंबावा.

कफज	रूक्ष ताक (लोणी काढलेलें) अग्नि प्रज्वलित होईतोंपर्यंत द्यावें. नंतर पेयादिक्रम अनुसरावा किंवा भात द्यावा.
सान्निपातिक	द्रव आहार– दूध, फळांचा रस.
मृज्जन्य	दूध द्यावें.

उपद्रवात्मक पांडु

विषमज्वरजन्य	कासीसभस्म १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– ताक, पाणी. दिवसांतून ३ वेळां,
विषमज्वर शोथ, प्लीहावृद्धि, यकृत्वृद्धि व पाण्डुहि असतांना.	१) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा कासीसभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.
रक्तार्शजन्य	नवायसलोह ४ ते ८ गुंजा. १ पुडी. अनुपान– ताक. दिवसांतून ३ वेळां.
रक्तपित्तजन्य	चंद्रकला १ ते २ गुंजा कासीसभस्म १ ते २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूधसाखर. दिवसांतून ३ वेळां.
अस्थि-मज्जागत दोषजन्य (निदानदीपिका)	हीरकभस्म १/१० गुंज. १ पुडी. अनुपान-मध. सकाळीं देणें. कासीसभस्म १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– मध. दुपारीं व संध्याकाळीं देणें.

कामला

कोष्ठशाखाश्रित कामलेची लक्षणें

त्वचा, डोळे, चेहरा, नख पीत वर्णात्मक; मल, मूत्र, रक्त, पीत, मिश्र वर्णात्मक; अग्निमांद्य, अविपाक, अरुचि, दाह, दौर्बल्य, इंद्रियक्रिया-हानि, तृष्णा, तन्द्रा, नाडीचें ठोके कमी. या कामलेच्या प्रकारांत पित्त हें कोष्ठांत येतें, त्यामुळें मल हा पीत वर्णात्मक असतो.	१) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा शरपुंखाघन २ ते ४ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. २) कुमारीआसव, रोहितकारिष्ट, अभयारिष्ट १ ते २ चहाचे चमचे प्रत्येकी घेऊन दुप्पट पाणी मिसळून दिवसांतून ३ वेळां.

रुद्धपथ कामला
(केवल शाखाश्रित)

मल श्वेत वर्णाचा असतो. अग्नि-मांद्य, मळमळ, डोळे, नख, नेत्र, त्वचा, मूत्र पीत वर्णात्मक; दौर्बल्य.	१) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा नवसारादिचूर्ण १ ते २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान – पाणी. दिवसांतून ३ वेळां. २) एरंडाच्या पानांचा रस १ ते २ तोळे, गायीचें दूध ५ ते ७ तोळे तापवून थंड केलेलें आठवड्यांतून एकदां सकाळीं फक्त घ्यावें. त्या दिवशीं आहार केवल दूध व भात ठेवावा. ३) कळीचा चुना ·।· ते ·॥· तोळा सुमारें ·।· शेर दह्यांत कालवून ३ दिवस सकाळीं द्यावा. कळीचा चुना मडक्यांत ठेवलेला ओला असावा. तेल, तूप व सर्व स्नेह पदार्थ वर्ज.

आहार — साधें वरण व भाकरी. उकडलेल्या तिखट न घालतां केलेल्या भाज्या; भात, लोणी काढलेलें ताक, साय काढलेलें दूध, मोसंबीरस, दाडिमस्वरस, ऊंस, पण ऊंसाचा रस वर्ज. (घेऊं नये.)

यकृद्दाल्योदर उपद्रव कामला — लोहपर्पटी १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं १ पुडी. दुपारीं व संध्याकाळीं. आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी.

आहार — निस्नेह दूध, मोसंबी रस, दाडिम रस.

रक्तपित्त

या अवस्थेचे दोन प्रकार –
१) पित्तप्रकोपाची लक्षणें.
२) रक्तप्रकोपाची लक्षणें.

पूर्वरूप

अग्निमांद्य, थंड पदार्थाची इच्छा, भितिदायक छर्दि; अरुचि, अम्लास्यता, भ्रम, क्लम, मत्स्य-आमगंधत्वास्य, नील–लोहित–पीत वर्णांचे स्वप्नांत दर्शन, गात्रसाद, दाह, विदाह, अनन्नाभिलाषा, अम्लोद्गार. रक्तगंधिउच्छ्वास, कंठधूमायन, रक्त - हारिद्र - हरितवर्णता,त्वचा, मल, मूत्र, स्वेद, लाळ नाकांतील मल, कानांतील मल व डोळ्यांतील मल यांना पूर्वरूपामध्यें वरील एकंदर लक्षणावरून असें म्हणता येतें कीं अल्प प्रमाणांत उर्ध्व वा अधस्थानांत रक्तस्राव होत असतो. उदा. रक्तगंधि उच्छ्वास. हें लक्षण उर्ध्वस्थानांत अल्प प्रमाणांत रक्तस्राव होत असल्याचे द्योतक आहे. तसेंच मलमूत्रांना रक्त, हारिद्र, हरित वर्ण हें लक्षण अधःस्थानांत रक्तस्राव होत असल्याचें दर्शक आहे.

१) प्रवाळभस्म २ ते ४ गुंजा
मौक्तिकभस्म ।। ते १ गुंज
चंद्रकला १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– वासा पुटपाकस्वरस व साखर दिवसांतून ३ पुड्या.
संपूर्ण विश्रांती.

२) सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म २ ते ४ गुंजा
सुवर्णगैरिक २ ते ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूधसाखर. दिवसांतून ३,४ वेळां.

स्थानानुरूप रक्तपित्त चिकित्सा
उर्ध्वस्थानांतून होणारे रक्तपित्त चिकित्सा.

नासिकागत	नाकामध्यें डाळिंबाच्या फुलाचा रस काढून किंचित् गरम करून ४ थेंब नस्यविषींतील पद्धतीप्रमाणें निजवून नाकांत टाकणें.
कर्णगत	लाक्षादितैलानें कर्णपूरण करावें.
नेत्रगत	कुमारी स्वरस किंचित् तुरटी टाकून डोळ्यांत टाकणें, किंवा कोरफडीच्या मगजाची पुरचुंडी करून ती सतत डोळ्यावर ठेवावी.
मुखगत (हिरड्यांतून होणारा रक्तस्राव)	१) गंधकद्रुतीचा पिचु ठेवणें. २) तुरटीच्या पाण्याच्या गुळण्या करणें.
कंठगत	१) गंधकद्रुति लावणें. २) तुरटीच्या पाण्याच्या गुळण्या करणें.
वरील स्थानिक चिकित्सेबरोबर पोटांत देण्यासाठीं.	चंद्रकला १ ते २ गुंजा प्रवाळभस्म २ ते ४ गुंजा मौक्तिकभस्म ॥ ते १ गुंज आमलकीरस १ ते २ गुंजा असली नागकेशर २ ते ४ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध साखर. दिवसांतून ३-४ वेळां.
उरःक्षत	कोहळास्वरस १ ते २ तोळे दिवसांतून ३ वेळां. याबरोबर प्रवाळभस्म १ ते २ गुंजा, मौक्तिकभस्म १ गुंज १ पुडी. कोहळास्वरस न मिळाल्यास कुष्मांडा-वलेहाबरोबर देणें.
कासगत (खोकल्यांतील कफाबरोबर उरः स्थानांतून होणारा रक्तस्राव)	लाक्षाचूर्ण २ ते ४ गुंजा आमलकीरस २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा

	सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान – दुधसाखर किंवा वासावलेह. दिवसांतून ३ वेळां.
छर्दिगत (आमाशयगत)	चंद्रकला १ ते २ गुंजा लाक्षाचूर्ण २ ते ४ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा आमलकीरस २ गुंजा १ पुडी. अनुपान– वासावलेह किंवा वासास्वरस (पुटपाक पद्धतीनें) दिवसांतून ३ वेळां.

अधोगामी

मूत्रगत	चंदनादिवटी १ ते २ गुंजा उन्हाळघाचें औषध २ ते ३ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.
गुदगत (अर्श विरहित)	चंद्रकला १ ते २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा मौक्तिकभस्म । ते ॥ गुंजा आमलकीरस २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. रोग्यांस निजवून ठेवणें. पोटावर बर्फाची पिशवी ठेवावी.
गर्भाशयगत (अत्यार्तव विरहित)	चंद्रकला १ ते २ गुंजा अशोकघन २ गुंजा मायफळ चूर्ण २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– तांदुळाचें धुवण. दिवसांतून ४ वेळां. २) दूर्वास्वरस २ ते ४ चहाचे चमचे दिवसांतून २ वेळां.

तिर्यग्गामी (त्वग्गत)	चंद्रकला १ ते २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा मौक्तिकभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– वासास्वरस (पुटपाकविधीनें काढलेला) दिवसांतून ४ वेळां.

आहार

अधोगामी	उष्ण, तीक्ष्ण वर्ज, कटुरस वर्ज. द्रवाहार, दाडिमरस, मोसंबीरस, ताक.

उपद्रव

श्वास	लक्ष्मीविलासगुटी ।' ते ।।' गुंज, मोरावळा किंवा दाडिमावलेह यामध्यें उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
कास	सितोपलादिचूर्ण ४ गुंजा शृंगभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– वासास्वरस व साखर. दिवसांतून ४ वेळां.
ज्वर तीव्र असल्यास	लक्ष्मीनारायण ।' ते ।।' गुंज प्रवाळभस्म १ ते २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.
छर्दि	वांतीहृद्रस १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. चाटवणें.
दाह, मूर्च्छा, मद, विदाह	सुवर्णसूतशेखर ।।' ते १ गुंज प्रवाळभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

मूर्च्छा असल्यास	वरील पुडी. वासास्वरस किंवा मोरावळा यामध्यें उगाळून १।१ बोट ५।५ मिनीटांनीं चाटवणें.
तृष्णा	१) नारिकेलोदक थोडें थोडें पाजीत रहावें. २) सुगंधीजल. वाळासिद्धजल. ३) खापरखुंटीसिद्धजल
कोष्ठभेद	शल्यचिकित्सकाकडे पाठवणें.
अतिसार	कुटजघन २ गुंजा बेलफळचूर्ण २ गुंजा कपर्दिकभस्म २ गुंजा मोचरस २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.
शोथ	पुनर्नवासव २ चमचे उशिरासव २ चमचे दुप्पट पाणी घालून दिवसांतून ३ वेळां देणें.
दौर्बल्य	नवायसलोह ४ ते ८ गुंजा १ पुडी. अनुपान–दूध, ताक. दिवसांतून २ पुड्या.
अविपाक, अरोचक	उशिरासव २ चमचे कुष्मांडासव २ चमचे दुप्पट पाणी मिसळून जेवणापूर्वी घेणें.

राजयक्ष्मा

त्रिरूप लक्षणें

अंसपार्श्वाचे भागीं पीडा, वेदना व गरम होतें, हातपायाची जळजळ, ज्वर.

प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
सुवर्णभस्म $\frac{1}{100}$ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध, तूप. दिवसांतून ३ वेळां.

२) सुवर्णमालिनीवसंत ·।।· ते १ गुंज
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– लोणी, खडीसाखर. किंवा दूधसाखर. दिवसांतून २ वेळां.

यानंतर कास, ज्वर, रक्तपित्त वरील ३ लक्षणानंतर ही ३ लक्षणें उत्पन्न होतात. म्हणून याला श्री. भोज यांनीं त्रिरूप राजयक्ष्मा असें म्हटलें आहे.

सूक्ष्मसुवर्णभस्म १ गुंज
अभ्रकभस्म १ गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– वासावलेह. दिवसांतून ३ वेळां.

रक्तपित्त प्रबल असल्यास

वरील पुडीमध्यें लाक्षाचूर्ण २ ते ४ गुंजा मिसळून देणें. अनुपान– कुष्मांडस्वरस किंवा कुष्मांडावलेह.

षड्रूप लक्षणें

अन्नद्वेष, ज्वर, श्वास, कास, रक्तपित्त, स्वरभेद.

हीरकभस्म $\frac{1}{10}$ गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळी देणें.
वसंतकुसुमाकर ·।।· गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध किंवा दूध. दुपारीं व रात्रीं देणें.

एकादश रूपें

स्वरभेद, बरगड्या दुखणें, अंसपार्श्वभागसंकोच, ज्वर, दाह, अतिसार, रक्तपित्त, शिरोजाड्य, अरुचि (अन्नद्वेष) कास, कंठोध्वंस.

हीरकभस्म $\frac{1}{10}$ गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं देणें.
दुपारीं व रात्रीं वसंतकुसुमाकर ·।।· गुंज.
प्रवाळभस्म २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध किंवा दूध.

टीप:– वरीलपैकीं एखादें लक्षण प्रबल असल्यास त्याची स्वतंत्रपणें औषधी योजना करावी.

आहार

पौष्टिक आहार, शीत, स्निग्ध बृंहणात्मक. भात, भाकरी, दूध, तूप, लोणी, फळें, आंबा, केळें, खजूर, द्राक्षें, पालेभाज्या व फळभाज्या.

अतिसार असल्यास आहार केवळ ताक हा ठेवावा. अतिसार बंद झाल्यावर पुन: पूर्ववत आहार घ्यावा.

टीप:– षड्रूप व एकादशरूप क्षयाची जी चिकित्सा सांगितली आहे ती अनुभवात्मक असली तरी ती आधुनिक पद्धतीनें क्ष किरणानें परीक्षा करून रोगी बरे झाल्याचे दिसून आले आहे.

प्रतिलोमक्षय

लक्षणें

अतिव्यवायामुळें शुक्रक्षीणतेची लक्षणें होतात. प्रथमत: तो रोगी फिक्कट, निस्तेज असा दिसूं लागतो. चिंताग्रस्त, अंगसाद, कृश होतो.

१) वंगभस्म १ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
अश्वगंधादिचूर्ण १ ते २ मासे
१ पुडी. अनुपान– दूधसाखर. दिवसांतून ३ वेळां.

२) वसंतकुसुमाकर १ गुंज
अश्वगंधाघन २ ते ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूधसाखर. दिवसांतून २ वेळां.

आहार

दूध, तूप, लोणी व इतर नेहमीचा आहार.

पार्श्वशूल (प्लूरसी)

या रोगाचें वर्णन आयुर्वेदांत कोठें असल्याचा उल्लेख मिळत नाहीं. पण व्यवहारांत रोगी सांपडत असल्यामुळें याचें निदान करून त्याची चिकित्सा करणें आवश्यक आहे.

लक्षणें	**चिकित्सा**
श्वासोच्छ्वासाचें वेळीं पार्श्वस्थ पीडा. ज्वर १०० ते १०२°, कास, श्वासाला अवरोध, श्रवणनलिकायंत्रद्वारें घर्षणात्मक ध्वनि ऐकूं येतो.	त्रिभुवनकीर्ति ।।' ते १ गुंज शृंगभस्म २ ते ४ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान–मध. दिवसांतून ३ वेळां. २) गंधकद्रुति २।२ थेंब सकाळीं व संध्याकाळीं २।३ चमचे दुधांत टाकून देणें. किंवा अर्धा चमचा साखरेवर २।२ थेंब टाकून देणें. ३) लेप– दशांगलेप किंवा लेपगोळी नं. १ चा लेप पाण्यांत उगाळून गरम करून वेदना असलेल्या जागीं लावणें. ४) गंधकद्रुतीचे २।३ थेंब वेदनेच्या जागीं लावून जिरविणें.

जलपार्श्व

वरील रोगाचाच हा एक दुसरा प्रकार आहे. यामध्यें पार्श्वशूल, ज्वर, क्वचित् कास, श्वास ही लक्षणें आढळतात. पार्श्वस्थ जल असल्याची प्रचीति नलिकायंत्रानें तपासून किंवा क्ष किरणानें तपासून याचें निदान निश्चित करता येतें. **नलिकायंत्रानें आढळणारी लक्षणें–** श्वासोच्छ्वासाचें ध्वनि जल असलेल्या भागांतून ऐकूं येत नाहींत. किंवा रोग्यांस १।२।३ असें म्हणावयास सांगितलें असतां हा आवाज जलसंचित भागांतून स्पष्ट असा ऐकूं येतो. छातीवर आपला डावा हात ठेवून त्याच्या बोटावर उजव्या हाताच्या बोटानें ताडन केलें असतां बदबद असा आवाज येतो. यावरून पार्श्वशूल भागीं किती जल पसरलें आहे वा संचित आहे याचें ज्ञान होतें. क्ष किरणानें पाहिल्यास प्रत्यक्ष पाण्याची होणारी हालचाल दृष्टोत्पत्तिस येते. किंवा फोटो घेतल्यास पाणी असलेल्या जागीं पांढरा असा पट्टा दिसतो व फुफ्फुसाचा भाग दिसत नाहीं. यावरूनहि पाण्याची संचित मर्यादा कळून येते.	१) गंधकद्रुति २ ते ४ थेंब सकाळीं व संध्याकाळीं दुधांतून देणें. २) कुमारीआसव २ ते ४ चमचे दुप्पट पाणी घालून २ वेळां देणें. ३) हीरकभस्म १/१० गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं देणें. यानेंहि पाण्याचें शोषण होतें.

कास-श्वास-ज्वर	लक्ष्मीनारायण ।।' ते १ गुंज लक्ष्मीविलास ।' ते ।।' गुंज शृंगभस्म २ ते ३ गुंजा सितोपलादिचूर्ण २ ते ३ गुंजा १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळा.
पाण्याचें प्रमाण अधिक असल्यास	पाणी काढावें.
पाणी काढल्यानंतर पुनः जल संचिती होऊ नये म्हणून	गंधकद्रुती २।३ थेंब पूर्वीप्रमाणें द्यावी.

पार्श्वस्थ पूयीभवन

जलसंचिती तशीच कांहीं काल राहिल्यास फुफ्फुसावरणामध्यें पूयीभवन होतें. अशावेळीं ज्वर हा थंडी वाजून येतो. उतरतो, कास, श्वास ही लक्षणें वाढतात.

१) पूं काढून घ्यावा लागतो. तो काढल्यानंतर वरीलप्रमाणें गंधकद्रुति चालू ठेवणें. म्हणजे तेथील दाह, शोथ, ज्वर ही लक्षणें कमी होतात व पुनः पूयीभवन होत नाहीं.

टीप– या पार्श्वशूल रोगाबरोबर किंवा नंतर राजयक्ष्म्याची चिन्हें सुरूं होतात. जर राजयक्ष्म्याची कांहीं चिन्हें दिसली तर हीरकभस्म १/८ गुंज मधांतून रोज सकाळीं १ पुडी देत रहावे म्हणजे राजयक्ष्मा होत नाहीं. व सुरूं झाला असल्यास त्याचा प्रशम होतो व रोगी पूर्ण बरा होतो.

आहार — **दूध, चहा, कॉफी, फळांचा रस.**

कास

पूर्वरूप

घशांत खवखवणें, अरुचि, कंठस्थदाह (घशांत टोचल्याप्रमाणें वाटणें) खाल्लेले गिळण्यास त्रास होणें.

चिकित्सा

१) त्रिभुवनकीर्ति ·॥· ते १ गुंज
वाकेरीचें भातें २ ते ४ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां.

२) घशास गंधकद्रुति लावणें.

वातज लक्षणें

हृदयाचे भागांत पीडा, शंख,शिर, उदर, पार्श्व या भागीं शूल; घसा कोरडा पडणें, बल, स्वर व ओज क्षय; कोरडा व सारखा खोकला. फुटलेला आवाज याप्रमाणें खोकला.

१) पुष्करमूळचूर्ण २ ते ४ गुंजा
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
तालिसादिचूर्ण १ मासा
१ पुडी. अनुपान– तूप व मध. दिवसांतून ४ वेळां.

२) कर्पूरादिवटीची १।१ गोळी खडीसाखरेच्या खड्याबरोबर तोंडांत धरणें.

३) समीरपन्नग १/२ गुंज
सोमलताचूर्ण २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ४ वेळां.

४) खदिरादिवटी १।१ गोळी खडीसाखरेच्या खड्याबरोबर तोंडांत धरणें.

पित्तज लक्षणें

उरोदाह, ज्वर, घसा कोरडा व शूल,तिक्तास्यता, तृष्णा, पिवळसर व तिखट, पित्त व रक्तयुक्त वांति, भ्रम, मोह, अरुचि, डोळ्यापुढें तारे चमकणें.

१) सुवणसूतशेखर ·॥· गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दाडिमावलेह. दिवसांतून ३ वेळां.

२) लक्ष्मीविलासगुटी ।। गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
तालिसादिचूर्ण १ मासा
१ पुडी. अनुपान– दाडिमावलेह. दिवसांतून ३ वेळां.
३) बकुळीच्या फुलांचा काढा २ ते ४ तोळे, साखर घालून थोडा थोडा पाजावा.
४) बकुळअवलेह २।२ चमचे.

कफज लक्षणें

तोंड चिकट होणें, शि:रशूल, अंगसाद, अरुचि, अंग जड पडणें, घसा दुखणें, खवखवणें, वारंवार खोकला, घट्ट, स्निग्ध, पांढरा कफ पडणें; पडसें, छर्दि.

१) अभ्रकभस्म १ गुंज
शृंगभस्म २ गुंजा
लवंगादिचूर्ण १ मासा
१ पुडी. अनुपान– मध, गरम पाणी. दिवसांतून ४ वेळां.
२) खदिरादिवटी किंवा लवंगादिवटी १ गोळी खडीसाखरेबरोबर तोंडांत धरणें.
३) रससिंदूर ।॰ गुंज
शृंगभस्म २ गुंजा
लवंगादिचूर्ण १ मासा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ४ वेळां.

वातज कास–(ब्रांकीओस्टेसिस)
अनुबंध कफ लक्षणें

सकाळीं उठल्याबरोबर कास, सतत कोरडा खोकला, पुढें पुढें किंचित् फेसकट, पिवळसर व पुष्कळ कफ पडतो, क्वचित् रक्तहि पडतें. व श्वास लागतो. अग्निमांद्य, मलावष्टंभ. हा खोकला पुष्कळ दिवस राहतो. क्ष किरणानें फुफ्फुसांतील श्वासनलिका मोठ्या

हीरकभस्म १/१० गुंज १ पुडी. अनुपान – मध. सकाळीं देणें.
२) अभ्रकभस्म १ गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दुपारीं व संध्याकाळीं देणें.

झालेल्या दिसतात. व श्रवणनलिका-यंत्रानें छाती तपासल्यास बारीक तारावर आघात केल्याप्रमाणें आवाज येतो.

आहार

वातज

उष्ण, स्निग्ध, मधुर आहार. भात, भाकरी, तूप, लोणी, पोळी, ताकाची कढी, अमसुलाचें सार, लसूण व खोबऱ्याची चटणी, तेलांतील तळलेलें पदार्थ व कटु-रसात्मक आहार वर्ज.

पित्तज

कटु, तीक्ष्ण, उष्ण वर्ज. मिरची, मोहरी, लसूण, कांदा वर्ज करणें. अम्ल फळें वर्ज. स्निग्ध, शीत, मधुर आहार घ्यावा.
भात, भाकरी, तूप, लोणी, पोळी, मधुर व शीत गुणात्मक भाज्या व फळें घ्यावीत. दुध्याभोपळा, पडवळ, भेंडी, मोहरी न घालतां तुपाची फोडणी घालून कराव्यात.

कफज

अम्ल, मधुर, शीत आहार वर्ज. रूक्ष, उष्ण, कषाय, तिक्त रसात्मक आहार द्यावा.
भाकरी ज्वारी किंवा बाजरीची. सात्म्य असेल तर पोळी द्यावी. अळू, मेथी, चाकवत, मुळा, मुळ्याच्या शेंगा, कारले, गाजर, सुरण, दाडिम, सफरचंद (अम्ल नसल्यास)

हिक्का – उचकी

पूर्वरूपें

छाती व घसा या ठिकाणीं जड वाटणें, कषायास्यता, अरति, आटोप ही सर्व लक्षणें वाताच्या संचयाची व त्याच्या उर्ध्वगतीची द्योतक आहेत.

चिकित्सा

वातानुलोमन करावें व दीपक, पाचक औषधें द्यावीत.
लशुनादिवटी १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– आल्याचा रस, लिंबाचा रस व साखर किंवा तुळशीच्या पानांचा रस साखर. दिवसांतून ४ वेळां.

अन्नजा लक्षणें

रूक्ष, तीक्ष्ण, खर, असात्म्य अन्न व द्रव आहार पोटांत गेल्याबरोबर हिक्का सुरू होते. आहारामुळें पूर्वी संचित झालेला वायु उर्ध्व गतिमान होतो. अन्नाचें पचन झाल्यावर हिक्का शम पावते. हिक्का वेदनारहित, मंदवेगात्मक व कधीं कधीं शिंकेबरोबर असते.

उष्ण, स्निग्ध.
शुण्ठीसिद्ध व घृतयुक्त पेया. वातानुलोमन करणारें औषध. लशुनादिवटी १ ते २ गुंजा वरील पेयेबरोबर द्यावी किंवा शुण्ठिसिद्ध दुग्ध.
सात्म्य अन्न व पान द्यावें. म्हणजे ती शम पावते.

यमला लक्षणें

आहाराचें पचन झाल्यावर सुरू होते. तहानेनें व्याकूळ व आध्मान असतांना सुरू होते. प्रलाप, छर्दि, अतिसार, जृंभा, डोळ्यांत पाणी (डोळे भरलेले), मुखशोष, हिक्का लागोपाठ दोनदां येते. मूर्च्छा. यमला या हिक्केची, प्रलाप, मूर्च्छा, छर्दि इ. जी लक्षणें वर दिली आहेत ती हिक्केमुळें उत्पन्न झालेली आढळून येत नाहींत. तर वरील लक्षणाबरोबर हिक्का ही असते.

१) सुवर्णसूतशेखर '।।' ते १ गुंज तुळशीच्या पानांचा रस व मध यांत उगाळून चाटवणें.
२) दीपक, पाचक, अनुलोमक चिकित्सा करावी.

क्षुद्रा लक्षणें

व्यायामामुळें उत्पन्न होते. मंद वेगात्मक. व खाल्यानें बंद होते.

दीपक, पाचक व वातानुलोमक चिकित्सा करावी.

गंभीरा लक्षणें

पक्वाशयापासून वायु उर्ध्वगामी होऊन हिक्का उत्पन्न होते. व तिचा आवाज मोठा असतो. जांभईसह येते. हिक्का येतांना खूप त्रास होतो. उच्छ्वास मार्गाचा रोध होतो. बल व चेतना धातू क्षीण होतात.

१) नाभीस्थानावर गंधकद्रुति २।३ थेंब टाकून जिरविणें.
२) नारळाच्या शेंडीची धुरी देणें.
३) हेमगर्भमात्रा १/८ गुंज. आल्याचा रस व मध यांमध्यें उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.

महाहिध्मा लक्षणें

देह निश्चल करते, मूकत्व उत्पन्न करते, स्मृति-संज्ञा नष्ट होतात. अन्नमार्गावरोध.

त्रैलोक्यचिंतामणी १/१६ ते १/८ गुंज आल्याचा रस व मध यांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें किंवा हेमगर्भमात्रा वरीलप्रमाणें चाटवणें.

आहार –

पूर्वरूप व अन्नजा	वातानुलोमन करणारा असावा. उष्ण, स्निग्ध, मधुर रसात्मक. दूध, तूप, भात भाकरी, चपाती.
यमला व क्षुद्रा	वरील प्रमाणें.
गंभीरा व महा	द्रवाहार, उष्ण पेयें. शुण्ठीसिद्ध दूध, चहा, कॉफी.

श्वास

पूर्वरूपें

अग्निमांद्य, प्रतिश्याय (वरचेवर पडसे येणें) कास, कण्ठकूजन, पार्श्वशूल, आनाह, वक्त्रवैरस्य, शिर:शूल, प्रतिश्याय वरचेवर येतो त्यावेळीं चिकित्सा करणें आवश्यक.

चिकित्सा

१) नागगुटी ।· ते ।।· गुंज
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– आलेरस व मध.
२) त्रिभुवनकीर्ति ।· ते १ गुंज
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– आलेरस व मध किंवा गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
नाकांत क्षारतेलाचा बोळा रोज रात्रीं फिरविणें.

तमकश्वास लक्षणें

सामान्यत: श्वासाचा वेग रात्रीं १ झोंप झाल्यावर येतो. त्यावेळीं खोकला अजिबात येत नाहीं. आला तरी शुष्क कास असतो. कण्ठकूजन असतें. श्वासाचा अवरोध मधून मधून असतो. रोगी बाह्य वायू घेण्याचा प्रयत्न करतो. खोकला येऊन जर कफ बाहेर पडला तर त्यास बरें वाटतें. असा रोगी निजत नाहीं तो बसून राहतो.

१) महालक्ष्मीविलास ।।· गुंज.
आल्याचा रस व मध किंवा मधांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
यामुळें वेगाचें शमन होतें. वेग येऊन गेल्यानंतर खालील औषधें द्यावीत.
समीरपन्नग ।।· गुंज
सोमलताचूर्ण २ ते ४ गुंजा
शृंगभस्म २ ते ३ गुंजा
रिंगणीघन १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी किंवा मध. दिवसांतून ४ वेळां.

कफ लवकर सुटत नाहीं, पण छातींत असतो. अशावेळीं कफ सुटून पडून जाण्यासाठीं.

समीरपन्नगाचा उपयोग होतो. याचे ऐवजी श्वासकुठार ।।· गुंज व इतर औषधें वापरली तरी चालतात.

कफ छातींत आहे. तो पडला तरी पुन: छाती डबडबलेली असते, जीव घुसमटतो, चालतांना दम लागतो.

मल्लसिंदूर ।· गुंज
सोमलताचूर्ण २ ते ४ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ४ वेळां.

प्रतमक लक्षणें

यामध्ये वरील लक्षणाचे जोडीस ज्वर असतो.

वरील औषधांचे बरोबर प्रत्येक पुडींत लक्ष्मीनारायण ।।· गुंज या प्रमाणांत घालून द्यावा.

महाश्वास लक्षणें

श्वासोच्छ्वास करतांना मोठा आवाज, श्वासाची घरघर, शुद्धि नसते, डोळे चंचल, उघडी बुबुळें सारखी हलतात. तोंड सारखे उघडे, रोगी बोलूं शकत नाहीं. छातींत कफ डबडबलेला, मल-मूत्र विसर्जन होत नाहीं. नाडी क्षीण-जलद. छातींत कफ जास्त असतो. तो बाहेर पडत नाहीं म्हणून त्याचा आवाज मोठा असतो.

हेमगर्भ १/८ ते ।· गुंज आल्याचा रस व मधांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.

रोग्यास कफ बाहेर काढण्याची शक्ति नसते. म्हणून दीर्घ असा श्वास घेत असतो, याचवेळीं नाडीहि क्षीण असते. अशा वेळीं कफाचें शोषण झालें तर रोगी जगूं शकतो.

पंचसूत १/८ गुंज आल्याचा रस व मधांत उगाळून वरचेवर चाटवणें. (यानें कफाचें शोषण होतें.) या अवस्थेंत पंचसूतापेक्षां कमी प्रतीचें कार्य करणारा मल्लसिंदूर हा आहे. त्याची मात्रा १/८ ते १/४ गुंज.

छिन्न व उर्ध्व श्वास

हेमगर्भ, मल्लसिंदूर व पंचसूत हीहि औषधें उपयोगी पडतात.

आहार

तमकश्वास- पूर्वरूप प्रतिश्याय- कास असतांना	शीत गुणात्मक व अम्ल रसात्मक सर्व द्रव्यें वर्ज. गार पाणी, थंड पेयें, आईस्क्रीम एअर कण्डीशन्ड रूम ही वर्ज करणें. थंड हवेंत फिरणें. रेफ्रिजरेटरमध्यें ठेवलेल्या वस्तु वापरूं नयेत. दही, ताक, लिंबू ही वर्ज. मोसंबी, संत्री, पेरू वर्ज. पोळी, भाकरी, भाज्या, मेथी, पाथरी, तांदुळजा, फळभाज्या, मोहरी, लसूण, आलें लावलेल्या भाज्या घ्याव्यात. फार तैल घालूं नये.
वरचेवर वेग येणाऱ्यास	केवल दुग्धाहार ठेवावा. म्हणजे श्वासाचे वेग येत नाहींत.

स्वर भेद

क्षयज लक्षणें	**चिकित्सा**
धातुक्षय-ओजक्षय यामुळें आवाज बसणें. आवाज न उमटणें.	रसायन चिकित्सा. सुवर्णभस्म १/१० गुंज अभ्रकभस्म १ गुंज तालिसादिचूर्ण १ मासा १ वेळां. अनुपान– मध. दिवसांतून ४ वेळां. यष्टीमधुघन तोंडांत धरून घघळण्यास देणें.
घशामध्यें अर्बुदा (कॅन्सर) चे प्रारंभी व नंतर स्वरभेद होतो.	गंधकद्रुति घशास दिवसांतून २ वेळां लावणें.
लक्षणें आवाज बसतो. अति खोल असा आवाज येतो. घशांत दुखते. गिळतांना त्रास.	गंधकद्रुति १।२ थेंब साखरेबरोबर किंवा दुधांत टाकून दिवसांतून २ वेळां देणें.

सूचना:– सामान्य कोणत्याहि स्वरभेदावर या गंधकद्रुतीचा उपयोग होतो.

आहार	अम्ल रस पदार्थ वर्ज. मधुर, स्निग्ध, उष्ण पदार्थ घ्यावे.

छर्दि

पूर्वरूपें

मळमळ, उद्गाररोध, प्रसेक, लवणास्यता, अन्नद्वेष.

चिकित्सा

दीपक, पाचक.
लशुनादिवटी १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– कोमट पाणी. दिवसांतून ३ वेळां.
सूतशेखर ·।।· ते १ गुंज. अनुपान– आर्द्रकस्वरस व शर्करा. चाटण द्यावें.

वातज लक्षणें

हृत्पार्श्वपीडा, मुखशोष, शीर्ष-नाभीं शूल, कास, स्वरभेद, फेसयुक्त काळसर-पातळ-तुरट कधीं थोडी कधीं पुष्कळ व शूलयुक्त वांती. उद्गारासहित वांती.

वांतिहृद्रस १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– आर्द्रकरस व मध. चाटवणें. दिवसांतून ४ वेळां.
२) लशुनादिवटीच्या गोळ्या तोंडांत वरचेवर चघळून रस गिळणें. दिवसांतून ४ गोळ्या.

पित्तज लक्षणें

तृष्णा, मुखशोष. शिर-तालु-अक्षिदाह, डोळ्यापुढें अंधेरी येणें. चक्कर, मूर्च्छा, ज्वर, हिरवट-कडसर-काळसर उष्ण व दाहयुक्त वांति, सरक्त वांति.

१) लीलाविलासरस १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– दाडिमावलेह किंवा मोरावळा. दिवसांतून ४ वेळां.
२) सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
मौक्तिकभस्म ·।· गुंज
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. मोरावळ्याच्या पाकांत कालवून ठेवून थोडें थोडें चाटवणें. दिवसांतून ३ वेळां.

कफज लक्षणें

आस्यमाधुर्य, प्रसेक, अरुचि, संतोष (तृप्ति) जाड्य, तंद्रा, निद्रा, हृल्लास, रोमहर्ष, तोंडावर सूज, स्निग्ध-घन-मधुर-लवण, पांढरट तंतुयुक्त वांति व अल्पवेदनायुक्त वांति.

१) मयूरपिच्छाभस्म १ ते २ गुंजा मधांतून वरचेवर चाटवणें. दिवसांतून ३-४ वेळां.

२) सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज आल्याचा रस व मधांतून चाटवणें. दिवसांतून ३-४ वेळां.
३) शंखभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. वरचेवर चाटवणें. ३ वेळां.

त्रिदोषज लक्षणें

शूल, अविपाक, अरुचि, दाह, तृष्णा श्वास, मोह, इ. प्रबल व सतत लवण- अम्ल- निळसर- घन- उष्ण- रक्तयुक्त वांति.

१) लीलाविलास १-२ गुंजा
प्रवाळभस्म, १-२ गुंजा
मौक्तिकभस्म ·।· गुंज
१पुडी. मोरावळ्याच्या पाकांतून वरचेवर चाटवणें. दिवसांतून ३ वेळां.
२) वांतिहृद्रस १ ते २ गुंजा १ पुडी. मोरावळ्याच्या पाकांतून वरचेवर चाटवणें. दिवसांतून ३ वेळां.

दौहृदज लक्षणें

गरोदरपणीं होणाऱ्या वांत्या. कांहींमध्यें वातज व कांहींमध्यें पित्तज वांतीची लक्षणें दिसतात.

ताप्यादिलोह १ गुंज. १ पुडी मधांतून चाटवणें किंवा आवळ्याच्या पाकांतून चाटवणें. दिवसांतून ३ वेळांपर्यंत चाटवावी. जास्त चाटवूं नये.

आहार

द्रव आहार द्यावा.
छर्दिचे वेग वारंवार असतील तर द्रव आहारसुद्धां उशीरा द्यावा. उष्ण पेयें देऊं नयेत. नारिकेलोदक किंवा शीत जल थोडें थोडें द्यावें. औषध दिल्याबरोबर कोठलाहि आहार देऊं नये. साळीचें लाह्याचें पाणी थोडें थोडें द्यावें. तें पचल्यावर चुन्याची निवळी घालून दूध द्यावें.

छर्दीवरील सामान्य उपचार

१) लिंबाचें लोणचे तव्यावर कोळसा होईतोंपर्यंत भाजून तो कोळसा २ ते ४ गुंजा मधांतून चाटवणें.

२) वाळलेल्या लिंबाचा कोळसा करून तोहि मधांतून चाटवावा.
दाणे विरहित मक्याच्या कणसाची मषी २ ते ४ गुंज मधांतून चाटवणें.

मूर्च्छा--भ्रम--संन्यास

पूर्वरूपें	चिकित्सा
जांभया, ग्लानि, वस्तूंचें योग्य ज्ञान न होणें, हृत्पीडा. (उरस्थ हृदयाचें ठिकाणीं वेदना) थकवा वाटणें.	सुवर्णसूतशेखर ।।' ते १ गुंज आल्याचा रस व मध किंवा साखर यांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
हृत्पीडा अधिक असल्यास श्वास, नाडी जलद, जीव घाबरा होणें, स्वेद येणें.	लक्ष्मीविलासगुटी ।।' ते १ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध घालून १।१ बोट चाटवणें. या अवस्थेंत सुवर्णसूतशेखर व लक्ष्मीविलासगुटी यांचे आलटून पालटून १०।१० मिनिटांनीं चाटण चालूं ठेवावें.
वातज लक्षणें	
डोळ्यापुढें निळसर, काळसर अरुण छटा दिसतात येतात. अंगमर्द, कंप, हृत्पीडा. मूर्च्छेमधून लवकर शुद्धि येते.	महावातविध्वंस ।' ते ।।' गुंज आल्याच्या रसांत उगाळून साखर घालून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
पित्तज लक्षणें	
डोळ्यापुढें रक्त, हरित, पीत छटा दिसल्यावर मूर्च्छा येते. पिपासा, सन्ताप, रक्त-पीत नेत्र, द्रवमलप्रवृत्ति. घाम येऊन शुद्धिवर येतो.	सुवर्णसूतशेखर १ गुंज सुवर्णमाक्षिक भस्म २ ते ३ गुंजा प्रवाळभस्म ३ ते ४ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– मोरावळा, दूध साखर दिवसांतून ४ वेळां.
कफज लक्षणें	
डोळ्यापुढें काळसर-निळसर छटा व दाट अंधेरी येऊन मूर्च्छा येते	सुवर्णसूतशेखर १ गुंज आल्याचा रस, मावयाचा रस, तुळशीच्या पानाचा रस

व उशिरा शुद्धि येते. ओलें कातडे गुंडाळल्याप्रमाणें वाटतें, प्रसेक, हृल्लास.

यामध्यें उगाळून मध घालून १।१ बोट लवकर लवकर चाटवणें. लवकर शुद्धि येण्यासाठीं चाटवणें.

शुद्धिवर आल्यानंतर

सुवर्णसूतशेखर १ गुंज
वचाचूर्ण २ ते ४ गुंजा
जटामांसीचूर्ण २ ते ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां.

लवकर शुद्धिवर येण्यासाठीं

वचाचूर्ण किंवा श्वासकुठार चूर्ण नाकाला लावणें

सन्निपातज लक्षणें

ही मूर्च्छा बराच वेळ टिकते. घाम येतो. कपड्यामध्यें मलप्रवृत्ति होते. श्वासोच्छ्वास जलद होतो. हातपाय गार पडतात. अंग गार पडते. नाडी क्षीण-जलद.

सुवर्णसूतशेखर व हेमगर्भ यांची निर-निराळी आल्याच्या रसांत उगाळून व मध मिसळून चाटणें करून ठेवावीत. व ती आलटून पालटून चाटवावीत.

दांतखिळी बसली असल्यास

वरील चाटणें हिरड्यांना घासावीत.

रक्तज लक्षणें

रक्ताचे गंधानें किंवा रक्त पाहिल्यावरहि मूर्च्छा येते. नेत्र स्थिर असतात. शरीर ताठ असते. श्वासोच्छ्वास क्षीण होतो.

शुद्धीवर येण्यासाठीं व श्वासोच्छ्वास प्रकृत होण्यासाठीं हेमगर्भ $\frac{1}{8}$ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिसळून १।१ बोट चाटवणें.

शुद्धिवर आल्यावर

ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप मध. दिवसांतून ३ वेळां.

आहार

दही, ताक वर्ज. मदवर्धक वा उत्तेजक द्रव्यें वर्ज. मधुर, शीत, स्निग्ध असा आहार ठेवावा.

भ्रम

लक्षणें

घेरी येणें. चालतांनाहि घेरी येते. पडल्या पडल्याहि येते, उभे राहिले असतां, चालतांना झुकांड्या जातात. दोष-पित्त, वात; दूष्य-रक्त.

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध साखर. दिवसांतून ४ वेळां.

रसाभिनोदनक्षीणताजन्य
(Low Blood Pressure)
यामुळें भ्रम असतांना.

सूक्ष्मसुवर्णभस्म १ ते २ गुंजा
(सुवर्णभस्म $\frac{1}{100}$ ते $\frac{1}{50}$ गुंज)
सुवर्णसूतशेखर ·।।· गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध साखर. दिवसांतून ३ वेळां.

रसभिनोदनवृद्धिजन्य
(High Blood Pressure)

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
ताप्यादिलोह १ ते २ गुंजा
सर्पगंधाचूर्ण $\frac{1}{2}$ गुंज
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी, दूध. दिवसांतून ३ वेळां.

हृद्रोगज

लक्ष्मीविलासगुटी ·।।· गुंज
सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
शृंगभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध साखर. दिवसांतून ४ वेळां.

आहार

दही, ताक वर्ज. मधुर, शीत, स्निग्ध गुणात्मक आहार असावा.

संन्यास

लक्षणें

बोलणें बंद, देहाच्या व मनाच्या क्रिया होत नाहींत. मूर्छेपेक्षां यामध्यें दोष बलवान असतात. मेल्याप्रमाणें किंवा लाकडाप्रमाणें ताठ मूर्च्छा येऊन पडतो.

तीक्ष्ण नस्य व अंजन. अतिशय गार पाणी तोंडावर शिंपडणें. या उपायांनीं शक्यतों लवकर शुद्धीवर आणणें.
नस्य- वचा.
अंजन– कांद्याचे १।२ थेंब.
१) सुवर्णसूतशेखर १ गुंज आल्याचा रस व मध यांत उगाळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
समीरपन्नग ½ गुंज याचे वरील अनुपानांतून चाटण.

वात व्याधि

सन्धिगतवात लक्षणें

सांध्याच्या हालचालीचें वेळीं वेदना, त्याठिकाणीं क्वचित् किंचित् सूज, ती पुष्कळ दिवस राहिल्यास किंवा सूज वाढल्यास त्यामध्यें पाणी सांठतें. संधीच्या हालचाली होतांना कटकट आवाज होतो.

चिकित्सा

१) महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा
प्रतापलंकेश्वर १ ते २ गुंजा
अश्वगंधाघन २ गुंजा
१ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
संधिस्थानीं शोथघ्न लेप. संधिस्थानीं उष्ण, स्निग्ध स्वेद.
२) रास्नापंचक क्वाथ. मडक्यांत काढा करणें. ⅛ उरवणें. प्रत्येक द्रव्य ·॥· तोळा घेऊन ४० तोळे पाणी व तयार काढा ५ तोळे. मंदाग्नि देऊन काढा करावा.
३) नारायणतेल २ ते ४ चमचे सकाळीं व संध्याकाळीं दोन वेळां देणें.

धनुर्वात

दोन प्रकार– १) साधा २) व्रणज गर्भपातज, सूतिकेला होणारा.

१) साधा- लक्षणें

हनुस्तंभ, चेहऱ्यावरचे स्नायु आकुंचन पावून चेहरा ओढल्यासारखा किंवा वानराच्या चेहऱ्यासारखा दिसतो. नंतर हळूंहळूं मानेचे, पाठीचे स्नायूंचे आकुंचन होते व नंतर आक्षेपक येऊं लागतात. व शरीराला बांक येतो. पाठीचा भाग आंत जातो व तो तसाच ताठ राहतो. हा ताठरपणा आकुंचन जास्त होऊन कायम राहतो. हे आक्षेपक कांहीं रोग्यांत

शाकूटकंदरस (अळूचा कंद रस) १ ते २ चमचे. तूप ४ ते ६ चमचे. पाणी ४ तोळे. साखर घालून मिश्रण करून चमचा चमचा रोग्यांस पाजावें.
यानें प्रथम आक्षेपक कमी होऊन नंतर स्नायू ढिले होतात व शेवटी तोंडाचे स्नायु ढिले होऊन हनुस्तंभ सुटतो.
या औषधानें दाह होऊं लागल्यास प्रवाळभस्म २ गुंजा किंवा दूध-तूपयुक्त पेया द्यावी. किंवा मोसंबीरस द्यावा.
या औषधाबरोबर
ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा. १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ४ वेळां.

सौम्य व कांहीं रोग्यांत तीव्र असतात. सौम्य आक्षेपक असलेला रोग साध्य असतो. प्रथम चेहऱ्यावर व नंतर सर्वांगावर घाम येतो. ज्वर १०० ते १०२ पर्यंत असतो. आक्षेपक अधिक तीव्र होऊन स्नायु अधिक ताठ व घट्ट होतात व त्यामुळें अस्थिभंग होतो. छातीच्या स्नायूंचे आकुंचन होऊन तेथें स्तंभ निर्माण होऊन रोग्यांस श्वासोच्छ्वासास त्रास होतो व मरतो. रोगी शेवटपर्यंत शुद्धिवर असतो.

अंगास नारायण तेल लावावें. चोपडावें. चोळूं नये.

व्रणज

आगंतुक व्रणामध्यें व्रण झाल्यापासून २४ तासांत हनुस्तंभ, आक्षेपक लक्षणें सुरू होतात. कांहीं रोग्यांत व्रण झाल्यापासून १० दिवसाचें आंत वरील लक्षणें सुरू होतात. २४ तासांत लक्षणें सुरू झालेला रोग तीव्र असतो म्हणून तो असाध्य असतो. तर १० दिवसांत सुरू झालेला रोग कष्टसाध्य असतो.

वरील चिकित्सा द्यावी. व्रण धावन करून गंधकद्रुतीचा पिचु ठेवावा.

प्रसूतीनंतर वा गर्भपातज

वरील चिकित्सा द्यावी.

यामध्यें लवकर लक्षणें सुरू झालेला तीव्र असतो तर उशिरा सुरू झालेला सौम्य असतो.

दुसरें मत- वा निराळा अनुभव. प्रथम पृष्ठवंशाचे स्नायु, धमन्या व कटी याठिकाणीं संकोच सुरू होतो.

नंतर ४ थें दिवशीं हनुस्तंभ होतो. (पृष्ठवंशस्य स्रावोश्च मन्यामारभ्यमाकटिम् । संकोचारंभ जायेत तत्पूर्वं त्रिदिनात्मकम् ।। दन्तबन्धुश्चतुर्थेन्हि अनुबन्धो दिनत्रयम् । निदानदीपिका वातव्याधि निदान पान १९१

आहार–

द्रवाहार
दूध, मोसंबीरस साखरयुक्त. दूध, तूप साखरयुक्त पेया.

अर्दित लक्षणें–

तोंड कोणत्या तरी एका बाजूस वाकडे होणें. हसतांना तें विशेष दिसून येतें. मानेमध्यें कंप, वाक्संग, स्तब्धनेत्र, आवाज बदलणें, खोल जाणें, ऐकूं कमी येणें, शिंक येत नाहीं, गंधाचें ज्ञान होत नाहीं, स्मृतिभ्रंश, बधिरता येते. (स्पर्श कळत नाहीं.) एक डोळा मिटतो. व एक डोळा उघडा राहतो. जत्रूच्या वर तीव्र रुजा. शरीराचे अर्ध्या भागांत कांहीं रोग्यांत वेदना असतात. शिरःकंप, नेत्राविलता (डोळे गढूळ होतात.) डोळ्यांतून पाणी गळतें.

ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान – दूध. दिवसांतून ३-४ वेळां.
डोकें, मन्या, मुख या भागीं नारायणतेल हळू हळू चोळून जिरविणें.

वातज-अर्दित लक्षणें–

अतिशय लाळ गळणें, कंप, स्फुरण, हनुग्रह, ओठाचें ठिकाणीं सूज व शूल.

ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– आर्द्रकस्वरस साखर. दिवसांतून ४ वेळां.

पित्तज-अर्दित लक्षणें

ओठावर - जिभेवर - मुखावर पिवळसर छटा, ज्वर, तृष्णा, मूर्च्छा

सुवर्णसूतशेखर ·।।· गुंज चाटण. (मूर्च्छा असल्यास) आर्द्रकस्वरसांतून. मूळ अर्दितावरील औषध चालू ठेवणें.

कफज-अर्दित लक्षणें

गंड-शिर-मन्या शोफ व स्तंभ निदानदीपिका-वातव्याधि निदान पान १९२.

पुनर्नवाघन १ ते २ गुंजा
महायोगराजगुग्गुळ २ गुंजा
१ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ४ वेळां.
ताप्यादिलोह चालूं ठेवणें.

आहार

प्रथम ३।४ दिवस द्रवाहार देणें.
अंगाला– वातघ्नतेलाचें नारायण–महानारायण तेलाचें मर्दन करावें.
दूध, चहा, कॉफी. मोसंबीरस, कठिण-रूक्ष-खर आहार वर्ज. अति बोलणें, हासणें, द्विदल वर्ज. मऊ भात, भाकरी, चपाती.

पक्षवध लक्षणें–

डावी किंवा उजवी बाजू शरीराची लुळी पडणें, (हालचाल करता येत नाहीं.) शिरा व स्नायु शोष, सांधे कांहीं रोग्यांत ताठ तर कांहींमध्यें ढिले पडतात. हाताची बोटें ताठ किंवा ढिली पडतात. त्या भागाला स्पर्शज्ञान नसतें. किंवा अल्प स्पर्शज्ञान असतें. कांहीं रोग्यांत शिरा-स्नायु शोष नसतो. पण त्या बाजूची क्रियाहानी असते. परंतु दीर्घ काल रोग टिकल्यास स्नायु शोष होतो.

१) ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध किंवा तूप दिवसांतून ४ वेळां.
२) एकांगवीर ·।· ते १ गुंज. १ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ४ वेळां.
एकांगवीरापेक्षां ताप्यादिचा उपयोग अधिक होतो.
तीव्रावस्था असतांना वातघ्न तेलाचें मर्दन करूं नये. तीव्रावस्था कमी झाल्यावर पक्षवध झालेल्याना मर्दन करावें.

मूर्च्छा–

बऱ्याचशा रोग्यांत मूर्च्छा हे लक्षण प्रथम दिसतें. व त्या मूर्च्छे-मध्येंच पक्षवध झालेला दिसून येतो. या अवस्थेंत कांहीं रोग्यांत गिळण्याची क्रिया मंदावते. मल-मूत्रावरोध असतो. आक्षेप असतात.

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज आल्याचा रस मधांतून चाटण द्यावें. ८।१५ दिवस मूर्च्छित असलेले रोगी या चाटणानें शुद्धीवर आलेले आहेत. यामध्यें आक्षेपक असतांना महावातविध्वंस ·।।· ते १ गुंज आल्याचा रस, माक्याचा रस साखर यांतून चाटण द्यावें. ५।५ मिनिटांनीं चाटवावें.

शुद्धीवर आल्यावर

सुवर्णसूतशेखर १ गुंज
ताप्यादिलोह २ ते ४ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान- दूध. दिवसांतून ३ वेळां.

रसाभिनोदनवृद्धिमुळें पक्षवध उत्पन्न होतो. चिकित्सेच्या दृष्टीनें या लक्षणांचा विचार करणें आवश्यक असते. या रोग्यांत रसाभिनोदनवृद्धि २०० च्या पुढें (Systolic) व (Dystolic) ७० ते ९० असते. कांहीं रोग्यांत दोन्हीही वाढलेले असतात.

या कारणानें मूर्च्छा असली तरीहि सुवर्णसूतशेखराचें चाटण द्यावें.

मधुमेही रोग्यांतहि पक्षवध होतो. त्यावेळीं प्रथम हातापायास मुंग्या येणें, दाह होणें हे असते व नंतर पक्षवध उत्पन्न होतो.

प्रमेहाची चिकित्सा करावी व त्यासोबत ताप्यादिलोह द्यावें.

आहार–

द्विदल धान्यें वर्ज.
भात, भाकरी, चपाती, नेहमीचा आहार, भाज्या देणें

रसाभिनोदनवृद्धिज असेल तर व रोगी स्थूल असल्यास व रोगी बलवान असल्यास.	३ दिवस लंघन द्यावें. केवळ पाणी द्यावें. व नंतर द्रवाहार– दूध, मोसंबी रस सुरू करावा. म्हणजे अपतर्पणजन्य चिकित्सा करावी लागते.
रोगी कृश व रसाभिनोदनवृद्धि असल्यास.	संतर्पणात्मक आहार द्यावा. अशा रोग्यांना तूप देण्यास हरकत नाहीं.
मूर्च्छित अवस्थेंत व नंतर.	दूध, चहा, कॉफी, फळांचा रस.

गृध्रसी

लक्षणें–

स्फिक्, पायु, कटि, पृष्ठ, उरु, जानु, जंघा पद या ठिकाणीं वेदना. यापैकीं कांहीं भागांतील स्नायु ताठ होतात. पायांत मुंग्या येणें, पाय जड होणें. १०-२० पावलें चालल्यानंतर पाय जड होतो, मुंग्या येतात, चालता येत नाहीं. थांबावे लागते. अति तीव्र वेदना हें लक्षण वायूच्या प्रकोपाचें आहे. हा रोगी पडून राहिला असतांनाहि वेदना असतात. पायाच्या मागील बाजूस विशेष वेदना असतात. क्वचित् रोग्यांत पायामध्यें दाहहि असतो. कांहीं रोग्यांत मलावरोध असतो.

महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
प्रतापलंकेश्वर	१ ते २ गुंजा
शिलाजीत	१ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
अश्वगंधाघन	२ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३-४ वेळां.

लेप– जितसाया, चित्रक, पुनर्नवा, बचनाग, काळाबोळ, गुग्गुळ, भल्लातक. ज्या भागांत वेदना जास्त असतील त्या भागांत गरम करून लावणें. त्या भागांत लेपामुळें दाह, कंडू सुरू झाल्यास तो बंद करावा. व नंतर पुनः लावावा.

अति तीव्र वेदना असतांना	वरील मिश्रणांत ताप्यादिलोह १ ते २ गुंजा मिसळून देणें. सहचर तेल २ चमचे जेवणापूर्वी दोन्ही वेळां देणें. वरून नारायणतेल लावून हळू हळू चोळून व गरम पाण्याचे पिशवानें शेकणें.

मलावरोध असल्यास	रात्रीं एरंडस्नेह २ चमचे व २ चमचे मध मिसळून देणें.
आहार–	द्विदल धान्यें सर्व वर्ज. कांदा, शेंगदाणा वर्ज; बटाटा, रताळी, केळी वर्ज. **पथ्यकर आहार**– भात, भाकरी, चपाती, तूप, पालेभाज्या, दोनच वेळां आहार घेणें. सकाळीं १ वेळां दूध देणें. हुलग्याचें पीठाचें कढण-यूष. अमसूल-टोमॅटो-चिंच यांचें सार. ताकाची कढी. (दाळीचें पीठ न लावलेली.) आलें व कढीलिंब घातलेली.

क्रोष्टुकशीर्ष

लक्षणें

गुडघ्याचें ठिकाणीं वायु व रक्त दुष्टीमुळें शोथ निर्माण होतो. तीव्र वेदना असतात. सूज मोठी होते. या विकारांत गुडघ्याच्या आवरणामध्यें जलसंचिती होते व पुढें पूयीभवनहि होण्याचा संभव असतो. गुडघ्याची हालचाल होत नाहीं.

महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
वाकेरी भातें	२ ते ४ गुंजा
अश्वगंधाघन	२ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

लेप– सागरगोटयाचें आंतील मगज एरंडेल तेलामध्यें खलून घट्ट असा गुडघ्यावर लेप करून बांधून ठेवणें. लेप देण्याचे अगोदर नाडीस्वेद द्यावा.

आहार–	साधा ठेवावा. द्विदल वर्ज करावें.

अवबाहुक

लक्षणें–

अंसदेशस्थित वायूचा प्रकोप होतो. यामुळें हाताची हालचाल करतांना वेदना होतात. हात वर उचलतांना किंवा पाठीकडे नेतांना

महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
शिलाजीत	१ ते २ गुंजा
अश्वगंधाघन	२ गुंजा
दशमूलघन	२ गुंजा

त्रास वेदना होतात. हातांस मुंग्या येतात. तो जड होतो. या रोगांत अंसफलकास्थि व बाव्हस्थि यांचे संधिस्थानांत विकृति असते. म्हणून या हाताच्या हालचाली करता येत नाहींत.

१ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
नारायणतेल लावून चोळणें. चोळतांना हाताच्या हालचाली करावयास लावणें. नंतर गरम पाण्याच्या पिशवीने शेकणें किंवा नाडीस्वेद देणें.

आहार–

सर्व द्विदल धान्यें वर्ज. व गृध्रसीमध्यें सांगितलेला आहार द्यावा.

वेपथु-कंप

लक्षणें

सर्वांगामध्यें कंप निर्माण होतो. मान, हात, पाय अशा विशिष्ट अवयवांतहि स्वतंत्रपणें कंप निर्माण होतो. जेव्हां सर्वांगांत कंप असतो तेव्हां रोगी अडखळत बोलतो. चालतांनासुद्धां रोग्याला आपला तोल सांभाळता येत नाहीं. या कंपांतून नंतर हळू हळू कर्मेन्द्रियाची कर्महानी होते. मलावरोध, आनाह हीहि लक्षणें कांहीं कांहीं रोग्यांत दिसतात. हा सर्वांग कंपाचा रोगी असाध्य गणला गेला आहे. तरी पण सौम्य कंप असतांना हा रोगी बरा होण्याची शक्यता असते.

ताप्यादिलोह १ ते २ गुंजा
शृंगभस्म १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३-४ वेळां.
२) रौप्यभस्म ।· ते ।।· गुंज
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप साखर. दिवसांतून २ वेळां.
यामध्यें पंचकर्माच्या चिकित्सेचा कांहींहि उपयोग आढळून येत नाहीं.

आहार–

मधुर, स्निग्ध, उष्ण असा आहार देणें, मधुमेही रोगी असल्यास मधुर रसाचा आहार विचार करून द्यावा.

हस्तकंप

लक्षणें–

लेखनिकांस होणारा हस्तकंप, सतत लेखनाचें काम करणाऱ्या माणसांस निर्माण होतो. यामध्यें हातांत पेन, टांक, पेन्सिल धरून लिहावयास सुरवात केली असतां कंप सुरू होतो. व सरळ लिहितां येत नाहीं. तर्जनी, अंगठा व मनगट येथें दाब देऊन लिहितो. त्यामुळें या तीन ठिकाणीं दुखते.

प्रथम त्या हातानें लिहिणें बंद करावें. व दुसऱ्या हातानें लिहिण्यास सांगावे.
सूक्ष्मसुवर्णभस्म १ ते २ गुंजा
ताप्यादिलोह १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी, अनुपान– दूध साखर, तूपसाखर. दिवसांतून ३ वेळां.
हातांस नारायणतेलानें मालीश-मर्दन करणें. नवीन असल्यास (१ वर्षांचे आंतील) साध्य आहे.

आहार–

द्विदल धान्यें वर्ज. इतर वातप्रत्यनीक आहार ठेवावा.

आक्षेपक

लक्षणें

हा विकार वायूच्या प्रकोपामुळें उत्पन्न होतो. हा स्वतंत्र व परतंत्र असा दोन प्रकारचा आहे. परतंत्र असतांना मूळ व्याधीनुसार त्याची चिकित्सा करावी लागेल. म्हणून येथें त्याचा विचार केलेला नाहीं. स्वतंत्र आक्षेपकामध्यें सामान्यत: पुढील लक्षणें दिसतात. हस्तपादादि अवयवांचें स्थानांतर होत असतें. उदा.– हातपाय एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं फेकला जातो.

महावातविध्वंस ।· ते ।।· गुंज
सूक्ष्मसुवर्णभस्म १ ते २ गुंजा
अभ्रगंधाघन २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध साखर, आल्याचा रस व साखर. दिवसांतून तीन वेळां.

आहार–

द्विदल वर्ज. साधा.

अर्धांगवात

लक्षणें–

यांस पक्षाघात असे म्हटले आहे. (पक्षाघातेऽर्ध देहरुक्। निदान दीपिका पान १९१.) यामध्यें कमरेपासूनचा खालचा भाग कार्यक्षम असत नाहीं. पायाची हालचाल करता येत नाहीं. दोन्ही हातापायाचें ठिकाणीं स्पर्शज्ञान नसतें अगर कमी झालेले असतें. लघ्वी होत नाहीं. लघ्वी मूत्राशयांत तुंबून रहाते. मलावरोध असतो. हा कष्टसाध्य आहे. गर्भिणी, सूतिका, बाल, वृद्ध, क्षीण व अधिक रक्तस्राव होऊन उत्पन्न झाला असल्यास व ज्यामध्यें संवेदनेची जाणीव नसते तो असाध्य समजावा. एकविंशति दिनात् साध्यः। एकवीस दिवसाचे आंत रोगी आल्यास साध्य असतो.	सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज ताप्यादिलोह १ ते २ गुंजा शृंगभस्म १ ते २ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध साखर. दिवसांतून ३ वेळां. प्रथम अभ्यंग वर्ज. बस्ति मूत्रानें भरला असल्यास मूत्रशलाकेन निर्हरण करावे. आनाह-आटोप-मलावरोध असल्यास बस्ति देणें.
मूर्च्छा असल्यास– कांहीं रोग्यांत मूर्च्छा येऊनच अर्धांगवध होतो.	सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज आल्याच्या रसांत उगाळून साखर मिसळून १।१ बोट ५।५ मिनिटांनीं चाटवणें.
रसाभिनोदनवृद्धिजन्य अर्धांगवध	सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज ताप्यादिलोह १ ते २ गुंजा सर्पगंधा ·।।· ते १ गुंज अश्वगंधाघन २ गुंजा दशमूलघन २ गुंजा १ पुडी. अनुपान – पाणी. दिवसांतून ३ वेळां.

आहार–

मूर्च्छित असतांना-	द्रव आहार.
स्थूल असल्यास व रसाभिनोदन जास्त असल्यास	२।३ दिवस मोसंब्याचा रस द्यावा. यानें रसाभिनोदनवृद्धि कमी होते.
शुद्धिवर असल्यास	द्विदल धान्यें वर्ज करून इतर साधा आहार द्यावा.

आमवात

पूर्वरूपें	**चिकित्सा**
अंगमर्द, अरुचि, तृष्णा, आळस, गौरव, ज्वर, अजीर्ण, बलहानी, (अंगात शक्ती नसल्याप्रमाणेंवाटणें) **अग्निमांद्य, हृद्गौरव** (हृदयाचें ठिकाणीं जडपणा) बहुमूत्रता.	लंघन. आमपाचक, वातघ्न. एरंडस्नेह २ ते ४ चहाचे चमचे रोज रात्रीं देणें जास्त विरेचन झाल्यास त्याची मात्रा कमी करणें. स्रोतोविशोधन करणारें तेल असल्यामुळें पुढील अवस्था टळण्यासाठीं एरंडस्नेहाचा प्राथमिक अवस्थेंत चांगला उपयोग होतो. एरंडेल तेल २० तोळे दशमूलारिष्ट ५ तोळे एकत्र करून मिश्रण रोज रात्रीं २ ते ४ चहाचे चमचे देणें. लशुनादिवटी २ ते ४ गुंजा. १ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
लक्षणें–	
हात, पाय, डोकें, घोटा, माकडहाड, गुडघा, मांडी, यांचे सांध्याचे भागीं सूज व वेदना. विंचू चावल्याप्रमाणें वेदना. ज्वर, अग्निमांद्य, प्रसेक, अरूचि, गौरव, उत्साहहानी, दाह, निद्राविपर्यय, मलबद्धता, आनाह, आटोप.एका सांध्यांतील सूज, वेदना कमी होतात व दुसऱ्या सांध्यामध्यें त्या सुरूं होतात. रोग बरा झाला असें वाटतें-दिसतें पण पुनः सुरूं होतो. (त्यावेळीं आम हा लीनावस्थेंमध्यें असतो.) हृद्ग्रह-हृद्पक्ष्मविकृति.	प्रथम लंघन– लक्ष्मीनारायण ·।· ते ·।।· गुंज महायोगराजगुग्गुळ २ गुंजा दशमूलघन २ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां. संधिस्थानीं लेप– लेप नं. १.

तीव्रावस्था असतांना लक्षणें ज्वर १०० ते १०२ संधिशोथ व त्या भागीं तीव्र रूजा, मलावरोध.	
संधिशोथ व वेदना, शिरःशूल. अविपाक.	महायोगराजगुग्गुळ २ गुंजा लशुनादिवटी २ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां. रोज रात्रीं एरंडेल तेल २ चहाचे चमचे. संधिस्थानीं नाडीस्वेद एक वेळ व लेप नं. १ चा दुसऱ्या वेळीं लावणें.
हृद्पक्ष्मविकृति, हृद्ग्रह, हृद्-जाड्य.	१) लक्ष्मीविलासगुटी ·।· ते ·।।· गुंज शृंगभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून २ वेळां. २) मकरध्वज ·।।· गुंज शृंगभस्म २ गुंज १ पुडी. सकाळीं मधांतून चाटवणें. महायोगराजगुग्गुळ २ गुंजा लशुनादिवटी २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान – गरम पाणी. दुपारीं व संध्याकाळीं देणें.
नाडी–	
कांहीं कांहीं रोग्यांत नाडीचें ठोके ५० ते ६० पर्यंत पडतात. ही नाडीची गति स्वाभाविक होणेंसाठीं (७० ते ८० होण्याकरितां)	आमाचें पचन करणें. आर्द्रकस्वरस ४ चहाचे चमचे + मध २ चमचे सकाळीं रिकाम्या पोटीं देणें. आमाचें पचन झाल्यावर नाडीची गति सुधारते.

आहार–	
तीव्रावस्था–	प्रथम लंघन. १ ते ३ दिवस. गरम पेयें– चहा, कॉफी, शुंठीसिद्ध दुग्ध.
ज्वर नाहीं व संधिशोथ वेदना कमी.	द्विदल आहार वर्ज्य. भात, भाकरी, चपाती, अमसूलसार, पालेभाज्या, दूध–भोपळा, कोबी, कॉली फ्लॉवर, ताक, लसणाची चटणी.
चिरकारी आमवात	सूक्ष्मसुवर्णभस्म १ ते २ गुंजा महायोगराजगुग्गुळ २ गुंजा प्रतापलंकेश्वर १ ते २ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां. रात्रीं एरंडस्नेह १ ते २ चमचे.
आहार	ज्वर नसतांना वर सांगितलेला.

वातरक्त

लक्षणें	**चिकित्सा**
अतिशय घाम येतो अगर अजिबात घाम येत नाहीं. लहान लहान संधिस्थानीं बोटांची पर्वें विशेषतः पायाचा अंगठा या स्थानीं शोथ, वेदना, लाली, स्पर्शासहत्त्व, विश्रांती घेतल्यावर किंवा रात्रीं वेदना अधिक, मंद व अनियमित ज्वर. मूत्रप्रवृत्ति गढूळ मधुता. कांहीं दिवस शम पावतो व पुनः तोच संधि किंवा दुसरा संधि, पायाचा अंगठा किंवा बोटें, पाय किंवा हात, घोटा, मनगट किंवा गुडघा या ठिकाणीं शोथ येतो. कानाच्या पाळचा फुगीर दिसतात.	महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा सुवर्णभस्म १/१६ गुंज अश्वगंधाघन २ गुंजा दशमूलघन २ गुंजा १ पुटी. अनुपान– घृत. दिवसांतून ३ वेळां. लेप– लेप गोळी नं. २.
वातप्रधान लक्षणें	
अधिक वेदना, पुढें पुढें बोटांचा स्तंभ-संकोच, पर्वावर काळसरपणा, रूक्षता.	नारायणतेल २ चमचे, दूध २ तोळे व तूप १ तोळा यामध्यें मिसळून सकाळीं व संध्याकाळीं देणें. वर दिलेलें औषध द्यावें.
रक्तप्रधान लक्षणें	
ताम्रवर्ण, कण्डू, स्निग्ध वा रूक्ष यांनीं शमन पावत नाहीं. (उपशय)	गोक्षुरादिगुग्गुळ २ ते ४ गुंजा अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३-४वेळां.

पित्तप्रधान लक्षणें

स्पर्शासहत्त्व, अतिस्वेद. मूर्च्छा, लाल वर्ण.

चंदनबलालाक्षादितेल २ चमचे, दूध २ तोळे व तूप १ तोळा यामध्यें मिसळून सकाळीं व संध्याकाळीं देणें.

गोक्षुरादिगुग्गुळ २ ते ४ गुंजा
सुवर्णभस्म १/१६ गुंज
अश्वगंधाघन २ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३ वेळां.

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज आल्याचा रस व साखर यांतून चाटण.

कफज लक्षणें

स्निग्धत्व, अस्वेद, कण्डू, शीत स्पर्श.

महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा
दशमूलघन २ गुंजा
सुवर्णभस्म १/१६ गुंज
१ पुडी. अनुपान– मध + तूप. दिवसांतून ३ वेळां.

आहार–

भात, भाकरी, चपाती, तुपाची फोडणी दिलेल्या पालेभाज्या, द्विदल वर्ज.

शूल

शूल हा वातपित्त-कफात्मक सांगितला आहे. त्याचा संबंध सर्व महास्रोतसाशींच आहे. त्यामुळें ही जी चिकित्सा केली जाते ती केवळ शूलघ्न नसून दीपन-पाचन, शूलघ्न आणि तत्तत् दोषनाशक आहे.

वातज लक्षणें

हृदय–पार्श्व–पाठ–माकडहाड–मूत्राशय या भागीं शूल. अन्न पचल्यावर, पावसाळ्यांत संध्याकाळीं, शीत कालीं, थंड पदार्थ खाल्ल्यामुळें शूल वाढतो. कधीं थांबतो, कधीं वाढतो. मलावरोध, आध्मान, तोडल्याप्रमाणें व फोडल्याप्रमाणें वेदना.

शेकल्यामुळें, तेल लावण्यामुळें, चोळल्यामुळें, अंजन केल्यामुळें, स्निग्ध व उष्ण गुणात्मक पदार्थ खाल्ल्यानें बरें वाटतें.

अजीर्णजन्य - वातजशूल–

लशुनादिवटी १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– आल्याचा रस, लिंबाचा रस व साखर.
दिवसांतून ३-४ वेळां.
लंघन देणें, गरम पाणी पिणें, गरम पाण्याचे पिशवीनें शेकणें.

विट् - वातस्तंभनज

गरम पाण्याचा बस्ति देणें किंवा स्नेह बस्ति देणें.
नारीकेलत्वक्क्षार १ ते २ गुंजा
(नारळाच्या कवटीचा कोळसा)

१ पुडी. अनुपान – मध. दिवसांतून ३-४ वेळां.
कफज शूलावर सांगितलेली चिकित्सा करावी.

आमज लक्षणें

कफज शूलाप्रमाणें

परिणामशूल

सामान्य लक्षणें

खाल्यानंतर ३ तासांनीं किंवा मध्यरात्रीं शूल सुरू होतो. शूल होण्याचा काल निश्चित असतो. कधीं कधीं वांती झाल्याबरोबर शूल ताबडतोब थांबतो. शूल होत असतांना थोडें दूध घेतलें असतां किंवा अम्ल विरोधी सौम्य क्षारीय द्रव्यें (अल्कली) घेतल्यानें बरें वाटतें. पार्श्व-पृष्ठ-मूत्राशय-उर या ठिकाणीं वेदना होतात. कोष्ठस्थ रक्तस्राव. हें रक्त मलाबरोबर बाहेर जातें. त्यामुळें मळाचा रंग काळसर तांबूस असा होतो. क्वचित् रोग्यांत लहान आंत्राच्या वरच्या भागीं व्रणोत्पत्ति होऊन आंत्रास छिद्र पडतें.

दोषज लक्षणें

वातज लक्षणें

आध्मान, आटोप, मलमूत्रावरोध मानसिक अस्वास्थ्य, स्निग्ध व उष्ण द्रव्यांनीं बरें वाटते. वरोल व्याधीलक्षणें या दोषलक्षणाबरोबर असतात.

प्रवाळपंचामृत	१ ते २ गुंजा
कनकसुंदर	१ गुंज
नारीकेलत्वक्क्षार	२ गुंजा
लशुनादिवटी	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– तूप किंवा दूध. दिवसांतून ३-४ वेळां.

पित्तज लक्षणें

तृष्णा, दाह, (पोटांत) अस्वास्थ्य स्वेद, कटू, अम्ल, लवण रसात्मक द्रव्यांनीं शूल वाढतो व थंड पदार्थांनीं कमी होतो.

प्रवाळपंचामृत	१ ते २ गुंजा
सुवर्णसूतशेखर	·।।· ते १ गुंज
कामदुघा	२ गुंजा
प्रवाळभस्म	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३-४ वेळां.

कफज लक्षणें

छर्दि, हृल्लास, सतत, पुष्कळ दिवस सौम्य शूल, कटू व तिक्त रसात्मक द्रव्यांनीं शूल कमी होतो.

प्रवाळपंचामृत	१ ते २ गुंजा
ताम्रभस्म	१/८ गुंज
कनकसुंदर	१ ते २ गुंजा
वांतीहृद्रस	१ गुंज

१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

२) प्रवाळपंचामृत	१ ते २ गुंजा
सुवर्णसूतशेखर	·।।· ते १ गुंज
कनकसुंदर	१ ते २ गुंजा
अभ्रकभस्म	·।· ते ·।।· गुंज

१ पुडी. अनुपान– तूप व मध. दिवसांतून ३ वेळां.

अन्नद्रवाख्य शूल लक्षणें

याचे दोन प्रकार आढळतात.
१) आशुकारी–तीव्र स्वरूपाचा
२) चिरकारी.

लक्षणें

१) आशुकारी तीव्र स्वरूप–
आहार घेतल्याबरोबर तीव्र स्वरूपाचा शूल सुरू होतो व वांती झाल्यानें थांबतो. वांतीबरोबर रक्त पडतें. आमाशयांत आमाशयाच्या विशिष्ट जागीं व्रण असतो. व्रणाचें जागीं स्पर्शासहत्त्व

सुवर्णसूतशेखर	·।।· ते १ गुंज
मौक्तिक भस्म	·।· ते ·।।· गुंज
मयूरपिच्छाभस्म	१ ते २ गुंजा
प्रवाळपंचामृत	१ ते २ गुंजा

१ पुडी अनुपान– तूप. दिवसांतून ३ वेळां

२) वांतिहृद्रस	१ ते २ गुंजा
कनकसुंदर	१ ते २ गुंजा

असतें. वांती कडू, आंबट, तिखट असतें व पित्तहि पडतें किंवा फेसकट पुष्कळ पाणी पडतें. वांतीबरोबर सर्वच अन्न पडतें असें नाहीं. वांती झाल्याबरोबर शूल कमी होतो. अग्निमांद्य असतें. खाण्यामुळें शूल होतो म्हणून खाण्याचे टाळतो. मलावरोध, पांडुता होते. पोट रिकामे असतांनाहि म्हणजे न खाल्यानेंहि शूल होतो.

१ पुडी अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां.

ओकून ओकून रक्त पडूं लागलें असतां.

ताप्यादिलोह १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां.

चिरकारी लक्षणें

वरचेवर पोटांत दुखते. मधून मधून कांहीं दिवस शूल थांबतो. बरेच दिवसांपासून अपचन असतें. खाल्यावर ·॥· ते २ तासांनीं आमाशयाच्या जागीं शूल होतो. तेथें दाबलें असतां दुखते. जेवणापूर्वीं (म्हणजे अन्न पचल्यावर) शूल थांबलेला असतो. व्रण आमाशयाच्या वरच्या भागांत असल्यास खाल्याबरोबर शूल सुरू होतो. आमाशयाच्या विशिष्ट जागीं शूल व स्पर्शासहत्व असते. अग्निमांद्य (भूक कमीं असणें) असतें. रोगी

प्रवाळपंचामृत १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
मौक्तिकभस्म ·।· ते ·॥· गुंज
कामदुधा १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३-४ वेळां.

घट्ट पदार्थ शूलाच्या भीतीनें खात नाहीं. विश्रांतीनें व हलके पदार्थ खाण्यानें बरें वाटते. प्रसेक, हृल्लास, अन्नद्वेष, वांती असते. शूल थांबावा म्हणून रोगी वांती करतो. सौम्य क्षारीय द्रव्यांनीं शूल थांबतो. वांतींतून सहसा रक्त पडत नाहीं, पडल्यास खूप रक्त पडतें. मलबद्धता असते.

प्रसेक, हृल्लास, अग्निमांद्य असतांना–

सकाळीं उठल्याबरोबर लिंबोटी देणें. लिंबोटी म्हणजे लिंबाच्या दोन फाका करणें. एका फाकेवर मिठाचें चूर्ण व दुसऱ्या फाकेवर शिग येईपर्यंत साखर घालणें. या दोन्हीं फाका शेगडीमध्यें निखाऱ्यावर ठेवणें. लिंबांतील रस खद खद शिजूं लागला म्हणजे या फाका खालीं काढून घेणें व क्रमानें १-१ फोड (फाक) चोखणें. हें अम्ल आहे म्हणून कांहीं लोक घेत नाहींत. पण याचा उपयोग चांगला होत असल्यानें रोग्यांस तें देऊन पहावें.

आनाह, मलावरोध

नारीकेललवणक्षार १ ते २ गुंजा
प्रवाळपंचामृत १ ते २ गुंजा
शिवाक्षारपाचनचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

रक्त पडत असतांना

लाक्षाचूर्ण १ ते २ गुंजा
मौक्तिकभस्म ·।· ते ·॥· गुंज
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
चंद्रकला १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दाडिमावलेह. दिवसांतून ३-४ वेळां किंवा रक्तस्तंभन होईतोपर्यंत द्यावें.

आहार

वातज-अजीर्णजन्य

लंघन प्रथम द्यावें. पाचक, दीपक, लघु आहार. द्रव, उष्ण आहार.
चहा, कॉफी त्रिकटू टाकून देणें. ताक सुंठ वा आलें लावलेलें उकळून देणें. नंतर मऊ भात सुरू करावा.

विड्-वात स्तंभनज

गरम पाण्यांत लिंबाचें सरबत, मनुकाचें सार, टोमॅटोचें सार द्यावें. नंतर लघु आहार सुरू करावा.

उपवासज

लाजामंड साखर घालून द्यावा. नंतर तूप, मीठ घालून पेया व नंतर मऊ भात द्यावा. लघु व थोडा आहार द्यावा व नंतर तो हळू हळू वाढवावा.

पित्तज

फळांचे रस. दाडिम, मोसंबी, लिंबाचें सरबत, द्राक्षें, दूध.

कफज

प्रथम लंघन १-२ दिवस. लंघनकालीं गरम पाणी पिण्यास द्यावें.
चहा, कॉफी, सुंठ वा पिंपळी-सिद्ध दूध.

परिणाम व अन्नद्रवाख्य शूल

या दोहोमध्येंहि केवल दुग्धाहार हाच अत्यंत उपयोगी पडणारा आहार आहे. सतत ४५ दिवस केवल दुग्धाहारावर रोग्यांस ठेवावे. दूध २।२ तासांनीं थोडें थोडें थोडी साखर घालून द्यावें. प्रथम सुरवात अर्ध्या कपापासून करावी व नंतर भुकेप्रमाणें प्रमाण वाढवीत जावें. दूधाचा घोट तोंडांत धरून ठेवावा त्यामुळें लाळ मिसळेल. व दुधाच्या रसाचा आस्वाद घेत घेत गिळावें. ४।५ दिवसानंतर प्रथम ॥ ते १ तोळा साळीच्या लाह्या दुधांत भिजवून थोडी साखर घालून दिवसांतून १ वेळां असें ७ दिवस द्यावें नंतर हळू हळू लाह्यांचें

प्रमाण वाढवावें व दुधाचें प्रमाण कमी करावें.
नंतर जुन्या तांदुळाचा मऊ भात लिंबा एवढा दुधाबरोबर द्यावा. हळू हळू भाताचें प्रमाण वाढवावें व दूध कमी करीत जावें. यानें अनुपशय येत नाहीं. नंतर दूध भाकरी वा दूध पोळी हळू हळू द्यावी. तिखट, तळलेलें पदार्थ देऊं नयेत. भाज्यांना तुपाची फोडणी द्यावी. डालडा वापरूं नये.
कांहीं रुग्णांना दूध जात नाहीं. त्याची शिसारी येतें. मळमळतें. तें घेणें तर आवश्यक असतें. अशावेळीं बलक्षय होऊं नये म्हणून १।२ बिया खजूर व तूप द्यावें.

तीव्र अन्नद्रवाख्य शूल असतांना

दूध बर्फ टाकून थोडें थोडें चमच्यानें घेण्यास सांगावें. नारिकेलोदक किंवा शहाळ्याचें पाणी द्यावें, नंतर हळू हळू दुधाचें प्रमाण वाढवीत जावें. या अवस्थेंत चहा, कॉफी वगैरे गरम पेयें देऊं नयेत. बोर्नव्हिटा, ओव्हलटीन, कॉफी या भोंवती बर्फाचे तुकडे ठेवून ते थंड करून द्यावें. ४ बिया खजूर रात्रीं भिजत ठेवून, सकाळीं कुस्करून, कोळून, गाळून तें पाणी पिण्यास द्यावें.

चिरकारी अन्नद्रवाख्य शूल

दूध वर लिहिल्याप्रमाणें २।२ तासांनीं एका वेळीं जास्तीत जास्त अर्धा कप द्यावें. भूक वाढेल त्या प्रमाणांत दुधाचें प्रमाण वाढवावें. साधारणपणें १॥-२ महिनेपर्यंत दुग्धाहारावर ठेवावें लागते. नंतर साळीच्या लाह्या दुधांत भिजवून द्याव्यात व हळू हळू दुधाचें प्रमाण कमी करावें. अग्नि चांगला प्रज्वलित

झाल्यावर मऊ असा भात सुरू करावा. भात दिल्यानंतर शूल होत नाहीं असे अनुभवास येते. किंवा त्याचा अम्ल विपाकहि होत नाहीं.

मलावरोध–

या अवस्थेंत रोग्यास शौचास होत नसतें अशावेळीं

ग्लिसरीनची पिचकारी १ दिवसाआड देणें किंवा तिळतैल १० तोळे वा चंदनबलालाक्षादि तेल १० तोळे यांचा मात्राबस्ति द्यावा. गोडघा तेलाचा १० तोळघाचा मात्राबस्ति देणें.

टीप–

वर दिलेल्या चिकित्सेनें अनेक रोगी बरें झालें आहेत. चिकित्सेच्या प्रारंभ X Ray घेऊन ठेवलेले होते व १॥-२ महिन्यांनीं पुन: X Ray घेऊन आमाशयस्थ व आंत्रिक व्रण बरें झाल्याचें आढळून आलें आहे. कांहीं रोग्यांचें सुरवातीस १ फोटो, १ महिन्यांनीं २ रा व त्यानंतर २ महिन्यांनीं ३ रा असे फोटो घेऊन व्रण कसा बरा होतो. हेहि पाहिले आहे. अशारीतीनें केवळ उपरुग्ण पद्धतीनें रोगी बरा झाला असा अनुभव आम्ही लिहिला नाहीं.

वरील चिकित्सेंतील महत्त्वाचें कार्य कसें घडते व परिणाम काय होतो याचाहि थोडा खुलासा करणें आवश्यक आहे.

आधुनिक वैद्यकाच्यादृष्टीनें प्रवाळपंचामृत हा कल्प अम्लविरोधी (Anti acid) आहे म्हणून या कल्पाचा उपयोग होतो अशी अवास्तव कल्पना करून घेतली जाते. आधुनिक अम्लविरोधी औषधें अशा रोग्यांस दिली जातात व दुग्धाहारावरहि रोगी ठेवले जातात पण व्रण भरून येत नाहीं. म्हणून अशा रुग्णांना शस्त्रकर्म करण्याचा सल्ला आधुनिक तज्ञ वैद्य देतात. येथें प्रवाळपंचामृताचें कार्य व्रणरोपण करणें व मुळांत उत्पन्न होणारी अधिक अम्लता कमी करणें हें घडतें. हें आधुनिक वैद्यकाच्या दृष्टिकोनांतून म्हणावें लागतें. आयुर्वेदीय दृष्टीकोनांतून या कल्पाचें गुणधर्म निराळे सांगावें लागतील. पण तो विस्तार येथें करीत नाहीं. केवल अनुभविक चिकित्साच येथें लिहिली आहे.

कोष्ठस्थ शूल लक्षणें

वेदना एकदम तीव्र स्वरूपांत सुरू होतात. अस्वस्थता, थंड घाम, वेदनेमुळें शरीर आखडून घेतो. वांती होते. चेहरा निस्तेज, फिक्कट व चिंतातूर. नाडी– जलद व क्षीण. क्वचित् ज्वरोष्मा फार नसतो किंवा प्राकृतपेक्षां कमीहि नसतो. कोष्ठांत स्थानिक लक्षणें कोठलीहि व्यक्त झालेली नसतात. केवल शूल असतो. दाबल्यानें वेदना कमी होतात.

कोमट पाण्याचा बस्ति देणें. लंघन देणें.

चंद्रप्रभा	१ ते २	गुंजा
कनकसुंदर	१ ते २	गुंजा
शंखवटी	१ ते २	गुंजा

१ पुडी. अनुपान– लिंबुरस, साखर. २।२ तासांनीं १।१ पुडी वेदना कमी होईतोंपर्यंत चाटवणें.

आहार

गरम पाणी थोडें थोडें पिण्यास द्यावें. गरम पाण्यात केलेलें लिंबाचें सरबत थोडें द्यावें.

टीप–

हा कोष्ठस्थ शूल उत्पन्न होण्यास कांहीं विकार कारणीभूत आहेत किंवा काय हें बारकाईनें पाहणें आवश्यक आहे.

कोष्ठस्थ कृमी (जंता) मुळेंहि अशारीतीचा शूल उत्पन्न होतो म्हणून कृमिघ्न औषधाची योजना करावी लागते. तसेच अजीर्णामुळेंहि उदरस्थ शूल उत्पन्न होतो. तेथें अजीर्णनाशक व शूलघ्न औषधें द्यावी लागतात. त्याचे चिकित्से-संबंधी विवेचन पूर्वीं केलें आहे. याशिवाय पुढील विकारांतहि अशा प्रकारचा शूल उत्पन्न होतो. त्याचाहि विचार येथें करणें आवश्यक आहे.

कृमिज शूल लक्षणें

कृमींची लक्षणें दिसत असतील तर

संजीवनी गुटी	१ ते २	गुंजा
कनकसुंदर	१ ते २	गुंजा
शंखवटी	१ ते २	गुंजा

१ पुडी. अनुपान– कोमट पाणी. शूल कमी होईतोपर्यंत. २।२ तासांनीं १।१ पुडी देणें.

भल्लातकतैल २ थेंब कॅपशूल मधून देणें.

पित्ताश्मशूल लक्षणें

पित्तवाहक नलिकेमध्यें पित्ताचें खडे बनतात. यामुळें पोटांतील उजव्या बाजूस यकृताचे जवळ वेदना होतात. या वेदना पार्श्वस्थहि होतात. उजव्या खांद्यामध्येंहि वेदना होतात. या अशा वेदना मधून मधून खालीं उजव्या बाजूच्या पोटांतहि होतात. कांहीं कांहीं रोग्यांत पित्तवाहक नलिका बंद झाल्यामुळें कांहीं तासांनीं वा १।२ दिवसांत कामला उत्पन्न होते. वरचे वर हा शूल होत असतो व तो तीव्र किंवा सौम्य स्वरूपाचा असतो. यामुळेंच याचें निदान करण्यास मदत होते. किंवा क्ष किरण घेऊनहि निश्चित निदान करता येतें.

आरोग्यवर्धिनी	१ ते २ गुंजा
शिलाजीत	२ ते ४ गुंजा
शरपुंखाघन	२ ते ४ गुंजा
कनकसुंदर	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

शूल तीव्र असल्यास

चंद्रप्रभा	१ ते २ गुंजा
शंखवटी	१ ते २ गुंजा
कनकसुंदर	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– लिंबाचा रस व साखर. २।२ तासांनीं शूल कमी होईपर्यंत पुड्या द्याव्यात.

पित्ताश्म लहान लहान असल्यास — वरील चिकित्सा.

पित्ताश्म मोठे असल्यास — शस्त्रकर्म करून पित्ताश्म काढून घ्यावेत.

पुनरावृत्ति

पित्ताशय काढून टाकल्यानंतरहि पुनः हा शूल उत्पन्न झालेले रोगी आढळतात. व त्या रोग्यांत कामलाहि उत्पन्न झालेली आढळते. अशावेळीं छर्दि, हिक्का हे उपद्रव उत्पन्न होतात.

वरील चिकित्सा करावी. त्यानें रोगी बरें झाल्याचा अनुभव आला आहे.

आहार

तीव्र शूल, सौम्य शूल व मध्यंतरामध्यें.

द्रवाहार, दूध, चहा, कॉफी, तेलकट स्निग्ध व गुरु आहार वर्ज.

मूत्रशर्कराजन्य

वृक्कामध्यें किंवा गविनीमध्यें अश्मरी असतो. या अश्मरीच्या किंवा शर्करा (बारीक खडें) यांच्या हालचालीमुळें शूल उत्पन्न होतो. या शर्करेच्या हालचालीमुळें वृक्क व गविनीमध्यें दाह, शोथ उत्पन्न होतो. यामुळें या भागांत रक्ताच्या बारीक बारीक गुठळ्या होतात. या शर्करेच्या, अश्मरीच्या किंवा रक्ताच्या गुठळ्याच्या हालचालीमुळें उदर शूल उत्पन्न होतो. पृष्ठ, कुक्षि यांतून शूल खालच्या पोटांत बस्ति व त्याच बाजूच्या वृषणापर्यंत जातो. हा शूल कधीं सौम्य वा कधीं तीव्र स्वरूपाचा असतो. हा एका बाजूच्या वृक्कांत सुरू होऊन दुसऱ्या बाजूच्या वृक्कामध्येंहि भासतो. वृक्कस्थानीं स्पर्शासहत्व व कुक्षिभागीं स्तब्धता असते. मूत्रामध्यें कधीं कधीं रक्तस्राव आढळतो व मूत्रप्रवृत्ति वारंवार, थोडी थोडी व सदाह असते. शूल येण्याचें पूर्वी मूत्रांत रक्त, पूं व मूत्रकृच्छ्राच्या तक्रारीचा इतिहास बहुधा असतो.

मूत्राशयांत अश्मरी येण्यापूर्वींची चिन्हें योगरत्नाकरानें दिली आहेत. ती खालीं देत आहोंत.

मूत्राशयांत अश्मरी येण्यापूर्वी कुक्षि, कटी या ठिकाणीं शूल असतो. व नंतर मूत्रकृच्छ्र दिसून येतें.

(योगरत्नाकर भाग २ रा अश्मरी निदान चिकित्सा.)

या योगरत्नाकराच्या विवेचनावरून असें म्हणतां येतें कीं अश्मरी हा वृक्क, गविनी यामध्येंहि असतो. व त्यामुळें जो शूल उत्पन्न होतो त्याचा विचार विस्तृतपणें प्रत्यक्ष लक्षणावरून वर दिला आहे.

वृक्क, गविनी यामध्यें असणाऱ्या अश्मरीचें निदान, स्वरूप हें X Ray मधून पाहतां येतें.

तीव्र शूल असतांना	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा शंखवटी १ ते २ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान- लिंबूरस व साखर. २।२ तासांनीं शूल कमी होईपर्यंत द्याव्यात.
शूल कमी झाल्यावर अश्मरी लहान असतांना किंवा शर्करा असतांना	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा शिलाजीत २ ते ४ गुंजा यवक्षार २ गुंजा १ पुडी. अनुपान- गोक्षुर फांट. दिवसांतून ३ वेळां या औषधाबरोबरच सागाच्या झाडाची मुळी रोज सकाळीं उगाळून त्याचें गंध १ ते २ चमचे घेणें. यानें लहान लहान खडे किंवा शर्करा हळू हळू झिजून कमी होतात व मूत्राबरोबर पडून जातात.
मोठा अश्मरी असल्यास	शस्त्रकर्म करावें.

डिंबशोथ (Appendicitis)

अपेंडिक्सला आंत्रपुच्छ हा शब्द मराठींत रूढ झाला आहे. वाग्भटानें आंत्रापासून रक्तमांसज असा हा उत्पन्न झालेला आहे असें वर्णन केलें आहे. म्हणून अपेंडिक्स म्हणजे डिंब आहे असें आम्हास वाटतें. म्हणून येथें याचा उल्लेख केला आहे.

अन्तर्विद्रधिमध्यें हा विकार येऊं शकतो. पण याचा उल्लेख अन्तर्विद्रधीच्या प्रकरणांत कोठें सांपडत नाहीं. हल्लीं या विकाराचें प्रमाण अधिक आढळतें. म्हणून तो स्वतंत्रपणें लिहावा असें वाटतें. याचेहि आशुकारी व चिरकारी असे दोन प्रकार पडतात. आशुकारीमध्यें तीव्र शूल असतो म्हणून शूलाचें दृष्टीनें याचा विचार करणें भाग पडतें.

लक्षणें

१) वेदना शूल-एकदम सुरू होतो व प्रथम नाभि, आमाशय या ठिकाणीं व नंतर नाभीच्या उजव्या बाजूस खालीं विशिष्ट ठिकाणीं होतो. २) शूलाबरोबर वांतीहि असते. वांती पुष्कळ दिवस चालूं राहिल्यास रोगाचें असाध्यत्व दर्शवितें. ३) विशिष्ट स्थानीं डिंबस्थानीं स्पर्शासहत्व, त्या भागाचें (कुक्षीचें) स्नायू ताठ होतात. व तो भाग उन्नत वाटतो. ४) स्थानिक शोथ असतो. अंगुली ताडन परीक्षेंत त्या स्थानीं बद्द आवाज येतो. तो स्थानिक आंत्रावरण शोथ व सपूयशोथामुळें येतो. ५) नाडी जलद, सर्पगतिप्रमाणें. ज्वरोष्मा क्वचित् ९९° – १००° च्या वर जातो. नाडी व ज्वरोष्मा यामध्यें असलेल्या संबंधांतील बिघाडामुळें निश्चित निदान करण्यास मदत होतें. सामान्यपणें १००° ज्वरोष्मा असतांना नाडीचे ठोके १०० असतात व पुढें दर १ अंशास १० ठोके याप्रमाणें नाडीची ही स्वाभाविक गति असते. पण या विकारांत ज्वरोष्मा १००° असला तर नाडीचें ठोकें ११० किंवा अधिक असतात. क्वचितच तापाची सुरवात थंडी

वाजून असते. कोथ सुरू झाल्यावर किंवा आंत्रावरण शोथ वाढू लागल्यावर ज्वरोष्मा कमी होतो. व शूल कमी कमी होत जातो. पण नाडी मात्र जलद असते. क्वचितच नाडीची गति कमी होते. ६) जिव्हा बहुतेक नेहमी साम असते. मलावरोध बहुतेक असतो. क्वचित् अतिसार होऊन रोगास सुरवात होते. मूत्रप्रवृत्ति कमी. ७) श्रवण-नलिका-यंत्रास आंतड्यांचा गुडगुड आवाज (आटोप) भासत नाहीं.

तीव्र शूल, छर्दि, ज्वर	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा शंखवटी १ ते २ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा संजीवनीगुटी ॥ ते १ गुंज १ पुडी. अनुपान- लिंबूरस व साखर. २।२ तासांनीं १।१ पुडी. शूल कमी होईपर्यंत देणें. बाह्यलेप-लेपगोळी नं. १ नाभीचे उजव्या बाजूस कुक्षिपर्यंत लेप द्यावा. २) कोमट पाण्याचा बस्ति देणें.
आहार	प्रथम लंघन. नंतर द्रवाहार. चहा, कॉफी, सुंठसिद्ध दूध.
शूल, ज्वर कमी झाल्यानंतर	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा शिलाजीत २ ते ४ गुंजा शंखवटी १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान- लिंबूरस + साखर दिवसांतून ३ वेळां.

आहार	द्रवाहार. १०-१५ दिवस रोग्यांस, चहा, कॉफी, ताक, मोसंबी रस यावर ठेवावे.
अन्तर्शोथ कमी होईपर्यंत	वरील चिकित्सा चालूं ठेवावी.
पच्यमानावस्था	वरील चिकित्सेनें रोग्यांस बरें वाटतें.
वरचेवर शूल	वरील द्रवाहार व औषधें चालूं ठेवावी. रोगी बरा होतो.
शोथाची पक्वावस्था असेल तर	ताबडतोब शस्त्रकर्म करावें.
आहार	शिग्रूचा (शेवग्याच्या शेंगा) उपयोग करावा. विशेषतः ताकामध्यें त्या २।३ तास उकळून खाण्यास द्याव्यात.

उदावर्त

स्वाभाविक उत्पन्न झालेल्या मलमूत्रादि वेगांचें धारण केल्यामुळें वायूच्या गतीला प्रतिबंध होतो. यामुळें जे विकार उत्पन्न होतात त्यास उदावर्त असें म्हणतात.

हल्लीच्या जीवनांत या वेगांचें धारण अधिक प्रमाणांत केलें जातें. यामुळें अनेक प्रकारचे विकार समाजांत उत्पन्न झालेलें आंढळून येतात. ही दृष्टी इतर वैद्यक-पंथांत नसल्यामुळें या विकारांची चिकित्सा आज तरी प्रचारांत नाहीं. म्हणून या रोगाचा विचार करणें भाग पडते.

अधोवाताचा अवरोध केल्यानें खालील विकार उत्पन्न होतात.

वातमलमूत्रावरोध, आध्मान, श्रमाविना थकवा, वेदना, गुल्म, दृष्टीमांद्य, अग्निमांद्य, हृद्रोग,	**चिकित्सा**
आध्मान, शूल, गुल्म, अग्निमांद्य असतांना.	१) पोटावर नारायणतेल चोळणें. २) सकाळीं नारायणतेल कोमट करून २ चमचे पिण्यास देणें. ३) २ ते ४ चमचे तूप कोमट करून त्यांत १ गुंज सैंधव टाकून भोजनाचें पूर्वी देणें. ४) हिंगाष्टक २ मासे + २ चमचे तूप जेवणाचे आरंभी पहिल्या घासाबरोबर देणें.
मलमूत्रावरोध—	स्नेहबस्ति देणें. लशुनादिवटी १ ते २ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी, अनूपान— आलेरस, लिंबूरस व साखर. दिवसांतून ३ वेळां.
दृष्टीमांद्य	रात्रीं त्रिफलाचूर्ण १ ते २ मासे मध व तुपाबरोबर देणें.

हृद्रोग—

या विकारांत आनाह, आध्मान, मलमूत्रावरोध, ही लक्षणें असतात. व यामुळेंहि हृदयविकार वाढत जातो. खरें पाहिलें असतां उदावर्त प्रथम होतो व नंतर हृद्रोग होतो. म्हणून प्रथम उदावर्ताची चिकित्सा करावी लागते.	वरील चिकित्सा करणें.
हृद्विकाराकरितां	हृद्रोगावरील चिकित्सा पहावी.
मलावरोधज उदावर्त— आटोप, शूल, गुदाचें ठिकाणीं कातरल्याप्रमाणें वेदना, मलावरोध वायूची उर्ध्वगति, तोंडाला मलाचा वास येतो किंवा मुखावाटें मल-प्रवृत्ति होते. पिंडिकोद्वेष्टन, प्रतिश्याय, शिरःशूल, हृदयाचें ठिकाणीं जखडल्याप्रमाणें वाटणें, हृद्रोग, गुल्म, दृष्टीमांद्य, श्रमाविना थकवा. वात व मूत्रावरोध.	

टीप— वर मलावरोधज उदावर्ताची लक्षणें दिली आहेत. त्यापैकीं प्रत्यक्षामध्यें ज्या क्रमानें ती आम्हाला अनुभवाला आली तो क्रम खालीं देत आहोंत.

१) प्रतिश्याय, शिरःशूल, पिंडिकोद्वेष्टन, अग्निमांद्य, वात व मलावरोध, क्वचित् मूत्रावरोध.	दीपन, पाचन, अनुलोमन. १) शंखवटी १ ते २ गुंजा शिवाक्षारपाचनचूर्ण ४ गुंजा नारीकेलत्वक्क्षार १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान— गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.

यामुळें मलाचें अनुलोमन न झाल्यास एरंडेल तेल १ ते २ चमचे रात्रीं देणें.

अनुपान– चहा, गरमपाणी किंवा मधामध्यें मिसळून द्यावें. पोटावर नारायण तेल हळू हळू चोळून जिरवावें. व गरम पाण्याचे पिशवीनें शेकावें.

२) कुमारीआसव, अभयारिष्ट, दशमूलारिष्ट प्रत्येकी १ ते २ चमचे यामध्यें १ ते २ गुंजा नवसागर टाकणें, पाणी सर्वांचे दुप्पट घालून जेवणाचें पूर्वी देणें.

३) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
नारीकेलत्वक्‌क्षार १ ते २ गुंजा
लशुनादिवटी १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– गरम दूध. दिवसांतून ३ वेळां.

टीप– हल्लीं समाजांत प्रतिश्यायाचें (पडसें) रोगी अनेक आधुनिक उपचार घेऊन बरें न झालेले दृष्टीस पडतात. प्रतिश्यायाला कारण हा उदावर्त असू शकतो. व त्यास वरील चिकित्सा केली असतां रोग्यांस बरें वाटतें.

आटोप, शूल, परिकर्तिका, आनाह, मलावरोध.

प्रथम स्नेहबस्ति द्यावा.
चंद्रप्रभा १ ते २ गुंजा
शंखवटी १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– गरमपाणी किंवा लिंबाचा रस व साखर. दिवसांतून ३ वेळां.

हृद्रोग, गुल्म,

या मलजन्य उदावर्तामुळें हृद्रोग व गुल्म हे विकार उत्पन्न होतात.

म्हणून प्रथम उदावर्ताची वरील चिकित्सा करावी.

हृद्रोग व गुल्म उत्पन्न झाल्यास

हृद्रोग व गुल्माची चिकित्सा करावी.

मुखावाटे मलप्रवृत्ति हें लक्षण आंत्ररोध खालीं नसतांनाहि केवळ उदावर्तामुळें क्वचित् रोग्यांत आढळून येतें.

अनुलोमन करावें. स्नेहबस्ति द्यावा. द्रवाहार ठेवावा.
अग्नितुंडी १ ते २ गुंजा १ पुडी.
अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

मूत्रनिग्रहज उदावर्त–

सामान्य लक्षणें

बस्ति, वंक्षण, मेढ्र या भागीं शूल. मूत्रकृच्छ्र, शिर:शूल, शरीर फुटल्याप्रमाणें वेदना, आनाह; या शिवाय वात व मलावरोध यामुळें होणारी लक्षणेंहि होतात. अश्मरी.

विशेष लक्षणें–

बस्ति, वंक्षण, मेढ्र या ठिकाणीं वेदना.

चंद्रप्रभा १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
गोक्षुरचूर्ण ४ ते ६ गुंजा
१ पुडी. अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
बस्ति, वंक्षण, मेढ्र या ठिकाणीं तेल लावावें. गरम पाण्याचे पिशवीनें शेकावें.

मूत्रकृच्छ्र असतांना–

या लक्षणाला कारण पौरुषग्रंथीची वाढ हे असते. मूत्रावरोध केल्यामुळें पौरुषग्रंथीची वाढ होऊं शकते.

उन्हाळघाचें औषध १ ते २ गुंजा
चंदनादिवटी १ ते २ गुंजा
गोक्षुर चूर्ण ४ ते ६ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

अश्मरी असतांना–

हा अश्मरी बस्तिमध्यें उत्पन्न होतो, असतो.

अपामार्गक्षार १ ते २ गुंजा
यवक्षार १ ते २ गुंजा
कदलीक्षार १ ते २ गुंजा
पुनर्नवाघन १ ते २ गुंजा
गोक्षुरचूर्ण ४ ते ६ गुंजा

	१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. या चिकित्सेनें लहान लहान असलेले अश्मरी पडतात. वरील चिकित्सेंत गोक्षुर वापरला आहे. तो केवल मूत्रल म्हणून नव्हे तर बस्तीच्या अन्तर्भागीं असलेला शोथ किंवा दोष संचिती नष्ट करून बस्तीचें शोधन करणारा आहे.
छर्दिनिग्रहज उदावर्त– कण्डु, कोठ, अरूचि, वांग, शोथ, पाण्डु, ज्वर, कुष्ठ, विसर्प, हृल्लास, कास, श्वास.	अशा विकारांत वातकफघ्न चिकित्सा करणें.
दोष– छर्दीची संवय असलेले अनेक रोगी आंढळतात. सकाळीं उठल्याबरोबर पित्त डाचतें म्हणून तोंडांत बोटें घालून पित्त पाडण्याची संवय असते, असें वेग उदीरण करतात व असे उत्पन्न होणारे वेग धारण करण्याचा प्रयत्न करतात. यामुळें शीतपित्त, कोठ उदर्द, शिरःशूल, त्वक्गतविकार उत्पन्न झालेले रोगी आंढळून येतात.	
उदर्द, शीतपित्त असल्यास	वातगजांकुश १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.
शिरःशूल असतांना	शंखभस्म १ गुंज लघुसूतशेखर २ गुंजा सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज अश्वगंधाघन २ गुंजा

	१ पुडी. अनुपान– दूध, पाणी. दिवसांतून ४ वेळां.
कण्डू, कुष्ठ (क्षुद्र)	अनंताचूर्ण १ ते २ गुंजा बावचीचूर्ण १ ते २ गुंजा सप्तपर्णाचूर्ण १ ते २ गुंजा गोदंतीभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.
विसर्प	विसर्पाची चिकित्सा करणें.
शुक्रनिग्रहज उदावर्त– शुक्रनिग्रहामुळें आपोआप शुक्राचा स्राव होतो व त्यामुळें मूत्राशय, गुद व वृषण याठिकाणीं शोथ व वेदना, ज्वर, हृदयाचें ठिकाणीं वेदना, मूत्रसंग, शुक्राश्मरी षंढत्व, अंगभंग (आपोआप अस्थि भंग पावतात.)	
आपोआप शुक्रस्राव होत असतां, स्वप्नावस्था अधिक होते.	अश्वगंधाघन १ ते २ गुंजा गुडूचीचूर्ण २ ते ४ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
बस्ति, गुद, वृषण अंतर्शोथ व वेदना बस्तीचें मुखाचें ठिकाणी शुक्र संचितीमुळे स्थानिक शोथ.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ ते ६ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
मूत्रसंग – मूत्राचा अवरोध होणें.	गोक्षुरचूर्ण ४ ते ६ गुंजा चंद्रप्रभा १ ते २ गुंजा उन्हाळघाचें औषध १ ते २ गुंजा

	१ पुडी अनुपान– गोक्षुर फांट. दिवसांतून ३ वेळां.
षंढत्व	मकरध्वज $\frac{1}{2}$ गुंज अश्वगंधाघन २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध साखर, तूप साखर. दिवसांतून २ वेळां. २ वसंतकुसुमाकर $\frac{1}{2}$ गुंज वंगभस्म १ गुंज अश्वगंधाघम २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध साखर. दिवसांतून २ वेळां.

क्षुधानिग्रहज उदावर्त

अरुचि, भ्रम, ग्लानि, शूल, कार्श्य, दृष्टीमांद्य, अंगमर्द, अंगभंग.	लघु, स्निग्ध, उष्ण व अल्प भोजन द्यावें.

क्षुधानिग्रहाची कारणें –

१) अनेक उपवास करणाऱ्या व्यक्ति.
२) धार्मिक - व्रतवैकल्यें.
३) राजकीय अन्न सत्याग्रही

यांत प्रकार –

१) अल्प आहार घेणारे,
२) अनशन करणारे,
३) एक रसाभ्यासी.

१) अल्प आहारामुळें होणारी लक्षणें –

मलावरोध, अग्निमांद्य, दौर्बल्य, कार्श्य, प्रथम दोषांचा प्रकोप. वात प्रकोपामुळें आनाह, आटोप. पित्त प्रकोपामुळें अच्छ पित्त अधिक उत्पन्न होईल. तिक्तास्यता, अम्लीभाव व आहार न मिळाल्यामुळें अग्नि अधिक प्रज्वलित होऊन दोषांचें पचन करूं लागतो व पुढें पुढें दोषक्षीणता **निर्माण होते.**

क्लेदक कफाची उत्पत्ति प्रथम आहाराचें मानानें जास्त असते. त्यामुळें हृल्लास, छर्दि, मुखमाधुर्य, तोंडास चिकटा ही लक्षणें उत्पन्न होतात. व अग्निकडून याचें पचन होऊन नंतर कफक्षीणतेची लक्षणें होतात. रसक्षीणताहि होते.

२) अनशनामुळें होणारी लक्षणें –

धार्मिक कारणानें असो वा राजकीय कारणानें असो अशा लोकांत होणारी लक्षणें.

यांत प्रकार २ (१) पाणी घेणारे २) पाणीहि न घेणारे.

पाणी घेणारे– यामध्यें उत्पन्न होणारी लक्षणें–

प्रथम ३।४ दिवस अधिक क्षुधेशिवाय फारशी लक्षणें उत्पन्न होत नाहींत. पण लंघनामुळें अग्नि अधिक प्रज्वलित झालेला दिसतो. पुढें पुढें कार्श्य, वायूचा प्रकोप, मलावरोध, आनाह, आटोप, शूल, नाडीची गति वाढते, व हळू हळू क्षीण होते. भ्रम, तन्द्रा, लघ्वीचें प्रमाण कमी व रंग रक्त, पीत असा होतो. निद्रानाश, अर्दित, पक्षवध इ. वात विकार होतात.

पाणी न घेणारे– यामध्यें उत्पन्न होणारी लक्षणें –

प्रथम सम्यग् लंघन केल्याची लक्षणें पाणी घेणारे व न घेणारे यामध्यें दिसतात. ती पुढील प्रमाणें – प्रथम पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेन्द्रियें यांना उत्तेजन मिळतें. मल, मूत्र विसर्जन योग्य होते. शरीर हलकें वाटूं लागते. रुचि उत्पन्न होते. भूक, तहान एकाच वेळीं लागतात. शुद्ध, चांगले ढेंकर येतात. घसा स्वच्छ होतो. हृदय उत्तम कार्य करूं लागतें. नाडीची गति (ठोके) स्वाभाविक असते. (७०।८०) उत्साह वाढतो. ग्लानि असत नाहीं. या नंतरहि उपवास चालू ठेवल्यास अतिक्षुधा, थकवा वाटणें, अतितृष्णा, मुखशोष, आटोप, आनाह, मलावरोध, शिरःशूल, मूत्राल्पता, मूत्र रक्त, पीत वर्णात्मक, शूल, ग्लानि, भ्रम, छर्दि, बस्ति हृदय - त्रिक इ. ठिकाणीं शूल, पर्व-अस्थिभेदन, अग्निमांद्य, निद्रा-दृष्टि-कर्ण-शुक्र-ओज-क्षुधा-स्नेह यांचा क्षय, नाडीची गति वाढते. हृदयदौर्बल्य, ज्वर, प्रलाप, मूर्च्छा.

टीप– क्षुधा निग्रह करणारे लोक किती प्रकारचे आहेत तें वर दाखविले आहे. धार्मिक प्रवृत्तीनें क्षुधा-निग्रह करणाऱ्या ज्या व्यक्ति आहेत; त्या विशिष्ट कालपर्यंत आहार घेणार नाहींत. त्यामुळें ते वैद्याकडे उपचारार्थ येतीलच असें नाहीं. तरी पण वैद्यांना या लोकांना पाहण्यासाठीं बोलाविले जाते. वैद्यांना या गोष्टीचें ज्ञान व्हावें म्हणून लक्षणांचा वर विस्तार केला आहे.

धार्मिक उपवासाचा काल संपल्यानंतर उपचार करून घेण्यासाठीं असे लोक येतात. त्यावेळीं त्यांच्या अवस्थानुसार आहार आणि औषध कोणते द्यावें हें समजण्यासाठीं ही चिकित्सा लिहिली आहे.

तसेंच राजकीय उपवास करणाऱ्या व्यक्ति तडजोडीमुळें मध्येंच उपवास बंद करतात. त्यावेळीं जी लक्षणें असतील त्यास अनुसरून चिकित्सा करतां येणें आवश्यक असल्यानें हा एकंदर क्षुधा निग्रहाचा विचार केला आहे.

पाणी घेणारे व न घेणारे यामध्यें उत्पन्न होणारी लक्षणें

अतिक्षुधा, थकवा वाटणें, अतितृष्णा, मुखशोष असतांना.	साळीच्या लाह्याचें पाणी. यामध्यें साखर घालून थोडें थोडें कोमट करून देणें. सामान्यतः हा आहार ३ दिवस द्यावा व नंतर भाताची पेज तूप, सैंधव घालून द्यावी. नारिकेलोदक, मुद्गयूष, व नंतर पेया, विलेपी या क्रमानें नित्याहारावर आणावे.
आटोप, आनाह, मलावरोध, शिरःशूल, रक्त–पीत–अल्प-मूत्रता, शूल	शुंठीसिद्ध लाजामंड, शुंठीचा तुकडा टाकून मंड तयार करावा. नंतर तुकडा काढून टाकून त्यामध्यें किंचित सैंधव व तूप टाकून थोडा थोडा कोमट करून मंड दिवसांतून ५ तोळेपर्यंत द्यावा. नारिकेलोदक द्यावें, गोक्षुरफांट दूध व साखर घालून द्यावा. स्नेहबस्ति देणें.

छर्दि, हृल्लास, भ्रम,	सुवर्णसूतशेखर ।· ते ।।· गुंज २ चमचे मधांत उमाळून वरचेवर चाटवणें व छर्दि बंद झाल्यावर लाजामंडादि क्रम अनुसरावा.
बस्ति, हृदय, त्रिक इ. ठिकाणीं शूल व इंद्रियदौर्बल्य, निद्रानाश, पर्वास्थिभेदन	अभ्यंग – बदामाचें तेल हळू हळू सर्वांगाला जिरविणें किंवा चंदनबलालाक्षादितैल वापरावें. त्यानंतर लाजामंडादि क्रम अनुसरावा.
शुक्र-ओज-स्नेह ह्यांचा क्षय, हृदयदौर्बल्य, नाडीची गती वाढणें.	लक्ष्मीविलासगुटी $\frac{१}{४}$ ते $\frac{१}{२}$ गुंज १ पुडी. अनुपान– $\frac{१}{२}$ ते १ चमचा तूप, व १ ते २ चमचे मध मिसळून दिवसांतून ३ ते ४ वेळां देणें. त्यानंतर लाजामंडादि क्रमानें आहार द्यावा.
ज्वर – प्रलाप – मूर्च्छा	सुवर्णसूतशेखर $\frac{१}{४}$ ते $\frac{१}{२}$ गुंज मधांतून चाटविणें. लाजामंडादि क्रमानें आहार द्यावा.

हृद्रोग

हृदय हें मांस धातूचें बनलेलें आहे. रक्त व कफ यांच्यापासून जरी त्याची उत्पत्ति सांगितली असली तरी प्रत्यक्ष त्याची जी आकृति उत्पन्न झाली आहे ती मांसमय आहे असें आयुर्वेदाचें म्हणणें आहे.

हें मांसपेशीमय हृदय म्हणजे रसरक्ताचें वहन करणारें यंत्र आहे. व त्यांतून वाहणाऱ्या रसाचें जें वहन होत असतें तें या विशिष्ट यंत्राच्या रचनेमुळें होते. रस हा आप महाभूताच्या आधिक्यानें तयार झालेला असतो. आप महाभूत हें अधोगामी जाणारे आहे. या मांसपेशीमय यंत्रामुळें या रसाचें उर्ध्व, अध आणि तिर्यग् गमन होत असतें. या गमनाला गति देणारा वायू हा प्रमुख आहे. या वायूच्या नोदन, पीडन आणि अभिघात या कर्मामुळें रसाचें सर्व शरीरभर वहन होत असतें.

या रसाकडून प्रीणन हें कार्य घडतें. व उत्तरोत्तर धातूंची उत्पत्ति तत्तत् स्रोतसांत होते.

या हृदयरूपी यंत्राच्या एकंदर विशिष्ट रचनेचें ज्ञान असणें आवश्यक आहे, व या यंत्रांत कोठें, कशी विकृति निर्माण झाली, हेहि वैद्यांना कळणें आवश्यक आहे. या यंत्रामध्यें कोठें, कशी विकृति निर्माण झाली, व ती विकृति कशी नष्ट करतां येईल हें पाहणें आवश्यक वाटल्यावरून आम्ही एकंदर हृदयामध्यें प्रत्यक्ष दिसणारी विकृति जमेस धरून या विकृतीचें वर्णन केलें आहे.

कदाचित् कांहीं लोकांना हें अनायुर्वेदीय आहे असें वाटेल म्हणून आपण नेत्रविकाराचा विचार करूं.

आयुर्वेदानें नेत्रविकाराचा विचार त्यांतील अत्यंत सूक्ष्म अशा पटलापासून केला आहे व तेथें दोषाकडून कशी विकृति उत्पन्न होते हेहि सांगितले आहे व त्याची स्वतंत्र चिकित्साहि लिहिली आहे.

याचप्रमाणें हृदय विकाराचा विचार पूर्वींच करावयास पाहिजे होता. कदाचित पूर्वींच्या लोकांनीं विचार केलाहि असेल, पण तो आज आम्हास उपलब्ध नाहीं असें म्हटलें असता, तें म्हणणें अस्थानीं होणार नाहीं. या वरील विचारास अनुसरून या ग्रंथांत हृद्रोगाची कारणें, आयुर्वेदीयदृष्टया उत्पन्न होणारी संप्राप्ति व चिकित्सा थोडक्यांत मांडीत आहे.

हृत्पटल विकृति, हृद् विस्तार त्यापासून उत्पन्न होणारे विकार व त्यांची लक्षणें प्राचीन ग्रंथांतील देत आहोंत.

हृदये मानसोद्वेगव्यायामाधिक्यरोहणैः । श्वासरोधस्तोदभेदौ पंडुत्वस्वेदसंभवः ॥१॥ रक्ताभिसरणं वेगात् सर्वकर्मस्वशक्तता । धावने गमने चापि मूत्रकृच्छ्रादिकान्बहून् ॥२॥ प्लीहाभिवृद्धिवत्वृद्धिस्तथा तस्याऽपि कुंचनम् । तस्मिन्क्षैण्यं तथाभूते मज्जवृद्धौ भ्रमस्तमः ॥३॥ अशक्तिर्मूर्च्छनं चापि कंचित्कालं प्रवर्तते । सशोथे (हृदये) घर्षणं चांतः सशोथं संधिवेदनम् ॥४॥ निष्ठीवनश्रमानिद्राकासश्वासादिमूर्च्छनम् । शिरोरुक् ज्वरघर्मौ च गात्रस्तंभोऽरतिस्तथा ॥५॥ रक्तनिष्ठीवनं श्वासः श्रमेऽल्पेऽपि प्रजायते । यकृद्बस्तिगताः शोथा मूत्राल्पश्रवणस्वनाः ॥६॥ हस्तपादादिशोथं च तथा विद्रधिसंभवाः ॥ कंठरोधकफश्वासाः रुजः पृष्ठोरसोस्तथा ॥७॥ अभ्यन्तरे तत्स्थपक्षनेत्रपक्ष्मपरिग्रहः । यथादोषं यथालक्ष्णं तथा चिन्हं च कारयेत् ॥८॥ तोददाहादितंद्रादीन्कारयेत् क्रमदूषिते ॥ (निदानदीपिका रक्ताशयव्याधिनिदानम्—पान १११, ११२ वैद्य व्यं. कृ. करंदीकर).

यामध्यें मूलतः कारण असलेला विकार म्हणजे आमवात हा आहे. रसस्थ आमामुळेंच ही हृदयाची विकृति झालेली आढळते. त्याचप्रमाणें उदावर्तासारख्या विकारामुळें हृद्रोग उत्पन्न होतो असें आयुर्वेदाचें म्हणणें आहे. उदावर्त व हृद्रोग यांचा संबंध आजहि आढळून येतो.

अनेक हृद्रोग झालेल्या माणसामध्यें उदावर्त असल्याचें दिसून येतें. मग तो पटलविकार असो, हृत्शूल असो, रोहिणी उपचय असो

किंवा रोहिणीमध्यें उत्पन्न होणाऱ्या ग्रंथि असो, या सर्व हृद्रोगाला मूळ कारण आम आणि वायू ही दोन महत्त्वाची कारणें आहेत. या कारणास अनुसरून चिकित्सा करणें आवश्यक आहे. व जी पुढें लिहिली जाणारी चिकित्सा आहे, ती सर्व चिकित्सा केलेली व अनुभवलेली आहे. जेथें या चिकित्सेचा उपयोग होत नाहीं, तेथें रसायन चिकित्सेचा अवलंब करून रोग्याचें जीवित दीर्घकाल कसें ठेवतां येईल हें पाहिलें आहे.

आजहि हृद्रोग विकारावर हमखास बरी करणारी चिकित्सा अस्तित्वांत नाहीं. जी चिकित्सा केली जाते ती केवळ रोग्यास जास्त काल कसें जगवितां येईल याच दृष्टीकोनांतून केली जाते.

आयुर्वेदीय चिकित्सेनेंहि हें कार्य सहज करतां येतें. म्हणून त्या चिकित्सेचा अवलंब येथें केला आहे.

हृद्रोग हा विकार उरस्थ हृदयास अनुसरून लिहित आहोंत. हृद् विकार हा फार मोठ्या प्रमाणांत आंढळून येतो. म्हणून त्याची मीमांसा विस्तृत करणें आवश्यक आहे.

हल्लीं दिसून येणाऱ्या हृद्विकाराचें वर्णन करणें आवश्यक वाटत असल्यामुळें त्याचें निदान आयुर्वेदीय दृष्टीकोनांतून शक्यतों मांडण्याचा प्रयत्न केला आहे. व या निदानास अनुसरून आयुर्वेदीय चिकित्सेचा जो अनुभव आला आहे तो वाचकांच्या पुढें ठेवीत आहोंत.

हृदयाचें वर्णन किंवा त्याच्या कार्याचें वर्णन येथें फारसे केलें जाणार नाहीं. तरी पण दोषांच्या दृष्टीकोनांतून हृदयाच्या कार्याची माहिती अल्पशी कां होईना देणें भाग आहे. त्याशिवाय दोषप्रत्यनीक चिकित्सेचें महत्त्व कळणार नाहीं. जेथें दोषप्रत्यनीक चिकित्सेचा उपयोग होत नाहीं तेथें व्याधिप्रत्यनीक चिकित्सेचा अवलंब करून रोगाचा उपशम कसा होतो याचें विवेचनहि करणार आहोंत.

हृदय शब्दाची व्युत्पत्ति

हृदय शब्द हा दोन धातूपासून बनला आहे. १) हृ –हरण करणें. घेणें. २) दा – देणें. यावरून ज्या अवयवाचें कार्य घेणें व देणें सतत चालू आहे, व ज्याच्यामुळें शरीराचा जीवन व्यापार योग्यरीतीनें चालविला जातो असा जो अवयव त्यास हृदय असें म्हटलें आहे.

आदान व प्रदान करणारी अवयवें शरीरांत दोनच महत्त्वाची आहेत. एक उरस्थ हृदय व दुसरें शिरस्थ हृदय.

आपणांस येथें उरस्थ हृदयाचा विचार करावयाचा आहे. चरकाच्या सूत्रस्थानांतील ३० व्या अध्यायांत हृदयाचें वर्णन केलें आहे. तेथेंच आत्मा, मन, प्राणवायु, बुद्धि यांचें वास्तव्य असतें. व हें हृदय द्व्यंगुल सांगितलें आहे. या हृद् विकारांचा विचार येथें करीत नाहीं. तर जें उरस्थ हृदय आहे व ज्यांतून रसाचें वहन होतें त्याच हृदयाच्या विकारांचें विवेचन या प्रकरणांत केलें जाणार आहे. हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें.

हृदय आणि त्रिदोष

आयुर्वेदामध्यें हृदयाच्या रचनेचें वर्णन आढळत नाहीं. तें प्रत्यक्ष शवविच्छेदनांत दिसणाऱ्या हृदयाचें चित्र या रोग-निदानासाठीं घेणें आवश्यक आहे. व त्यांतील विशिष्ट भागांत उत्पन्न होणाऱ्या विकारांचा नामनिर्देशहि केला जावा असें वाटतें. हृदयाच्या विशिष्ट भागांत उत्पन्न होणाऱ्या रोगाची मीमांसा त्रिदोषांच्या विचारसरणींतून करावी लागेल. आयुर्वेदानें उरस्थ हृद्विकाराचें वर्णन दोषांच्या दृष्टिकोनांतून केलेलें दिसतें. तें सामान्य असून हृदयाच्या स्थानीं विशिष्ट विकार उत्पन्न झाला आहे, याचें ज्ञान होत नाहीं. म्हणून हृदयाच्या रचनेनुसार त्या त्या भागांत उत्पन्न होणाऱ्या विकारांचें स्वतंत्र वर्णन व त्याची स्वतंत्र चिकित्सा देण्याचा प्रयत्न करीत आहोंत. असा हा प्रयत्न कोणी केला आहे असें आढळून येत नाहीं. हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें यांत

कदाचित् दोष असण्याचा संभव आहे. तो नष्ट करण्यास इतर विद्वानांनीं हातभार लावावा.

हृदय हें प्राणवह स्रोतसाचें मूल आहे, तसेंच रसवह स्रोतसाचेंहि मूल असल्याचा उल्लेख सांपडतो. याची उत्पत्ति रक्त व कफ यांच्या सारभागापासून झाली आहे. तरी पण हें मांस धातूचें बनलेलें आहे असें म्हणता येईल. हृदय हें प्राणवह व रसवह स्रोतसाचें मूल असल्यामुळें यांतून रसाचें व प्राणवायूचें वहन होत असतें. म्हणून येथें उत्पन्न होणाऱ्या विकारांचा संबंध प्राणाशीं, रसाशीं असतो. त्याचप्रमाणें याचें मूलघटक रक्त आणि कफ हे असल्यामुळें यांत दोषांकडून कोणता बदल होतो याचाहि विचार करावा लागेल. येथें हृदयाच्या रचनेचें सामान्य ज्ञान वैद्यास असणें आवश्यक आहे. त्याचा येथें विस्तार न करता हें ज्ञान त्यांना आहे असें गृहीत धरून हृदयाच्या रोगाची लक्षणें व चिकित्सा देत आहोंत.

हृदावरणशोथ

हृदयाच्या वर असलेल्या आवरणामध्यें सदाह शोथ उत्पन्न होतो. हा शोथ विशेषतः प्रधान असत नाहीं. इतर व्याधीमध्यें उत्पन्न होणारा उपद्रवात्मक रोग आहे. तें व्याधी पुढील प्रमाणें आहेत– आमवात, साथीचें ज्वर, फुप्फुसाचें विकार, पार्श्वशूल (फुप्फुसावरण सदाहशोथ) राजयक्ष्मा, अर्बुद, वृक्क विकार, वातरक्त व साक्षात् प्रधान कारण– छातीवर झालेला आघात, हृदयस्थ धमनी (रोहिणी) चा रोध झाल्यामुळें हृद् स्नायूची भेदावस्था, हृदयस्थ रोहिणी विकार.

लक्षणें –

चेहरा चिंताग्रस्त, त्रासलेला व टापसलेला. फिक्कट पण शोथ नाहीं. ज्वर, नाडी व श्वसन जलद, छातीच्या डाव्या बाजूस वेदना त्या पोटाकडे जातात, वेदना हालचाल, श्वसन व दाबामुळें वाढतात, कास.

बाह्य चिन्हें –

शुष्कसदाहशोथ असल्यास घर्षण ध्वनि स्पर्शनानें व नलिका श्रवणानें प्रतीत होतो. हा हृदयाचें आकुंचन व शैथिल्य या कालांत असतो. हा घर्षणध्वनि हृदयाच्या पहिल्या व दुसऱ्या ध्वनीच्यामध्यें असतो. क्वचित् या ध्वनिबरोबरहि असतो. श्रवण– नलिका दाबली असतां आवाज वाढतो, मोठा येतो. महाधमनीचें मूलस्थानीं ध्वनि जोरांत ऐकूं येतो, श्वास घेणें बंद केल्यावरहि हा घर्षणध्वनि ऐकूं येतो. फुप्फुसावरण दाहामध्यें तो श्वासाबरोबर येतो. सजलावस्थेमध्यें हा घर्षणध्वनि अस्पष्ट ऐकूं येतो. क्वचितच संपूर्णपणें नाहींसा होतो. सजलावस्था संपल्यावर घर्षणध्वनि पुनः जोरांत ऐकूं येतो.

हृद्रोगाची आयुर्वेदीय संप्राप्ति –

वरील सर्व लक्षणें व चिन्हें ही विशिष्ट दृष्टीकोनांतून व प्रत्यक्षास अनुसरून दिली आहेत. हा व्याधी उत्पन्न होण्याच्या मूळ कारणामध्यें अनेक रोगांचा अंतर्भाव केलेला असला तरीहि त्याशिवाय खरें रोगाचें कारण आयुर्वेदानें सांगितलेला आम हा आहे, किंवा उदावर्त हा विकार आहे. हे विकार किंवा श्वास, क्षय इ. रोगामध्येंहि हृद्विकार उत्पन्न होतात. याचप्रमाणें आमवातामध्यें आमामुळें हृद्विकार उत्पन्न होतो. आमवात या विकारामुळें नव्हे. म्हणून या विकारांत आमाचें पचन करणारी चिकित्सा करणें आवश्यक आहे.

अधोवात, मलावरोध, मूत्रावरोध, उद्गार, तृष्णा, कास, श्वास, अश्रु, शुक्र, यांच्या अवरोधामुळें एकंदर आधुनिक वैद्यकांत विवेचन केलेलें हृद्रोग उत्पन्न होतात. म्हणून केवल हृद्रोगाच्या स्थानिक वा सार्वदेहिक लक्षणांस अनुसरून चिकित्सा केली असतां हृद्रोग बरा होत नाहीं किंवा विकृत झालेलें हृदय काढून दुसरें हृदय बसविलें तरीहि तो रोगी निरोगी होऊं शकत नाहीं. म्हणून वर दिलेल्या एकंदर कारणांचा विचार करून ती कारणें कशी नष्ट करतां येतील याचा विचार चिकित्सकाला करणें आवश्यक आहे. वेगावरोधामुळें हें विकार उत्पन्न होत असल्यामुळें वायूचा प्रकोप, हें प्रमुख कारण आहे. हा प्रकुपित वायू, रस व आम यांचेसह हृदयस्थानीं जाऊन तो स्थान वैगुण्य निर्माण करतो. हृदय हें रक्त व कफ या दोन धातूनीं उत्पन्न झालेलें आहे. या दोहोंची दुष्टी म्हणजे संमूर्च्छना होऊन हृद्रोग उत्पन्न होतात. याचें समीकरण पुढीलप्रमाणें मांडता येतें. आम + वायु + रसधातु + रक्त + कफ = हृद्रोग.

या नंतर हृदावरणशोथाची थोडक्यांत संप्राप्ति खालीलप्रमाणें मांडली आहे.

हा व्याधि अनेक रोगांत उपद्रवात्मक म्हणून उत्पन्न होत असला तरीहि त्याचा स्वतंत्रपणें विचार करावा लागतो. हा उपद्रवात्मक व्याधि असला तरीहि तो मर्मस्थ असल्यामुळें प्राणनाश केव्हां करील त्याचा भरवंसा नाहीं. म्हणून त्याची स्वतंत्रपणें प्रथम चिकित्सा करावी लागते. सांसर्गिक ज्वरामुळें किंवा आमवातामुळें हा विकार उत्पन्न होतो असें जें वर म्हटलें आहे, तें आयुर्वेदीयदृष्टया ज्वरांतील आमामुळें किंवा आमवातांतील आमामुळें हा हृदावरणशोथ उत्पन्न होतो. व या संप्राप्तींत वायु व आम ही दोनच प्रमुख आहेत. म्हणून शूल हा अधिक तीव्र असतो. व आवरणामध्यें जो शोथ निर्माण होतो, त्या शोथांत पाक क्रिया उत्पन्न होऊन जलसंचिती व पूयीभवन होत असतें. यांतील पाकावस्थेमध्यें जेव्हां पित्ताचें आधिक्य होतें तेव्हां हळू हळू जल संचिती होतें व कफाचें आधिक्य होतें तेव्हां पूयीभवन होतें. याप्रमाणें या हृदावरणशोथाची संप्राप्ति संक्षिप्तपणें मांडली आहे. या नंतर या संप्राप्तिनुसार आयुर्वेदीय चिकित्सेचा विचार करूं.

चिकित्सेच्यादृष्टीनें हृदावरणशोथाच्या ३ अवस्था पुढीलप्रमाणें आहेत. १) आमावस्था २) पच्यमानावस्था ३) पक्वावस्था. या अवस्थानुसार दोषांची व व्याधीची लक्षणें पाहून चिकित्सा करावी लागते.

हृदावरणशोथ

आमावस्था लक्षणें

हा शोथ अन्तस्थ असल्यामुळें मन्दोष्मता, स्थानिक सवर्णता, ही प्रत्यक्ष पाहतां येत नाहींत. हृदयस्थ मन्दवेदना, अल्पशोफता, मन्द ज्वर ही लक्षणें आढळून येतील. नाडी व श्वसन जलद, चेहरा टापसलेला, फिक्कट व त्रासलेला, कास, हृदयस्थ स्पर्शासहत्व.

ज्वरधूमकेतु १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ ते ४ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
लेप – हृदयाचें ठिकाणीं लेप नं १ दिवसांतून २ वेळां गरम करून लावणें.

नाडी व श्वसन जलद –

नाडीचा वेग १ मिनीटांस ज्वराचें मानानें अधिक असेल तर, (ज्वर १०० व नाडीचा वेग १२० ते १४०) त्यामुळें श्वसनाचाहि वेग वाढलेला असतो.

लक्ष्मीविलासगुटी ।· ते ।।· गुंज
शृंगभस्म २ ते ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून २ ते ३ वेळां वरील औषधाबरोबर देणें.

हृदावरणशोथ पच्यमानावस्था लक्षणें

शोथ कमी होतो. किंवा पाकावस्था वाढून तेथें द्रव संचिति होऊं लागते. वेदना, व स्पर्शासहत्व कमी होतें. त्यामध्यें असलेला द्रव १०० ते १५० मि. ली. पेक्षां जास्त नसतो. जेव्हां द्रव वाढतो

गंधकद्रुति १ ते २ थेंब दुधांतून किंवा साखरेवर टाकून देणें. दिवसांतून ३ वेळां. हीरकभस्म १/१० गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं १ पुडी देणें. यानें द्रवाचें शोषण होतें. व हृदयांस बल मिळतें.

तेव्हां घर्षणध्वनि श्रवणनलिकेनें अस्पष्ट ऐकूं येतात. हृदयाचें मूल स्थानीं (Base) घर्षणध्वनि स्पष्ट ऐकूं येतो. श्वसन व नाडी वाढलेली असते, खोकला त्रासदायक असतो, क्वचित् गिळण्यास त्रास होतो व वांति होते. मानेंतील नीला फुगीर दिसतात. निश्वासाचें वेळीं नाडी क्षीण असते. इतर कारणांनीं होणाऱ्या हृदयविस्तारांपेक्षां हृदयांतील आवरणामध्ये वाढलेल्या द्रवामुळें बद्द आवाज अधिक व्यापकस्थानीं येतो. गात्रनीलिमा, रसाभिनोदन कमी होतें.

पाणी अधिक असल्यास	तें काढण्यासाठीं शल्यचिकित्सकाकडे पाठविणें.
श्वास, रसाभिनोदन कमी, हातापायास मुंग्या, गारवा येतो, नाडी क्षीण. चेहरा काळा - निळा पडतो.	महालक्ष्मीविलास ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मधांतून वरचेवर चाटवणें किंवा हेमगर्भ १/८ ते १/४ गुंज आल्याचा रस व मधांतून वरचेवर चाटवणें.
ज्वर वेगतीव्र असल्यास	लक्ष्मीनारायण ·।· ते ·।।· गुंज शृंगभस्म १ ते ३ गुंजा प्रवाळ भस्म १ ते ३ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान – मध. दिवसांतून ३-४ वेळां.
मलावरोध असल्यास	मात्राबस्ति देणें.

हृदावरणशोथ पक्वावस्था

लक्षणें

थंडी वाजून ताप येतो. घाम येऊन उतरतो. तापामध्यें चढ उतार असतो. घर्षणध्वनि ऐकूं येत नाहीं. पांडुता, श्वास, कास वाढतो. शिवाय पहिल्या दोन अवस्थांमधील लक्षणें असतात.	पूं काढून टाकणें. पूं काढून टाकल्यावर औषधी योजना करावी. गंधकद्रुति १ ते २ थेंब दूध किंवा साखरेंतून दिवसांतून ३ ते ४ वेळां द्यावी. लक्षणानुरूप वर सांगितलेली चिकित्सा करावी.

२ हृदयस्थ अन्तस्त्वचेचा सदाहशोथ

लक्षणें

हा विकार आमजन्य आहे.

आमवात या विकारामुळेंहि हृदयस्थ अन्तस्त्वचेच्या ठिकाणीं शोथ उत्पन्न होतो. तसेंच तीव्र आमज्वरामध्येंहि हा विकार उत्पन्न होतो. तसेंच कांहीं वेगांचें धारण केल्यानेंहि हृदयस्थ अन्तस्त्वचेचा दाह होतो. हा शोथ हृदयाच्या अन्तस्त्वचेंतच होतो असें नाहीं, तर हृदयामध्यें असलेल्या पडद्याला शोथ उत्पन्न होऊन रसाच्या अभिसरणास अडथळा येतो. तसेंच हृदयापासून निघणाऱ्या रोहिणीच्या (महा धमनी) ठिकाणीं असलेल्या पडद्यांच्या ठिकाणीं हा शोथ उत्पन्न होतो. या शोथांत वात आणि कफ या २ दोषांचें प्राबल्य असतें. याचेहि २ प्रकार पडतात.

१) आशुकारी २) चिरकारी.
आशुकारीचे प्रकार दोन
१) सौम्य २) व्रणयुक्त (मॅलिग्नन्ट)

अन्तस्त्वचासदाहशोथ आमावस्था

लक्षणें

हृदयाचें जागीं शूल, वेदना. नाडीचा वेग अधिक, श्वास वाढलेला, ज्वर, हृद्ग्रह, आमवातामुळें जर हा सदाहशोथ उत्पन्न झाला असेल तर द्विपटल व रोहिणीपटल या ठिकाणीं घर्षणध्वनि ऐकूं येतो.

आशुकारी आमवातामुळें बहुतकरून द्विपटल हें विकृत होतें. पण द्विपटल व महारोहिणीपटल दोन्हींहि विकृत होतात. किंवा क्वचित् एकटें रोहिणीपटल विकृत होतें.

हृदयाचें विशिष्ट स्थानीं मृदु असा घर्षणध्वनि ऐकूं येतो. क्वचित् सुरवातीला कर्कश घर्षणध्वनि ऐकूं येतो. कांही रोग्यांत हृद्विस्तार झालेला आढळतो. हृदयाचा ध्वनि क्षीण व पसरलेला ऐकूं येतो. आमवातजन्य असेल तर त्याची लक्षणें दिसतात. पण आमवातजन्य असूनहि मुलामध्यें ही लक्षणें सौम्य असतात अगर नसतातहि. कूर्परसंधि, मणिवंध, गुल्फ व जानु याठिकाणीं आमवातज ग्रंथिशोथ

महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
शृंगभस्म	२ गुंजा
लक्ष्मीनारायण	½ गुंज
अश्वगंधाघन	२ गुंजा

१ पुडी अनुपान– गरम पाणी, आल्याचा रस व साखर. दिवसांतून ३,४ वेळां.

असतो. यावरून तीव्र स्वरूपाचा हृदयाचा सदाहशोथ आहे असें समजतें.

दुसऱ्या कारणानें हा विकार असल्यास फिक्कटपणा, ओज क्षीणता, संध्याकाळीं ज्वर येतो. नाडी जलद, हृदयाचें ठिकाणीं वेदना व अस्वस्थता क्वचित् असते.

इतर कारणांनीं आमज्वर सांधीचे ज्वर, शरीरांत इतर ठिकाणीं पूयीभवन असल्यास	ज्वरधूमकेतु १ ते २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३,४ वेळां. गंधकद्रुती १ ते २ थेंब. दूध अगर साखरेंतून दिवसांतून ३ वेळां देणें.
श्वास, कास, नाडीचा वेग अधिक असल्यास	लक्ष्मीविलासगुटी ॥ गुंज आल्याचा रस व मधांतून वरचेवर चाटवणें. किंवा मकरध्वज । ते ॥ गुंज. आल्याच्या रसांत उगाळून मध घालून वरवरचे चाटवणें.
ज्वर वेग तीव्र असतांना (१०२चे पेक्षां जास्त असतां)	लक्ष्मीनारायण । ते ॥ गुंज शृंगभस्म २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– आल्याचा रस व मध दिवसांतून ३,४ वेळां. ज्वर कमी झाल्यावर देऊं नये. सुरवातीपासून षडंगोदक द्यावें.
तीव्र शूल असल्यास	नारायणतेल हळूं हळूं चोळून शेकावें किंवा गंधकद्रुति हळूं हळूं चोळावी.

हृत्शूल

हृत्शूल हा विकार सुश्रुतानें हृद्रोगापासून निराळा सांगितला आहे. व त्याची सम्प्राप्तीहि निराळी दाखविली आहे.

कफपित्तांनीं स्रोतसें रुद्ध झाल्यामुळें वायु हा रसाशीं संयुक्त होऊन त्याचप्रमाणें वायु व रस यांच्या संमूच्छनेनें हृत्शूल होतो. याशिवाय अति थंडीचा आघात, अति मेदोवृद्धि, मानसिक विकार व विशेषत: क्रोध यामुळेंहि होतो किंवा मलमूत्रादिकांच्या अवरोधामुळेंहि हा शूल उत्पन्न होतो. या सर्व कारणामुळें मुख्यत्वेंकरून वायू हा प्रकुपित होतो.

लक्षणें–

हृदयाचें ठिकाणीं अकस्मात् तीव्र शूल, उच्छ्वासास अवरोध, शूल हा उरोस्थीच्या मागें असतो. या वेदना वर मानेकडे व डाव्या हाताकडे जातात. चेहरा सचिंत व फिक्कट, शूल कांहीं क्षण, कांहीं मिनिटें किंवा तासभरहि टिकतो. शूल पुढें पुढें अधिक तीव्र होत जातो. क्षुल्लक कारणांनीं शूल सुरू होतो. केव्हां केव्हां शूल नसतो, पण इतर श्वासावरोधादि लक्षणें असतात. हात, पाय एकदम थंडगार पडतात, हृदयाचें ठिकाणाऐवजीं कुक्षीभागीं, पोटांत, पाठींतहि शूल होतो.

दशमूलघन १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी अनुपान– गरमपाणी. १-१ तासांनीं पुडी द्यावी.

चाटण–

मकरध्वज -।- ते -।।- गुंज
आल्याचा रस व मधांतून ५-५ मिनिटांनीं चाटवणें किंवा
लक्ष्मीविलासगुटी -।- ते -।।- गुंज
चाटण आर्द्रक रस व मधांतून ५-५ मिनिटांनीं चाटवणें.

शूल सौम्य असल्यास

वरचेवर उरस्थानीं शूल हृद्ग्रह, छातींत जडपणा, नाडीची गति वाढलेली, किंचित् श्वासावरोध,

मकरध्वज -।।- गुंज
सुवर्णभस्म १६ गुंज
मृगशृंगभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून २ पुड्या सकाळीं व रात्रीं देणें.

आभासात्मक हृत्शूल

याचप्रमाणें होत असतो व वरील लक्षणाप्रमाणें त्यामध्यें लक्षणें असतात.

हृदय-रोहिणी-अवरोध

या विकारामध्यें रसदुष्टी हीच प्रमुख घेतली आहे. रसदुष्टीमुळेंच हृदयस्थ रसाचे वहन करणाऱ्या रोहिणीमध्यें ग्रंथी उत्पन्न होते. ही ग्रंथी हृदयाचें पोषण करणाऱ्या रसवाहिनींत रोध उत्पन्न करते. व त्यामुळें हृदयाच्या पुढील भागाचें पोषण होत नाहीं. तसेंच या ग्रंथीच्या अवरोधामुळें शूल उत्पन्न होतो. ही दुष्टी वात-कफात्मक असते. व पुढें यामध्यें सान्निपातिक अवस्था उत्पन्न होते. म्हणून हा सान्निपातिक हृत्शूल असें म्हणता येते. हा असाध्य म्हणून गणला आहे.

वायूंचे जे पांच प्रकार सांगितलें आहेत, त्यांचे एकमेकांवर होणाऱ्या आवरणामुळें निरनिराळे विकार उत्पन्न होतात. या विकारामध्यें हृद्रोगाचा अन्तर्भाव केलेला आहे, व त्याची लक्षणेंहि सांगितली आहेत.

ती लक्षणें पुढीलप्रमाणें

प्राणावृत उदानामुळें शिरोग्रह, प्रतिश्याय, श्वास व उच्छ्वास यांस रोध, हृद्रोग, मुखशोष.
व उदानावृत प्राणामुळें कर्मनाश, ओजोनाश, बलनाश, वर्णनाश व मृत्यु ही लक्षणें असतात.

या दोन आवृत वाताची जी लक्षणें दिली आहेत, ती हल्लीं दिसणाऱ्या हृद्रोगांत दिसून येतात.

हृदय रोहिणी अवरोधाची लक्षणें

यांतील मुख्य लक्षण छातींत शूल हें असते. हळूं हळूं तो तीव्र होत जातो. तीव्र अजीर्णामुळें उत्पन्न झालेला शूल व या विकारांत उत्पन्न झालेला शूल सारखा असतो. म्हणून अजीर्णजन्य शूल आहे कां तें खात्री करून घ्यावे. या विकारांतील शूल बहुधा रात्रीं, विश्रांतीच्या वेळीं सुरूं होतो.

हा शूल उरोस्थीच्या वर मध्यभागीं किंवा खालच्या भागांत असतो. व छातीची डावी बाजू, डावा हात, मान, खांदा व आमाशयाकडे जातो. शूल बराच काल राहतो व विश्रांतीनेंहि कमी होत नाहीं. हा विकार सौम्य असल्यास शूल कांहीं तास असतो. तीव्र स्वरूपाचा असल्यास शूल कांहीं दिवस असतो. विकार तीव्र स्वरूपाचा असल्यास रोगी फिक्कट, भ्यालेला, अस्वस्थ, असतो.

छर्दि, अति स्वेद येतो. व रसाभिनोदन कमी होतें.

स्वस्थ पडून असतांनाहि श्वास असतो. उजवी जवनिका कार्यहीन झाल्यास हाताची बोटें, चेहेरा काळा निळा होतो, मानेच्या नीला

फुगीर असतात. यकृद्वृद्धि होते. डावी जवनिका कार्य हीन झाल्यास नाडी क्षीण, हृदय-ध्वनि क्षीण, हृदयध्वनीच्या तालबद्धतेंत विकृति होते. हृत्स्पंद कमी होण्यापेक्षां हृत्स्पंद यामध्यें वाढलेला असतो.

आवरणाचा घर्षणध्वनि १-२ दिवस ऐकूं येतो. ज्वर १००-१०१ असतो.

हृत्शूल व हृदय रोहिणी अवरोध यांतील भेद

हृत्शूल	हृदय-रोहिणी-अवरोध
१ श्रम, थंडी व भावनोद्वेगामुळें सुरूं होतो. विशेषतः जेवणानंतर.	दिवसां किंवा रात्रीं केव्हांहि सुरूं होतो.
२ यामुळें रोग्यांस जखडून बसावेसें वाटतें व तसें बसल्यानें शूल थांबतो.	अस्वस्थ, हात-पाय गार होतात, नाडी क्षीण, जलद; निश्चेष्ट होतात. खूप घाम येतो. गात्र नीलिमा किंवा चेहरा टवटवीत, लाल होतो.
३ शूल कांहीं मिनिटें टिकतो.	शूल कांहीं तास किंवा कांहीं दिवस टिकतो. व जास्त पीडाकर होतो.
४ रोहिणी विस्तारामुळें शूल कमी होतो.	रोहिणी विस्तारामुळें शूल कमी होत नाहीं.
५ रसाभिनोदन वृद्धि होते.	रसाभिनोदन विशेषत्वानें कमी होतें. नीलामधील रसाभिनोदन कदाचित वाढते.
६ ज्वर नसतो.	मंद ज्वर

७ घर्षणध्वनि नसतात.	४ थ्या दिवशीं हृदावरणजन्य घर्षणध्वनि ऐकूं येतात.
८ हृद्ध्वनि स्पष्टपणें ऐकूं येतात.	हृद्ध्वनि क्षीण असतात.

वरील साधर्म्य वैधर्म्यावरून हृदय रोहिणी अवरोधाचें निदान निश्चित करता येतें.

हृदय रोहिणी अवरोधामुळें स्वस्थानांतील प्राण व उदान यांच्या प्रकृत गतीस अडथळा उत्पन्न होतो. व यामुळें त्यांच्या प्राकृत कार्यांत बिघाड होतो. एक वायू दुसऱ्या वायूवर आवरण घालतो. म्हणून निराळी लक्षणें उत्पन्न होतात. प्राणावृत उदानामुळें श्वास व उच्छ्वास यांस रोध उत्पन्न होतो. व उदानावृत प्राण झाला असतांना ओजोनाश, बलनाश, वर्णनाश, कर्मनाश व शेवटीं मृत्यू येतो.

शूल, नाडी मंद-क्षीण-अनियमित; बेचैनी, मंद ज्वर, मळमळ, वांति, हृदावरणाचें घर्षणध्वनि ऐकूं येतात. रसाभिनोदन कमी होतें.	दशमूलघन १ ते २ गुंजा महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा अश्वगंधाघन १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान मध. १-१ तासानें पुडी देणें.
मूर्च्छा असल्यास	सुवर्णसूतशेखर -।- ते -॥- गुंज आल्याचा रस व साखर यांमधून ५-५ मिनिटांनीं चाटवणें. किंवा वासापुटपाक स्वरस व मध घालून देणें किंवा आले रस व मध यांमधून देणें.
नाडी क्षीण, हातपाय गार पडणें, गात्र नीलिमा, रसाभिनोदन कमी.	महालक्ष्मीविलास ·।· ते ·॥· गुंज आल्याचा रस व मध यांमधून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवणें. किंवा हेमगर्भ ·।· ते ·॥· गुंज. आल्याचा रस व मध यांमधून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवणें.

ही रसायन चिकित्सा असल्यामुळें रसरक्तादि धातु व धात्वग्नि यांच्यावर कार्य करणारी आहे. म्हणून जो ग्रंथी रोहिणीमध्यें असतो त्याचें विलयन या कल्पामुळें घडून येतें. तसेंच आवृत असलेल्या वाताचेंहि शमन होतें. महायोगराजगुग्गुळामुळें शिरेमध्यें असलेल्या ग्रंथीचें विलयन होतें.

याचे आवेग पुनः पुनः येत असतात केवळ विश्रांती घेऊन हा रोग बरा होत नाहीं. पुनः आवेग येऊं नये म्हणून.	रसायन चिकित्सा करावी. सुवर्णभस्म १/६ गुंज मकरध्वज ·।· ते ·॥· गुंजा शृंगभस्म १ ते २ गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं व संध्याकाळीं १।१ पुडी देणें, ही चिकित्सा सतत २ महिने चालूं ठेवावी.

५ हृत्स्नायुवृद्धि

डावी जवनिका स्नायुवृद्धि कारणें–

१) रसाभिनोदनवृद्धि २) पटल विकार, द्वि–पटल विकार ३) महारोहिणी–पटल–विकार व चिरकारी महारोहिणीद्वार संकोच ४) हृत्स्नायु शोथ ५) संसक्तहृदावरण ६) महारोहिणीविस्तार ७) वृक्कविकार ८) अतिश्रम किंवा अति व्यायाम ९) फुप्फुसरोग.

उजवी जवनिका स्नायुवृद्धि कारणें–

१) कास, श्वास २) द्विपटल विकार ३) रोहिणी काठिण्य (Arteria sclerosis) ४) जन्मतःच फुफ्फुस संकोच, **डावी कर्णिका स्नायुवृद्धि कारणें**–द्विपटल विकार.

डावी जवनिका स्नायुवृद्धीची लक्षणें–

हृत्स्पंद हा हृत्स्नायुची वृद्धि झाल्यामुळें ६ ते ८ व्या पर्शुकांचे

खालीं व स्तनरेषेच्या बाहेर भासतो. हृत्स्पंद हातास जोरानें लागतो. हृत्स्नायु वृद्धि असल्यानें अंगुली ताडन केले असतां जड ध्वनि प्रदेश वाढलेला आढळतो. श्रवणनलिकेस हृदयाचा पहिला आवाज जोरानें व दीर्घ ऐकूं येतो. नाडी- वेग सातत्य कायम, भरदार व बलवान.

हृत्स्नायु वृद्धिमध्यें कोणकोणत्या दोषांचा संबंध असतो ते पाहूं.

हृत्स्नायुवृद्धीला कारण असलेल्या रोगांत कोणता दोष प्रधान आहे हेहि पाहणें आवश्यक वाटते. पटल विकार किंवा हृदयस्थ विवर विकार किंवा रोहिणी विस्तार हे वायूच्या प्रकोपामुळें घडून आलेले आहेत. या सर्व विकाराला कारण उदावर्त किंवा आमवात हा असतो. याचप्रमाणें अति स्थौल्यामुळें हे हृद्विकार किंवा रोहिणी विकार उत्पन्न होत असतात, या मेदोधातूच्या वृद्धिमध्येंहि वात प्रकुपित असतो. म्हणून या दोन्ही कारणामध्यें वायूचा प्रकोप हाच कारण आहे. या वायूच्या प्रकोपामुळेंच व तेथें उत्पन्न झालेल्या स्रोतोरोधामुळें हृदयाचें आकुंचन प्रसरणात्मक कार्य अधिक वेगानें होत असते यामुळें हृत्स्नायुवृद्धि होते. म्हणून या विकारांत वातप्रत्यनीक चिकित्सा करावी लागते. स्थौल्यामुळें उत्पन्न झालेल्या हृद्विकारांत वायूप्रत्यनीक चिकित्सा परस्पर विरोधी होत असल्यामुळें ही फार जपून करावी लागते. वायूच्या शमनाची चिकित्सा उष्ण, स्निग्ध गुणात्मक करावी लागते. यामुळें मेदाची वृद्धि होते व मेदोघ्न चिकित्सा केली असतां वायूचा प्रकोप होतो. अशा वेळीं, मेदोघ्न व वातघ्न अशा द्रव्याची निवड करावी लागते. ती म्हणजे तिल-तैल हे होय. याचप्रमाणें गुग्गुलु–कल्पापैकीं महायोगराजगुग्गुळ हाहि संतर्पण अपतर्पणात्मक कार्य करणारा आहे, म्हणून या हृत्स्नायुवृद्धीमध्यें रोगी कृश असल्यास संतर्पणात्मक चिकित्सा करणें आवश्यक आहे. तें संतर्पण अतिस्थूलपणा उत्पन्न करणारे असूं नये व संतर्पणजन्य ही वृद्धि असल्यास अपतर्पणात्मक चिकित्सा करावी पण ती चिकित्सा करतांना रोग्याचा शक्तिपात होणार नाहीं याची काळजी घ्यावी.

६ हृद्विस्तार (Cardiac Dilatation)

हा विकार मूलभूत (स्वतंत्र) व उपद्रव म्हणून (परतंत्र) असतो. मूलभूत विकार हा कृमिज विषें, दारू, तंबाखू, इ. विषें, मानसिक आघात, भावनोद्रेक, ताप व एकदम बलक्षय या कारणांनीं हृत्स्नायू निःशक्त व पातळ होतो. यामुळें एकदम सर्व हृदयाचा कोषविस्तार जलद होतो.

उपद्रव (परतंत्र) म्हणून होणारा हृद्विस्तार हा हृत्स्नायु-वृद्धीजन्य विकारामुळें होतो.

लक्षणें–

सर्वांगशोथ, उदर व तदनुषंगिक लक्षणें रक्त पुढें फेकलें न गेल्यामुळें फुफ्फुसें, यकृत्, वृक्क, पचनेंद्रियें इ. इंद्रियामध्यें रक्तसंचय होत जातो. रक्तसंचय झाल्यामुळें ती ती इंद्रियें मोठी होऊन तेथें शोथ निर्माण होतो. पुढें उदर विकार होतो.

हृदयध्वनि जोरानें येणें शक्य नसते. रक्ताचें पुनरागमन होतें. त्यामुळें घर्षणध्वनि ऐकूं येतात. नाडी क्षीण, अनियमित, जलद. उजव्या जवनिका विस्तारामध्यें नीलांचा स्पंद प्रतीत होतो.

याशिवाय निद्राभंग, वात, भ्रम इ. हृद्रोगलक्षणें होतात.

हृदयस्थ पटलांचे व्याधींचा अल्पसा कां होईना विचार केला आहे, त्याचप्रमाणें हृद्विस्ताराचा व यकृत्, वृक्क इ. अवयवांच्या विकृतींचा विचार केला आहे व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या कासश्वासादि विकारांचा नामनिर्देश केलेला आढळतो. हें विवेचन लक्षांत घेऊन या विकाराची चिकित्सा लिहीत आहोंत.

हा विकार असाध्य आहे. हा संपूर्णतः बरा होत नाहीं. हृद्विस्तार होऊं लागल्याबरोबर जर चिकित्सा केली तर रोग्याचें आयुष्य वाढविणें शक्य आहे.

पादशोथ, कास, श्वास, नाडी क्षीण व जलद. अल्प श्रमानें थकवा व श्वास.	रोग्यास निजवून ठेवणें. संपूर्ण विश्रांतीची आवश्यकता आहे. लक्ष्मीविलासगुटी ।। ते १ गुंज शृंगभस्म ६ गुंजा सुवर्णभस्म १/१६ गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं व संध्याकाळीं १।१ पुडी देणें. वरील औषधाबरोबर दशमूलारिष्ट १ ते २ चमचे अर्जुनारिष्ट १ ते २ चमचे दुप्पट पाणी घालून दोन्ही जेवणानंतर देणें. २) महालक्ष्मीविलास ।। गुंज शृंगभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं १ पुडी व २ री पुडी रात्रीं देणें. वरील चिकित्सा हृद्य आहे.
शोथ असल्यास–	पुनर्नवाक्वाथ सकाळीं ताजा काढा करून ५ तोळे देणें. व वरील हृद्य औषधें द्यावी.

यकृत्वृद्धि, श्वास, कास, मूत्राल्पता व शोथ.	आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा पुनर्नवाघन २ गुंजा रिंगणीघन २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ ते ४ पुड्या देणें.
उदर- सजलावस्था	वरील आरोग्यवर्धिनी मिश्रण व विरेचन देणें. इच्छाभेदी १ ते २ गुंजा ते ४ गुंजापर्यंत देणें किंवा अभ्रकंचुकी १ ते ४ गुंजा-पर्यंत देणें,
आहार	केवल दुग्धाहारावर ठेवावे. मीठ वर्ज करावें.

Myocarditis ७ आशुकारी हृत्स्नायुसदाहशोथ

कारणें –

सांसर्गिक साथीचें ज्वर, कृमिविष, आमविष.

लक्षणें –

हृत्स्नायु क्षीणता, हृत्स्नायु विस्तार नाडी क्षीण, जलद, अनियमित. ज्वर, बलक्षय, भ्रम, मूर्च्छा.	लक्ष्मीनारायण । ते ।। गुंज शृंगभस्म २ गुंजा सुवर्णसूतशेखर १ गुंज सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां
नाडी, क्षीण, जलद, अनियमित.	महावातविध्वंसन । ते ।। गुंज मध व आल्याचा रस यांतून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवणें.

मूर्च्छा, श्रम.	सुवर्णसूतशेखर ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मधांतून वरीलप्रमाणें चाटवणें.
ज्वर वेग कमी झाल्यावर हृत्स्नायुमध्यें बल येण्यासाठीं.	मकरध्वज ·।· ते ·।।· गुंज मधांतून सकाळीं चाटवणें.

चिरकारी हृत्स्नायुसदाहशोथ

याचे प्रकार ५ –

१) हृत्स्नायुवृद्धि २) हृत्स्नायु-विस्तार ३) फिरंगज ४) मेदोवृद्धि ५) हृत्स्नायुक्षय (क्षीणता)

कारणें–

हृत्स्नायुवृद्धि व विस्तार यांचा विचार पूर्वी दिला आहे.

मेदोवृद्धिज व हृत्स्नायुक्षय याची कारणें–

आशुकारी हृत्स्नायुसदाहशोफ २) हृद् रोहिणी विकार ३) मद्य व इतर विषांचें सतत सेवन ४) पांडू ५) श्वास ६) वृक्क विकार ७) सतत श्रमाधिक्य.

यास प्रमुख कारण हृद्रोहिणी विकार हें असतें.

मेदोवृद्धिज – लक्षणें

मेदोवृद्धीमुळें हृत्स्नायूंचे तंतू नष्ट होऊन तेथें मेदसंचय होतो. जेवल्यानंतर गुंगी, पाय गार पडणें, किंचित् श्रमानीं श्वास, हृद्ग्रह	हेमगर्भ $\frac{1}{8}$ ते $\frac{1}{4}$ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिसळून वरचेवर चाटवणें. लक्ष्मीविलास ·।· ते ·।।· गुंज शृंगभस्म २ गुंजा सितोपलादि ४ गुंजा

अथवा शूल, क्षीण व मंद नाडी, हृद्स्पंद अस्पष्ट व ध्वनिऱ्हस्वता. मूर्च्छा. एकाएकीं मरण.	१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३-४ वेळां.

हृत्स्नायु क्षयज लक्षणें–

किंचित श्रमानीं कोरडा श्वास, गात्र नीलिमा, पायावर सूज, प्रथम हृत्स्पंद अस्पष्ट व दीर्घ.	सुवर्णभस्म $\frac{1}{16}$ गुंज शृंगभस्म २ गुंजा मकरध्वज ·।।· गुंज १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं व रात्रीं देणें.

फिरंगज लक्षणें–

महारोहिणींतून रक्ताचें पुनरागमन, अथवा हृत्स्नायुक्षय. फिरंग ग्रंथीमुळें हृत्स्नायुविकृति. जलद व अनियमित नाडी, हृद्शूल, श्वास.	व्याधीहरण $\frac{1}{2}$ ते १ गुंज शृंगभस्म २ गुंजा चोपचिन्यादिचूर्ण १ मासा १ पुडी. अनुपान– तूप. दिवसांतून ३ वेळां. मकरध्वज ·।।· गुंज मधांतून सकाळीं चाटवणें.

हृत्पटल विकार

पटल विकारांचे प्रकार–

१) अवरोध २) अपूर्णता ३) दोन्हीहि.

या विकारांत घर्षणध्वनि ऐकूं येतात. हें घर्षणध्वनि व पटल विकारांची लक्षणें यावरून कोणते पटल व हृदयाचें कोणते द्वार विकृत झालें आहे हें कळतें.

द्विपटलविकृति– (Mitral Regurgitation)

असतो. मानेंतील नीला भरलेल्या असतात. इतर शरीराचे मानानें हातपाय गार व फिक्कट असतात. आमवात तीव्र स्वरूपाचा हृस्थ अंतस्त्वचादाह, वृक्कविकार यामध्यें द्विपटलद्वार संकोच होऊं शकतो.

१) नाडीच्या परीक्षेवरून हृदयाची डावी बाजू व रसरुधिराभिसरण कसें आहे हें समजतें. नाडी भरीव असते. जादा स्पंद व कर्णिका कंप असल्यास नाडी अनियमित होते. नाहींतर नियमित असते. नाडी जलद. (सुमारें ९०) २) डाव्या जवनिकेचा जोर कमी झाल्यानें व रसरक्त कमी बाहेर पडल्यामुळें (वा पुरवठा कमी झाल्यामुळें) रसाभिनोदन कमी होतें. कर्णिका-कंप सुरूं झाल्यानेंहि रसाभिनोदन कमी असतें. वृद्ध रुग्णामध्यें रोहिणी उपचयाच्या मानानें (Arterio Scelerosis) रसाभि-नोदन वृद्धि असतें. द्विपटलद्वार संकोचामध्यें जर रोहिणी–पटल–द्वारानें रसरक्ताचे पुनरागमन होत असेल तर रसाभिनोदन वाढतें व नाडी भरीव व नाडीचा दाब वाढतो.

३) **हृदयाची चिन्हें**

दर्शन परीक्षा – उजव्या जवनि-

केच्या स्नायुवृद्धि व विस्तार यामुळें उरोस्थीच्या खालीं डाव्या बाजूस हृत्स्पंद दिसतात. हृदाग्राचें ठिकाणीं भासणारा हृत्स्पंद डाव्या स्तनरेषेच्या आंतील भागास पसरलेला दिसतो.

स्पर्श परीक्षा –

हृत्स्पंद हातास पसरलेला लागतो, व उजव्या कर्णिकेच्या संकोचना-मुळें उत्पन्न होणारा हृत्स्पंद हृदा-ग्राचें ठिकाणीं भासतो. वरील स्पंद (Presystolic Thrill) श्रम, दीर्घश्वसन व डाव्या कुशीवर निजले असतां भासतो.

अंगुली ताडन परीक्षा –

हृदयाचा थोडा विस्तार आढळतो.

श्रवणनलिका यंत्र परीक्षा –

श्रमानंतर किंवा डाव्या कुशीवर निजले असतां उजव्या कर्णिकेच्या संकोचनामुळें उत्पन्न होणारा घर्षणध्वनि ऐकूं येतो. प्रथम विश्रांती घेतली असतां दोन्ही घर्षणध्वनि ऐकूं येतात. नंतर पहिला घर्षणध्वनि तीक्ष्ण, विभागलेला व मोठ्यानें हृदाग्राचें ठिकाणीं ऐकूं येतो. रुग्ण डाव्या कुशीवर निजला असतां दोन्ही घर्षणध्वनि जोरानें ऐकूं येतात.

सामान्य लक्षणें –

१) **श्वास–** सुरुवातीला जेवणानंतर ताण पडेल असें श्रम केले असतां, नंतर थोडया श्रमानेंहि, यानंतर सतत चालूं असतो व यापुढें रात्रीं निजल्यानंतरहि श्वास चालूं राहतो.

छातींत धडधड –

सुरुवातीला थोडयाश्रमानंतर, धडधड व नाडी जलद होते. नंतर बहुतेक सतत धडधड चालूं राहते. श्रमाशिवायहि धडधड असते.

कास – हे यामध्यें सामान्य लक्षण असतें. फुफ्फुसामध्यें रस-रक्तादि संचितीमुळें कास येतो. श्रम व हालचाल यामुळें सुरुं होतो. गात्रनीलिमा व रक्तनिष्ठीवन हेहि याबरोबर असतात. हृत्स्नायु-क्षीणता व रक्ताचे गुठळीमुळें अवरोध यामध्यें तीव्र कास असतो. ४) कर्णिका कंप, कर्णिका स्पंदाधिक्य (Auricular Flutter) आगंतुक स्पंद (Premature beat) ५) रक्तनिष्ठीवन, रक्ताची गुठळी हृदयाच्या उजव्या बाजूचा अवसाद, यकृतामध्यें रक्तसंचिती व जलोदर ही लक्षणें होतात. रक्त गुठळीमुळें पक्षवध, सरक्त मूत्र-प्रवृत्ति इ. विकार उत्पन्न होतात.

महारोहिणीद्वार संकोच –

(Aortic Stenosis) या विकारांत प्रथम ध्वनीच्यामध्यें विकृत असा ध्वनि होतो. हा ध्वनि व हृदयस्थ अंतःत्वचादाह व महारोहिणीचे मूलद्वाराशीं होणाऱ्या ग्रंथिमुळें उत्पन्न होणारा ध्वनि यांतील फरक पाहणें आवश्यक आहे.

१) हा ध्वनि मानेकडे जाणाऱ्या रोहिणीमध्यें (Carotid artery) कर्कश, कधीं कधीं मंजूळ ऐकूं येतो. हृदाग्राचें ठिकाणींहि ऐकूं येऊं शकतो. २) प्रथम घर्षण ध्वनि (Systolic Thrill) रुग्ण पुढें वाकून बसला असतां व उच्छ्वासाचे शेवटीं महारोहिण्याच्या भागांत ऐकूं येतो. ३) डाव्या जवनिकेच्या स्नायूंची वृद्धि होते.

४) हळूं हळूं गति वाढून स्थिर होणारी व हातास कमी प्रतीत होणारी नाडी असते.

५) नाडीचा दाब (Pulse Pressure) कमी व हृदयाचा दुसरा ध्वनि क्षीण असतो.

सामान्य लक्षणें –

चेहरा फिक्कट व चिताग्रस्त, एकदम चक्कर येतें. व श्रमानंतर मूर्च्छा.

कारणें – या विकृतीस आमवात किंवा कधीं कधीं जन्मतःच ही विकृति असते. बऱ्याचशा रोगांत याचे कारण समजलेलें नाहीं.

त्रिपटल पुनरागमन

या द्वाराच्या विकृतीमुळें व विस्तारामुळें रसरक्ताचें पुनरागमन होतें. त्रिपटलामध्यें कांहीं विकार नसतो. पण विस्तार झालेला असतो, तेव्हां प्रथम व द्वितीय ध्वनीच्यामध्यें निराळा ध्वनि ऐकूं येत नाहीं. पण कांहीं चिरकारी कासाच्या रुग्णांत घर्षणध्वनि ऐकूं येतो. पण तो चिकित्सेनें ऐकूं येत नाहीं. व मरणोत्तर परीक्षेंत त्रिपटलामध्यें कांहीं विशेष बदल झालेला आढळून येत नाहीं. या विकृतीमधील घर्षणध्वनि उरोस्थीच्या खालच्या भागाच्या डाव्या बाजूस स्पष्ट ऐकूं येतो. मानेच्या नीलेमध्यें (Jugular Veins) प्रथम ध्वनीच्यावेळीं नाडी प्रतीत होणें व त्याचप्रमाणें यकृतवृद्धिमध्यें नाडी प्रतीत होणें हें या विकारांतील प्रमुख चिन्ह आहे.

महारोहिणीपटल विकृती व
(Aortic Regurgitation)
रसरक्ताचे पुनरागमन
(Tricuspid Regurgitation)

हृच्छिद्रें पुरी बंद न झाल्यानें हृद्विकासकालीं रसरक्ताचें पुनरागमन होतें. अशक्त हृत्स्नायूंच्या आंकुचनाचा दाब रक्तावर जोरानें पडूं न शकल्यानें घर्षणध्वनि सौम्य व हृदय विकास पावतांना होतो. (Diastolic) घर्षणध्वनि उरोस्थिच्या दिशेनें खालीं हृदग्राकडे जातो व द्वितीयध्वनिमध्यें फरक करतो. या विकृतीमुळें पांडूता, घेरी येणें, मूर्च्छा, हृद्ग्रह किंवा हृच्छूल ही लक्षणें उत्पन्न होतात.

महारोहिणीद्वार संकोच किंवा अवरोध यापेक्षां महारोहिणी पटल विकृती व रसरक्तांचें पुनरागमनामध्यें वरील लक्षणें विशेषत्वानें असतात. या विकृतींत डाव्या जवनिकेंत डावी कर्णिका व महारोहिणींतून अधिक रक्त संचय झाल्यानें हृत्स्नायुवृद्धिहि अधिक होते.

फुफ्फुसरोहिणीद्वारसंकोच–
(Pulmonary Stenosis)

ही विकृति जन्मतःच असूं शकते. उजव्या जवनिकेच्या संकोचकालीं होणारा, वरच्या दिशेनें जाणारा, फुफ्फुसरोहिणी द्वाराचें ठिकाणीं आढळणारा, मोठ्यानें ऐकूं येणारा, असा घर्षण ध्वनि असतो. उजव्या

जवनिकेचा विस्तार होतो व चेहरा काळसर आढळतो.

फुफ्फुस–रोहिणी–पटल विकृति व रसरक्तांचें पुनरागमन–

(Pulmonary Regurgitation)

यामध्यें सौम्य, उरोस्थिमार्गें जाणारा व हृदविकासकालीं घर्षणध्वनि असतो.

त्रिपटलद्वार संकोच

(Irichspic Stenosis)

ही विकृति क्वचित होते. यांतील घर्षणध्वनि कर्कश, उरोस्थीच्या अधोमार्गीं व प्रथम ध्वनीच्यापूर्वी ऐकूं येतो.

चिकित्सेच्या सोयीच्यादृष्टीनें सामान्यतः तीन अवस्था पाडल्या आहेत.

१) हृद्स्नायुवृद्धिची अवस्था
२) हृत्स्नायु विस्तारास सुरवात
३) हृत्स्नायु विस्तार पूर्ण झाल्यावर

पहिली अवस्था

या अवस्थेस कारण द्विपटल विकृति, द्विपटलद्वारसंकोच किंवा महा-रोहिणीद्वार विकृति असते. या अवस्थेंत हृदय हें बलवान असते म्हणून ही प्राथमिक अवस्था आहे.	या अवस्थेंत रोग्यानें विशेष श्रम करूं नयेत व योग्य आहार घेऊन बलाचें रक्षण करावें. अशा अवस्थेंत योग्य आहार विहार ठेवल्यास रोगी २५-३० वर्षेसुद्धां जगूं शकतात. योग्य व्यायामहि करण्यास हरकत नाहीं. व बलाचें व ओजाचें रक्षण करणारी अशी चिकित्सा करावी.

	सुवर्णमालिनीवसंत ·।· ते ·॥· गुंज रोज सकाळीं लोणी व खडीसाखर याबरोबर द्यावा. किंवा वसंतकुसुमाकर ·॥· ते १ गुंज रोज सकाळीं साखरेंतून देणें.

दुसरी अवस्था

हृद् विस्तारास सुरवात झाल्यावर असणारी लक्षणें. थोड्या श्रमानें दम लागतो, श्वास, कास, पायावर किंचित् सूज, पांडू, नाडी-क्षीण, वेगवान् व अनियमित. छातींत धडधड, निद्रानाश, शिरःशूल, प्रलाप, रक्ताची गुठळी.	पूर्ण विश्रांती. निजवून ठेवावें. हालचाल करूं देऊं नये. मलमूत्र विसर्जनासाठींहि रोग्यांस उठूं देऊं नये. मकरध्वज ·।· ते ·॥· गुंज शृंगभस्म २ गुंजा चांगले एकत्र खलून मधांतून चाटवणें. पुनर्नवाघन २ गुंजा अर्जुनघन २ ते ४ गुंजा शृंगभस्म ४ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दुपारीं व सध्याकाळीं देणें.
श्वास, कास अधिक, नाडी अनियमित व क्षीण असल्यास.	महालक्ष्मीविलास ·।· ते ·॥· गुंज आल्याच्या रसांत उगाळून त्यामध्यें मध घालून वरचेवर ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवणें.
मलावरोध असल्यास	मात्राबस्ति देणें.
आहार	लवण वर्ज. शक्यतों दुग्धाहार देणें. नारिकेलोदक देणें. लक्षणें कमी झाल्यावर भाकरी, पोळी इतर भाज्या द्याव्यात.

तिसरी अवस्था

हृदय विस्तार पूर्ण झाल्यावर असणारी लक्षणें— श्वास, कास अधिक, नाडी अनियमित, क्षीण, मधून मधून बंद पडते. यकृद्वृद्धि, मूत्राल्पता, पांडुता, सर्वांगशोथ, जलोदर, निद्रानाश.	संपूर्ण विश्रांती. आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा पुनर्नवाघन २ ते ४ गुंजा शृंगभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३-४ वेळां देणें.

	२) पुनर्नवादिक्वाथ ५ तोळे रोज सकाळीं देणें.
	आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– दूध. दुपारीं व संध्याकाळीं देणें.
मलावरोध, आनाह असल्यास	मात्राबस्ति देणें. किंवा अश्वकंचुकी वा इच्छाभेदी देणें.
नाडी अनियमित व अत्यंत क्षीण, हातपाय गार पडणें, छिन्न श्वास.	हेमगर्भ ·।· गुंज आल्यांच्या रसांत उगाळून मध घालून १।१ बोट चाटवणें. किंवा महालक्ष्मीविलास वा मकरध्वज वरील प्रमाणें देणें.
आहार–	केवल दुग्धाहार.
शोथ, कास, श्वास कमी झाल्यावर किंवा उदरस्थ जल कमी झाल्यावर व अग्नि प्रज्वलित असेल तर	साळीच्या लाह्याचा मंड नंतर साळीच्या लाह्या दुधांत टाकून साखर घालून देणें व नंतर हळूं हळूं मऊ भात देणें.

टीप–

या चिकित्सेनें रोग्याचें जीवित वृद्धिगत होतें. रोग मात्र बरा होत नाहीं.

नाडीविकृति

याचे दोन प्रकार असतात.

१) नाडीची गति मंद

२) नाडीची गति वृद्धि.

१) नाडीची गती मंद–
(Bradycardia)

कांहीं कांहीं लोकांच्या नाडीची गति स्वाभाविकपणेंच मंद असते. (४० ते ५०) कांहीं व्यायाम	ही निरोगी अवस्था असल्यानें यावर चिकित्सा करण्याची आवश्यकता नसते.

करणाऱ्या लोकामध्येंहि नाडीची गति मंद असते.	
कांहीं औषधांचे परिणाम म्हणून नाडीची गति मंद होते. उदा.– कांहीं विषें- डिजिटेलीस, नागविष, मद्य, सर्पगंधा (सतत घेत राहिले असतां.)	प्रथम निदान परिवर्जन करावे.
३) अजीर्ण, आमावस्था, आमज-ज्वर, कामला, थंडी, मेंदूचे विकार मूर्च्छा, व्याधीचा शम होत असतांना व प्रसूति नंतर, कांहीं हृद्विकार.	मूळ व्याधीला अनुसरून चिकित्सा करावी.
नाडीची गति मंद व क्षीण असल्यास	महालक्ष्मीविलास ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मधांतून वरचेवर चाटवणें.
आमवात किंवा आमावस्था असल्यास	आल्याचा रस २ ते ४ चमचे व मध २ चमचे एकत्र करून दिवसांतून २ वेळां देणें.

नाडीची गतिवृद्धि– (Tachycardia)

कारणें–

चहा, कॉफी, तंबाखू यांचे अतिरिक्त सेवन, कांहीं विषें उदा.– सोमल, ज्वर, क्षय, अर्बुद, पांडु, अग्निमांद्य, मेंदूचे विकार, गलगंड, १० व्या धमनीची कार्य हानी (व्हेगस नर्व्ह), आमवात, फिरंग, वातकफज्वर (सांधीचा), श्रम व मनोविकार यांचा अतिरेक, आध्मान.

लक्षणें–

याचे वेग येतात व ते कांहीं दिवस अथवा कांहीं आठवडे टिकतात. त्यावेळीं अति क्षीणता, हृत्शूल, बेचैनपणा, नाडीचा वेग दर मिनिटांस १५० ते २०० पर्यंत व हृत्स्नायु विस्तार व हृदावसाद होऊन रोगी मरतो. स्वस्थ पडून राहिला असतांनाहि नाडीचा वेग कमी होत नाहीं हें याचे वैशिष्टय होय व त्यामुळें निश्चित निदान होतें.	पूर्ण विश्रांती देणें. या अवस्थेंत उपयोगी पडणाऱ्या बऱ्याच मात्रा आहेत. त्यापैकीं कांहीं मात्रांचा उल्लेख येथें करीत आहे. १) हेमगर्भ ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मध यांतून चाटण. २) लक्ष्मीविलासगुटी ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मध यांतून चाटण. ३) मृगशृंगभस्म २ ते ४ गुंजा. १ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३-४ वेळां देणें. एखाद्या रोग्यांत हें लक्षण असल्यास त्या रोगाचीहि चिकित्सा करावी.
अजीर्ण, आमज असल्यास	पाचक, दीपक औषधें द्यावी.
फिरंगज असल्यास	व्याधीहरण ·।।· गुंज. १ पुडी. अनुपान– मध. सकाळीं व संध्याकाळीं देणें. २) अष्टमूर्ति १/१६ ते १/८ गुंज मधांत उगाळून थोडें थोडें चाटवणें.
पुन: पुन: वेग येऊं नये यांकरितां	सुवर्णमालिनीवसंत ·।।· गुंज १ पुडी. अनुपान– मध व तूप. सकाळीं व संध्याकाळीं देणें.

अनियमित नाडी–

ही अनेक रोगांत आंढळते. तीव्र ज्वर, पांडु, अग्निमांद्य, हृद्रोग, इ. विकार.

नाडीचा स्पंद सतत सारख्या अंतरानें न लागणें किंवा नाडीचें ठिकाणीं असलेली तालबद्धता बिघडणें.

१) नाडीचे ठोके २-३ ठराविक अंतरानें लागतात व एखादा ठोका लागत नाहीं.	महावात विध्वंसन ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मध यांतून चाटवणें.
२) नाडीचा स्पंद मधूनच न लागणें व गति वाढलेली असणें	१) लक्ष्मीविलास ·।· ते ·।।· गुंज. आल्याचा रस व मध यांमधून चाटवणें. २) सुवर्णसूतशेखर ·।· ते ·।।· गुंज आल्याचा रस व मध यांमधून चाटवणें.
३) नाडीचा स्पंद मधून मधून सौम्य लागणें किंवा दाब कमी लागणें	३) हेमगर्भ किंवा त्रैलोक्यचिंतामणी १/८ ते १/४ गुंज. आल्याचा रस व मधांतून चाटण.

नाडी--विज्ञान

बृहत्त्रयीमध्यें नाडीविज्ञानासंबंधी फारसा उल्लेख सांपडत नाहीं. त्यामुळें आयुर्वेदांत नाडीसंबंधी उल्लेख केलेला नाहीं असा विचार कोणीहि करून घेऊं नये. हा विषय स्वतंत्ररीत्या वैद्यांनीं मांडलेला आहे. त्याचा अंतर्भाव रोगनिदानाचें दृष्टीनें व स्वास्थ्याचे दृष्टीकोनांतून करणें आवश्यक आहे.

मागें ज्वरप्रकरणांत आम्ही नाडीचा उल्लेख केलेला आहे. त्यापेक्षां हृद्रोगाशीं नाडीचा संबंध अधिक येत असल्यामुळें नाडीचा विचार येथें-करणें आवश्यक आहे.

प्रथम नाडी पहाणारा वैद्य कसा असावा याचा विचार करूं. नंतर स्वस्थ प्रकृतीचे माणसाचे नाडीची गति पूर्वींच्या आचार्यांनीं कशी मोजली आहे व ती कशी आहे याचा विचार करणें बरें. त्यानंतर दोषांचे दृष्टीकोनांतून नाडीचा विचार कसा करता येतो ते पाहूं. व तदनंतर निरनिराळचा रोगांत नाडीचा विचार केलेला मांडीत आहे व नंतर असाध्य अवस्थेमध्यें नाडीचा विचार किती महत्वाचा आहे ते पाहूं.

नाडी परीक्षेस योग्य वैद्याचें लक्षण –

एकचित्तः प्रसन्नात्मा मनसा च विशारदः ।
स्पृशेद्ङ्गुलिभिः नाडीं जानीयाद्दक्षिणे भुजे ॥
अनन्यमतिको वैद्यः संयमितेन्द्रियस्तु हि ।
अङ्गुलिभिस्तु तिसृभिः नाडीमवहितः स्पृशेत् ॥
स्थिरचित्तः नीरोगश्च सुखासीनः प्रसन्नधीः ।
नाडीज्ञानसमर्थः स्यादित्याहुः परमर्षयः ।

– भारतीय नाडीविज्ञानम् पान १५

स्थिरचित्त, एकचित्त, प्रसन्नात्मा, मानसरोगतज्ञ, जितेन्द्रिय, नाडीचे ठिकाणीं एकचित्त झालेला, निरोगी, नाडीशास्त्राचें ज्ञान असलेला, नाडीसंबंधी निश्चित निर्णय घेणारा अशा वैद्यानें नीट बसून रुग्णाच्या उजव्या हाताची नाडी तीन बोटांनीं पहावी व स्त्रियांची नाडी डाव्या हाताची पहावी.

नाडी उत्पत्ति –

परिव्याप्याखिलं कायं धमन्यो हृदयाश्रयाः ।
वहन्त्यः शोणितस्रोतः शरीरं पोषयन्ति ताः ।
हृदयाकुञ्चनाद्रक्तं कियदुत्प्लुत्य धामनीम् ।
तत्संचितं तदुत्थञ्च प्रविश्य चापरास्वपि ।
व्रजित्वा निखिलं देहं ततो विशति फुप्फुसम् ।
फुप्फुसाद् हृदयं याति क्रियैवं स्यात् पुनः पुनः ॥
रुधिरोत्प्लववेगेन धमनी स्पन्दते मुहुः ।
उत्प्लवप्रकृतेर्भेदाद्भेदः स्यात्स्पन्दनस्य च ।
स्थौल्यादिकं धमन्याश्च तत्प्रकृत्यैव जायते ॥
तत्प्रकारान् समासेन ब्रुवे वत्स निशामय ।

हृदयापासून निघालेल्या रोहिणीच्याद्वारें सर्व शरीराचे रसरक्तानीं पोषण केलें जातें. हृदयाचें आकुंचनामुळें रोहिणीद्वारें सर्व शरीरभर रसरक्ताचा संचार होतो व नीलांच्याद्वारें हें रसरक्त परत हृदयांत येते. तेथून फुप्फुसांत रक्त जातें व फुप्फुसांतून हृदयांत विशुद्ध रसरक्त येतात. ही क्रिया सतत चालूं असते. हृदयाचें आकुंचन–प्रसरणामुळें रोहिणीमध्यें स्पन्दनें निर्माण होतात. या हृत्स्पंदामध्यें बदल झाल्यास नाडीच्या स्पंदनांत बदल होतो. नाडी भरीव किंवा पोचट लागणें किंवा नाडीचें स्पंद मध्येंच बंद पडणें या क्रियेशीं हृदयाचा संबंध आहे.

नाडी-स्पंदन-संख्या

षष्ठचा स्पन्दास्तु मात्राभिः षट्पंचाशद्भवन्ति हि ।
शिशोः सद्यः प्रसूतस्य पञ्चाशत्तदनंतरम् ।

चत्वारिंशत् ततः स्पन्दाः षट्त्रिंशदयौवने ततः ।
प्रौढस्यैकोनत्रिंशत् स्युर्वार्द्धकेऽष्टौ च विंशतिः ॥

जन्मलेल्या (नवजात) बालकाची नाडी १ पलामध्यें ५६ असते. १ पल म्हणजे २४ सेकंद असतात. म्हणजे १ मिनिटांत १४० नाडीचे स्पंद असतात. बालकाची वाढ जसजशी होत जाईल तसतशी नाडीची स्पंदनें १ पलामध्यें ५० पर्यंत कमी होतात. म्हणजे १ मिनिटांत १२५ स्पंदनें असतात. १६ वर्षापर्यंतच्या बालकाच्या नाडीची स्पन्दनें १ पलास ४० ते ३६ म्हणजे १ मिनिटास १०० ते ९० पर्यंत असतात. तारुण्यावस्थेंत १ पलास २१ म्हणजे १ मिनिटास ७२ नाडी स्पन्दनें असतात व वृद्धापकालीं १ पलास २८ म्हणजे १ मिनिटास ७० नाडी स्पन्दनें असतात.

स्वस्थ माणसाची नाडी –

भूलताभुजगप्राया स्वस्था स्वास्थ्यमयी शिरा ।
सुखितस्य स्थिरा ज्ञेया तथा बलवता मता ।

स्वस्थ पुरुषाच्या नाडीची स्पन्दनें गांडुळाच्या गतिप्रमाणें संथ व भरदार असतात.

सुव्यक्तता निर्मलत्वं स्वस्थानस्थितिरेव च ।
अमन्दत्वमचाञ्चल्यं सर्वासां शुभलक्षणम् ॥

नाडीची स्पन्दनें वर सांगितल्याप्रमाणें स्पष्ट, स्वस्थानीं, दोषरहित, द्रुतगतिहीन ती नाडी चांगली स्वस्थ समजावी.

दोषानुरूप नाडीचें स्थान –

आदौ च वहते श्लेष्मा मध्ये पित्तं तथैव च ।
अन्ते प्रभञ्जनो ज्ञेय नाडीज्ञैस्तु विशारदैः ।

रुग्णाच्या हाताच्या आंगठ्याखालीं पहिल्या बोटाला जी नाडी भासते तें स्थान वाताचें, मधल्या बोटाला भासणारे पित्ताचें व शेवटच्या बोटास भासणारे स्थान कफ दोषाचें होय.

कालानुसारिणी स्वस्थ नाडी–

प्रातः स्निग्धमयी नाडी मध्यान्हे चोष्णतान्विता ।
सायान्हे धावमाना च रात्रौ वेगविवर्जिता ॥

सकाळीं नाडीची गति मंद (कफात्मक) दुपारीं उष्ण-थोडी जलद, (पित्तात्मक) संध्याकाळीं जलद (वातात्मक) व रात्रीं नाडीची गति साधारण असते.

दोषानुसार नाडी स्पर्श–

पित्तनाडी भवेदुष्णा कफनाडी तु शीतला ।
वातनाडी भवेन्मध्या एवं स्पर्शविनिर्णयः ॥

पित्तात्मक नाडी उष्ण, कफात्मक नाडी शीत व वातात्मक नाडी सम शीतोष्ण स्पर्शाला भासते.

प्रकुपित दोषात्मक नाडीची गति–

वाताद्वक्रगता नाडी चपला पित्तवाहिनी
स्थिरा श्लेष्मवती ज्ञेया मिश्रिते मिश्रिता भवेत् ।

वाताचा प्रकोप झाला असतां नाडीची गति वक्र असते. पित्ताचा प्रकोप झाला असतां नाडीची गति वाढते व कफाचा प्रकोप झाला असतां नाडीची गति भरदार होते व द्वंद्वज दोषामध्यें मिश्रित अशा स्वरूपाची नाडीची गति असते.

सर्पजलौकादि गतिं वदन्ति विबुधा प्रभंजने नाडीम्
पित्ते च काकलावकभेकगतिं विदुः सुधियः ॥

राजहंसमयूराणां पारावतकपोतयोः ।
कुक्कुटादिगतिं धत्ते धमनी कफ संवृता ।

वायूचा प्रकोप झाला असतां नाडीची गति सर्प, जलौकांच्या गतिप्रमाणें; पित्तप्रकोप झाला असतां कावळा, लावा व बेडूक यांच्या गतिप्रमाणें व कफप्रकोप झाला असतां राजहंस, मोर, पारवा, कोंबडा, कबूतर यांच्या गतिप्रमाणें नाडीची गति असते–होते.

या प्राण्यांच्या गतीचा आलेख काढला असतां ज्याप्रमाणें दिसेल त्याप्रमाणें वृद्ध दोष झाले असतां नाडीची गति आढळेल.

द्वन्द्वजनाडी गति–

मुहुः सर्पगतिं नाडीं मुहूर्भेकगतिं तथा ।
वातपित्तद्वयोभ्दूतां प्रवदन्ति विचक्षणाः ॥

वातपित्तात्मक नाडीची गति थोडा काल सर्पगतिप्रमाणें व थोडा काल बेडकाच्या गतीप्रमाणें असते.

भुजगादि गतिञ्चैव राजहंसगतिं तथा ।
वातश्लेष्मसमुभ्दूतां भाषन्ते तद्विदो जनाः ।

वातकफात्मक नाडीची गति सर्पगति व राजहंसगतिप्रमाणें असते.

मण्डूकादिगतिं नाडीं मयूरादिगतिं तथा ।
पित्तश्लेष्मसमुद्भूतां प्रवदन्ति महाधियः ॥

पित्तकफात्मक नाडीची गति कांहीं काल बेडकाचे गतिप्रमाणें व कांहीं काल मोराचे गतिप्रमाणें असते.

उरगादिलावकादिहंसादीनाञ्च बिभ्रती गमनम् ।
वातादीनां च समं धमनी सम्बद्धमाधत्ते ।

त्रिदोषात्मक नाडीची गति सर्प-लावा-हंस इ. प्राण्यांच्या गतिप्रमाणें असते.

सान्निपातिक विकारांतील नाडीची गति–

काष्ठकुट्टी यथा काष्ठं कुट्टते चातिवेगतः ।
स्थित्वा स्थित्वा तथा नाडी सन्निपाते भवेद् ध्रुवम् ।
अङ्गुलि त्रितये ऽपि स्यात् प्रव्यक्ता सन्निपातितः ।

ज्याप्रमाणें सुतारपक्षी थांबून थांबून वेगानें व जोरानें लाकडावर आघात करतो त्याप्रमाणें सन्निपात अवस्थेमध्यें नाडीचे स्पंद भरीव असतात.

कदाचिन्मन्दगा नाडी कदाचिच्छीघ्रगा भवेत् ।
त्रिदोषप्रभवे रोगे विज्ञेया च भिषग्वरैः ॥

सन्निपात अवस्थेमध्यें नाडीची गति कधीं मंद किंवा कधीं जलद असते.

सुखसाध्य नाडी–

यदा यं धातुमाप्नोति तदा नाडी तथा गतिः ।
तथा हि सुखसाध्यत्वं नाडीज्ञानेन बुध्यते ॥
स्पन्दते चैकमानेन त्रिंशद्वारं यदाधरा ।
स्वस्थानेन तदा नूनं रोगी जीवति नान्यथा ॥

जेव्हां नाडी दोषाला व त्या दोषानुसार सांगितलेल्या गतिप्रमाणें असते तेव्हां तो रोग सुखसाध्य असतो. त्याचप्रमाणें नाडीचे तीस स्पन्द एकसारखे तालबद्ध असले तर रोग सुखसाध्य समजावा.

असाध्य नाडी–

मन्दं मन्दं शिथिलशिथिलं व्याकुलं व्याकुलं वा ।
स्थित्वा स्थित्वा वहति धमनी याति नाशं च सूक्ष्मा ॥

नित्यं स्थानात् स्खलति पुनरप्यङ्गुलिं संस्पृशेद् वा ।
भावैरेवं बहुविधविधैः सन्निपातादसाध्या ॥

ज्या रोगांत नाडी मंद किंवा शिथिल किंवा क्षीण किंवा मधून मधून नाडी भासते किंवा बंद पडते (भासत नाहीं) किंवा स्वस्थानापासून च्युत होते किंवा भासते. या प्रकारची नाडीची गति असल्यास दोषांची सन्निपात अवस्था असाध्य समजावी, असाध्य असते.

महादाहे ऽपि शीतत्वं शीतत्वे तापिता शिरा ।
नानाविधगतिर्यस्य तस्य मृत्युर्न संशयः ।

जेव्हां शरीर गरम असते व नाडी थंड असते याचे उलट शरीर थंड व नाडी गरम असते, व नाडी अनेक गत्यात्मक असते तेव्हां मृत्यु निश्चितपणें येणार असें समजावें.

असाध्य नाडीचे अपवाद–

भारप्रवाहमूर्च्छाभयशोक प्रमुख कारणान्नाडी ।
संमूर्च्छितापि गाढं पुनरपि सा जीवितं धत्ते ।

जड ओझें वाहण्यानें, मूर्च्छा, भीति, शोक इ. कारणामुळें नाडीचें स्पन्द हातास भासलें नाहीं तरी रोगी मरणार नाहीं असें समजावें. कारण पुनः नाडीचें स्पन्द कांहीं कालानीं सुरू होतात.

प्रत्येक विकारांत नाडीची विशिष्ट अवस्था कशी असते याचे विवेचन भारतीय नाडी-विज्ञान या ग्रंथांत केलें आहे. त्यापैकीं उदाहरणादाखल कांहीं विकारांमधील नाडीची विशिष्ट अवस्था कशी असते ते देत आहोंत.

वातज्वरे नाडी लक्षण–

सौम्या सूक्ष्मा स्थिरा मन्दा नाडी सहजवातजा ।
स्थूला च कठिना शीघ्रा स्पन्दते तीव्र मारुते ॥

वाताच्या वृद्धिच्या अवस्थेमध्यें नाडी सौम्य, सूक्ष्म, स्थिर व मंद असते व वातप्रकोपाच्या अवस्थेमध्यें भरीव, कठीण व जलद असते.

पित्तज्वरे नाडी लक्षण–

भृता च सरला दीर्घा शीघ्रा पित्तज्वरे भवेत् ।
शीघ्रमाहननं नाड्याः काठिन्याच्च चला तथा ।

पित्त वृद्धिच्या अवस्थेंत नाडी पूर्ण भरलेली (तालबद्धता) सरळ, दीर्घ व जलद असते तर पित्त प्रकोपामध्यें कठीण, जलद, चल (स्वस्थान सोडून) असते.

कफज्वरे नाडी लक्षण–

नाडीतन्तुसमा मन्दा शीतला श्लेष्मदोषजा ।
मलाजीर्णे नातितरां स्पन्दनं च प्रकीर्तितम् ॥

कफज्वरामध्यें नाडी दोऱ्याप्रमाणें, मंद व शीत असते व मलांचा अवरोध व अजीर्ण असतांना नाडी मंद असते.

काल निर्णय–

नाडी परीक्षेवरून काल निर्णय कसा करता येतो याचें दिग्दर्शन करण्याकरितां कांहीं उदाहरणें देत आहोंत.

अङ्गुल्यभ्यन्तरे नाडी शीतला यदि तिष्ठति ।
प्रहरैर्नवभिस्तस्य निर्दिष्टं मरणं बुधैः ॥

रुग्णाची नाडी मधल्या बोटास थंड लागली असतां ९ प्रहरामध्यें (२७ तासांत) रोगी मरेल असें समजावे.

प्राचीन (बृहत्त्रयी) आयुर्वेदीय ग्रंथांत नाडीचें वर्णन तिची उत्पत्ति, स्थिति व नाडीचा नाश यांचा विचार केलेला आंढळत नाहीं.

प्रत्यक्ष वैद्यांचा व्यवहार मात्र नाडीशीं चालू आहे. ही परंपरा भारतांतील वैद्यक पंथीयामध्यें पुरातन कालांपासून चालत आलेली असावी, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. एखाद्या मरणोन्मुख रोग्याचें भविष्य नाडीवरून सांगणारे वैद्य होऊन गेले. किंवा केवल नाडीचा विचार करून रोगाचें निदान करणारे वैद्यहि होते. पण ही परंपरा आज टिकलेली नाहीं. याचप्रमाणें नाडी आणि त्रिदोष यांचा अन्योन्य संबंधहि आज विचारांत घेतला जात नाहीं. यामुळें आयुर्वेद शास्त्राची फार मोठी हानि झाली आहे. ती अंशतः भरून काढावी या हेतूनें वरील विवेचन केलें आहे.

नाडीशास्त्रावर अनेक ग्रंथ आज उपलब्ध असूनहि त्या ग्रंथांचा अभ्यास केला जात नाहीं. आमचे वरील विवेचन लक्षांत घेऊन वैद्यवर्ग या नाडीशास्त्राचा अभ्यास करील अशी आशा केली तर ती अस्थानीं होणार नाहीं.

हृदय व नाडी

हृदय व नाडी यांचा संबंध अतूट आहे. हृदयापासून निघणाऱ्या स्पन्दनांचेंच प्रतिबिंब नाडींत उठत असतें, असे जरी आज मानलें जातें तरीहि ही कल्पना फार स्थूल आहे. याचा सूक्ष्म अभ्यास प्राचीन नाडी विज्ञान-शास्त्रज्ञांनीं केलेला आहे. जसे तंतुवादनपटू एकाच मुख्य तारेवर आपल्या इच्छेप्रमाणें बोटांनीं आघात करून निरनिराळया रागांचें ध्वनि त्यांतून काढतो त्याचप्रमाणें नाडी परीक्षकहि नाडीच्या स्पन्दनांपासून शरीरस्थ अनेक विकारांचें ज्ञानहि मिळवूं शकतो. असे नाडी शास्त्रकारांचें म्हणणें आहे.

ही नाडी हृदयाशीं अप्रत्यक्षरीत्या संबंधित असते. व केवल हृदयाच्याच विकृतीमुळें नाडीच्या स्पन्दनांत बदल होतो हें म्हणणें वरवर जरी खरें दिसत असलें तरी या नाडीशास्त्राचा शरीरस्थ सर्व विकाराशीं संबंध आहे हें म्हणणें सामान्य माणसाच्या कल्पनेच्या बाहेरचे आहे.

नाडी आणि त्रिदोष

शरीरस्थ विकृतीला कारण त्रिदोषांचें वैषम्य हें आहे. हें त्रिदोष शरीरामध्यें रसरक्तादींच्याद्वारें संचार करीत असतात. यामुळें या शरीरांतील निरनिराळया स्थानांत विकृति उत्पन्न होतात. इतकेंच नव्हें तर स्वाभाविक स्थितींतहि, निरोगी स्थितींतहि या त्रिदोषांकडून हृदयाचें आंकुचन व प्रसरण होत असतें. किंवा त्याच्या ठिकाणीं आंकुचन-प्रसरणात्मक क्रिया तालबद्ध चालू असते. त्यासहि कारण त्रिदोष हेच आहेत. याचप्रमाणें नाडीचें ठिकाणीं असलेली तालबद्धता त्रिदोषांकडूनच उत्पन्न झालेली आहे. म्हणून या यांत्रिक कल्पनेपेक्षां त्याच्या पाठीमागें असलेल्या सूक्ष्म अशा शक्तीचा विचार करणें आवश्यक आहे व ती शक्ति म्हणजे त्रिदोष कल्पना ही होय. या त्रिदोष कल्पनेचा व नाडीचा संबंध वरील विवेचनांत आलेला आहे. म्हणून शरीरस्थ त्रिदोषामुळें उत्पन्न होणाऱ्या विकारांचें ज्ञान या नाडीमुळें होते.

रसाभिनोदन वृद्धि व क्षीणता

शरीरामध्यें मुख्यतः रसाचें वहन होत असतें. रस शब्दामध्यें रस गतौ गमन करणें हा रसाचें ठिकाणीं स्वाभाविक धर्म आहे. या रस धातु बरोबरच रक्ताचेंहि वहन होत असतें. तसेंच आहार द्रव्यांबरोबर गेलेली पंचमहाभूतात्मक अशीं द्रव्यें सर्व शरीरांत सूक्ष्मरीतीनें फिरत असतात. या पंचमहाभूतात्मक द्रव्यामुळेंच पंचमहाभूतात्मक शरीराचें पोषण होत असतें. रस धातू हा प्राधान्यानें आप् महाभूतात्मक आहे. (स खलु आप्यो रसः ....) आप महाभूतात्मक द्रव्येंहि गुरुत्व, द्रवत्व या गुणामुळें अधोगमन करीत असतात. हा स्वाभाविक धर्म असला तरी रस धातू हा सर्व शरीरामध्यें सतत फिरत असतो. (संतत्या भोज्यधातूनां परिवृत्तिस्तु चक्रवत्) या रसाचें गमन होण्यासाठीं शरीरामध्यें जी यंत्रें निर्माण झाली आहेत, त्या यंत्राचा व त्या यंत्राच्या कार्याचा विचार लक्षात घेणें आवश्यक आहे.

आहार द्रव्याचें पचन झाल्यानंतर रस धातू हा हृदयाकडे जातो. आणि त्या हृदयांतून रोहिणीच्याद्वारें सर्व शरीरांत फिरतो. (हृदो रसो निस्सरति) रस धातूच्या ठिकाणीं विशिष्ट मर्यादेपर्यंत गतिमत्व असतें. पण हा जेव्हां हृदयांत येतो तेव्हां हृदयाच्या आकुंचन व प्रसरणामुळें रोहिणीमध्यें जातो. या महारोहिणींतून उर्ध्व, अध, तिर्यग् गतीनें सर्व शरीरांत संचार करतो.

नाडीमध्यें रस धातू असून वायुसंयोगामुळें तिर्यक्, उर्ध्व, इ. गति त्याच्यामध्यें उत्पन्न होतात. तिर्यग्, उर्ध्व या गति त्याच्या (रस धातूच्या) स्वाभाविक नाहींत. केवळ वायुसंयोगामुळें या क्रिया उत्पन्न होतात असें नाहीं, तर दाब, अभिघात, संयुक्तसंयोग यांच्या कर्मामुळें त्या उत्पन्न होत असतात. हृदय हें रसाचें आशय आहे. त्या हृदयाच्या आकुंचन-प्रसरणामुळें पीडन हें उत्पन्न होतें. या पीडनामुळें रसद्वारां

नाडीवर दाब उत्पन्न होतो. त्या दाबामुळें व नाडीमध्यें स्थितिस्थापकत्व हा गुण असल्यामुळें रसाचें ठिकाणीं उर्ध्व व तिर्यग् गति उत्पन्न होते व त्यामुळें रसाचें वहन होतें.

अपां कर्मणो न समग्रवचनमिदं नलिकास्थजलस्य तिर्यगूर्ध्वादिगमनादित्यत आह। नाड्यो वायुसंयोगादारोहणम् । नाडिका अन्तर्गतानामपां वायुसंयोगाद् द्रवत्वादारोहणम् तिर्यगूर्ध्वादिगमनं जनयन्ति । न वस्तुतस्तिर्यगादिमपामस्तीति भावः । नाड्यो न केवल वायुसंयोगादपामारोहणं जनयन्त्यन्यस्मादपीत्यत आह । नोदनापीडनात् संयुक्तसंयोगाच्च । नाड्यो बस्त्यादिनेत्रादिगता नालरूपा दीर्घाकार-वस्तुबन्धात्मिकास्तद्वस्त्यादिस्थानामपां नोदनाय प्रेरणाय यदा पीडनम् ततश्च तिर्यगाद्यारोहणं जनयन्ति । संयुक्तसंयोगाच्च यथा वक्रनाड्यो नोदनपीडनव्यतिरेकेणापि वक्रदेशपर्यन्तं गत्वा तद्देशे संयुक्तानां पुनः संयोगात् तिर्यगारोहणं भवति, तथा स्थालीस्थानामपां वन्हिसंयुक्त-स्थालीसंयोगाद् उर्ध्वाद्यारोहणमिति । चरक सूत्रस्थान अ. १ सूत्र. २१ गंगाधर पान ६६–६७.

या रसाचें वहन रोहिणीच्याद्वारां सर्व शरीरांत होत असते. या रोहिणीपासून अनेक प्रकारच्या रसरक्ताचें वहन करणाऱ्या नलिका सर्व शरीरभर पसरलेल्या आहेत. जेव्हां हृदयाचें आकुंचन होतें तेव्हां हृदयांतील रस धातू रोहिणीमध्यें जातो व या रोहिणीचें आकुंचन-प्रसरण होऊन पुढें पुढें रसधातू जात असतो. या रसधातूंतील द्रवत्व व गुरुत्व गुणामुळें रोहिणीच्या ठिकाणीं जो आघात होतो तोच रसाचा दाब होय. या रसाच्या दाबामुळें रोहिण्यांचा विस्तार होतो, त्यावेळीं आपल्या हातास रसाचा दाब लागतो. मनगटाच्या खालीं आपल्या बोटांस लागणारी जी नाडी म्हटली जाते तीत लागणारा दाब हा रसाच्या वहनामुळें उत्पन्न झालेला आहे. अशारीतीनें रसाच्या वहनांतून नोदनात्मक क्रिया प्रमुख अशा रोहिण्यांत उत्पन्न होतात. व यांसच नोदन किंवा दाब म्हटलें जातें. याचा संबंध हृदयाच्या आकुंचन व प्रसरण या क्रियेशीं आहे. या दाबाचें किंवा नोदनात्मक क्रियेचें मोजमाप यंत्रद्वारें केलें जातें,

स्वाभाविक व निरोगी माणसाचें हृद्संकोचकालीं नोदन तरुणपणीं १००-१४० व हृद्विस्ताराचें कालीं नोदन ६५ ते ८५ असतें. वयाच्या मानानें वय वाढत जाईल त्याप्रमाणांत नोदनामध्यें वाढ होत जातें.

व्यान वायु व नोदन

वर रसाच्या वहनामध्यें नोदनात्मक क्रिया कशी उत्पन्न होते याचा विचार केला. या नोदनात्मक क्रियेशीं वायूचा फार मोठा संबंध आहे. वायूचें कर्म म्हटलें कीं त्यांत अभिघात आणि नोदन या क्रिया महत्वाच्या आहेत. या क्रियेमुळेंच तो उर्ध्व, अध आणि तिर्यग् संचार करतो, गमन करतो. हृदयस्थ व्यान वायु असतो असे आयुर्वेदाचें म्हणणें आहे. या व्यानवायूच्या अभिघातात्मक, नोदनात्मक क्रियेमुळें हृदयाचें ठिकाणीं आकुंचन-प्रसरण क्रिया चालू असतें. तसेंच रोहिण्याच्याहि ठिकाणी या व्यानवायूच्या क्रियेमुळेंच आकुंचन व प्रसरण क्रिया घडत असतात. हृदयस्थ रसाचें विक्षेपण करण्यास व्यान वायूच कारणीभूत होतो.

व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचित कर्मणा ।
युगपत् सर्वतो ऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा ।
चरक चि. स्था अ. १५ सू. ३६

या रसाच्या नोदनात्मक क्रियेशीं व्यानवायूचा संबंध आहे. म्हणून रसाभिनोदनवृद्धि किंवा क्षय यांचा विचार करीत असतांना व्यान वायूच्या व रसाच्या स्वाभाविक कार्याचें ज्ञान असणें आवश्यक असल्यामुळें हा विस्तार केला आहे.

नोदन वृद्धीची कारणें

१) संतर्पण आणि २) अपतर्पण.

संतर्पणजन्य कारणें

अतिस्निग्ध आहार, व्यायाम न करणें, अध्यशन करणें, अतिशय पाणी पिणें, अतिबृंहणात्मक औषधें घेणें (शक्तिवर्धक औषधें), परंपरागत

स्थूलता असणें, याचप्रमाणें अतिस्थूलतेमुळें उत्पन्न होणारे व्याधि-मेह (प्रमेह) आमदोष, गलगंड, मधुर रस, गुरु, पिच्छिल, नवान्न, नव मद्य, मांस, अनूप देशांतील पाणी, गुळाचें पदार्थ, पिष्टमय पदार्थ, यांचें अतिसेवन, सुखासीन, दिवसां जास्त झोप घेणें, (आसन सुख) पांडु, ज्वर, मूत्रकृच्छ्र (वृक्कविकार) स्रोतसलेप (रसरक्त वहन करणाऱ्या रोहिण्यांमधून लेप) पंचज्ञानेंद्रियें यांना लेप (त्यांच्या स्रोतसांना लेप) हृद्रोग, मानसविकार, मद्यपान, ऋतुस्राव बंद होण्याचा काल, फलकोश काढल्यामुळें, पार्थिव द्रव्यांचें अति सेवन (सुधा, लवणें) अभिष्यंदी द्रव्यें (मीठ, दहीं.)

अपतर्पणजन्य कारणें–

अति व्यायाम, दगदगीचें आयुष्य, चिंता, शोक, भय, अपतर्पणात्मक आहार (वायूचा प्रकोप करणारा आहार. रूक्ष, लघु गुणात्मक, कटु रसात्मक) हृद्रोग, मूत्रावरोध व मलावरोध यामुळें वायूचा प्रकोप.

संतर्पणजन्य रसाभिनोदन–

संतर्पणामुळें स्थौल्य निर्माण होतें. स्थूलतेमुळें रोहिण्यामध्यें व स्रोतसामध्यें उपलेप निर्माण होतो. स्रोतोरोध उत्पन्न होतो. या अवस्थेंत वायू प्रकुपित होतो. रसाच्या वृद्धिमुळें त्याचें नोदन कार्य अधिक वाढतें. म्हणून हे जे रोहिण्यांच्या ठिकाणीं असलेलें नोदनात्मक स्वाभाविक कार्य असतें, त्यांत वाढ झालेली असते. वर जे संतर्पणजन्य व्याधि सांगितले आहेत. त्यामध्येंहि रसवृद्धि व वायूची वृद्धि झालेली दिसून येते. उदा:-मूत्रकृच्छ्र. मूत्रकृच्छ्र विकारा-

मध्यें शरीरस्थ क्लेदाचें मूत्रद्वारें होणारें बहिर्गमन योग्य रीतीनें होत नसल्यानें शरीरस्थ अप् धातूची वृद्धि होते, व ही वृद्धि कमी करण्या-साठीं म्हणून वायू अधिक कार्य करूं लागतो. यामुळें क्लेदाचें बहिर्गमन मूत्रवह स्रोतसांमार्गे होत नाहीं म्हणून मूत्रकृच्छ्र विकारामुळें रसाभिनोदन वाढतें. याची चिकित्सा म्हणजे मूत्रवहस्रोतसें मोकळी करणें हें होय.

याचप्रमाणें इतर जे व्याधि आहेत त्यांचाहि विचार चिकित्सेच्या दृष्टिकोनांतून करावयास पाहिजे.

स्थौल्य

या विकारांत सामान्यतः १६० पासून २००-२१० पर्यन्त रसाभिनोदन असतें. यावेळीं भ्रम, अंगसाद, अशक्तता, क्लम (थोडयाशा श्रमानें थकवा वाटतो).

सुवर्णसूतशेखर	·।· ते ·।।· गुंज
ताप्यादिलोह	१ ते २ गुंजा
सर्पगंधाचूर्ण	·।।· ते १ गुंज
शृंगभस्म	१ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण	२ ते ४ गुंजा

१ पुडी अनुपान-पाणी. दिवसांतून ३-४ वेळां.

रोहिणी उपलेप

(Arterio Sclerosis)

सामान्य लक्षणें—

रोहिण्यांच्या ठिकाणीं काठिण्य आलेलें असतें, नाडी भरीव, मनगट, दंड, मान, कपाळ व

कानाचे पुढें स्पष्ट दिसते, यांतील रसप्रवाह बोटानें दाबून बंद केला तरी उपलेपामुळें नाडीचा दाब जोरानें बोटांस भासतो. यामुळें हळूं हळूं हृत्कोषविस्तार होतो व त्यामुळें श्वास, कास, भ्रम (चक्कर), मूर्च्छा ही लक्षणें होतात. याशिवाय शिरःशूल, कर्णनाद, अजीर्ण, आध्मान, आनाह, पोटशूल, पिंडिकोद्वेष्टन, मुंग्या येणें, गात्रबधिरता, थकवा, पांडुता, दृष्टिमांद्य, डोळयामध्यें रक्तस्राव इंद्रिय कार्यहानि, इ. लक्षणें होतात.

श्वास, कास, भ्रम ही लक्षणें असतांना

लक्ष्मीविलासगुट	·।· ते ·।।· गुंज
शृंगभस्म	१ ते २ गुंजा
सर्पगंधाचूर्ण	·।।· ते १ गुंज
सितोपलादिचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान-मध. दिवसांतून ३ वेळां.

भ्रम, शिरःशूल, कर्णनाद, मुंग्या येणें, पिंडिकोद्वेष्टन, गात्रबाधीर्य.

सुवर्णसूतशेखर	·।· ते ·।।· गुंज
सर्पगंधाचूर्ण	·।।· ते १ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
अश्वगंधाघन	१ ते २ गुंजा

१ पुडी अनुपान-दूध. दिवसांतून ३ वेळां.

आनाह, आध्मान, पोटशूल, मलावरोध.

पाचक, दीपक, अनुलोमक, विरेचक.

शंखवटी	१ ते २ गुंजा
कनकसुंदर	१ ते २ गुंजा
चंद्रप्रभा	१ ते २ गुंजा

१ पुडी अनुपान-लिंबुरस व साखर दिवसांतून ३ वेळां. याबरोबर खालील पुडया देणें.

	सुवर्णसूतशेखर ·।· ते ·।।· गुंज सर्पगंधाचूर्ण ·।।· ते १ गुंज सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान–पाणी. दिवसांतून ३ वेळां. रसाभिनोदनवृद्धि जस जशी कमी होत जाईल तस तशा या पुडया कमी करीत जाव्यात.
मूर्च्छा व पक्षवध (अर्धांगवध-युक्त मूर्च्छा) असतांना	सुवर्णसूतशेखराचें चाटण आल्याचा रस व मध यांमधून ५।५ मिनिटांनीं शुद्धिवर येईतोपर्यंत चाटवावें.
शुद्धिवर आल्यानंतर	ताप्यादिलोह १ ते २ गुंजा सर्पगंधाचूर्ण ·।।· ते १ गुंज सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान–पाणी. दिवसांतून ३ वेळां.
नेत्रामध्यें रक्तस्राव, दृष्टिमांद्य	मूर्च्छेवरील औषधें द्यावीत. व कोरफडीच्या गिराची पुरचुंडी डोळ्यावरून फिरवीत रहावे. डोळ्यामध्यें शर्करामिश्रित स्तन्याचें थेंब टाकावें.

मूत्रकृच्छ्र (वृक्कविकार)

या विकारांत मूत्राची उत्पत्तीच कष्टानें होत असते. म्हणून मूत्राचें प्रमाण अल्प असतें. दोषयुक्तहि असतें. मूत्राचें अल्प प्रमाण असल्यामुळें शरीरस्थ क्लेद बाहेर जात नाहीं. यामुळें रसाची अभिवृद्धि होऊन रसाभिनोदन वाढतें.	मूत्रकृच्छ्राची चिकित्सा करावी. व तात्पुरते रसाभिनोदन कमी होण्याकरितां सर्पगंधाचूर्ण १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान–पाणी. दिवसांतून ३ वेळां द्यावें.

ऋतुस्राव बंद होण्याचा काल. या कालांत वायूचा प्रकोप अधिक झाल्यामुळें रसाभिनोदन वाढतें.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा सर्पगंधा ·।।· ते १ गुंज जटामांसीचूर्ण २ ते ४ गुंजा सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा अश्वगंधाघन १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान–पाणी. दिवसांतून ३ वेळां.

आमामुळें रसाभिनोदनवृद्धि

लक्षणें–

स्रोतोरोध, आनाह, आध्मान, जाड्य, क्लम, मलावरोध, स्रोतोरोधाचीं स्थानें- हृदय, रोहिण्या, नीला, सूक्ष्म रसवाहिन्या, मूत्रवहस्रोतसें, मस्तिष्क,	दीपन, पाचन, वाताचें अनुलोमन. सुवर्णसूतशेखर ·।· ते ·।।· गुंज सर्पगंधाचूर्ण ·।।. ते १ गुंज शिलाजीत १ ते २ गुंजा अश्वगंधाघन १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान–पाणी. दिवसांतून ३–४ वेळां. याशिवाय पाचक–दीपक खालील चिकित्सा करावी. लशुनादिवटी २ गुंजा आल्याचा रस, लिंबाचा रस व साखर यांमधून द्यावी.
मूत्रवह स्रोतसें रुद्ध असतांना	गोक्षुरफांट ५ तोळे, दिवसांतून थोडा थोडा द्यावा.
पार्थिव द्रव्यांच्या अति सेवनामुळें (सुधा व लवणें)	निदान परिवर्जन करणें. अम्ल रसात्मक द्रव्यांचा उपयोग करणें. उदा– महाळुंग रस, लिंबाचा रस, साखर घालून द्यावा.

अपतर्पणजन्य रसाभिनोदनवृद्धि

पक्षवध, अर्दित, अर्धांगवात	स्नेहन, स्वेदन, सौम्य विरेचन. अभ्यंतर स्नेहन, बाह्यस्नेहन. (अभ्यंग) स्नेहनाचें मर्दन करावें. द्रव्य म्हणून नारायणतैल बापरावें.

बाह्वा मगज रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं कोळून, गाळून पिणें.

महायोगराजगुग्गुळ	१ ते २ गुंजा
अश्वगंधाचूर्ण	१ ते २ गुंजा
सर्पगंधा	·।।· ते १ गुंज

१ पुडी अनुपान – पाणी. दिवसांतून ३ वेळां.

मानसिक– शोक, भय, क्रोध इ. कारणांनीं र. वृद्धि होते. हें दोन्ही संतर्पण व अपतर्पणजन्य आहे.

निदान परिवर्जन करणें व मनःशांति निर्माण होण्यासाठीं उपासना मार्गाचा अवलंब करण्यास सांगावे.

वरील कारणानें कांहीं व्यक्तींत रसाभिनोदनाची वृद्धि होते. व ती पुष्कळ वेळां तात्पुरती असते म्हणून मानसिक विकार शम पावल्यानंतर रसाभिनोदन पुनः पुनः घेऊन तें मानसिक विकारामुळेंच आहे याची खात्री करून घ्यावी लागते.

सूक्ष्मसुवर्णभस्म	१ ते २ गुंजा
सुवर्णसूतशेखर	·।· ते ·।।· गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
जटामांसीचूर्ण	२ ते ४ गुंजा
वेखंडचूर्ण	२ गुंजा
अश्वगंधाघन	१ ते २ गुंजा

१ पुडी अनुपान – दूधसाखर. दिवसांतून ३ वेळां.

रसाभिनोदन अधिक असल्यास — सर्पगंधाचूर्ण ·।· ते ·।।· गुंज वरील प्रत्येक पुडींत घालावें.

आहार

संतर्पणजन्य रसाभिनोदन.

स्निग्ध, अभिष्यंदि, आहार वर्ज करणें. भाकरी, तेल, तूप वर्जित अशी चपाती, बाजरीची भाकरी, पालेभाज्या, गोड ताजें ताक, तीळ, गूळ, दूध, कटुरस. वर्ज–मीठ, दही, तेल, तूप (तिळाचें तेल चालतें.) वनस्पतीज तूप, शेंगदाणा, खोबरें, हरभऱ्याच्या डाळीचें पदार्थ. भात, साखर, इक्षुरस, अति पाणी पिणें.

अपतर्पणजन्य

भात, भाकरी, तूप, ताक, फोडणी दिलेल्या भाज्या, दूध, पोळी, बाजरीचीं

भाकरी, लोणी, खिचडी, मीठ, प्रमेह असल्यास भात, गूळ, साखर वर्ज करावी. वर्ज – कटु, तिक्त, कषाय रसात्मक द्रव्यें. उदा– मोहरी, मिरची, रूक्षान्न उदा– राळे, सावें, भगर.

रसाभिनोदन क्षीणता

निरोगी माणसांत निरोगी अवस्थेंत कांहीं कांहीं माणसांत रसाभिनोदन क्षीणता आढळून येते. पण त्यांच्या कांहीं तक्रारी असतहि नाहींत. अचानकपणें अशा लोकांत पुढील लक्षणें उत्पन्न होतात.

भ्रम, थकवा, चेहरा निस्तेज, आलस्य, शिरःशूल, बेसावधपणा, उभे राहिले असतां तोल जातो. उभे राहिले असतां नाडी वाढते, बसले असतां कमी होते व आडवे निजवले असतां ३०–४० ठोके कमी होतात. नाडी मृदु व नाडीवर बोटानें दाब दिला असतां बंद पडते. निजल्यापेक्षां उभे राहिले असतां हृद् विकास– कालचे रसाभिनोदन २० ते ३० नें कमी होतें.

सूक्ष्म सुवर्णभस्म	१ ते २ गुंजा
सुवर्णसूतशेखर	·।।· ते १ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म	१ गुंज
प्रवाळभस्म	२ गुंजा
शृंगभस्म	२ गुंजा
सितोपलादिचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान – दाडिमावलेह, मोरावळा, दूधसाखर.

टीप– या चिकित्सेनें रसाभिनोदनांत फारशी वाढ होत नाहीं. पण वरील सर्व लक्षणें कमी होतात. व तो सर्व व्यवहार करूं शकतो.

खालील विकारांत रसाभिनोदन क्षीण होतें.

विकार–

हृद्रोग– डाव्या जवनिकेचा अवसाद, (Coronary Thrambosis) — या रोगांची चिकित्सा करून तात्पुरते रसाभिनोदन वृद्धिसाठीं.

हृदय रोहिणी अवरोध व घटसर्पजन्य हृत्स्नायुसदाहशोथ)	हेमगर्भ १/४ गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध मिसळून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवावें.
घटसर्पामध्यें तीव्र ज्वर असल्यास व रसाभिनोदन कमी झाल्यास	लक्ष्मीविलासगुटी ।' तें ॥' गुंजेचे चाटण द्यावें.
राजयक्ष्मा– यामुळें रसाभिनोदन क्षीण असल्यास.	राजयक्ष्म्याची चिकित्सा करणें.
अभिघात– (Shock)	
विद्युत्, अग्नि, शस्त्रकर्म, सूचिकाभरण, या सर्व अवस्थेमध्यें हृदय विकल होतें, हृद्रव होतो, त्याची गति कमी होते व या सर्वांचा परिणाम म्हणून रसाभिनोदन कमी होतें, मूर्च्छा येते. दरदरून घाम सुटतो, नाडी क्षीण, हातापायास गारवा.	महालक्ष्मीविलास १/४ गुंज आल्याचा रस व मध यांत उगाळून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटविणें.
मूर्च्छा फार वेळ राहिल्यास-	सुवर्णसूतशेखराचें चाटण चाटविणें.
तीव्र रक्तस्राव-	रक्त स्तंभन करणें व स्तंभन झाल्यानंतर चंद्रकला रस १ ते २ गुंजा प्रवाळभस्म २ गुंजा मौक्तिकभस्म ॥' गुंज सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूधसाखर. दिवसांतून ३ वेळां.

अप्धातु क्षीणता–
(Dehydration)

तीव्र अतिसार, तीव्र छर्दि, विषूचिका.	त्या त्या रोगाची चिकित्सा करावी. व नारिकेलोदक वरचेवर थोडें थोडें द्यावें. सुवर्णसूतशेखर किंवा महालक्ष्मीविलास

किंवा मल्लसिंदूर यांचे आल्याच्या रसांत उगाळून मध मिश्र करून चाटण चाटवावें.

आहार

निरोगी अवस्था–	मधुर, स्निग्ध, लघु आहार. जुन्या तांदळाचा भात, तूप, मुगाचें वरण, भाज्या, एकदां तापवलेलें दूध, मधुर ताक, भाकरी, पोळी, बाजरीची भाकरी, लोणची. त्यानें हळूं हळूं फिरण्याचा व्यायाम करावा. मानसिक व शारीरिक विश्रांती घ्यावी.
हृद्रोग–	त्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें.
राजयक्ष्मा–	पौष्टिक, बृंहणात्मक आहार द्यावा.
अभिघात–	दूध, तूप, मिसळून देणें, नंतर द्रवाहार देणें, उदा–नारिकेलोदक, मंड, पेया इ. नंतर हळूं हळूं लघु आहार.
तीव्र रक्तस्राव–	शीत व अम्ल रसात्मक अमसुलाचें सार, लिंबाचें सरबत, दाडिमस्वरस, चिंचेचें सार, मधुर ताक, कवठाचें सार, आंब्याचें पन्हें, नंतर लघु आहार. भाकरी, भात, तूप, लोणी इ.

मूत्रकृच्छ्र -- मूत्राघात -- अश्मरी

वातज मूत्रकृच्छ्र लक्षणें–	चिकित्सा
वंक्षण, बस्ति, मेढ्र या ठिकाणीं तीव्र वेदना; पृष्ठ, कुक्षि, उदर येथें पण तीव्र शूल असतो. आध्मान, हृल्हास, कातरल्याप्रमाणें पीडा, बस्तिशोथ, तोद, अविपाक, वारंवार व अल्प-अल्प कष्टानें मूत्रप्रवृत्ति.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा शंखवटी १ ते २ गुंजा कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान – लिंबाचा रस व साखर. दिवसांतून ३ ते ४ वेळां. २) गोक्षुर फांट– २ तोळे गोक्षुर, ४० तोळे पाणी फांट करून दिवसभर थोडें थोडें पाजणें. ३) नारळाचें पाणी दिवसांतून ५ ते १० तोळे. ४) रात्रीं २ तोळे धने, १० तोळे पाण्यांत भिजत टाकून सकाळीं तें कुसकरून गाळून तें पाणी पिण्यास देणें.
वेदना कमी झाल्यावर.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा शिलाजीत २ गुंजा उन्हाळ्याचें औषध १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान – पाणी. दिवसांतून ३ वेळां.

पित्तज मूत्रकृच्छ्र लक्षणें–

पीत किंवा सरक्त, सशूल, सदाह व कष्टानें मूत्रप्रवृत्ति.	चंदनादिवटी २ गुंजा उन्हाळ्याचें औषध २ गुंजा प्रवाळभस्म २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– शीतजल. दिवसांतून. ३ ते ४ वेळां.

वरीलप्रमाणेंच गोक्षुरफांट किंवा तृणपंचमूळ क्वाथ ५ तोळे दिवसभर थोडा थोडा पिण्यास द्यावा.

कफज मूत्रकृच्छ्र लक्षणें–

वृक्क, बस्ति, मेढ्र गौरव, व शोथ, तसेंच मुखशोथ असतो. मूत्र पिच्छिल असतें.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा वंगभस्म १ गुंज उन्हाळ्याचें औषध २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान – पाणी. दिवसांतून ३ ते ४ वेळां गोक्षुरफांट देणें.
शोथघ्न म्हणून	पुनर्नवाघन १ ते २ गुंजा वरील पुड्यांमधून देणें.

टीपः– या कफज मूत्रकृच्छ्रामध्यें तीव्र असें अग्निमांद्य असतें. व तृप्ति हें लक्षण विशेषत्वानें दिसून येतें. रुग्णास कोणताहि आहार घेण्याची अगर पाणीहि पिण्याची इच्छा होत नाहीं. असें असूनहि रुग्ण फारसा कृश होत नाहीं. हें असाध्यत्वाचें लक्षण आहे. या अवस्थेंत सर्वांगावर शोथहि असतो.

तीव्र अग्निमांद्य, मूत्राल्पता, मूत्र पिच्छिल, गढूळ असतें. मूत्रामध्यें तैल बिंदु टाकला असतां तो स्थिर असतो. पसरत नाहीं. सर्वांगावर शोथ, क्वचित् ज्वर असतो. चिरकारी विकार आहे.	आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा चंद्रप्रभा २ गुंजा वंगभस्म १ गुंज पुनर्नवाघन २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान – पाणी. दिवसांतून ३–४ वेळां.

सान्निपातिक लक्षणें–

पृष्ठ, बस्ति, मेढ्र, उदर, वृक्क येथें तीव्र वेदना व दाह, वृक्क व	आरोग्यवर्धिनी २ गुंजा लक्ष्मीनारायण ·। ते ·॥· गुंज

बस्ति येथें शोथ, सशूल, सदाह, पीतवर्णात्मक, पिच्छिल, अल्प, अल्प व वारंवार मूत्रप्रवृत्ति. क्वचित् सरक्त मूत्रप्रवृत्ति. सर्वांग शोथ, विशेषतः मुखावर शोथ असतो. अग्निमांद्य, तृप्ति, ज्वर, हा असाध्य असतो. ही लक्षणें चिरकारी वा आशुकारी असूं शकतात. शेवटीं मूर्च्छा येते. नाडी वेगवान व टणक असते. आध्मान, मलावरोध.

चंद्रप्रभा	२ गुंजा
उन्हाळयाचें औषध	२ गुंजा
गोक्षुर चूर्ण	४ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां.

तसेंच पुनर्नवादि क्वाथ दिवसांतून ५ तोळे थोडा थोडा देणें.

मूर्च्छा असल्यास– सुवर्णसूतशेखर ।· ते ।।· गुंज आल्याच्या रसांत उगाळून मध घालून वरचेवर चाटवणें.

आहार

मीठ, दही, तैल वर्ज.

वातज– मधुर, स्निग्ध, उष्ण असावा. दूध, भाकरी, भात, तुपाच्या फोडणी दिलेल्या भाज्या. डाळी वर्ज.

पित्तज– शीत, मधुर आहार द्यावा. ताक, भाकरी, लोणी, पालेभाज्या, सरबत, फळें, डाळींबरस, भात, मुगाचें वरण, दूध.

कफज– भात, भाकरी, मुगाचें वरण, दूध, पालेभाज्या, रूक्ष आहार, नुसत्या उकडलेल्या भाज्या.

सान्निपातिक– केवळ दुग्धाहार.

मूत्रकृच्छ्र व मूत्राघात यामध्यें भेद–

मूत्राघात व मूत्रकृच्छ्र हें दोन विकार निरनिराळे आहेत.

मूत्रकृच्छ्रामध्यें प्रकुपित दोषांमुळें सकष्ट व अल्प प्रमाणांत विकृत अशा मूत्राची उत्पत्ति होते. तसेंच या विकारांत वृक्क, गविनी व बस्ति येथें स्थानसंश्रयहि झालेला असतो.

मूत्रकृच्छ्रामध्यें– मूत्रप्रवृत्तीचें वेळीं अतिशय त्रास होणें हें प्रमुख लक्षण असतें. (सकष्ट मूत्रप्रवृत्ती हें प्रमुख लक्षण असतें.) व मूत्रविबंध हा अल्प प्रमाणांत असतो. परंतु मूत्राघातामध्यें मूत्रविबंध हे प्रमुख लक्षण असून अल्प प्रमाणांत सकष्टता हें लक्षण असतें.

परंतु मूत्राघातामध्यें मूत्राची उत्पत्ति योग्य प्रमाणांत व योग्य प्रकारें होऊनहि तें मूत्र मूत्राशयांत आल्यावर तेथेंच संचित होऊन राहतें.

मूत्राघात

कारणें–वाताष्ठीला, अष्ठीला किंवा पौरुषग्रंथी, मूत्र-पुरीष व शुक्र यांचा अवरोध, वातविकृति, अर्श, तसेंच कांहीं ज्वर यामुळें मूत्र मूत्राशयांतून बाहेर पडूं शकत नाहीं. मूत्राशय हा मूत्रानें भरलेला असतो. विशेषतः मलावरोध हें कारण असतें.

सामान्य लक्षणें– मूत्राशय हा मूत्रानें भरलेला असतो. तो ओटीपोटामध्यें हाताला लागतो. तेथें आध्मान (उत्सेध) दिसतें. प्रवाहण केलें असतांहि मूत्रप्रवृत्ति होत नाहीं व थोडचा थोडचा वेदना असतात.

कारणानुरूप चिकित्सा करावी.

मलावरोधज– स्नेहबस्ति देणें. रोज रात्रीं निजतांना २ चमचे एरंडेल व २ चमचे मध देणें.

अर्शज–

यांत अर्शाची लक्षणें स्वतंत्र असतील. विशेषत: अभ्यंतर अर्शामुळें मूत्राघात होतो.	सूरणवटक ४ गुंजा तिलादिमोदक ३ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३–४ वेळां. रात्रीं– स्वादिष्टविरेचनचूर्ण ३ ते ४ मासे किंवा बालहरीतकी चूर्ण ३ ते ४ मासे. अनुपान– गरम पाणी.
अर्शासाठीं–	बिब्बा तुपांत उगाळून अर्शास आंतून लावणें. किंवा बाहेरून कांद्याचा शेक देणें. मूत्र निर्हरणासाठीं मूत्रशलाका वापरणें.
अष्ठीला वगैरे ग्रंथीमुळें असल्यास	शस्त्रकर्म करावें.
पौरुषग्रंथीवृद्धिज	अधिक वृद्धि असल्यास शस्त्रकर्म करावें.
पौरुषग्रंथी अल्प असल्यास व अल्प मूत्रप्रवृत्ति होत असल्यास	चंदनादिवटी २ गुंजा पुनर्नवाघन २ गुंजा उन्हाळ्याचें औषध २ गुंजा गोक्षुर चूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
तीव्र तापामुळें मूत्राघात असल्यास सान्निपातिक ज्वरांत अपानदुष्टीमुळें मूत्राघात असतो.	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा उन्हाळ्याचें औषध २ गुंजा गोक्षुर चूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ४ वेळां. २) पळसाची फुलें पाण्यांत उकळून गरम गरम ओटीपोटावर बांधणें.
मूत्राशय फार भरला असल्यास	मूत्रशलाकेनें मूत्र काढणें. परंतु या विकारांत पुन: पुन: मूत्रशलाकेचा उपयोग करूं नये.

सर्व मूत्राघातामध्यें	नारायणतेलानें उदरावर स्नेहन करून स्वेद द्यावा. किंवा अवगाहन करावें.

आहार–

उष्ण, स्निग्ध असा आहार द्यावा. मूत्रप्रवृत्ति होईपर्यंत अल्पमात्रेंत द्रवाहार द्यावा. विशेषत: गोक्षुरसिद्ध दूध द्यावें. २-३ दिवसपर्यंत द्रवाहारावरच ठेवावे. मूत्रप्रवृत्ति प्राकृत होऊं लागल्यावर आहार सुरू करावा. मलावरोध होऊं देऊं नये. मलावरोध झाल्यास स्निग्धबस्ति द्यावा.

अश्मरी

हा विकार केवळ मूत्राशयांतच होतो किंवा असतो, असें नाहीं. तर तो वृक्कामध्येंहि होतो, असतो. याचें वर्णन आयुर्वेदांत नसलें तरी प्रत्यक्ष तो वृक्कस्थ अश्मरी क्ष किरणानें पाहतां येतो. वृक्कांतून लहान लहान मूत्राचें खडे गविनीच्याद्वारें मूत्राशयांत येत असतात. तेव्हां कांहीं वेळां हें खडे गविनीमध्येंहि अडकून राहतात. तसेंच मूत्राशयांतहि अश्मरी उत्पन्न होतात.

पूर्वरूपें

ज्वर, बस्ति व त्याच्या आजूबाजूच्या भागांत पीडा (बस्तिशिर, मुष्क, शेफस्, पृष्ठ, कुक्षि,) अरुचि, मूत्रकृच्छ्र, बस्तिविस्तार, अंगसाद, मूत्रास वास, दोषात्मक लक्षणें असतात.	सामान्य चिकित्सा.

सामान्य लक्षणें–

नाभि, बस्ति, सेवनी, जननेंद्रिय, पृष्ठ, कटि याठिकाणीं मूत्रप्रवृत्तीच्यावेळीं वेदना होतात.

मूत्राचा अवरोध होतो. किंवा मूत्राच्या दोन धारा एकाच वेळीं येतात. मूत्राची धार मध्येंच बंद पडतें. कारण मूत्रप्रवृत्तीच्या वेळीं अश्मरीमुळें मार्गाचा अवरोध होतो. मूत्र गोमेदाप्रमाणें (पीत) गढूळ असतें. सिकतायुक्त मूत्र असतें. सरक्त मूत्र येतें. लंघन, उन्हांत हिंडणें,पोहणें, जास्त चालणें यामुळें वेदना अधिक होतात.

मूत्रशर्करा असल्यास ती वृक्कांतून किंवा गविनींतून मूत्राबरोबर येत असतां पृष्ठ, पोट व वृषण येथपर्यंत वेदना होतात. या कांहीं तासापासून कांहीं दिवसपर्यंत असतात. शर्करा मूत्राशयांत आल्यावर या वेदना थांबतात. मूत्र अल्प अल्प व पीत, रक्तयुक्त असतें.

वृक्कांतून गविनीमार्गें मूत्राशयांत येत असलेल्या अश्मरी, व शर्करे-मुळें होणारा तीव्र शूल	चंद्रप्रभा २ गुंजा शंखवटी १ गुंज कनक सुंदर २ गुंजा श्यामावटी २ ते ४ गुंजा गोक्षुर चूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– लिंबू रस व साखर. गरम पाणी. दिवसांतून ४ वेळां. शूल कमी होईपर्यंत १ । १ तासांनीं एक एक पुडी द्यावी.

टीप– दोषप्रत्यनीक चिकित्सा करण्यापेक्षां व्याधिप्रत्यनीक चिकित्सा ही जास्त श्रेयस्कर आहे. व त्यास अनुसरून चिकित्सा लिहीत आहे.

अश्मरीच्या शल्यामुळें मूत्र–प्रवृत्तीचें वेळीं दाह, मूत्राल्पता, रक्तमूत्रता असल्यास	चंद्रप्रभा २ गुंजा चंदनादिवटी २ गुंजा उन्हाळयाचें औषध २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– शीत जल. दिवसां–तून ४ वेळां. २) गोक्षुरफांट मागें सांगितल्याप्रमाणें करून देणें. ३) मक्याच्या कणसांतील केंस २ तोळे पाणी ४० तोळे घेऊन फांट करून वरचे-वर थोडा थोडा पाजणें.
वृक्क व गविनीमध्यें अश्मरी असल्यास	मुळघाचा क्षार २ गुंजा. मुळघाच्या रसांतून सकाळीं १ वेळां देणें. यामुळें अश्मरीचें क्षरण होऊन तो विरघळतो. किंवा लहान होऊन मूत्राशयांत येतो. २) सागवान मुळीचें गंध २ चमचे रोज सकाळीं व संध्याकाळीं देणें. यानें मूत्र–शर्करा लहान होते. तसेंच मूत्रांतून जाणारें कॅल्शियम ऑक्झलेटस् कमी होत असल्याचा अनुभव आहे.
मूत्राशयांत असणारे अश्मरीवर	चंद्रप्रभा १ ते २ गुंजा अपामार्ग क्षार २ गुंजा कदलीक्षार २ गुंजा यवक्षार २ गुंजा पुनर्नवाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– गोक्षुर फांट २ ते ४ तोळे. दिवसांतून ३ ते ४ वेळां द्यावें. यानें लहान अश्मरी पडून जातो.
वृक्क, गविनी व मूत्राशय येथें मोठे अश्मरी असल्यास	शस्त्रकर्म करावें.

आहार–.

टोमॅटो, चुका, द्विदलधान्यें, दही या गोष्टी वर्ज करून सर्व साधा आहार घ्यावा.

प्रमेह–बहुमूत्रता

प्रमेह हा विकार सामान्यतः दोन तऱ्हेच्या लोकांत आढळून येतो. १) स्थूल, २) कृश. स्थूल लोकांत होणारा हा संतर्पणजन्य व कृश लोकांत होणारा अपतर्पणजन्य होय. म्हणून या दोन्ही तऱ्हेच्या लोकांचा विचार चिकित्सेच्यादृष्टीनें करणें आवश्यक आहे. तसेंच या रोगाचा प्रादुर्भाव बाल, तरुण व प्रौढावस्थेंत दिसून येतो. विशेषतः हा विकार प्रौढावस्थेंत अधिक लोकांत आढळून येतो. कांहीं कुटुंबांत हा अनुवंशिकहि असतो. म्हणून चिकित्सेच्यादृष्टीनें बाल, युवा व प्रौढ यांचाहि विचार करावा लागतो.

प्रमेह हा विकार म्हणजे हल्लीं समाजांत ज्या विकारास मधुमेह म्हटलें जातें, तोच विकार होय.

पूर्वरूपें

हाता-पायाच्या तळव्याची आग, गात्रांना स्निग्धता, गुरुता, मूत्र मधुर रसात्मक व श्वेत वर्णात्मक असतें. तंद्रा, अंगसाद, तृष्णा, श्वास, मुखस्थ गल, तालू, कंठ, जिव्हा यांना मधुर वास येतो. गल-तालू शोष व तेथें मलांची उत्पत्ति होतें. केसांत अधिक गुंता होतो. नखांची अधिक वाढ होते. दाट व पुष्कळ मूत्रप्रवृत्ति होतें. हृदयोलेप.

ही पूर्वरूपामध्यें सांगितलेली लक्षणें हल्लीं म्हटल्या जाणाऱ्या मधुमेही रुग्णांत आढळून येतात. म्हणून हल्लीं समाजांत आढळणारा व म्हटला जाणारा मधुमेह म्हणजे आयुर्वेदानें सांगितलेला प्रमेह विकारच होय. मधुमेह ही शास्त्रीयदृष्टचा प्रमेहाची शेवटची अवस्था होय. त्यामध्यें सर्व शरीरांत मधुरत्व उत्पन्न झालेलें असतें व ती असाध्यावस्था म्हणून सांगितली आहे.

हा विकार कफप्रधान त्रिदोषात्मक आहे. आयुर्वेदानें सांगितलेल्या 'आस्यासुखं' इ. कारणांचा विचारहि निदान परिवर्जनाच्यादृष्टीनें

करणें आवश्यक आहे. उदा.– आस्यासुखं-नुसते बसून रहाणें. व्यायाम न करणें. यामुळेंहि प्रमेह विकार झाल्याची उदाहरणें व्यवहारांत सांपडतात. अशा कांहीं लोकांना व्यायाम करावयास सांगून ते रोगी बरें झाल्याचें अनुभव आले आहेत.

प्रमेह हेतु	परिवर्जन
१ आस्यासुखम्	१ व्यायाम करणें.
२ स्वप्नसुखम्	२ झोप कमी घेणें, दिवास्वाप वर्ज
३ दही, गूळ इ. पदार्थांचें सेवन	३ या कफकारक पदार्थांचा त्याग करावा.
४ नवान्न	४ एका वर्षानंतरचें जुनें धान्य खावें.
५ गुडवैकृत. गूळ, साखर	५ गुळापासूनच होणारे इतर पदार्थ व इक्षुविकार काकवी इ. वर्ज करावे.

पूर्वरूपें

अवयवांची स्निग्धता, गुरुता, पिच्छिलता, केसांच्या जटा होणें, मूत्रास मुंग्या लागणें, मधुरास्यता, तंद्रा, स्थूलत्व, नखादींची अतिशय वाढ, अंगसाद, तालू-गल-दंत-मुख येथें अधिक मलोत्पत्ति, गल-तालू शोष, हृदयोपलेप.	प्रथम निदान परिवर्जन करावें व धात्वग्नि वृद्ध करणारी द्रव्यें द्यावीं. १) हरिद्रेस (कच्ची हळद) आमलकीच्या रसाच्या ७ भावना देऊन त्याचें चूर्ण करून ठेवावें. व १ ते २ मासे दिवसांतून २ वेळां द्यावें. २) वंगभस्म ·।· ते १ गुंज सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा शिलाजीत २ गुंजा जसदभस्म १ गुंज प्रवाळभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान– २ चमचे कडुनिंबाच्या पाल्याचा रस. दिवसांतून ३ वेळा.

हस्तपादतलदाह, अतितृष्णा, दौर्गंध्य, शीतेच्छा.	प्रवाळभस्म १ ते २ गुंजा गुळवेलसत्व २ ते ४ गुंजा सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा चंद्रकला १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– गुडूची स्वरस किंवा क्वाथ. दिवसांतून ३ वेळां.

सामान्य लक्षणें–

पुष्कळ व गढूळ मूत्रप्रवृत्ति, पुष्कळ वेळां व मूत्राचें प्रमाण अधिक असतें.	चंद्रप्रभा गुटी १ ते २ गुंजा जम्बुबीजचूर्ण २ ते ४ गुंजा त्रिवंगभस्म १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३-४ वेळां.

सूचना– हें लक्षण जेव्हां पित्तज किंवा वातज प्रमेहाची अवस्था येते, तेव्हां दिसतेंच असें नाहीं.

नवीन परीक्षण तंत्र–

मूत्रांत शर्करा आहे किंवा नाहीं हे पाहण्याचें नवीन तंत्र. गुडमार वनस्पतीचें चूर्ण ·।· गुंज जिभेवर सोडून लाळेशीं मिश्र करावें. तें चांगलें मिसळल्यानंतर रोग्याच्या तोंडांत थोडी साखर टाकावी. नंतर गुळाचा एक खडा चघळण्यास द्यावा. त्याच्या रक्तांत किंवा मूत्रांत शर्करा असेल तर त्यास मधुर रसाची जाणीव होतें. जर मूत्रांत किंवा रक्तांत शर्करा नसेल तर साखर व गूळ याचा मधुर रस जाणवत नाहीं, लागत नाहीं.

सकाळच्या वेळीं मूत्रांत शर्करा नसल्यास वरील प्रयोगांत गोडी कळत नाहीं. जर जेवणानंतर २ तासानें हा प्रयोग केला व मूत्रांत ·।· ते ·।।· टक्का प्रमाणांत शर्करा असेल तरीहि साखरेची वा गुळाची गोडी लागते.

तैलबिंदूनें परीक्षण–

शर्करा अधिक प्रमाणांत असलेल्या मूत्रांत तैलबिंदु टाकला असतां तो स्थिर राहतो. पसरत नाहीं. नत्र (Albumin) द्रव्य हें मूत्रांत

असल्यासहि तैलबिंदु पसरत नाहीं. पण तेव्हां विशिष्ट गुरुत्व वाढत नाहीं. प्रमेहांत वाढलेलें असतें.

कफज लक्षणें

बहुमूत्रता, मूत्र-शुक्ल, स्वच्छ, फिक्कट, अधिक शर्करायुक्त असतें. स्वच्छ पदार्थावर मूत्राचा थेंब पडल्यास मूत्र सुकल्यावर तेथें सांका जमतो. आळस, तृष्णा, (क्लेदाचें अति वहन झाल्यामुळें) अग्निमांद्य, तंद्रा, जाडच, मुखमाधुर्य व मुखास चिकटा असतो. त्वचेवर स्निग्धता, नपुंसकत्व, यामध्यें शीत, निर्गंध, अविल, पिच्छिल, इक्षुरसाप्रमाणें मधुर, सान्द्र, (द्रवत्व कमी) अम्ल (Acidic) रसात्मक व कांहीं काल ठेवल्यास खालीं घन व वर स्वच्छ, पिठाप्रमाणें पांढरे व पुष्कळ, शुक्राप्रमाणें किंवा शुक्र- मिश्रित; बारीक, कठिण कणयुक्त; अधिक मधुरत्व व अधिक शीतत्व, प्रमाणानें अल्प व वारंवार मूत्रप्रवृत्ति तन्तुयुक्त, असें मूत्र असतें.

उदकमेह लक्षणें

अग्निमांद्य, मधुरास्यता, स्थौल्य, मुखलिप्तता, जाडच, बहुमूत्रता, मूत्र शुक्ल, उदकाप्रमाणें स्वच्छ, पुष्कळ व पुष्कळ वेळां शर्करायुक्त, मुंग्या लागणें. क्लेद, मांस व मेदाची दुष्टि असते व कफ प्रधान दोषाची दुष्टि असते.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
जंबूबीजचूर्ण	२ ते ४ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
शिलाजीत	२ गुंजा

१ पुडी. अनुपान- कडूनिंब पानाचा रस १ ते २ चमचे.
दिवसांतून ३-४ वेळां.

इक्षुमेह लक्षणें

त्वचेवर अधिक स्निग्धता, तंद्रा, आलस्य, याशिवाय उदक मेहाची लक्षणें असतात. अधिक शर्करायुक्त इक्षुरसाप्रमाणें.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
अभ्रकभस्म	१ गुंज
शिलाजीत	२ गुंजा

१ पुडी. अनुपान- बेलाचा रस किंवा कडूनिंब पान रस, किंवा गंगावती पाला स्वरस. दिवसांतून ३ वेळां.

सान्द्रमेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्रामध्यें वरीलपेक्षां अधिक घनता असते. कफप्रधान दोष अपक्व मेदास मूत्रवह स्रोतसांत नेतात व त्यामुळें तें स्रोतस विकृत होऊन सान्द्र मेह व यापुढील मेहाचे प्रकार उत्पन्न करण्यास कारणीभूत होतात.

चंद्रप्रभा	२ गुंजा
जसदभस्म	१ ते २ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
अभ्रकभस्म	१ गुंज
शृंगभस्म	२ गुंजा

१ पुडी. अनुपान- जिरे १ मासा व पाणी. दिवसांतून ३ वेळां.

सुरामेह लक्षणें

वरील सामान्य लक्षणांनीं युक्त व मूत्र हें सुरेप्रमाणें असतें व तें अम्ल असतें. मूत्र काचेच्या पेल्यांत ठेवल्यानंतर कांहीं कालानें खालीं घन व वर द्रव असें आढळतें.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
शिलाजीत	२ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
प्रवाळभस्म	२ गुंजा
अभ्रकभस्म	१ गुंज

१ पुडी. अनुपान- पाणी. दिवसांतून ३ वेळां.

पिष्टमेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्र हें पीठ कालवलेल्या पाण्याप्रमाणें असतें.

शिलाजीत	४ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
जसदभस्म	१ गुंज
गोक्षुरचूर्ण	४ गुंजा

१ पुडी. अनुपान- पाणी. दिवसांतून ३ वेळां.
याचे जोडीस
आरोग्यवर्धिनी २ गुंजा. सकाळीं देणें. अनुपान- दूध.

शुक्रमेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्रांतून शुक्र जात असतें. मूत्र

वसंतकुसुमाकर १ गुंज सकाळीं दुधांतून द्यावा. शिवाय

चिकट, स्निग्ध असें असतें.

जसदभस्म	२ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
शिलाजीत	२ गुंजा
अश्वगंधाघन	२ गुंजा

१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

सिकतामेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून बारीक, कठीण कणयुक्त (Casts) मूत्र असतें.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
शिलाजीत	२ गुंजा
चंद्रप्रभा	२ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
पुनर्नवाघन	२ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी, गोक्षुरफांट. दिवसांतून ३ वेळां.

शीतमेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्र अधिक मधुर व शीत असतें.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
शिलाजीत	२ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
अभ्रकभस्म	१ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	२ गुंजा
प्रवाळभस्म	२ गुंजा
शृंगभस्म	२ गुंजा

१ पुडी. अनुपान– गंगावतीच्या पाल्याचा रस २ तोळे. दिवसांतून ३ वेळां.

शनैर्मेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्र-प्रवृत्ति वारंवार होते व मूत्र अल्प असतें.

जसदभस्म	१ ते २ गुंजा
वंगभस्म	१ गुंज
शिलाजीत	२ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
पुनर्नवाघन	२ गुंजा
गोक्षुर चूर्ण	४ गुंजा
जिरें चूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान- पाणी. दिवसांतून ३ते४ वेळां. या शिवाय गोक्षुर फांट वरचेवर थोडा थोडा १० तोळेपर्यंत द्यावा.

लालामेह लक्षणें

वरील लक्षणांनीं युक्त असून मूत्र पिच्छिल व तन्तुयुक्त असते.

जसद भस्म	१ ते २ गुंजा
वंग भस्म	१ गुंज
शिलाजीत	२ गुंजा
चंद्रप्रभा	१ ते २ गुंजा
पुनर्नवाघन	१ ते २ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

कफज प्रमेहाचें उपद्रव

स्थौल्यज रक्तवाहिनी विकृति, रसाभिनोदनवृद्धि, रोहिण्यामध्यें ग्रंथि होऊन पाऊल व त्याचा आंगठा यांचा शुष्क कोथ, व्रण-आर्द्र कोथ. हृदयरोहिणी व मस्तिष्क रोहिणी उपलेप, वृक्क विकृति होऊन मूत्रांत नत्र (Albuminious) द्रव्यें येतात- अधिक रसाभिनोदनवृद्धि-शोथ, सपूय वृक्क सदाह शोथ, नेत्रविकृति, (अंत:पटलावर लाल डाग) दृष्टिमांद्य, लिंगनाश, (मोतिबिंदु) अग्निमांद्य, अविपाक, अरुचि, प्रसेक, छर्दि, तंद्रा, अधिक निद्रा, मंद-खोल मधुगंधि श्वसन, प्रतिश्याय, कास, श्वास, वातकफज्वर, राजयक्ष्मा, मांस धातु विकृतिमुळें– योनिकंडू, विद्रधि, प्रमेह पीटिका.

स्थौल्य व रोहिणी विकृति

महायोगराजगुग्गुळ	२ गुंजा
शिलाजीत	२ ते ४ गुंजा
त्रिकटु	४ गुंजा
सुवर्णमासिकभस्म	१ गुंज

१ पुडी अनुपान-कोमट पाणी. दिवसांतून ३ वेळां.

रसाभिनोदनवृद्धि व रोहिण्यामध्यें ग्रंथि — ग्रंथी विलयनासाठीं

	महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा ताप्यादिलोह १ ते २ गुंजा अश्वगंधाघन १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.
रसाभिनोदनवृद्धि असल्यास	वरील पुडयामध्यें सर्पगंधाचूर्ण ·।· ते १ गुंज घालावें.
हृदयरोहिणी व मस्तिष्करोहिणी उपलेप	सुवर्णसूतशेखर -।।- ते १ गुंज महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३ वेळां.
वृक्क विकृति. अल्प-अविल मूत्रता, मत्रोत्पत्ति बंद होणें	मूत्रकृच्छ्रावरील चिकित्सा करावी. किंवा कफज प्रमेहांतील सिकता मेहादि प्रकारावरील चिकित्सा करावी.
नेत्र विकृति	नेत्रविकारावरील व कफज प्रमेहाची चिकित्सा करावी.
अग्निमांद्य, अविपाक, अरुचि, प्रसेक, छर्दि	आरोग्यवर्धिनी २ गुंजा शरपुंखाघन २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध किंवा पाणी. दिवसांतून ३ वेळां.
प्रतिश्याय	नागगुटी -।।- गुंज शृंग भस्म २ गुंजा प्रवाळ भस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– आर्द्रक स्वरस, मध. सकाळीं व रात्रीं देणें.
कास, श्वास	अभ्रक भस्म १ गुंज शृंग भस्म २ गुंजा समीरपन्नग -।।- गुंज सोमलताचूर्ण २ गुंजा रिंगणी अर्क २ गुंजा १ पुडी अनुपान-मध. दिवसांतून ३ वेळां.

वातकफज्वर	त्याची चिकित्सा करावी.
राजयक्ष्मा	वसंतकुसुमाकर -।।- गुंज श्रृंग भस्म २ गुंजा प्रवाळ भस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– मध, तूप. सकाळीं व संध्याकाळीं द्यावें.
योनिकंडू	स्थानिक-कडूनिंबबीज तैल किंवा करंज-तैल वरचेवर लावणें किंवा जितसायाचें गंध उगाळून त्यांत व्हॅसलीन मिसळून तें मलम लावण्यास द्यावें.
प्रमेह पीटिका	जितसाया-मुळीचा किंवा खानदोडकी मुळीचा लेप करणें.

सूचना– वरील उपद्रवाची चिकित्सा चालू असतांना कफज प्रमेहाची चिकित्सा जो वर दिली आहे ती चालू ठेवावी.

पित्तज-प्रमेह लक्षणें

तीक्ष्णाग्नि, रोगी शरीराच्या व वयाच्या मानानें अधिक आहार घेतो व तो पचतो. पण आहाराचें मानानें शरीराची वृद्धि होत नाहीं. अपक्वच मेद तयार होत राहतो. धात्वग्निमांद्य असतें. हस्तपादतलदाह, त्वग् दाह, अतितृष्णा, दौर्गंध्य, स्वेतातिप्रवर्तन, कांहीं रोग्यांत बगलेंत आलेल्या घामाचे डाग कपडयावर पडतात, तें पिवळे असतात. शीतेच्छा, त्वग् पीतता, विशेषतः हात व चेहऱ्यावर पिवळसरपणा येतो, पांडुता, मूत्र-क्षार, अम्ल, लवण, कटु, विस्र, उष्ण, या गुणांनींयुक्त असतें.

क्षारमेह लक्षणें–

गंध-वर्ण-रस व स्पर्श क्षाराचें पाण्याप्रमाणें मूत्रास असतो. तीक्ष्णाग्नि, हस्तपादतलदाह, अति-तृष्णा, त्वग्दाह.	वसंतकुसुमाकर -।।- ते १ गुंज प्रवाळभस्म २ गुंजा गुळवेलसत्त्व २ गुंजा सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

नीलमेह लक्षणें–

नीळसर रंगाची लघ्वी होते. वरील लक्षणांनीं युक्त

चंद्रप्रभा	२ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
शिलाजीत	२ गुंजा
जसद भस्म	२ गुंजा
गोक्षुरचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

कालमेह लक्षणें–

सुश्रुतानें या प्रकाराचा उल्लेख केला नाहीं तर अम्लमेहाचा उल्लेख केला आहे. व त्यामध्यें मूत्र अम्ल रसात्मक व अम्ल गंधी असतें असें वर्णन केलें आहे. तर चरकानें शाईच्या रंगाप्रमाणें काळे, उष्ण मूत्र असतें असें सांगितलें आहे.

चंद्रप्रभा	२ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
प्रवाळभस्म	२ गुंजा
गोक्षुरचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

वसंतकुसुमाकर	१ गुंज

१ पुडी अनुपान– तूप, मध. रोज सकाळीं १ पुडी द्यावी व वरील औषध चालू ठेवावें.

हारिद्रमेह लक्षणें–

कटु रसात्मक, पीत वर्णात्मक मूत्र असतें. याशिवाय वरील लक्षणें असतात. स्वेतातिप्रवर्तन, कपड्यावर घामाचें पिवळे डाग पडतात. त्वग् पीतता, विशेषतः हात व चेहरा यावर पिवळसरपणा, शीतेच्छा, पांडुता इत्यादि.

आरोग्यवर्धिनी	१ ते २ गुंजा
चंद्रप्रभा	२ गुंजा
जसद भस्म	१ गुंज
अभ्रक भस्म	१ गुंज
गोक्षुरचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

मंजिष्ठमेह लक्षणें–

मंजिष्ठेच्या काढ्याप्रमाणें वर्ण व दुर्गंधीयुक्त मूत्र असतें. याशिवाय वरील सर्व लक्षणें असतात.

चंद्रप्रभा	२ गुंजा
गोक्षुरादिगुग्गुळ	४ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
जसद भस्म	१ गुंज
वंग भस्म	१ गुंज
गोक्षुर चूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

रक्तमेह लक्षणें–

दुर्गंधीयुक्त, उष्ण, लवणरसात्मक, रक्तमिश्रित मूत्र असतें. याशिवाय पित्त प्रमेहांत वर दिलेली सर्व लक्षणें होतात. ही पित्तज प्रमेहाची शेवटची अवस्था आहे. यामध्यें वृक्क विकृत होतात. म्हणून वरील सर्व लक्षणें यामध्यें असतात.

वसंतकुसुमाकर	१ गुंज

१ पुडी अनुपान– वासास्वरस. सकाळीं देणें. याशिवाय

चंद्रप्रभा	२ गुंजा
चंदनादिवटी	२ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
आमलकी रस	२ गुंजा

१ पुडी अनुपान– जीरें व गोक्षुर फांट. दिवसांतून ३ वेळां.

पित्तज प्रमेहाचें उपद्रव

वरील चिकित्सा योग्य प्रकारें दिली गेली असतां भ्रम, मूर्च्छा ही या प्रकारांतील उपद्रवात्मक लक्षणें उत्पन्न होणार नाहीत. जर कदाचित भ्रम, मूर्च्छा उत्पन्न झालेले रोगी आले तर पुढील चिकित्सा करावी.

भ्रम	सुवर्णसूतशेखर -॥- गुंज माक्याचा स्वरस २ ते ४ चमचे यांत उगाळून वरचेवर चाटवावे किंवा २) माक्याचा रस १ ते २ तोळे पाजावा.
मूर्च्छा	नस्य– श्वासकुठार चूर्ण नाकास लावावें किंवा वचाचूर्ण नाकास लावावें. म्हणजे शिंका येऊन शुद्धिवर येईल. खालील मिश्रण द्यावें.

सुवर्णसूतशेखर	-।।- गुंज
जसद भस्म	२ गुंजा
शिलाजीत	४ गुंजा
अभ्रक भस्म	१ गुंज

१ पुडी अनुपान– माक्याचा रस १ ते २ तोळे यांत मिश्र करून थोडें थोडें पाजावें. एकदम औषध दिल्यास अधिक बरें.

वातज प्रमेह

लक्षणें–

जिव्हा कोरडी व चिरा पडलेली, पिंडिकोद्वेष्टन, कृशता वाढते, वजन कमी होते, विषमाग्नि, त्वचेची स्थितिस्थापकता कमी होते व त्वचा रूक्ष होते. एखाद्या अवयवांत वेदना, हातपाय इ. ठिकाणीं मुंग्या येतात. वातविकार, आशयापकर्षा-मुळें दाह (पित्त) मूत्र-कषाय-मधुर रसात्मक, कधीं रूक्ष कधीं स्निग्ध-श्वेत वर्णात्मक, कधीं अति प्रमाण तर कधीं विबद्धता, नपुंसकत्व येतें.

वसामेह लक्षणें–

मूत्र-कषाय, मधुर, पण कषायत्व अधिक, रूक्ष व वसामिश्र, पाण्डुर-वर्णात्मक. वारंवार व अल्प मूत्र प्रवृत्ति. जिव्हा कोरडी किंवा त्वचा रूक्षत्व इ. सामान्य लक्षणांची सुरवात. शरीरांतील स्नेह गुण वा वसा बाहेर जात असल्यामुळें होते.

वसंतकुसुमाकर	१ गुंज

१ पुडी अनुपान– मध, तूप. सकाळीं द्यावी.

चंद्रप्रभा	२ गुंजा
शिलाजीत	२ ते ४ गुंजा
जसदभस्म	१ ते २ गुंजा
अभ्रकभस्म	१ गुंज
प्रवाळभस्म	२ गुंजा

१ पुडी अनुपान- दूध. दिवसांतून ३ वेळां.

मज्जामेह लक्षणें–

मूत्र-मधुर प्राधान्य रसात्मक, मज्जामिश्र. मज्जेप्रमाणें पातळ तुपाच्या वर्णाप्रमाणें, वरील सामान्य लक्षणामध्यें अधिक वाढ होत जाते.

वसा मेहावरील चिकित्सा द्यावी.

हस्तीमेह लक्षणें–

मूत्र-कषाय रसात्मक, अतिशय सतत मूत्रप्रवृत्ति, लसीकायुक्त असेल तर मूत्रप्रवृत्ति विबद्ध असते. व सामान्य लक्षणांची अधिक वाढ होत जाते.

वसंतकुसुमाकर	१ गुंज

१ पुडी अनुपान– तूप, मध. सकाळीं द्यावी.

जसद भस्म	१ ते २ गुंजा
जम्बुबीज चूर्ण	२ ते ४ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	१ गुंज
प्रवाळ भस्म	२ गुंजा
अभ्रक भस्म	१ गुंज

१ पुडी अनुपान– बेलाच्या पानाचा रस किंवा कडूनिंबपत्र स्वरस किंवा कारल्याचा रस. दिवसांतून ३ वेळां.

लसीकायुक्त, विबद्ध मूत्र प्रवृत्ति असेल तर

चंद्रप्रभा	१ ते २ गुंजा
त्रिवंग भस्म	१ ते २ गुंजा
उन्हाळघाचें औषध	२ गुंजा
शिलाजीत	२ गुंजा
गोक्षुर चूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

क्षौद्रमेह वा मधुमेह लक्षणें–

प्रभूतमूत्रः पुरुषः पूर्वरूपैरुपद्रुतः । प्रमीढ इति विज्ञेयो मधुमेही तु वक्ष्यते ।। यस्य गात्रे प्रमीढस्य पिडका जायते भृशाम् । मधुमेही स विज्ञेयो युक्तश्चोपद्रवैर्भृशम् ।। इति । सुश्रुत निदानस्थान अ. ६ सू. २५ न्यायचंद्रिका टीका.

मूत्र अधिक, मधुर रसात्मक, कषाय, रूक्ष, पाण्डुर वर्णात्मक; वरील सर्व लक्षणांनीं युक्त व ओज क्षीणतेची दुर्बल, भित्रा, चिंताग्रस्त, एकादश इंद्रियें गलित इ. तंद्रा, निद्रा, वातशोफ, मोह, मूर्च्छा, प्रलाप, मरण ही लक्षणें यामध्यें असतात.

हा असाध्य असला तरीहि औषधोपचार करून पाहावा.

सुवर्ण भस्म	$\frac{1}{16}$ ते $\frac{1}{8}$ गुंज
मकरध्वज	$\frac{1}{2}$ गुंज
अभ्रक भस्म	१ गुंज
जसद भस्म	२ गुंजा
नाग भस्म	१ गुंज

१ पुडी अनुपान– तूप, मध. दिवसांतून २ वेळां.

१) वातज प्रमेह उपद्रव

उदरशूल, उन्माद, अतिसार, गृध्रसी, पक्षवध, अर्धांगवात इ. वातविकार.

प्रमेहाच्या चिकित्सेबरोबर त्या त्या विकारांची चिकित्सा करावी.

आहार

कफज प्रमेह–

मधुर रसात्मक नवधान्य (एक वर्षाचे आंतील) वर्ज

मधुर रसात्मक, कांहीं द्रव्यें सेवन करण्यास हरकत नाहीं. उदा.- दूध, जुनें तांदूळ.

अल्प प्रमाणांत जुन्या तांदळाचा भात, भाकरी, चपाती, बाजरीची भाकरी, यव, सातू, राळे, तूर, मूग, हुलगे, पालेभाज्या (कांहीं पालेभाज्याची कोशिंबीर करून खावी.

मेथी, पाथरी, करडई, मुळ्याचा पाला, कोबी कच्च्या खाव्यात.) कारली, काकडी, दुध्या भोपळा, भेंडी, लिंबू, महाळुंग, चिंच, अमसूल, तोंडली, ताक, दूध (बेतानें), तूप, लोणी, शेंगदाणे, तीळ, कारळे,

वर्ज — साखर, गूळ, केळी, बटाटा, रताळी, साबुदाणा, सर्व फळें.

सूचना– विशेषत: तिक्त, कषाय, कटुरसात्मक आहार घ्यावा.

पित्तज प्रमेह–

जुन्या साळीचा भात, ज्वारी, गहूं, व $\frac{1}{4}$ यव मिसळून पोळ्या कराव्यात. आम्ल रसात्मक व तीक्ष्ण, उष्ण गुणात्मक द्रव्यें, लोणची मुळा वर्ज करावा. भेंडी, तोंडली, दुध्याभोपळा, मेथी, पालेभाज्या, (अंबाडी, चुका, आळू सोडून) काकडी, कच्च्या भाज्या खाणें, तूप, लोणी, दूध, ताक, फळें खाऊं नयेत.

वातज प्रमेह–

जुन्या साळीचा भात, गहूं, तूप, धारोष्ण वा एकदां तापवलेलें दूध, लोणी, मूग, यवमिश्रित दोन्ही प्रकारच्या भाकरी, पोळी, ब्रेड – बिस्किटें खाण्यास द्यावीत. पालेभाज्या कच्च्याहि चालतील. काकडी, कारली, तोंडली, भेंडी, भोपळा, इ. पालेभाज्या, कोबी, फ्लॉवर, कोशिंबीरी खाणें. द्विदल धान्यें व गूळ वर्ज.

सूचना– वरील २० प्रकारच्या प्रमेहांत खालील गोष्टी वर्ज कराव्यात.

आहार–

साखर, गूळ, बटाटा, रताळी, सर्व प्रकारचीं फळें, व पिष्टमय द्रव्यें, दही, नवधान्यें, सर्व प्रकारचीं मद्यें, क्षार.

विहार–

नेहेमी बसून रहाणें, दिवा स्वाप, मलमूत्र वेग धारण करणें, धूम्रपान करणें, घाम काढणें, अस्त्र विस्तुति.

बहुमूत्रता

प्रमेह विकारांत कफप्रधान दोषामुळें मेदधातु विकृत होऊन अपक्व राहतो. बहुमूत्र विकारांत कफ प्रकुपित होऊन शरीरस्थ क्लेदाची दुष्टि

होते. व हा क्लेद मूत्रद्वारें अधिक बाहेर जातो. हा विकार अतिशय वाढला असतांना वृक्क विकृति होते व त्यामुळें मूत्रांत शर्करा व अल्ब्युमिन जातें.

कारणें–

आमावस्था, कांहीं ज्वर, अजीर्ण, अत्यम्बुपान, विरुद्धाशन, अध्यशन, उपदंश. आनुवंशिकता, अति शीत पेयांचें अतिसेवन, दही, चहा, कॉफी अति पिणें. हा विकार स्त्रियांपेक्षां पुरुषामध्यें अधिक होतो. तरुण-पणांत किंवा बालपणांतहि होतो.

लक्षणें

मूत्राचें प्रमाण खूप वाढतें. दिवसांकाठीं ५ ते १० लिटर मूत्राचें प्रमाण असतें. स्वच्छ पाण्यासारखा मूत्राचा रंग असतो. वि. गु. १००२ ते १००५ असतें. मूत्रामध्यें इतर कोणताहि बदल झालेला आंढळून येत नाहीं. रोगाच्या चिरकारी अवस्थेमध्यें क्वचित् अगदि अल्प प्रमाणांत नत्रद्रव्य (Albumin) व शर्करा आंढळते.

२) रोगाचें सौम्य स्वरूप असतांना बहुमूत्रता व तृष्णा ही दोनच लक्षणें असतात. पण रोगाचें तीव्र स्वरूप असल्यास प्रमेहाची लक्षणें आंढळतात. त्वचा रूक्षता, थकवा, (कार्श्य) तीव्र क्षुधा, कांहीं दिवस मलावरोध व कांहीं दिवस अति–सार असे आलटून पालटून असतें.

मूत्रांत शर्करा नसतें म्हणून तो प्रमेह नाहीं असें निश्चितपणें निदान करतां येतें. मधून मधून ज्वर असतो. चिडखोरपणा, खंडित निद्रा, पश्चात् मस्तिष्कशूल, कटिशूल, स्नायूंच्या ठिकाणीं मुंग्या येणें व त्यांची क्रियाहानि ही वात विकृतीची लक्षणें होतात.

नूतन असेल तर साध्य. आनुवंशिक व पुराण असेल तर असाध्य.

अजीर्ण व आमज असेल तर	लंघन, दीपन, पाचन
बहुमूत्रता	१) चंद्रप्रभा २ गुंजा जंबुबीजचूर्ण २ ते ४ गुंजा वंग भस्म १ गुंज सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३-४ वेळां. २) तारकेश्वर १ ते २ गुंजा जम्बुबीजचूर्ण २ ते ४ गुंजा १ पुडी दिवसांतून ३-४ वेळां. अनुपान– त्रिफला, वेळूचीं पानें, नागर-मोथा, पहाडमूळ यांचा काढा ५ तो. मध घालून द्यावा.
कार्श्य	वसंत कुसुमाकर १ गुंज १ पुडी अनुपान– तूप, मध. सकाळीं व संध्याकाळीं द्यावा.
आहार	द्रव, अभिष्यंदि, कफकर आहार कमी करावा. पालेभाज्या, तेल, तूप, लोणी, भाकरी, भात वर्ज. तिक्त, कषायरसात्मक भाज्या, मेथी, पाथ्री, कारली इ. द्याव्यात.

उदर

उदर म्हणजे कोष्ठाचें ठिकाणीं उत्सेध उत्पन्न होणें हे होय. कोष्ठस्थ असलेल्या इंद्रियांचें ठिकाणीं उत्सेध असणें हाहि उदराचा एक भाग होय. उदा.– यकृत्प्लीहावृद्धि किंवा आंत्रामध्यें मलग्रंथि संचित झाल्यामुळें होणारी उदरवृद्धि ही यामध्यें अंतर्भूत होतात. येथें अंतर्विद्रधीचा अंतर्भाव केलेला नाहीं. याशिवाय कांहीं विकार असें आढळून येतात कीं त्यामुळें उदरस्थ उत्सेध निर्माण होतो. त्याचा विचार स्वतंत्रपणें करावा लागतो. उदा.– उदरावरणदाह, उदरस्थ अर्बुद, उदरस्थ लसीका ग्रंथिशोथ.

पूर्वरूपें	**चिकित्सा –**
भूक नष्ट होते. स्वादु-अतिस्निग्ध व गुरु अन्नाचें पचन सावकाश होतें, खाल्लेल्या अन्नाचा विदाह होतो, अन्न पचलें किंवा नाहीं तें समजत नाहीं, जेवण त्याला अधिक सहन होत नाहीं. किंचित् पादशोथ, हळूं हळूं बलक्षय होतो, थोडा व्यायाम केला तरी श्वास लागतो, मलसंचय वृद्धि व रूक्ष, मूत्राल्पता, उदावर्त, बस्तिचें सभोंवती आध्मान व पीडा, लघु, अल्प आहारानेंहि पोटास तणावा लागतो. व पोट मोठें दिसतें, पोटावर सिरा दिसतात व पोटावरील वळ्या नाहींशा होतात. वर्ण हानी.	पुनर्नवादिक्वाथ ४० तोळे पाणी घालून ५ तोळे तयार केलेला सकाळीं १ वेळ देणें. आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान– दूध. दुपारीं व रात्रीं २ वेळां.
पांडुचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था.	पुनर्नवादिक्वाथ वरीलप्रमाणें द्यावा. लोहासव १ ते २ तोळे दुपारीं व रात्रीं भोजनानंतर किंवा दुग्धाहारानंतर दुप्पट पाणी घालून द्यावें.

अतिसाराचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था	लोहपर्पटी १ ते २ गुंजा. १ पुडी. अनुपान–तूप, मध. दिवसांतून ३ वेळां. आहार-ताक.
हृद्रोगाचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था	पुनर्नवादिक्वाथ वरीलप्रमाणें. आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान- दूध दिवसांतून ३ वेळां. आहार– दूध.
श्वासाचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था	श्वासाची चिकित्सा करावी. शिवाय आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा रिंगणीघन २ गुंजा पुनर्नवाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां. आहार– दूध.
मूत्रकृच्छ्राचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था	चंद्रप्रभा २ गुंजा आरोग्यवर्धिनी २ गुंजा वंगभस्म २ गुंजा पुनर्नवाघन २ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां. आहार– दूध.
यकृतार्बुदाचा उपद्रव व उदराची पूर्वरूपावस्था–	हीरकभस्म १/१० गुंज १ पुडी अनुपान– मध. सकाळीं देणें. कज्जली १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– तूप, मध. दुपारीं व रात्रीं देणें.

वातोदर लक्षणें–

पार्श्व, नाभी, उदर, पृष्ठ, कुक्षि, पाणि, पाद, वृषण या भागीं उत्सेध. (वृद्धि) या भागावर काळचा रंगाचें सिरा जाल. आनाह, शूल, तोद, भेदवत् वेदना, पोटांत मोठे आवाज होतात. पर्वभेद, शुष्क कास, अंगमर्द, अधोदर जाडय, मलावरोध, त्वचा श्याम व अरुण वर्णात्मक, एकदम पोट मोठें वाटणें वा कमी वाटणें. हृदय, वंक्षण, कटी, नाभि, गुद, या ठिकाणीं वेदना, अजातोदकावस्थां यांत असते. पोटावर अंगुलीनें ताडन केलें असतां पोकळ (वातपूर्ण कातडयाच्या पिशवीवर आघात केला असतां ज्याप्रमाणें आवाज येतो. त्याप्रमाणें) शब्द येतो.

दीपन, पाचन, वातशमन.
लोहपर्पटी १ ते २ गुंजा
शृंगभस्म ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां.

उदरशूल, (वंक्षण, हृदय, कटी, इ. ठिकाणीं.)

दीपन, पाचन, शूलघ्न, अनुलोमन,
चंद्रप्रभा १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
शंखवटी १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– लिंबुरस, आलेरस, साखर. दिवसांतून ३ वेळां.
मध्य कोष्ठासाठीं एरंडेल तेल २ ते ४ चमचे शुंठीचें काढयांतून रोज रात्रीं द्यावें.

पित्तोदर लक्षणें–

दाह, ज्वर, तृष्णा, मूर्च्छा, अतिसार, भ्रम, कटुकास्यता, नख–नेत्र- मुख- (चेहरा) त्वचा–मल-मूत्र यांना हिरवा व पिवळा वर्ण असतो, उदरावर नीळसर, पिवळसर, हिरवट, तांबुस सिराजाल असतें. दाह, शूल, गरम वाफा निघाल्याप्रमाणें वाटते. पार्श्वभागीं उष्णतेनें आंच लागल्याप्रमाणें वाटते. स्वेद प्रवर्तन, आर्द्रता, उदराचा स्पर्श मृदु लागतो. जलसंचिती लवकर होते.

१) सुवर्णसूतशेखर १ ते २ गुंजा
पंचामृतपर्पटी १ गुंज
प्रवाळभस्म २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां.
२) सुवर्णपर्पटी -।।- ते १ गुंज
प्रवाळभस्म २ गुंजा
शृंगभस्म २ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध, तूप. दिवसांतून २ वेळां.

कफोदर लक्षणें–

गौरव, अरुचि, अविपाक, अंगमर्द, सुप्ति. उदरस्निग्धता, पाणि-पाद-मुष्क-ऊरू, उदर या ठिकाणीं शोथ, उत्क्लेश, शीतस्पर्श, निद्रा, कास, श्वास, नख-नेत्र– मुख-त्वचा-मल-मूत्र या ठिकाणीं श्वेतवर्ण, पांढरा वर्ण येतो. उदरावर श्वेतवर्णात्मक सिराजाल असतें. उदर, गुरु, स्थिर स्तिमित, कठीण असतें. जलसंचिती उशीरा.

आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां. सकाळीं गोमूत्र ५ ते १० तोळे.

सान्निपातिक उदर-लक्षणें–

सर्व दोषांची सर्व लक्षणें आढळून येतात. विशेषतः वारंवार मूर्च्छा, पाण्डु, कृशता, मुखशोष, तृष्णा, भ्रम, लवकर जलसंचिती होते.

थंड वारा सुटला असतांना व मेघाच्छादित आकाश असतांना रोग्यांस मूर्च्छा, दाह, भ्रम इ. लक्षणें वाढतात. रोगी तळमळत

ज्या दोषांचा अधिक प्रकोप असेल त्या दोषांनुसार उदराची चिकित्सा करावी.

असतो. ही असाध्यावस्था आहे. या अवस्थेंतून सहसा रोगी बरा होत नाहीं.	
मूर्च्छा असल्यास	सुवर्णसूतशेखर -।।- गुंज माक्याचा रस व मध यांत उगाळून चाटविणें.
तीव्र दाह, तृष्णा असल्यास	चंद्रकला १ ते २ गुंजा मौक्तिकभस्म -।।- गुंज प्रवाळभस्म २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
गरविषज	सुवर्णभस्म $\frac{१}{१६}$ गुंज ताम्रभस्म $\frac{१}{६}$ गुंज १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून १ ते २ वेळां.

प्लीहोदर

लक्षणें–

प्लीहावृद्धि कासवाचें पाठीप्रमाणें कठीण असते. दौर्बल्य, अरोचक, अविपाक, मलमूत्रग्रह, डोळ्यापुढें अंधेरी येते. तृष्णा, अंगमर्द, छर्दि, मूर्च्छा, अंगसाद, कास, श्वास, मृदू ज्वर, जीर्णज्वर, आनाह, अग्निमांद्य, कार्श्य, आस्यवैरस्य, पर्वभेद, कोष्ठाचें ठिकाणीं शूल, अतिशय पाण्डु, बलक्षय, उदरावर निळचा, अरुण, पिवळचा, किंवा विवर्ण अशा रंगाचें सिराजाल उत्पन्न होतें.	दीपन, पाचन व क्षरण. कुमारीआसव २ ते ४ चमचे वज्रक्षार १ ते २ गुंजा १ पुडी दिवसांतून ३ वेळां. कुमारी आसवामध्यें टाकून घेणें. २) रोहितकारिष्ट २ चमचे अभयारिष्ट २ चमचे दुप्पट पाणी घालून दिवसांतून ३ वेळां. ३) कपर्दिकभस्म १ ते २ गुंजा कोरफडीचा रस ४ चमचे व साखर यामध्यें कपर्दिकभस्म मिसळून सकाळीं एकदां द्यावें.

प्लीहा अतिवृद्ध असल्यास	निशोत्तराचें ६ माशापर्यंत रोग बलवान असेल तर विरेचन द्यावें.
जीर्णज्वर व प्लीहावृद्धि	विषमज्वरारि २ ते ४ गुंजा शरपुंखाघन २ ते ४ गुंजा कपर्दिकभस्म १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. २) अमृतारिष्ट २ ते ४ चमचे रोहितकारिष्ट २ ते ४ चमचे कुमारी आसव २ ते ४ चमचे दुप्पट पाणी घालून दिवसांतून ३ वेळां द्यावें.
पाण्डु व प्लीहावृद्धि	१) कासीसभस्म २ गुंजा शरपुंखाघन २ ते ४ गुंजा शृंगभस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– ताक. दिवसांतून ३ वेळां. २) लोहासव १ ते २ चमचे अभयारिष्ट १ ते २ चमचे कुमारी आसव २ ते ४ चमचे दुप्पट पाणी घालून दिवसांतून ३ वेळां द्यावें.
छर्दि, प्लीहावृद्धि	१) वांतिहृद्रस १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– मध. वरचेवर चाटवणें. २) मयुरपिच्छामषी २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– मध. वरचेवर चाटवणें.

अग्निमांद्य, अविपाक, बलक्षय इ. लक्षणावर पांडू व प्लीहावृद्धि यावरील चिकित्सा उपयोगी पडेल.

पांडू, शोथ व प्लीहावृद्धि

आरोग्यवर्धिनी २ गुंजा
कासीसभस्म १ ते २ गुंजा
पुनर्नवाघन २ ते ४ गुंजा
शरपुंखाघन २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

कफज प्लीहावृद्धि लक्षणें–

वेदनारहित, श्वेत, कठिण, स्थूल, अति प्लीहावृद्धि, स्पर्श शीत, अग्निमांद्य, कास, श्वास, छर्दि, पाण्डू.

वज्रक्षार १ ते २ गुंजा
कासीसभस्म १ ते २ गुंजा
शौक्तिकभस्म २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान- मध, गरम पाणी, गोमूत्र. दिवसांतून ३ वेळां.

पित्तज प्लीहावृद्धि लक्षणें–

ज्वर, पिपासा, स्वेद, तीव्र वेदना, पीत गात्रता, प्लीहा स्पर्श मृदु व मध्यम वृद्धि.

विडंग, चित्रक, सातु, सैंधव, वेखंड समभाग घेऊन तूप घालून खापरामध्यें भाजून कोळसा (मषी) करणें. ही मषी १ मासा या प्रमाणांत दुधांतून दिवसांतून ३-४ वेळां द्यावी.

वातज प्लीहावृद्धि लक्षणें–

मल, मूत्र, वात यांचा अवरोध, उदावर्त, उदरस्थ वेदना, प्लीहा रूक्ष, शीत, वृद्धि कमी जास्त होते.

१) बाळ हिरड्याचें चूर्ण ३ मासे
सैंधव चूर्ण १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– गरम पाणी. रात्रीं निजतांना देणें.
२) बाळहिरडे एरंडतेलांत भाजून त्याचें चूर्ण करावें. व त्यांत सैंधव मिश्र करावें.
एरंडभृष्ट हरीतकीचूर्ण १ ते ३ मासे
सैंधवचूर्ण १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– गरम पाणी. सकाळीं व रात्रीं द्यावें.

रक्तज प्लीहावृद्धि

क्लम, विदाह, संमोह, वैवर्ण्य गात्रगौरव, उदरामध्यें रक्तस्राव, भ्रम, मूर्च्छा,

चंद्रकला १ ते २ गुंजा
आमलकी रस २ ते ४ गुंजा
असली नागकेशर २ ते ४ गुंजा
मौक्तिकभस्म ॥ गुंज
१ पुडी अनुपान– वासास्वरस (पुटपाक पद्धतीनें) कुष्मांडस्वरस ५ ते १० तोळे. दिवसांतून ३–४ वेळां.

यकृद्दाल्युदर–

कारणें–

अजीर्ण, अग्निमांद्य, प्लीहावृद्धि, प्रमेह, कफक्षीणता, मद्यपान, मेदवृद्धि, गुल्म, सविषअन्नपान, अति मैथुन, मलमूत्रावरोध, नित्य अजीर्ण (वरचेवर अजीर्ण) अर्बुद, पित्तवाहि नलिका रोध व पित्तसंचय, कामला.

लक्षणें–

अग्निमांद्य, यकृत्वृद्धि, पांडुता, कार्श्य, पित्त–रक्तातिसार, यकृत् स्थानीं स्पर्शासहत्त्व, तीव्र ज्वर, हिक्का, पित्तज छर्दि, प्रलाप, रक्तपित्त, कामला, मलावरोध, दौर्बल्य या पुढील अवस्था म्हणजे यकृत् मृदू होतें व शुष्क (क्षीण) होतें. (निदानदीपकेवरून)

१)आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
शरपुंखाघन २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान–दूध. दिवसांतून ३ वेळां.
२) ताम्रपर्पटी १ ते २ गुंजा
शृंगभस्म २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– तूप, मध. सकाळीं व संध्याकाळीं देणें.

मलावरोध असल्यास

अश्वकंचुकी २ ते ४ गुंजा
अनुपान– पाणी. सकाळीं किंवा रात्रीं देणें.

अग्निमांद्य, अजीर्ण, मलमूत्रावरोध, चिरकारी अजीर्ण या कारणांनीं होणाऱ्या यकृत् वृद्धीवर

आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून २ वेळां, सकाळीं व संध्याकाळीं देणें.
कुमारीआसव १ ते २ चमचे
अभयारिष्ट १ ते २ चमचे
दुप्पट पाणी घालून दोन्हीं वेळां जेवणापूर्वी द्यावें.

कामला, पित्तवाहिनलिकारोध, पित्तसंचय या कारणांनीं होणाऱ्या यकृत् वृद्धिवर

नवसारादिचूर्ण २ गुंजा
शिलाजित ४ गुंजा
शरपुंखाघन २ गुंजा
ताम्रभस्म ·॥· ते १ गुंज
१ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

सविषअन्नपानज (गरविष)

१) सुवर्णसूतशेखर १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– मध. सकाळीं व संध्याकाळीं २ वेळां.
२) ताम्रभस्म ·॥· ते १ गुंज
सुवर्णभस्म १/१६ ते १/८ गुंज
शिलाजित २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां.

मद्यपानज यकृत्वृद्धि

निदान परिवर्जन करणें.
१) आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
शरपुंखाघन २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– दूध, खालील आसवारिष्टें दिवसांतून ३ वेळां द्यावीत.
२) कुमारी आसव २ ते ४ चमचे
द्राक्षासव २ ते ४ चमचे
रोहितकारिष्ट २ ते ४ चमचे
दुप्पट पाणी घालून द्यावें.

(तदर्थकारी चिकित्सा होय)

कफक्षीणताजन्य यकृत्वृद्धि

प्रथम किंचित् यकृत्वृद्धि किंवा जास्तहि यकृत्वृद्धि होते. व नंतर कफक्षीणता निर्माण झाल्यावर यकृत् मृदू व क्षीण होऊं लागतें. यकृत् हा अवयव मांसपिंड आहे. मांसधातु हा कफाचें आश्रयस्थान आहे. यामुळें प्रथम कफाची वृद्धि होऊन नंतर कफ क्षीण होऊं लागतो. म्हणून यकृत् हळूं हळूं क्षीण होत जातें. क्षीणताहि वृद्धिपेक्षां घातक असते. क्षये वृद्धेस्तु पीडनः ।

प्रथम वृद्धिचेवेळीं ज्वर, यकृत् वृद्धि, स्पर्शासहत्त्व, कामला, मूत्र पीत, हरित; मल पीत, हरित किंवा श्वेत. शिरःशूल, हळू हळू यकृत् वृद्धि कमी होऊन यकृत् बारीक लहान होत जातें. तेव्हां कामला वाढते, शिरःशूल, प्रलाप, शेवटीं मूर्च्छा, आमाशय-आंत्र-वृक्क या ठिकाणीं रक्तस्राव होतो. शरीरांतील त्वचेखालीं ठिकठिकाणीं रक्त सांखळतें. अशा वेळीं बहुतेक ज्वर नसतो, पण शेवटीं तीव्र ज्वर येतो. प्लीहावृद्धि, मूत्रामध्यें नत्र-द्रव्यें, रक्त, पित्त आढळतें. हा तीव्र स्वरूपाचा विकार आहे व असाध्य आहे.

आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा
लक्ष्मीनारायण ·।· ते ·॥· गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म १ गुंज
प्रवाळभस्म २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

जलोदर

लक्षणें–

अनन्नाभिलाषा, पिपासा, शूल, श्वास, कास, दौर्बल्य, प्राथमिक अवस्थेंत उदरावर नानावर्णात्मक सिराजाल. अल्प जल संचिति, पादशोथ. अतिजल संचिती झाल्यावर कुक्षीची वाढ, उदरावरील सिराजाल नाहीसें होतें. एक हात एका कुक्षीभागीं व आंगठ्यानें मध्यें पोट दाबलें असतां व आपण आपले दुसऱ्या हातानें कुक्षिवर ताडन केलें असतां पहिल्या हातास जल तरंगाची जाणीव होते. मलावरोध, मूत्राल्पता, सर्वांग शोथ, कृशत्व, ज्वर (कांहीं रोग्यांत)	लोहपर्पटी १ ते २ गुंजा श्रृंगभस्म ४ गुंजा १ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां. किंवा वर्धमान प्रयोग करावा. ·।।· गुंज पहिलें दिवशीं लोहपर्पटी तूप, मधांतून द्यावी. दुसरें दिवशीं १ गुंज, ३ रें दिवशीं १।। गुंज याप्रमाणें १० गुंजेपर्यंत वाढवावी. उत्तरोत्तर प्रमाण जास्त वाढल्यावर दिवसांतून ३ वेळां मिळून सर्व प्रमाण दिलें तरी चालेल. नंतर रोज ·।।· गुंज याप्रमाणें मात्रा कमी करीत जावी. ·।।· गुंजेवर देण्याचें प्रमाण आल्यावर पर्पटी देणें बंद करावें. या कालावधीमध्यें जल संचिति नष्ट न झाल्यास किंवा शेष राहिल्यास याचें-बरोबर विरेचन अभ्रकंचुकी किंवा इच्छाभेदी देत जावी. किंवा पुनर्नवादि काढा द्यावा.
अति तृष्णा असल्यास	नारिकेलोदक द्यावें.
शूल असल्यास	कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– शालेरस व साखर. दिवसांतून ३ वेळां.
मलावरोध असल्यास	१ दिवसाआड मात्राबस्ति द्यावा.

उपद्रव

रक्तपित्त (नाक, हिरड्या, घसा, मलाबरोबर) उदरांतून पाणी काढण्याचें वेळीं रक्तस्राव होत असतो.	असली नागकेशर २ ते ४ गुंजा मौक्तिकभस्म ·।।· गुंज प्रवाळभस्म २ गुंज १ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३–४ वेळां.

टीप.– उदरांतून पाणी काढण्याचें पूर्वी २।३ दिवस या पुड्या द्याव्यात व नंतर जल निर्हरण करावें म्हणजे रक्तस्राव होत नाहीं.

श्वास–	लक्ष्मीविलास ·।।· गुंज आल्याचा रस व मध यामध्यें उगाळून ५–५ मिनिटांनीं १–१ बोट चाटवावें.
तमकश्वास	समीरपन्नग $\frac{१}{८}$ ते $\frac{१}{४}$ गुंज वरील अनुपानांतून चाटवावा.
हिक्का	१) सुवर्णसूतशेखर ·।।· गुंज तुळशीचा रस व मधांतून चाटवावा. २) नारळाच्या शेंडीची किंवा केवड्याच्या कणसाची धुरी द्यावी.
स्वरभेद	केवड्याचें कणीस चिलमीमध्यें घालून धूम्रपान करावें.
मूत्रसंग (मूत्राशयांत मूत्र आलेलें असतें.) पण मूत्र प्रवृत्ति होत नाहीं.	१) चंद्रप्रभा १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान–नारिकेलोदक. दिवसांतून ३–४ वेळां. २) पळसाच्या फुलांनीं ओटीपोट शेकणें. ३) उंदराच्या लेंड्या व एरंडाचा मगज यांचा वाटून बस्तिभागीं लेप करणें.
मूत्रकृच्छ्र किंवा मूत्रक्षय	पुनर्नवाघन २ ते ४ गुंजा चंदनादिवटी १ ते २ गुंजा गोक्षुरचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी दिवसांतून ३–४ वेळां
अर्श–	१) सूरणवटक ४ ते ६ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. २) तिलादिमोदक १ मासा १ पुडी अनुपान– पाणी. सकाळीं व संध्याकाळीं द्यावा.

रक्तज अर्श	कुटजारिष्ट २ ते ४ चमचे उशीरासव २ ते ४ चमचे दुप्पट पाणी घालून दिवसांतून ३ वेळां.

ज्वर–

ज्वराचा वेग मृदू, मध्य, तीक्ष्ण असतो.

मृदू असेल तर.	उदर जसजसें कमी होईल तसतसा ज्वर कमी होत जातो. त्यावर निराळी चिकित्सा द्यावी लागत नाहीं.
मध्य व तीव्र ज्वराचा वेग असतां	सुवर्णसूतशेखर ·॥· गुंज लक्ष्मीनारायण ·॥· गुंज शृंगभस्म १ ते २ गुंजा सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– तुळशीचा रस व मध. दिवसांतून ३ वेळां.

अतिसार–

अतिसार असूनहि उदरस्थ जल फारसें कमी होत नाहीं व स्तंभन केले असतां जलसंचिती वाढतें हा विरुद्धोपक्रम असला तरीहि स्तंभन करणें आवश्यक असतें.	लोहपर्पटी १ ते २ गुंजा कुडाघन २ ते ४ गुंजा बेलफळमगजचूर्ण ४ गुंजा १ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.
अतिसार बरा झाल्यावर	पूर्वीप्रमाणें पर्पटीकल्प चालूं करावा.
जलसंचिती अधिक असल्यास	विरेचन इच्छाभेदी किंवा अश्वकंचुकी द्यावी.

अशारीतीनें विरुद्धोपक्रम करूनहि रोगी बरे होतात असा अनुभव येतो.

उदरस्थ जल निर्हरणाचे वेळीं आघातजन्य उपद्रव

जल निर्हरणाचें वेळीं हृदय विकल होऊं नये व नाडी क्षीण होऊं नये म्हणून (Shock) येऊं नये म्हणून	जल निर्हरण करण्यापूर्वी मकरध्वज ·॥· गुंज २ चमचे मधांत उगाळून ५।५ मिनिटांनीं १।१ बोट चाटवावें. व नंतर जलनिर्हरण सुरूं करावें. ही क्रिया चालूं असेपर्यंत हें चाटण चाटविणें सुरूं ठेवावें.

बद्धगुदोदर–

कारणें–

ज्याच्या अंत्रांत अन्नाचा उपलेप होतो किंवा लहान लहान दगड पोटांत गेल्यामुळें आंत्रस्थ किंवा गुदस्थ अवरोध निर्माण होतो त्यामुळें मलाचा अवरोध होतो. या मल संचितीमुळें दोष त्याच्याशीं मिश्र होतात. व त्यांचाहि अवरोध होतो. मलप्रवृत्ति झालीच तर कष्टानें अल्प होते. हृदय व नाभि या दोहोंमधील उदराचा भाग मोठा होतो. छर्दि होते. या छर्दीला मलासारखा दुर्गंध येतो. बहुतेक रोग्यांत मलाचा अवरोधच असतो. अशावेळीं बस्ति किंवा ग्लिसरीनची पिचकारी दिली असतां केवळ ग्लिसरीन किंवा पाणी बाहेर येतें, मल येत नाहीं. आनाह असतो. अशा रोग्यांस शस्त्रकर्म करणें हाच उपाय आहे. किंवा पुढील चिकित्सा करून पहावी.

मलाची गांठ असल्यास	स्नेहबस्ति द्यावा. नंतर रबराची नलिका गुदद्वारांत घालावी. जर मलग्रंथि खालच्या भागांत असेल तर तो ग्रंथि सुटून बाहेर येतो व रोगी बरा होतो. यानें मलग्रंथि बाहेर आला नाहीं तर शस्त्रकर्म करणें आवश्यक आहे.

टीप– अशा रोग्यांना विरेचन देऊं नये. या शिवाय बद्धगुदोदराचा विचार निदानदीपिका या ग्रंथांत केला आहे. तो पुढीलप्रमाणें:–

बहुपित्तो मृदुः प्रोक्तो बहुश्लेष्मा च मध्यगः ।
बहुवातः क्रूरकोष्ठो दुर्विरेच्यः स कथ्यते ॥१॥
मृद्वी मात्रा मृदौ कोष्ठे मध्यकोष्ठे च मध्यमा ।
क्रूरे तीक्ष्णा मता तज्ज्ञैर्मृदुमध्यमतीक्ष्णकैः ॥२॥
अंत्रवृद्ध्या कोष्ठवाते गुल्मे चांत्रभवे क्षते ।
तथांत्रशोथे विद्रधौ बाह्यस्थाने तथार्शसि ॥३॥
स्फोटावृतपथे वापि सशल्ये पिहिते मुखे ।
शैथिल्या कुंचनाभ्यां च स्रोतसां किट्टसर्गिणाम् ॥४॥
मले शुष्के तथा चामे बद्धलिप्तमुखे ऽथवा ।
स्थानांतरगते चांत्रे स्थूले सूक्ष्मावगुंठिते ॥५॥
अंत्ररोधो मलस्तंभो मलानां संचयो भवेत् ।
पूर्वरूपं मलस्तंभ शूलाजीर्णानि च क्लमः ॥६॥
अरुचिर्मलबद्धत्वं हिक्का छर्दिस्तथैव च ।
अग्निमांद्यं ज्वरस्तीव्रः पूर्वं पश्चान्मृदुर्भवेत् ॥७॥
अंत्रेशोथो मलस्यापि छर्दिः स विषमः (वातः) स्मृतिः ।
अंत्ररोधानिलो ज्ञेयः साध्मानो न रुजं विना ॥८॥
पक्षात्पक्षद्वयाच्चापि भवेत्तु ज्वरमार्दवः ।
मलोत्सर्गोऽन्नकांक्षा च त्रिदिनाद्वा मरणं भवेत् ॥९॥
स शल्यांत्ररोधे स्यात्साध्यो रेचात् न त्वन्यथा ।
बस्तिसाध्यः क्वचित्साध्यः शस्त्रेणापीति ते विदुः ॥१०॥

निदानदीपिका पान १६१-१६२

आहार

उदराच्या पूर्वरूप, रूप व कोणत्याहि दोषोदरांत त्याचप्रमाणें इतर प्रकारांतहि केवल **दुग्धाहार** द्यावा.

सजलावस्था असतांना पाणी सुद्धां देऊं नये. केवल दुग्धाहार द्यावा.

रोगी थकत आहे असें वाटल्यास किंवा अति तृषा असल्यास नारिकेलोदकाची दुग्धाहारास जोड द्यावी.

शोथ

शोथ म्हणजे शरीरांतील कोणत्याहि सूक्ष्म वा स्थूल अवयवांत (अंतर्बाह्य स्रोतसांत) उत्पन्न होणारा उत्सेध होय. या व्याख्येनुसार शोथाचा विचार केला आहे.

या शोथाचे दोन भेद पडतात. १) व्रणवस्तु निर्माण न करणारा व दुसरा व्रणवस्तु निर्माण करणारा म्हणजे व्रणशोथ होय. हे दोन्ही प्रकारचे शोथ शरीरस्थ अंतरावयवांत व बाह्य अवयवांतहि उत्पन्न होतात. यामध्यें चिकित्सेचेहि दोन भेद पडतात. १) कायचिकित्सेनें बरा होणारा शोथ. २) शल्य चिकित्सेनें बरा होणारा शोथ.

या प्रकरणांत कायचिकित्सेनें बरा होणारा शोथच विचारांत घेतला आहे. मग तो कोणत्याहि प्रकारचा असो.

या शोथाचे दोन प्रकार प्रामुख्यानें पडतात १) निज व २) आगंतुक

प्रथम निज शोथाचा विचार करूं.

एकदेशीय निज शोथ

पूर्वरूपें–

तीव्रदाह, ताणल्याप्रमाणें पीडा,
अंगगौरव.

ही लक्षणें ज्या स्थानांत शोथ उत्पन्न होण्याची क्रिया सुरवात झाली असेल तेथें होतात. जर हा शोथ बाह्य अवयवांत किंवा दृश्य अशा अवयवांत (मुख, नासिका) सुरू झाला असेल तर तेथें शोथघ्न अशा लेपांचा उपयोग करावा.

सामान्य लक्षणें–

शोथस्थानीं जाडय, मन अस्वस्थ होते, ज्या स्थानांत शोथ असेल तेथें

चिकित्सा

दशमूलक्वाथ ५ तोळे
दिवसांतून एकदा द्यावा.

फुगवटा असतो. स्थानिक उष्णता वृद्धि, सिरा तेथें फुगलेल्या असतात. (तेथें रसरक्तप्रवाह जास्त झालेला असतो.) अंगावर रोमांच उभे राहतात. वैवर्ण्य, अंतस्थ किंवा बाह्य शोथ उत्पन्न झाला असतां वरील लक्षणें होतात.

२) शुद्ध गुग्गुळ ४ ते ८ गुंजा
१ पुडी अनुपान– दशमूलक्वाथ. दिवसांतून ३ वेळां.

वातज शोथ लक्षणें–

स्थानांतर करणारा शोथ असतो. त्वचा पातळ, खरखरीत, तांबूस, काळसर होते. तेथें स्पर्श समजत नाहीं. वेदना, रोमांच उभे राहतात, शोथ आपोआप नाहींसा होतो, पुनः होतो. दिवसां बलवान असतो.

१) ज्वरधमकेतु १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
२) पुनर्नवा, देवदार, दारूहळद, सुंठ, एरंडमूळ, सर्व मिळून २ तोळे, पाणी ३२ तोळे, शेष ४ तोळे, शुद्ध गुग्गुळ १ मासा वरील काढयाबरोबर देणें.
३) बाह्यस्थानीं लेप–बचनाग, पुनर्नवा, गुग्गुळ, जायफळ, यांचा उगाळून लेप करणें.

पित्तज शोथ लक्षणें–

शोथ मृदु, गंधयुक्त, उष्ण स्पर्श, काळसर,पिवळा,लाल,स्पर्शासहत्व, लवकर पिकणारा असतो. भ्रम, ज्वर, स्वेदप्रवृत्ति, तृष्णा, शीताभिलाषी, आरक्त नेत्रता, सौम्य मद उत्पन्न होतो. अतिसार, शोथभागीं मोहरी लावल्याप्रमाणें आग होते. शोथावरील लव तांबुस होते, शोथाचा मध्यभाग पातळ असतो. (त्या ठिकाणची त्वचा पातळ होते.)

चंद्रकला १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म २ गुंजा
अनंतमूळचुर्ण ४ गुंजा
१ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३-४ वेळां.
बाह्य लेप–श्वेतचंदन उगाळून पातळसर लेप करावा. लेप दिवसांतून २।३ वेळां किंवा चंदनाचें तेल लावावें.

स्थानिक दाह जास्त असल्यास — शतधौतघृत लावावें.

कफज शोथ लक्षणें–

शोथ- त्या स्थानीं गुरूता, हळूं हळूं वाढतो, शीत, पांडुर वर्णात्मक, कंडूयुक्त, कठीण, स्निग्ध, श्लक्ष्ण स्त्यान, (घट्ट) हळूं हळूं कमी होतो. रात्रीं बलवान असतो, यामधून रक्तस्राव होत नाहीं, तर पिच्छिल असा स्राव होतो. शेकल्यानें बरें वाटतें. अरोचक, प्रसेक, छर्दि, अग्निमांद्य, निद्राधिक्य.

१) कांचनारगुग्गुळ २ ते ६ गुंजा
वाकेरीभातें ४ गुंजा
वंगभस्म १ गुंज
१ पुडी अनुपान– गरम पाणी. दिवसांतून ३-४ वेळां.

२) वंगभस्म १ गुंज
ताम्रभस्म -॥- ते १ गुंज
अभ्रकभस्म -॥- ते १ गुंज
महायोगराजगुग्गुळ १ ते २ गुंजा
१ पुडी अनुपान– मध. दिवसांतून ३ वेळां.

३) बाह्यलेप– लेपगोळी नं. १.

एक देशोत्थित शोथाचा विचार चरकानें सूत्रस्थान अ. १८ यामध्यें सूत्र १९ ते ३६ अखेर केला आहे. त्यामध्यें शोथज रोगांचा विचार दोषांच्या संप्राप्तिमधून मांडला आहे. त्या विकारांची यादी खालीलप्रमाणें दिली आहे. उपजोव्हिका, गलशुण्डिका, गलगण्ड, गलग्रह, विसर्प, पिडका, तिलका, पिप्लवा, व्यंग, नीलिका, शंखक, कर्णमूल, प्लीहावृद्धि, गुल्म, वृद्धि, कुक्ष्यूदर, आनाह, अधिमांस, अर्बुद, जिव्हामूल, रोहिणी.

या सर्व शोथजन्य विकारांची चिकित्सा तत् तत् प्रकरणांत येत असल्यामुळें येथें त्याचा विचार केला नाहीं.

वर सांगितलेल्या शोथज विकाराशिवाय आज आढळून येणाऱ्या फुप्फुसावरणशोथ, हृदय आवरणशोथ यांचा विचार चरकाच्या वरील विचारसरणीनुसार या ग्रंथांत केला आहे. याचप्रमाणें अनेक विकारांचा विचार करावा लागेल.

आगन्तुशोथ व विषजशोथ (एकदेशीय) यांचा विचार येथें करण्याचें मनांत असूनहि विस्तारभयास्तव करतां येत नाहीं. कदाचित

या चिकित्सेचा दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा योग वाचकांनीं आणून दिल्यास या शोथांचा तेथें विचार अवश्य केला जाईल.

सार्वदेहिक शोथ हा निरनिराळ्या व्याधींचा उपद्रव किंवा लक्षण म्हणून उत्पन्न होतो. म्हणून त्या त्या रोगाला अनुसरून चिकित्सा करावी. ती त्याठिकाणीं दिली आहेच.

आहार– एकदेशीय शोथ जो असतो तो तत्स्थानीन विकार करतो. सबब त्या विकाराला अनुसरून आहार द्यावा लागतो.

अर्बुद-- गण्डमाला-- अपची

व्याख्या–

गोल, स्थिर, अल्प वेदनायुक्त, खोल धातुमध्यें पसरलेला, सावकाश वाढणारा, क्वचित् पाक होणारा असा मांसाचा उपचय होऊन उत्पन्न होणारा व शरीरांतील निरनिराळ्या अवयवांत होणारा जो शोथ त्यास अर्बुद असें म्हणतात. ही अर्बुदें रक्त, मांस, मेद, अस्थि, त्वचा या दूष्यांच्या ठिकाणीं होतात. सुश्रुतानें गात्र प्रदेशामध्यें होतात असें सांगितलें आहे. त्याठिकाणीं अवयवांचा उल्लेख करणें आवश्यक आहे.

रक्तार्बुद लक्षणें

यामध्यें मांसांकुर असतात. उत्सेध असतो. या अर्बुदाचें स्वरूप कॉलीफ्लॉवरसारखें असतें. पाक होऊन यांतून रक्तस्राव होतो. थोडा कशाचाही स्पर्श व धक्का लागला असतां त्यांतून रक्तस्राव होतो. अशा वरचेवर होणाऱ्या रक्तस्रावामुळें पांडुता येते. हा विशेषतः कंठ, जिव्हा, गिलायु, तालू, हिरड्या, जननेंद्रिय, नासिका, याठिकाणीं होतो. यामध्यें वेदनाहि असतात. यांतूनच आसपासच्या ग्रंथिमध्यें शोथ उत्पन्न होऊन तेथें अर्बुद सुरूं होतो. अशा इतर ठिकाणीं उत्पन्न झालेल्या अर्बुदास द्विरर्बुद असें म्हटलें आहे. हा फुफ्फुसें, अन्ननलिका, आमाशय, आंत्र, गुद, यकृत, क्लोम (अग्न्याशय), प्लीहा, वृक्क, पौरुषग्रंथि, मस्तिष्क

चिकित्सा

हीरकभस्म १/१० गुंज
एक पुडी. अनुपान– मध. सकाळीं द्यावी. या रोगाच्या आरंभी जर हीरकभस्म सुरूं केलें तर व्याधी नाश होतो. व्याधीची (व्यक्तता) पूर्ण वाढ झाल्यानंतर जर हीरकभस्म दिलें तर त्याच्या पुढील अवस्था कमी होतात. व या व्याधीपासून पुढें होणारे उपद्रव त्यांच्यावरहि कांहीं प्रमाणांत परिणाम होतो असा अनुभव आहे. हें भस्म त्रिदोषघ्न व रसायन कार्य करणारे आहे व हें व्याधी प्रत्यनीक म्हणून कोणत्याहि स्थानीं असलेल्या रक्तार्बुदावर देतां येतें.

कज्जली (१ पारा २ गंधक) २ ते ४ गुंजा १ पुडी. अनुपान– तूप. दुपारीं व संध्याकाळीं द्यावी.

बस्ति, उंडूक, गर्भाशयमुख, गर्भाशय, फलकोश, पित्ताशय श्वासनलिका, स्वरयंत्र, उदरावरण, बृहदांत्र, गलगण्ड ग्रंथि, योनिओष्ठ, वृषण इ. अंतरावयवामध्येंहि होतो. व त्या त्या स्थानाला व त्यांच्या कार्याला अनुसरून लक्षणें होतात.

टीपः– रक्तार्बुद म्हणजे ज्याला हल्लीं ब्लड कॅन्सर (Leukaemia) म्हणतात तो हा विकार नव्हे. आयुर्वेदाचें वर्गीकरण निराळ्या दृष्टिकोनांतून आहे, ज्या अर्बुदांतून रक्तस्राव होत असतो, व ज्यामध्यें आरंभक पित्तदोष आहे. त्यास रक्तार्बुद असें म्हटलें आहे. या अर्बुदामध्यें पित्तदोष, रक्त व मांस हो दूष्यें आहेत.

उपद्रवानुसार विचार

रक्तस्राव–

चंद्रकला १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म २ गुंज
मौक्तिकभस्म ॥ गुंज
आमलकीरस ४ गुंजा
१ पुडी. अनुपान–वासास्वरस. (पुटपाक) दिवसांतून ३–४ वेळां.

गर्भाशयांतून अति रक्तस्राव असल्यास — वरील पुड्याबरोबर अशोकघन २–२ गुंजा द्यावा.

ज्वर–

कांहीं कांहीं रोग्यांत ज्वर येत असतो. तो सतत राहतो, वा ताप येतो तो घाम येऊन उतरतो व पुनः चढतो.

सुवर्णसूतशेखर ॥ ते १ गुंज
लक्ष्मीनारायण । ते ॥ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण ४ गुंजा
१ पुडी. अनुपान– मध. दिवसांतून ३–४ वेळां.

वेदना–

फुफ्फुस, गर्भाशय, गिलायु, तालू वगैरे मुखस्थ, कर्ण इ. ठिकाणीं होणाऱ्या अर्बुदामध्यें वेदना होतात.

हीरकभस्म सुरू केल्यानंतर या वेदना बहुतेक कमी होतात. तरी पण या वेदना कमी होण्यासाठीं 'गन्धकद्रुति' वेदना स्थानीं लावावी. किंवा १ ते २ थेंब दुधामधून पोटांत द्यावी.

दृश्य अर्बुदावर स्थानिक उपचार.

गन्धकद्रुति मांसांकुरावर दिवसांतून २ वेळां लावावी.

अन्ननलिकेंतील अर्बुद–

खानदोडकीचें गन्ध १ ते २ चहाचे चमचे पोटांत द्यावें. हें गन्ध अन्ननलिकेच्या स्थानीं लेपासारखें बसतें. व तेथील अर्बुदावर शोथघ्न असा परिणाम होऊन अर्बुदाची वृद्धि कमी होते.

आमाशयार्बुदः–

आमाशयाच्या अधोमुखापाशीं जास्त प्रमाणांत अर्बुद होतो. किंवा अन्ननलिकेचे आमाशयांतील टोंक व आमाशयाचें वरील मुखाचे संधिस्थानीं अर्बुद होतो. अखेरीस आमाशयाचे मोठ्या वक्रभागीं होतो. अर्बुदाची सुरुवात श्लेष्मल त्वचेच्याखालीं होते. नंतर स्नायुकोश व पुढें तसाच वाढून उदरावरण विकृत होतें. आमाशयाच्या अधोमुखाचा ज्या प्रमाणांत संकोच असेल त्या प्रमाणांत लघ्वंत्रामध्यें अन्न जाणें बंद होतें. व त्यामुळें आमाशयांत अन्न अधिक सांठून राहतें, म्हणून आमाशय विस्तृत होतो. येथें अन्न सांठल्यानें

प्रारंभी
आमाशयांत कोठेंहि स्थानिक अर्बुदाची शंका आल्यास प्रथम हीरकभस्म सुरू करावें.
हीरकभस्म १/१० ते १/८ गुंज
१ पुडी. अनुपान– मध व तूप. रोज सकाळीं द्यावें.
आमाशयाचें अधोमुख बंद झाल्यास कायचिकित्सेचा उपयोग होत नाहीं. रक्तस्राव असल्यास पूर्वीं सांगितलेली चिकित्सा करावी.

आंबट वांती होते. कधीं कधीं रक्ताची वांती होते. अग्निमांद्य, सतत वेदना, कार्श्य, पांडुता, ही लक्षणें होतात. अन्ननलिकेच्या अधोमुखास झाल्यास अन्न आमाशयांत उतरणें कठीण होऊन वरची अन्ननलिका फुगते. अर्बुदावरची श्लेष्मल त्वचा फाटून व्रण होतात. तें व्रण चरत जाऊन त्याखालील रक्तवाहिन्या फुटतात व खूप रक्तस्राव होतो. आमाशयास छिद्र पडल्यास उदरावरण-शोथ व अंतर्विद्रधि होतो. चिरकारी दाहामुळें शेजारची इंद्रियें यकृत्, क्लोम इ. आमाशयास चिकटतात. याच्या व्रणाची व्याप्ति फुफ्फुसावरण, आंत्र, उदरावरण व हृदयाचें आवरणापर्यंत पोंचते. व यापैकीं एकामध्यें व्रण होतो, इंद्रियाचा दाह होतो व मरण येतें. यकृत्, लसिकाग्रंथि व आंत्रावरण या ठिकाणीं त्यापासून द्विरर्बुद होतें.

आंत्रार्बुद

लक्षणें–

आंतड्याचें व तत्समीपस्थ इंद्रियांचें कार्य बिघडल्यानें अवष्टंभ, आंत्रदाह, आंत्रव्रण, रक्तातिसार ही लक्षणें होतात व त्यामुळें तीव्र पांडु, कृशता, वेदना, मलावरोध,

ही असाध्यावस्था आहे. तरी पण अशा रोग्यांत आयुर्वेदीय चिकित्सा केलेली आहे.

वांति, अग्निमांद्य, अजीर्ण होतें. वेदना दोन प्रकारच्या असतात, १) सतत, मंद व स्थानिक २) मधून मधून, तीव्र व विशेषत: मलविसर्जन कालीं. बहुतेक मलावरोध असतो. कांहीं रोग्यांत अतिसारहि होतो. आंत्रावरोध पूर्ण झाल्यास मलमिश्रित वांति, आध्मान, आटोप, पोटांत कठीण, चल, स्पर्शासहत्व असलेली, ग्रंथियुक्त गांठ लागते. आंत्रावरोध पूर्ण झाल्यावर आंतड्याची पुर:सरण क्रिया स्पष्ट दिसतें. रक्त व पूं मिश्रित मल, मल चापट किंवा इतर आकृतिविशिष्ट असतो. मांस पाक झाल्यास मलामध्यें बारीक बारीक मांसाचें तुकडे येतात.

हें अर्बुद आंत्राभोंवती आंगठीप्रमाणें किंवा गांठीप्रमाणें असूं शकतें. व्रणावस्था लवकर येते. उदरावरण, वपा, तेथील लसीका, ग्रंथी यामध्यें द्विरर्बुद होतें. स्थूलांत्रांत नैसर्गिक वळणाचें ठिकाणीं (Flexuses) किंवा उपगुदाचें भागीं विशेषेंकरून आढळतें.

अग्निमांद्य, आनाह, आटोप, मलावरोध, छर्दि, वेदना असल्यास	ताम्रपर्पटी १ ते २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा १ पुडी अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां.

तीव्र शूल, आटोप.	कनकसुंदर १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– लिंबुरस, साखर किंवा मध. २।२ तासांनीं शूल कमी होईतों पुढचा देणें.
रक्तातिसार.	कुटजघन २ ते ४ गुंजा बेलफळमगजचूर्ण ४ गुंजा मोचरसचूर्ण २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. याबरोबर ताम्रपर्पटी चालूं ठेवावी.
मांसपाकावस्था व तज्जन्य रक्त, पूं मिश्रित मांसखंडयुक्त अतिसार.	लोकनाथ (सुवर्णयुक्त) १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– तूप, मध. दिवसांतून ३ वेळां. याबरोबर त्रिफलगुग्गुळ २ ते ४ गुंजा १ पुडी अनुपान– पाणी किंवा मध. दिवसांतून ३ वेळां. बाह्य लेप– खानदोडकीचें गंधाचा.
मलावरोध.	मात्राबस्ति देणें. विरेचन देणें.

गुदस्थ अर्बुद

लक्षणें–

गुदाचें ठिकाणीं किंवा गुदाचें वरच्या भागीं अर्बुद असतां त्यामुळें गृध्रसी होते. शिवाय मलावरोध, प्रवाहण, रक्तमिश्रित मल, किंवा रक्तस्राव होतो. पुढें पूय प्रवृत्तीहि होते. हें वाढून बस्तीचें पौरुष ग्रंथीचें ठिकाणीं द्विरर्बुद होतें. व वृक्कदाह होऊन रोगी मरण पावतो. गुदद्वारावाटें परीक्षा केल्यास बोटास टणक, वेडेवांकडे, व गाठाळ अर्बुद लागतें.	सुरवातीस हीरकभस्म १/६० गुंज १ पुडी अनुपान– तूप, मध. फक्त सकाळीं देणें. किंवा शस्त्रकर्म करून हीरकभस्म चालूं केल्यास बस्ति किंवा पौरुषग्रंथि या ठिकाणीं अर्बुद होण्याची भीति नसते.

यकृदार्बुद किंवा यकृत् मांसार्बुद

हा बहुतेक द्विरर्बुद स्वरूपी असतो. क्वचित् उजव्या खांद्यांत वेदना, प्रथम सौम्य नंतर तीव्र, कृशता, पांडुता, बेंबीपर्यंत यकृताची वाढ होते. त्याची कडा वेडीवांकडी टणक, स्पर्शासहत्व, गांठाळलेलें, पुढें पुढें गांठींत खड्डे, तीव्र कावीळ, जलोदर, उदरावरण शोथ व यकृत्वृद्धि यामुळें शूल, ज्वर.

हीरकभस्म १/१० गुंज
१ पुडी अनुपान– तूप, मध. फक्त सकाळीं देणें.
कज्जली २ ते ४ गुंजा
१ पुडी अनुपान– तूप, मध. दुपारीं व संध्याकाळीं देणें.
पारदभस्म -।- ते -।।- गुंज
१ पुडी अनुपान– मध. सकाळीं व रात्रीं देणें.

गर्भाशयार्बुद–

प्रकार २–

१) विशेषतः बहुप्रसव स्त्रियांमध्यें गर्भाशयमुखाला होणारा २) वंध्या व बहुप्रसवा स्त्रियांना वयाच्या ५५ ते ६५ च्या दरम्यान गर्भाशयाला होणारा.

हीरकभस्म १/१० गुंज
१ पुडी अनुपान– तूप, मध. सकाळीं द्यावी.

१) गर्भाशयमुखार्बुद लक्षणें–

विशेषतः तरुण स्त्रियांमध्यें लवकर वाढतो. सुरवातीच्या अवस्थेमध्यें योनी परीक्षणामध्यें गर्भाशयमुख कठीण, अंकुरयुक्त असतें. बोटाला त्यांतून सहज रक्त लागतें. यावरून याचें अर्बुद आहे असें सहज अनुमान करता येतें.
२) पुढील अवस्थेमध्यें कॉली फ्लॉवरप्रमाणें असते. व त्यांतूनहि

अल्पशा स्पर्शानें रक्त येतें. तें आजूबाजूस वर गर्भाशयाकडे पसरतें. त्यामुळें गर्भाशय आजूबाजूस चिकटतो व योनी परीक्षणामध्यें तें बोटास कठीण लागतें.
३) अत्यार्तव असते. तांबुस, दुर्गंधीयुक्त, पाण्यासारखा स्राव सारखा असतो. अशक्तता, दुर्बलता, पांडुता आल्यावर वेदना सुरू होतात व त्या गृध्रसीप्रमाणें असतात.

सुरवातीच्या अवस्थेंत रोगाचें निदान झाल्यास रोग बरा होऊं शकतो.

दुसऱ्या अवस्थेंत वेदना, अत्यार्तव, श्वेतप्रदर, स्थानिक शोथ, मांसांकुर.

हीरकभस्मानें कमी होतात.

२) गर्भाशयस्थ अर्बुद लक्षणें–

पाण्यासारखा स्राव एकदम जोरानें येतो. पाळीचे वेळीं अधिक रक्तस्राव व मधल्या काळांत लालसर स्राव. कांहीं रोग्यामध्यें गर्भाशयाचा आकार मोठा होतो. नंतरच्या अवस्थेंत गर्भाशय शेजारच्या भागांस चिकटून स्थिर होतो.

वरील चिकित्सा सुरवातीला केल्यास रोगी बरा होण्याची शक्यता असते.

अशक्तता, दुर्बलता, पांडुता, वेदना इ. लक्षणें होतात.

यामध्यें नंतरच्या अवस्थेंत रक्तस्राव होतो, तर गर्भाशय मुखास अर्बुद झाला असल्यास सुरवातीच्या अवस्थेंत रक्तस्राव होतो.

टीप:- अर्बुद कोणत्या स्थानीं होतात हे सुरुवातीला दिलें आहे. व उदाहरणादाखल कांहीं स्थानीं होणाऱ्या अर्बुदांची लक्षणें व चिकित्सा वर दिली आहे. राहिलेल्या स्थानीं होणाऱ्या अर्बुदांचा विचार विस्तारभयास्तव येथें करीत नाहीं. त्यांची सामान्य चिकित्सा वर दिल्याप्रमाणेंच आहे.

आहार-

मांस खाणाऱ्या लोकांत अर्बुद झाला असल्यास-	संतर्पणात्मक असावा. मांस वर्ज्य करावें.
सामान्यतः	दही, ताक, तिखट, डालडा वर्ज्य. ज्वारी, बाजरी, गहूं, भाज्या, गाईचें दूध, तूप, साधा आहार.

गण्डमाला

लक्षणें:-

कंक्षा-अंस-मन्या-गलें-वंक्षण यामध्यें कफ, मेदापासून बोर, आंवळा यांच्या आकाराच्या एवढ्या गांठी उत्पन्न होतात. यांचा पाक सावकाश होतो. मंदज्वर, कार्श्य, अरुचि, अग्निमांद्य. हा विकार चिरकारी आहे.	कांचनारगुग्गुळ २ ते ४ गुंजा वाकेरीभातें ४ गुंजा शृंगभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान- दूध-साखर. दिवसांतून ३ वेळां. बाह्य लेप- लेप नं. १ चा रात्रीं लेप करावा.

अपची-

लक्षणें-

याच गण्डमालेच्या गांठीं वरील स्थानांतच पक्व होऊन वाहात असतात व तो व्रण लवकर भरून येत नाहीं.	
कृशत्व, कार्श्य, ज्वर, पांडुता, अग्निमांद्य.	वैक्रांतभस्म १ गुंज वंगभस्म १ गुंज कांचनारगुग्गुळ ४ गुंजा शृंगभस्म १ गुंज १ पुडी. अनुपान- दूध. दिवसांतून ३ वेळां. व्रणोपचार-- व्रण स्वच्छ धुऊन गन्धकद्रुतीचा पिचु ठेवणें.
आहार-	दूध, तूप, लोणी, भाकरी, पोळी इ. संतर्पणात्मक आहार.

अम्लपित्त

व्याख्या–

विरुद्ध, विकृत, अम्ल, विदाहि, पित्तप्रकोपी असें अन्न, वर्षाऋतूतील अम्ल विपाकी जल व अन्न सेवन केल्यानें संचित झालेलें पित्त प्रकुपित होऊन अम्लपित्त बिकार उत्पन्न करतें.

सामान्य लक्षणें–

अविपाक, थकवा, उत्क्लेश, कडू व आंबट ढेंकर, जाड्य, छाती व घशांत जळजळ, अरुचि, आनाह, शूल, अग्निमांद्य, आंबट, तिखट, कडू-जळजळीत छर्दि; सकाळीं उठल्याबरोबर तोंड कडू किंवा आंबट होणें,

चिकित्सा

निदान परिवर्जन
प्रवाळपंचामृत १ ते २ गुंजा
कनकसुंदर १ ते २ गुंजा
कामदुघा १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

प्रकार–

१) उर्ध्वगामि २) अधोगामि
१) वातपित्तात्मक २) कफ-पित्तात्मक ३) वातकफपित्तात्मक.

उर्ध्वगामि लक्षणें–

हिरवी, पिवळट, निळसर, काळसर, किंचित् तांबूस, लालसर, अतिखारट, तिखट, आंबट, कडसर, मांस धुतलेल्या पाण्याप्रमाणें बुळबुळीत, कफयुक्त अशी वांति होते. जेवणापूर्वीं किंवा जेवण झाल्यावर अन्नाचें पचनकालीं कडू, आंबट वांति होते. कडू, आंबट ढेंकर येतात. घशांत, छातींत, कुक्षिभागीं जळजळ; शिरःशूल, हाता-पायाची जळजळ, अंगांत उष्णता वाटते, अरुचि, ज्वर, कंडू, अंगावर चकंदळें उठतात, पिटिका, अविपाक, उत्क्लेश इ. सामान्य लक्षणें होतात.

१) सुवर्णसूतशेखर १ गुंज
१ पुडी. अनुपान– तूप-मध. सकाळीं देणें.
२) प्रवाळपंचामृत (मौक्तिकयुक्त) १ ते २ गुंजा
कामदुघा १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– दूध. दुपारीं व रात्रीं देणें.
३) अविपत्तिकरचूर्ण १ ते १॥ मासा
१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

अधोगामि लक्षणें–

तृष्णा, दाह, मूर्च्छा, भ्रम, मोह, मळमळ, कोठ, अग्निमांद्य, रोमहर्ष, स्वेद, त्वचा पिवळी होते. हिरवट, पिवळट, काळसर, लाल, दुर्गंधियुक्त द्रवमलप्रवृत्ति होते.

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा
प्रवाळभस्म १ ते २ गुंजा
कामदुघा १ ते २ गुंजा
१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

वातपित्तात्मक लक्षणें–

कंप, प्रलाप, मूर्च्छा, मुंग्या येतात, अंग गळतें, शूल, डोळ्यापुढें अंधारी, भ्रम, मोह, रोमहर्ष. याशिवाय अम्लपित्ताची वर सांगितलेली सामान्य लक्षणें असतात.

सुवर्णसूतशेखर ·।।· ते १ गुंज
१ पुडी. अनुपान– आलेरस, साखर. यांतून दिवसभर चाटवणें.
ही लक्षणें कमी झाल्यावर अम्लपित्तावरील वर दिलेली सामान्य चिकित्सा सुरू करावी.

कफपित्तात्मक लक्षणें–

गौरव, अरुचि, थंडी वाजते, छर्दि, अंगसाद, तोंड चिकट असतें, अग्निमांद्य, बलक्षय, कण्डू, निद्रा याशिवाय अम्लपित्ताची सामान्य लक्षणें असतात. भ्रम, मूर्च्छा,

ताम्रभस्म -।- ते -।।- गुंज
अभ्रकभस्म १ गुंज
प्रवाळभस्म २ गुंजा
प्रवाळपंचामृत २ गुंजा
१ पुडी अनुपान– मोरावळा. दिवसांतून ३ वेळां.

अरुचि, छर्दि, आळस, शिर:शूल, प्रसेक व मुखमाधुर्य.

त्रिदोषात्मक लक्षणें–

वातपित्तात्मक व कफपित्तात्मक यांची उभयविध लक्षणें शिवाय कडू, आंबट, तिखट ढेकर येतात; छाती, कंठ, कुक्षिभागीं दाह. याशिवाय सामान्य लक्षणें असतात.	लीलाविलास रस १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान-- आल्याचा रस व साखर. दिवसांतून ३ वेळां.
आहार–	केवल दुग्धाहार. दूध भाकरी किंवा दूध पोळी, बिन तिखटाच्या पालेभाज्या (चुका, आंबाडी, अळू इ. अम्ल, कटु रसात्मक वर्ज) मुगाचें वरण.
वर्ज–	भात, तुरीची डाळ, मिरची, तळलेलें पदार्थ, अम्ल पदार्थ.

शीतपित्त--उदर्द--कोठ

पूर्वरूपें	**चिकित्सा**
तृष्णा, अरुचि, हृल्लास, अंगसाद, गौरव, डोळे लाल होतात.	सुवर्णमाक्षिकभस्म १ ते २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा महावातविध्वंस ·।· ते ·॥· गुंज सितोपलादिचूर्ण ४ गुंजा १ पुडी. अनुपान-- पाणी. दिवसांतून ३ वेळां. त्रिफळाभरड २ तोळे रात्रीं १०–१५ तोळे पाण्यांत भिजत घालून सकाळीं कुसकरून गाळून देणें.

लक्षणें–

कण्डू, वेदना, कांहीं रोग्यांत प्रथम छर्दि होऊन नंतर अंगावर गांधी येतात. ज्वर, दाह, शोथ विशिष्टस्थानीं येतो. उदा–हात, पाठ, तोंड, मांड्या, किंवा थंड पाण्याचा अगर थंड वाऱ्याचा स्पर्श होईल तेथें गांधी येतात. गांधी लाल असतात.	वातगजांकुश १ ते २ गुंजा प्रवाळभस्म १ ते २ गुंजा गोदंतीभस्म २ गुंजा शृंगभस्म २ गुंजा १ पुडी. अनुपान-- पाणी. दिवसांतून ३ वेळां. पूर्वरूपांत सांगितलेला त्रिफळा हिम चालू ठेवावा.

टीप:– शीतपित्त व उदर्द यांतील भेद. शीतपित्तामध्यें वात हा प्रधान तर उदर्दामध्यें कफ हा प्रधान दोष असतो.

आहार–	द्विदलधान्यें वर्ज करून बाकीचा आहार घेणें. मांस वर्ज.

विसर्प

विसर्पाचे प्रकार सात–

१) ३ दोषांचे ३, २) द्वंद्वजांचे ३, सान्निपातिक १.

१ वात २ पित्त ३ कफ.
४) अग्निविसर्प (वातपित्तात्मक)
५) ग्रंथिविसर्प (कफवातात्मक)
६) कर्दमक (कफपित्तात्मक)
७) सान्निपातिक ८) क्षतविसर्प

१) वातविसर्प लक्षणें–

वातज्वराची लक्षणें, शोथ, स्फुरण, तोद, भेद, ओढल्याप्रमाणें वेदना, रोमहर्ष; काळसर, मृदु, परुष, सदाह शोथ असतो.

ज्वर १०२ अंश ते १०३ अंश, तो विषम असतो. म्हणजे कमी जास्त होतो.

चिकित्सा

त्रिभुवन कीर्ति	-॥- ते १ गुंज
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
शृंगभस्म	१ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण	४ गुंजा

१ पुडी अनुपान– आल्याचा रस, साखर. दिवसांतून ३ वेळां.

२) पित्तविसर्प लक्षणें–

लवकर पसरतो, पित्तज्वराची लक्षणें; फोड लाल, दाह, पाकयुक्त असतात. त्याला चिरा पडतात. क्षतजविसर्पाप्रमाणें दिसतो. तीव्र ज्वर १०३ अंश ते १०५ अंश. मांस व सिरा यांचा भेद होतो. त्यामुळें हा असाध्य आहे.

लक्ष्मीनारायण	-।- ते -॥- गुंज
चंद्रकला	१ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
मौक्तिकभस्म	·।· ते ·॥· गुंज

१ पुडी. अनुपान- पाणी, दूध. दिवसांतून ३–४ वेळां.

३) कफविसर्प लक्षणें–

सावकाश पसरतो. सावकाश पाक, स्निग्ध, पांढरा असा शोथ, अल्पवेदना, तीव्र कंडू, मंदवेग ९९ ते १०१ अंश. ग्रंथिविसर्पाप्रमाणें असाध्य आहे.

दशमूलघन	२ ते ४ गुंजा
योगराजगुग्गुळ	२ ते ४ गुंजा
शृंगभस्म	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां.

टीप:– ग्रंथिविसर्पाप्रमाणें यांत जर ग्रंथि झाले नाहींत तर हा प्रकार साध्य आहे. व तसे रोगी पहावयास मिळतात.

४) अग्निविसर्प लक्षणें–

यामध्यें दोष वात, पित्त हे असतात. वातपित्तात्मक ज्वराची लक्षणें ज्वर, छर्दि, मूर्च्छा, अतिसार, तृष्णा, भ्रम, ग्रंथि, अग्निसाद, डोळचापुढें अंधेरी, अरुचि, सर्वांगाचा भाजल्याप्रमाणें दाह व स्थानिकहि तीव्र दाह असतो. ज्या ज्या भागांत तो पसरतो तेथें कृष्ण, नील, किंवा रक्त असा वर्ण येतो. अग्निनें भाजल्याप्रमाणें फोड येतात, लवकर पसरतो. हा जर वातप्रधान असेल तर मर्मस्थानीं पसरतो. अंगमर्द, संज्ञानाश, निद्रानाश, श्वास, हिक्का, अरति, मोह, शेवटीं मरण येतें.

लक्ष्मीनारायण	·।· ते ·॥· गुंज
सुवर्णसूतशेखर	·॥· ते १ गुंज
प्रवाळभस्म	१ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण	४ गुंजा

१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां

लेप– जितसाया वनस्पतीचें गंध लावणें व तो लेप वाळल्यावर त्यावर राळादि मलम लावणें.

प्रारंभी जर जितसायाचा लेप केला तर तो पसरत नाहीं. व पुढील अवस्था येत नाहींत.

दाह कमी होण्यासाठीं. राळादिमलम.

ग्रंथिविसर्प लक्षणें–

यामध्यें दोष वात, कफ, असतात. गोल, स्थूल, खर, लाल अशी ग्रथींची माला उत्पन्न होते. तीव्र वेदना, ज्वर, श्वास, कास, अतिसार मुखशोष, हिक्का, छर्दि, भ्रम, मोह, वैवर्ण्य, मूर्च्छा, अंगमर्द, अग्निमांद्य.

कफविसर्पांतील औषधें पोटांत द्यावीत.
लेप– जितसायाचें गंध, खानदोडकीचें गंध, पुनर्नवेचें गंध यांचा एकत्र उगाळून लेप करणें.

६) कर्दमविसर्प–

यांत कफ, पित्त दोष असतात. ज्वर १०३ ते १०५ अंशपर्यंत असतो. निद्रा, तंद्रा, मलावरोध, गात्र स्तब्धता, मुखलेप, शिरःशूल, अंगसाद, आक्षेपक, प्रलेप, अरुचि, भ्रम, मूर्च्छा, अग्निमांद्य, हाड फुटल्याप्रमाणें वेदना, इंद्रियगौरव, तृष्णा, स्रोतसांना लेप, स्रोतसामध्यें पसरतो. अंतर्विसर्पामध्यें, आमाशयामध्यें पसरतो. वेदना तीव्र नसतात. लोहित, पांडू, अतिपीत, काळचा, चमकणाऱ्या, मळकट, पिटिका, व गुरु, गंभीर, पाक, त्याठिकाणीं उष्णता, त्यांतून स्राव होतो. मांस चिखलाप्रमाणें होऊन गळतें. सिरा व स्नायु यामुळें स्पष्ट दिसतात. दुर्गंधि.

लक्ष्मीनारायण	׀ ते ׀׀ गुंज
वंगभस्म	१ ते २ गुंजा
सुवर्णमाक्षिकभस्म	१ ते २ गुंजा
गंधकरसायन	१ ते २ गुंजा
प्रवाळभस्म	१ ते २ गुंजा
श्रृंगभस्म	१ ते २ गुंजा

१ पुडी. अनुपान– दूध. दिवसांतून ३ ते ४ वेळां.
लेप– जितसाया गंधाचा. दाहभागीं शतधौतघृत किंवा राळधाचा मलम.

हा कर्दमविसर्प अन्तस्थहि जातो. मुखापासून सुरवात झाली असेल तर मुखापासून आमाशयापर्यंत जातो व अन्तस्थ विसर्प झाला तर तो असाध्य म्हणून गणला गेला आहे.

८) क्षतविसर्प–

हा क्षतज आहे, यामध्यें दोष वात, पित्त व दूष्य रक्त असतें. काळसर-लालसर पिटिका, ज्वर १०३ अंश ते १०५ अंश. तीव्र वेदना, तीव्र दाह,

लक्ष्मीनारायण	׀ ते ׀׀ गुंज
श्रृंगभस्म	१ ते २ गुंजा
प्रवाळभस्म	१ ते २ गुंजा
सितोपलादिचूर्ण	४ गुंजा

१ पुडी. अनुपान– तुळशीचा रस, साखर. दिवसांतून ३–४ वेळां.
प्रतिसारण– गंधकद्रुति पिटिकावर व व्रणावर लावणें.
गंधकद्रुति १ ते २ थेंब दुधांतून सकाळीं व संध्याकाळीं देणें.

आहार– केवळ दुधावर ठेवावें.

कुष्ठ

महाकुष्ठ सामान्य लक्षणें–

प्रथम थोडा ताप; चेहरा, हात पायावरची त्वचा व कान टापसलेले दिसतात. थोडी सूज असते. प्रथम त्वचेला स्पर्श सहन होत नाहीं. नंतर हळूं हळूं ती त्वचा संज्ञारहित व विवर्ण होते. वरील प्रक्रिया वारंवार होते. पसरट, उत्सेधयुक्त, लालसर, अंकुरयुक्त चट्टे भुवया, कपाळ, तोंड, नाक, कान, हात, पाय यावर दिसतात. नाक सर्वांत अधिक शोथयुक्त व लालसर दिसतें, शरीराच्या आंतील भागांतहि चट्टे पसरतात. श्वेतमंडळ, कृष्ण-मंडळ यांचा दाह होतो. दृष्टी कमी होते. शोथाचें ठिकाणीं व्रण होतात. व तें रक्तमिश्रित स्रावयुक्त असतात. हाता-पायांत तीव्र वेदना, मुंग्या येतात, तो भाग गळून पडूं लागतो. त्वचा फिक्कट, कंडूयुक्त असते. हात-पाय व तोंड यावर चट्टे उठतात. तेथील धमनी जाड व टणक होते. ३ वर्षांनीं संज्ञानाश होतो. हात-पाय यांचा आंगठा सुकतो. पांढरट होतो. त्यावर फोड येऊन चिरा पडतात. व बोटें आखडून झडून गळून पडतात.

चिकित्सा

गंधकद्रुति २ ते ४ थेंब विडयाच्या पानाला लावून सकाळीं रिकाम्या पोटीं पान चावून खावें. त्यानंतर कमीतकमी २ तास तरी आहार वा पेय घेऊं नये. याप्रमाणें सतत १ वर्षपर्यंत प्रयोग केला असतां प्राथमिक अवस्थेंतील लक्षणें नाहींशीं होतात.

आधुनिक पद्धतीनें परीक्षण करूनहि हा रोग बरा होत असल्याचा निष्कर्ष काढला आहे.

ग्रंथामध्यें सांगितलेल्या सर्व प्रकारावर वरील चिकित्सा करावी.

कानाची पाळीहि याप्रमाणें झडूं लागते. व्रणाजवळच्या लसिकाग्रंथि सुजतात. याशिवाय अपचन, अतिसार, क्षय इ. सार्वदेहिक विकार होतात. व मृत्यू येतो.

टीपः– प्राथमिक अवस्थेंत आयुर्वेदीय चिकित्सा केली असतां तो बरा होऊं शकतो.

आहार–

दूध, तूप, चपाती, भाकरी व भाज्या असा साधा आहार ठेवणें.

वर्ज– दही, तेलकट पदार्थ, डालडा, तिखट व खारट पदार्थ वर्ज करणें चांगले.

फिरंगोपदंश

बाह्य लक्षणें–	**चिकित्सा**
इंद्रियावर विस्फोट – पिटिका उत्पन्न होते. ३-४ दिवसांत द्रव जमतो व पूंहि होतो. व्रणावस्था येते, स्वच्छ ठेवल्यास ३ आठवडयांत बरा होतो. स्रावाच्या संसर्गानें इतर ठिकाणीं याप्रमाणें पिटिका होतात. जांघेमध्यें गांठ येते. तीहि पिकून व्रण होतो.	चोपचिन्यादिचूर्ण १ ते २ मासे १ पुडी. अनुपान– पाणी. दिवसांतून ३ वेळां. व्रणावर उपचार त्रिफळा क्वाथानें व्रण धुऊन गंधकद्रुति लावणें.
जांघेतील गांठीवर	१) दशांग लेप लावणें २) लेप नं. १ लावणें
पूयीभवन असल्यास	शस्त्रकर्म करावें. व व्रण रोपणासाठीं गंधकद्रुतीचा पिचु ठेवणें.

सूचना– हा व्रण व ही पहिली अवस्था लवकर बरी होते.

दुसरा प्रकार–

प्रथमावस्थेची लक्षणें–

संसर्गस्थलीं चयकालानंतर टणक व अल्परुक् असलेला फोड येतो. हा फोड पुरुषेंद्रियावरील मणी, त्यावरील त्वचा किंवा सीवनी यापैकीं एका जागीं होतो, स्त्रियामध्यें स्थूलौष्ठ किंवा सूक्ष्मौष्ठ यावर असतो. योनीमध्यें सहसा नसतो. फोड फुटून व्रणावस्था येते. व्रणाचा तळ टणक व जाड असतो. ज्या लोकांच्या इंद्रियावरचे कातडें मागें सरकत नाहीं. त्यांना हा रोग झाल्यास त्वचेखालून व्रण चरत जातो, व शेवटीं सर्व इंद्रिय व जांघेंतील ग्रंथींचा नाश करतो. प्रथम जांघेमधील लसीका ग्रंथि मोठ्या व टणक होतात. योग्य चिकित्सा केल्यास व्रण होत नाहीं व तो झाल्यास लवकर भरून येतो.	१ भाग शुद्ध पारा, २ भाग शुद्ध गंधक घालून तयार केलेली कज्जली १ मासा १ पुडी. अनुपान– तूप. सकाळीं व संध्याकाळीं देणें. कज्जली देत असतांना मीठ वर्ज करावें.

व्रणावर	व्रणधावन त्रिफला–कषायानें किंवा रसकर्पूर २ गुंजा व चुन्याची निवळी २० तोळे एकत्र घोटलें असतां काळें मिश्रण तयार होतें. त्यानें व्रण धावन करावें. १ भाग कज्जली व २ भाग पांढऱ्या काताचें चूर्ण चांगलें मिश्र करून तें व्रणावर टाकावें.

द्वितीयावस्था लक्षणें–

व्रणानंतर २ ते ६ महिन्यांनीं द्वितीयावस्था सुरू होते. पांडु, ताप, सांधेदुखी, अस्वास्थ्य, त्वचेवर पुरळ, फोड उठतात. व्रण होऊन, त्यावर स्रावाचे थर जमतात व जाड खपली त्यांवर येते. शिवाय विविध आकाराच्या पिटिका दोन्ही हात, पाय व शरीराच्या दोन्ही बाजू यावर येतात. यांना वेदना व कंडू नसते. त्या आपोआप नाहींशाहि होतात. लाल असतात. स्नायूच्या	१) पाण्यांत बुडणारे दोन मोठे बिब्बे घेऊन एका बिब्याचे २ तुकडे करावे. तें -।- शेर दुधांत टाकावें व -।- शेर पाणी टाकून मंदाग्निवर पाणी आटवावें. व दूध शिल्लक राहिल्यावर बिब्बे काढून टाकावेत. ओठांस तूप लावून तें दूध सकाळीं प्यावें. अशारीतीनें हा प्रयोग महिनाभर करावा. २) व्याधीहरण १ गुंज सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं तूप मधांतून व्याधीहरण देणें. व यावर आहार- तूप, साखर, चपाती किंवा दूध, साखर, चपाती

आकुंचन होणाऱ्या भागावर, पोटावर मागें, पुढें, कपाळ व डोक्यांतील केसांळ भागाच्या कडेला पिटिका येतात. व्रण बरा झाल्यावर तेथें पातळ, पांढरी, वाटोळी व्रणवस्तूची खूण राहते.

घशाच्या कमानी, गिलायु, उपजीव्हिका, पडजीभ, मृदु तालु, जीभ, गालांचे आंतील भाग, ओंठ यावर उथळ व्रण होतात.

ओलसर भागांवर मांसकीलक येतात.

कोपर, जांघ व मान या ठिकाणच्या लसिकाग्रंथी मोठ्या टणक होतात.

सव्रणशुक्र होतें. याचा चिरकारी दाह होतो.

अस्थ्यावरण दाह, हाडावर लहान लहान गांठी येतात. संध्यावरणदाह असतो. Choroid & Retina यांचा दाह होतो. मस्तिष्क, नाडी, मज्जातंतु विकार, वृषणदाह, उपवृषण दाह होतो.

द्यावी. इतर वेळीं भूक लागली असतां दूधच प्यावें. बाकीचा आहार घेऊं नये. असें पथ्य दोन महिने केले असतां वरील सर्व उपदंशजन्य लक्षणें बरी होतात व कहान टेस्टहि नकारात्मक येतें.

तृतीयावस्था लक्षणें–

ही अवस्था लगेच येते किंवा २० ते ३० वर्षानींहि ही अवस्था सुरूं होते. ठिकठिकाणीं गांठीं होतात. त्वचेमध्यें असल्यास फुटून व्रण होतो. व्रणाच्या कडा कातरल्या-

अष्टमूर्ति ½ ते ¼ गुंज १ पुडी अनुपान– तूप, मध. सकाळीं व रात्रीं द्यावा.

२) गंधक रसायन १ ते २ गुंजा १ पुडी अनुपान– दूध. दिवसांतून ३ वेळां.

प्रमाणें, व्रण वाटोळा, व्रणाचा तळ धुवट चामडयाप्रमाणें असतो. एका स्थानांतील व्रण बरा झाला असतां तेथेंच पुनः शोथ वा व्रण होत नाहीं. तेथला व्रणवस्तु पातळ, मृदू व सफेत असतो.

या गांठीहि कोठेंहि होऊं शकतात. पण सामान्यतः मुख, घसा, जीभ, उपगुद, वागिन्द्रिय, वृषण व अस्थि याठिकाणीं होतात.

नाक, ओंठ व कपाळ या ठिकाणीं चर्मरोग होतो.

याचा उपद्रव म्हणून कलायखंज वातविकार होतो. याचप्रमाणें यामुळें यकृत्, जीभ, उपगुद, रोहिण्या व वृषण विकृत होतात.

हाडें कठीण होतात. टाळू, नासा व शिर या ठिकाणीं गाठीं उत्पन्न होतात. टाळू व नाक यांना भोकें पडतात. नाकाचा तरुणास्थि झिजून केवळ भोकें शिल्लक राहतात.

व्रण असल्यास, त्वग् विकृति असल्यास

गंधकद्रुतिचा उपयोग करावा.

आहार–

उपदंशजन्य कोणत्याहि अवस्थेमध्यें तूप, साखर, चपाती, दूध हा आहार ठेवावा. इतर कांहींहि आहार घेऊं नये. या आहारानें थकवा आल्यास कांहीं दिवस हा आहार बंद करावा व नंतर पुनः सुरूं करावा.

उपदंशजन्य संतति होत असल्यास	व्याधीहरण १ ते २ गुंजा १ पुडी. अनुपान– तूप. सकाळीं व संध्याकाळीं २ वेळां. पतिपत्नींना २ महिने सतत द्यावें. तेव्हां आहार वर सांगितलेला ठेवावा.

औषधांचें पाठ

१) **लाक्षाचूर्ण–** लाखेच्या तांबडया कांडया मिळतात. त्यांचे वस्त्रगाळ चूर्ण करून वापरणें.

२) **मयूरपिच्छाभस्म–** मोराच्या पिसाची जाळून केलेली मषी.

३) **भल्लातकतैल–** बिब्याचे तुकडे करून त्याचे पातालयंत्रानें तेल काढून घेणें.

४) **नवसारादिचूर्ण–** शुद्ध नवसागर ५० ग्रॅम, यवक्षार ५० ग्रॅम, सैंधवचूर्ण ५० ग्रॅम, मिरेचूर्ण १०० ग्रॅम, भाजलेल्या जिऱ्याचें चूर्ण १५० ग्रॅम, या सर्वांचा एकत्र खल करणें.

५) **आमलकीरस–** आवळयांचा रस काढून उन्हात वाळवून घेणें.

६) **लेपगोळी** नंबर १– जितसाया ८०० ग्रॅम, पुनर्नवा २०० ग्रॅम, शुद्ध शिलाजित २०० ग्रॅम, अशुद्ध बचनाग २०० ग्रॅम, काळाबोळ ४०० ग्रॅम, चित्रक ४०० ग्रॅम, शुद्ध गुग्गुळ १२०० ग्रॅम, शेंदुर २०० ग्रॅम, बिब्बे २०० ग्रॅम, डिंक ४०० ग्रॅम

गुग्गुळ, शिलाजीत व काळाबोळ यांत इतर सर्व द्रव्यें भिजतील इतके पाणी घालून ती विरघळे पावेतों शिजवावें. नंतर त्यांत इतर द्रव्यांचें वस्त्रगाळ चूर्ण घालून खल करून त्याच्या गोळया करून वाळवून घेणें.

७) **सोमलताचूर्ण–** सोमलता नांवाची वनस्पती कलकत्त्यास मिळते. तिच्या बारीक कांडया मिळतात त्यांचें चूर्ण.

८) **नारिकेलत्वक्क्षार–** नारळाच्या कवटीस मोकळया जागेंत अग्नि द्यावा. त्या पेटल्यावर त्यावर झाकण घालावें म्हणजे त्याचा कोळसा होतो. त्या कोळशाचें चूर्ण करून घ्यावें.

९) **श्यामावटी–** खुरासनी ओव्याचा घन घेऊन त्याच्या गोळया कराव्यात.

१०) **तारकेश्वररस–** रसचंडांशु. प्रमेहचिकित्सा.

शुद्धिपत्रक

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२०	१	विटसंग	विट्संग
२९	३०	रलपर्पटी	रसपर्पटी
७६	९	शलाकेन	शलाकेनें
८९	२२	नारीकेलत्वकक्षार	नारिकेलत्वक्क्षार
९२	१२	प्रारंभ	प्रारंभी
९९	३	अन्तर्शोथ	अन्तः शोथ
१२२	४	संमूच्छनेनें	संमूर्च्छनेनें
१३६	२५	हृदाग्राचें	हृदग्राचें
१४६	६	हृदावसाद	हृदयावसाद
१४८	१७	स्पृशेद्ङ्गुलिभिः	स्पृशेदङ्गुलिभिः
१४९	८	शोणिस्रोतः	शोणितस्रोतः
१५०	१	षट्त्रिशदयौवने	षट्त्रिशद् यौवने
१५०	९	१ पलास २१ म्हणजे	१ पलास २९ म्हणजे
१५०	२३	प्रभञ्जनो ज्ञेय	प्रभञ्जनो ज्ञेयो
१५५	१०	नाडीतंन्तुसमा	नाडीतन्तुसमा
१५९	७	वस्तुतस्तिर्यगादिम–पामस्तीति	वस्तुतस्तिर्यगादिकम–पामस्तीति
१५९	७	केवल	केवलं
१९१	२७	भृशाम्	भृशम्
२१०	२३	स्मृतिः	स्मृतः